ज्ञानदीप लावू जगी

पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : माझी संसारयात्रा

लेखक : गोविंद सखाराम सरदेसाई

प्रकाशक : कर्नाटक हाऊस , मुंबई

प्रकाशन वर्ष : १९५६

मूळ ग्रंथ प्रत : लो टिळक ग्रंथ संग्रहालय, वाई

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प
अंकेक्षण रूपांतर - २०१९

६४

लो. टिळक ग्रंथसंग्रहालय
वाई (जि. सातारा)

क्रमांक 1878/128

ग्रंथाचे नाव माझी संसारयात्रा

लेखकाचे नाव सरदेसाई गोविंद सखाराम

विषय चरित्र - साहित्यिक

६ 1878

18178

माझी संसारयात्रा

गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए., डी. लेट्
रियासतकार

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

मूल्य सहा रुपये

सर्वाधिकार
लेखकाधीन

पहिली
आवृत्ति
१९५६

मुद्रक
वा. ग. ढवळे,
कर्नाटक मुद्रणालय,
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक
के. भि. ढवळे,
कर्नाटक हाउस,
चिराबाजार, मुंबई २

माझी

संसारयात्रा

गोविंद सखाराम सरदेसाई

प्रस्थान

'सारखें कांहीं तरी काम हातांत पाहिजे ह्या दृष्टीनें मीं हें 'संसारयात्रा' प्रकरण मुद्दाम हातीं घेतलें. कदाचित् हेंच माझें अखेरचें लेखन ठरेल,' अशा समारोपात्मक शब्दांत रियासतकार सरदेसाई ह्यांनीं समाप्त केलेलें हें आत्मचरित्र आम्ही वाचकांच्या हातीं देत आहों.

रियासतकारांच्या जीवनाचीं ९० वर्षें गतसालीं पुरीं झालीं. अत्यंत समाधानानें त्यांचा प्रवास चालला आहे. ह्या दीर्घ आयुष्यांत त्यांना आलेले विविध भलेबुरे अनुभव त्यांनीं आपल्या ह्या आत्मचरित्रांत ग्रथित केलेले आहेत. ह्या बाबतींत त्यांची भूमिका अगदीं विनम्र आहे. लोकांना संदेश देण्याचा किंवा उपदेश करण्याचा त्यांचा हेतु नसून उपयुक्त अशा आठवणी व अनुभव ह्यांचा संग्रह करणें एवढेंच उद्दिष्ट त्यांनीं स्वतःपुढें ठेवलें आहे. गेल्या नव्वद वर्षांत स्वतःजवळ जमलेला प्रचंड लेखसंभार व पत्रसंग्रह ह्यांचा "नाश करण्याची छाती होत नाहीं, तेव्हां त्यांतील मथितार्थ स्वतंत्र लिहून" काढून त्यांनीं हें स्वानुभवाचें नवनीत नव्या पिढीपुढें ठेवलें आहे.

तेव्हां हें आत्मचरित्र हल्लीं रूढ असलेल्या पद्धतीचें नाहीं, हें ध्यानांत घेऊनच वाचलें पाहिजे. आतां आयुष्याच्या अखेरच्या काळांत पूर्वी, फार पूर्वी सोसलेल्या यातना व मानखंडना, लढलेले वादविवाद नि भांडणें, ओढवलेले दारुण प्रसंग आणि संकटें, त्याचप्रमाणें मानवी सौहार्दाचा नि जिव्हाळ्याचा आलेला प्रत्यय, उपभोगलेला आनंद नि सुख ह्या सर्वांचीच उत्कटता नाहींशी झाली आहे. त्यामुळें वाढलेलें मनोवैभव हाच जीवन संपवितांना जवळ राहिलेला ठेवा, हीच भूमिका ह्या चरित्रलेखकाची आहे व ह्या दृष्टीनेंच त्यानें लिहिलेल्या आत्मचरित्राचें रसग्रहण केलें पाहिजे. रियासतकारांनीं कटुता निर्माण होऊं शकेल अशा प्रसंगांचा व व्यक्तींचा उल्लेख आवर्जून वगळला आहे, हेंही त्यांच्या आजच्या शांत मनोधारणेचें द्योतकच आहे.

गेल्या शंभर वर्षांत महाराष्ट्रांत थोर पुरुषांची जी मालिका निर्माण झाली, तींत रियासतकारांचें स्थान निःसंशय अढळ आहे. बडोद्याचे श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड ह्यांचे रीडर व राजपुत्र शिक्षक म्हणून त्यांनीं ३५ वर वर्षें काम केलें. ह्या अवधींत त्यांना अनेक बरेवाईट अनुभव आले. नोकरीची परतंत्रता सोडून उर्वरित आयुष्य एकाद्या शांत ठिकाणीं इतिहासलेखनांत घालवावें अशी दुर्दम्य इच्छा त्यांच्या मनांत बळावून त्यांनीं १९२५ मध्यें महाराजांचा अखेरचा निरोप घेतला. इतिहासलेखनाचें कार्य त्यांनीं १८९८

पासूनच सुरू केलें होतें. तेंच अखंडितपणें ते आजतागायत करीत आहेत. आज 'रियासतकार' म्हणून त्यांना अखिल भारतीय कीर्ति लाभली आहे, तरी देखील विनम्रभाव हाच त्यांच्या मनोवृत्तीचा स्थायीभाव राहिला आहे.

रियासतकारांचें बहुतेक लेखन प्रकाशित करण्याचा मान आम्हांला मिळाला आहे. आतां त्यांचें हें आत्मवृत्त प्रसिद्ध करीत आहों. तरुण पिढीला त्यापासून बरेंच शिकतां येईल व ध्येयनिष्ठा व व्यासंग ह्यांचें महत्त्व समजून येईल. जीवनाच्या महासागरांतील रियासतकारांसारखे दीपस्तंभ आजच्या तरुणांना सतत मार्गदर्शन करीत राहातील. 'सुखं वा यदि वा दुःखं प्रियं वा यदि वाऽ प्रियम्। प्राप्तं प्राप्तं उपासीत हृदयेनापराजितः ॥' हाच रियासतकारांचा संदेश आहे.

प्रकाशक

अनुक्रमणिका

१. शिक्षणाचे सुयोग

१. अंतरंगींचे पडसाद. २. पूर्वजांच्या आठवणी. ३. माझी आई. ४. माझें बालपण, मराठी शाळा. ५. दैन्यावस्था. ६. रत्नागिरीचीं पांच वर्षे. ७. कॉलेजचीं चार वर्षे. ९–४८

२. ज्ञानार्जनाची संधि

१. माझे प्रवास. २. अनुभवानुरूप राहणी. ३. माझें वाचन व अभ्यास. ४९–७१

३. स्मरणीय अनुभव

१. अत्यंत दुःखाचा दिवस. २. माझें गाजलेलें प्रायश्चित्त. ३. जेव्हांच्या तेव्हां, जेथल्या तेथें. ४. कामशेतचा निवास. ७३–९०

४. सयाजीरावांची सेवा

१. आरंभींचा गोडवा. २. उतरती कळा. ३. परिणामांतील कटुता. ९१–११२

५. आमचें कौटुंबिक जीवन

१. स्वतंत्र धंदा. २. शेतीचे प्रयोग. ३. बिलिमोऱ्याचा कारखाना. ४. गोड शेवट. ११३–१३३

६. ऐतिहासिक पत्रसंभार

१. माझी भूमिका. २. चतुर्विध साह्यकर्ते, न्या. रानडे. ३. पारसनीस. ४. किंकेड. ५. साने, भावे, आठल्ये. ६. बा. ना. देव. ७. चिंतामणराव वैद्य. ८. नरसोपंत केळकर. ९. मुनीर हुसेन किडवै व मायर्स. १०. लॉर्ड लिटन. ११. आणखी सन्मान्य व्यक्ति. १२. अपरिचितांकडून अभिनंदन. १३. दादासाहेब मावळंकर. १३५–१७६

७. माझे सत्कार-समारंभ

१. रावसाहेबी ता. १ जानेवारी सन १९३२. २. रावबहादुरी ता. १० मे स. १९३७. ३. साडेतीन वर्षांचा अहेर, सातारा ता. २ नोव्हेंबर स. १९३४. ४. एक्काहत्तरावा वाढदिवस पुणें, ता. २४ मे स. १९३५. ५. कामशेत सप्ताह ऑक्टोबर ता. १ ते ७ स. १९३८. ६. इतिहासमार्तंड धुळें राजवाडे संशोधन मंडळ, १९ जानेवारी स. १९४६. ७. बडोदेकरांचें मानपत्र ता. २ मार्च स. १९४७. ८. उपसंहार व नंतर. १७७–२०५

८. खांचखळगे

१. माईनीं लिहिलेल्या आठवणी. २. तेव्हां व आतां. ३. माझे आजार. ४ प्रस्तुत. २०७–२३१



गो. स. सरदेसाई.

माझ्या वडिलांनीं
‘ तूं विष्णुसहस्रनाम रोज’ म्हणतोस
ना ? ’ असें मला वारंवार लिहिलें आहे.

माझ्या
आईच्या ठिकाणीं
मृदुता, कनवाळूपणा जास्त होता.

२९-२-१८८४ रोजीं
घरीं आलेली लक्ष्मी

माझ्या एकंदर जीवनोद्योगांत माझी कुटुंबिनी गंगूबाई ह्यांचें अंग मुख्य

शामकान्त मी श्रीवत्स माई [१९०५

पुढची खुर्चीवरची रांग

चिमणाबाई सयाजीराव स्पष्ट आहेत.
सयाजीरावांच्या पुढ्यांत धैर्यशील आणि त्यांच्याजवळ संपतरावपुत्र सीताराम जमिनीवर बसलेले
महाराजांच्या डाव्या हातास इंदिराराजे.
इंदिराराजांच्या डाव्या हातास फत्तेसिंग.
चिमणाबाईंच्या उजव्या हातास शिवाजीराव.
फत्तेसिंगरावच्या मागें उभा मी.

मागील उभ्या मंडळीमध्यें

भाऊसाहेब गायकवाड, जिजाबा मोहिते, डॉ. बाळाभाई नानावटी, प्रो. मसानी.
माझ्या डाव्या हातास लिमये.
चिमणाबाईंच्या मागें जयसिंगराव उभे आहेत.

आबा भाऊ

मी नारायणराव

चौघे बंधु सहकुटुंब : १९३३

दादासाहेब मावळंकर हिंदी राष्ट्राचे एक सामर्थ्यवान घटक

मी

सर जदुनाथ सरकार एवढे एकच माझे निकट साह्यकर्ते कायम राहिले

भाऊ-आबांसारखे बंधु माझ्या भजनीं राहातात

प्रकरण पहिलें

शिक्षणाचे सुयोग

१. अंतरंगींचे पडसाद

२. पूर्वजांच्या आठवणी

३. माझी आई

४. माझें बालपण, मराठी शाळा

५. दैन्यावस्था

६. रत्नागिरीचीं पांच वर्षे

७. कॉलेजचीं चार वर्षें

प्रकरण पहिलें

शिक्षणाचे सुयोग

सुखं वा यदि वा दुःखं प्रियं वा यदि वाऽप्रियम्।
प्राप्तं प्राप्तं उपासीत हृदयेनापराजितः ॥

सुख येवो किंवा दुःख येवो, प्रिय मिळो वा अप्रिय मिळो,
त्याचा — जें काय येईल त्याचा — आदर करावा, दम खचूं देऊं नये.

१. अंतरंगींचे पडसाद

आत्मचरित्रानें प्रसिद्धि मिळविण्याइतकें माझें चरित्र महत्त्वाचें नाहीं, हें मी जाणून आहें, आणि राष्ट्राच्या बौद्धिक संपत्तींत भर घालण्याइतकी माझी ऐपतही नाहीं. तेव्हां आत्मचरित्र लिहिण्याच्या किंवा प्रसिद्ध करण्याच्या भरीस पडणें अनुचित होय असें मी माननों. तथापि प्रत्येक व्यक्तीला असे कांहीं थोडेबहुत अनुभव येतात कीं त्यांपासून बाहेरच्यांस अंशतः तरी फायदा करून घेतां येईल. ह्या अर्थानें जगांत सर्वथा टाकाऊ असें कांहीं नाहीं. मनुष्याची एकंदर प्रगति पूर्वानुभवावर आधारलेली असते. म्हणून माझ्या जीवनांत राष्ट्रोपयोगी अंश विशेष नसला तरी प्रत्यक्ष माझे कौटुंबिक, आप्तइष्ट, सुहृद्वर्ग किंवा व्यवहारसंबद्ध व्यक्ति अशांचा वर्गही बराच मोठा असून त्यांचा परिणाम माझ्या जीवनावर पुष्कळ झालेला आहे. माझ्या पश्चात् माझें रियासतकार एवढेंच नांव माहीत असणार, म्हणून माझे सर्व अवान्तर अनुभव एकत्र लेखबद्ध झालेले जिज्ञासूंना कळणें इष्ट होय असे विचार माझ्या मनांत वारंवार घोळत असतात. तशा सूचनाही अनेकांनीं मला केलेल्या आहेत. कामशेतच्या निवान्त स्थानांत राहूं लागल्यास तीस वर्षें होऊन गेलीं. एवढ्या दीर्घ कालांत एकटा असतांना मीं आपला जपून ठेवलेला पत्रसंचय, वार्षिकी वृत्तान्त, ऐतिहासिक टिपणें, वादविवादांचा संग्रह, इत्यादि सर्व संथपणें तपासून, अनावश्यक वाटले ते कागद नाश केले व ठेवण्यासारखे वाटले ते व्यवस्थित

विषयवार लावून ठेवले. हें काम करतांना जणूं काय मी आपलें एकंदर जीवन पुनश्च अनुभवीत आहें, लहानाचा मोठा होत आहें, अभ्यास करीत आहें, अडचणी सोशीत आहें, प्रवास करीत आहें, नानाविध प्रसंगांतून भांडततंडत निभावून जात आहें, असा हृदयंगम अनुभव मिळून अनेक विचारांचें काहूर मनांत उठलें. ह्या काल्पनिक जीवनांत व पहिल्या खऱ्या जीवनांत फरक इतकाच कीं संसार-नाटकाचे सर्व पडदे एकदम खुले होऊन खऱ्या जीवनाची अनिश्चिति आतां उरली नाहीं; त्या वेळच्या सुख-दु:खांची क्षिति आतां वाटत नाहीं. पुत्र श्यामकान्त परदेशीं आजारी असतांना एक एक क्षण कसा दु:सह वाटत होता, तो प्रकार आतां संपून भूतकालांत जमा झाला. अर्थात् ह्या माझ्या प्रचंड लेखसंग्रहाचा इत्यर्थ संक्षेपानें सुसंगत लिहून ठेवणें गैर नसून उलट व्यावहारिक दृष्ट्या फायदेशीरच आहे असें मला वाटतें.

ह्या संबंधांत दुसरा एक विचार सुचला तो असा कीं आमच्या कुटुंबांत मीच सर्वांत वडील. आरंभापासून कुटुंबाचा भार मूलत: मलाच सांभाळावा लागला. कुटुंबाचें मार्गदर्शन, आर्थिक देवघेव, लग्नकार्यादि समारंभ, अडीअडचणी, रागद्वेषांचे प्रसंग जितके मला उरकावे लागले व माहीत आहेत, तितके माझ्या कनिष्ठांना अवगत नाहींत. सर्वांची प्रजा वाढत असून ह्या भावी पिढीला माझी माहिती नुसत्या ऐकीव रूपांत तुटपुंजी कळण्यापेक्षां ती प्रत्यक्ष मजकडून त्यांस प्राप्त होणें अधिक चांगलें. मजजवळ जो प्रचंड लेखसंभार जमला आहे तो इतरांजवळ नाहीं, इतकेंच काय पण आतां ह्या संचयाचें पुढें काय करावयाचें, माझ्या पश्चात् हा कोण सांभाळणार, बराचसा पत्रव्यवहार मोडी लिपींत असल्यामुळें तो वाचणारे तरी किती निघतील, आपल्यादेखत ह्या सर्वांचा नाश करण्याची छाती होत नाहीं, तेव्हां त्यांतील मथितार्थ स्वतंत्र लिहून काढण्याची कल्पना मी मुद्दाम स्वीकारीत आहें.

विद्वत्ता, पराक्रम, इत्यादि गुणांनीं मी कांहीं अलौकिक व्यक्ति मुळींच नाहीं. सतत नियमित उद्योग करण्याची सवय मात्र मला प्रथमपासून आहे, त्यामुळें आजच्या माझ्या दीर्घ हयातींत किती तरी बरें वाईट काम माझ्याकडून झालेलें दिसतें. केवळ सुदैवाचा हा परिणाम होय, माझ्या

करामतीचा नव्हे असें मी मानतों. मी मोठा नशीबवान प्राणी खरा असें माझें मलाच वाटतें. ह्याचा अर्थ दुःखाचे किंवा कष्टाचे प्रसंग मला अनुभवावे लागले नाहींत असा नव्हे, पण ह्या सर्व प्रसंगांतून निभावून मी निष्ठेनें आपलें कर्तव्य करीत राहिलों. माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीच्या हातून रियासतींसारखें लेखनाचें बरेंचसें काम सिद्धीस गेलें. हें काम करितांना परिश्रमपूर्वक पुस्तकसंग्रह निर्माण झाला, पुष्कळ लहानथोरांशीं पत्रव्यवहार घडला, व्यासंगासंबंधानें अभ्यासाचीं टिपणें तयार झालीं. हा सर्व संचय माझ्या पुष्कळ हितचिंतकाना बहुमोल वाटतो. सहज समरस मंडळीशीं बोलतांना मी आपले अनुभव सांगूं लागलों किंवा कै. सयाजीरावांसारख्यांच्या आठवणी वर्णूं लागलों, म्हणजे हे जिव्हाळ्याचे स्नेही आग्रह करूं लागतात कीं तुम्ही हे आपले असले अनुभव व ह्या आठवणी लिहून काढा, त्यांचा भावी पिढीला मोठा उपयोग आहे. ही सूचना मला सर्वथा पटते असें नाहीं. गोष्टी ऐकायला गोड वाटतात, पण त्यांत टिकाऊ अंश फार थोडा असतो. तरी पण हा माझा लेखसंचय टिकविण्याचें चरित्रकथन हें एकच साधन शक्य आहे ह्यांत संशय नाहीं.

आत्मचरित्र लिहिण्याची पुष्कळदां एक प्रथाच पडलेली दिसते ती मला मान्य नाहीं. आपणांस कांहीं तरी विशिष्ट सांगण्यासारखें नसेल तर आत्मचरित्र लिहिण्याच्या भरीस माणसानें पडूं नये. तसें बहुमोल किंवा टिकाऊ आख्यान मला सांगतां आलें नाहीं तरी जे अनुभव किंवा आठवणी थोड्याबहुत उपयुक्त अशा मला वाटतात तेवढ्यांचाच संग्रह मी ह्या लेखांत करणार आहें. गरिबींत दिवस काढले, कष्ट सोसून अभ्यास केला, निकृष्ट स्थितींतून डोकें वर काढून समाजांत कांहीं एक स्थान मिळविलें, असले सामान्य अनुभव पुष्कळांस येतात ते सांगण्याचा हेतु मी मनांत बाळगीत नाहीं. मी आपणांस भाग्यशाली समजतों तर तसे सुदैवाचे प्रसंग मला कसे लाभले हेंच मी मुख्यतः सांगणार आहें. लोकांस उपदेश करण्याची किंवा कांहीं विशिष्ट संदेश देण्याची लायकी माझ्या ठिकाणीं नाहीं. अर्थात् ह्या लेखनाला ‘ आत्मचरित्र ’ असें भपकेदार नांव न देतां ‘ माझी संसार-यात्रा ’ असें सामान्य अनुभव सांगणारें सूचक अभिधान मीं मुद्दाम स्वीकारलें आहे. कुटुंबाचें मार्गदर्शन व गेल्या ऐशीं-नव्वद वर्षांतील स्थित्यंतराचा आढावा एवढें जरी ह्या लेखांत मी सांगूं शकलों

तरी माझा कार्यभाग झाला असें मी मानीन. माझे वेळोवेळीं प्रसिद्ध झालेले लेखसुद्धां हेंच सांगतील. दुसरें अधिक तें मी काय करणार !

२. पूर्वजांच्या आठवणी

महाराष्ट्रांतील प्राचीन ऐतिहासिक घराण्यांत मावळंकर सरदेसाई महशूर असून त्याचा सविस्तर इतिहासही प्रसिद्ध झाला आहे. नृसिंहभट सत्यवादी हा घराण्याचा मूळपुरुष पैठणाहून इ. स. १०७५ च्या सुमारास कोंकणांत संगमेश्वरजवळ मावळंगें येथें येऊन राहिला, त्यावरून त्याच्या वंशजांनीं मावळंकर नांव स्वीकारलें. भारत विधिमंडळाचे लोकनियुक्त चालक गणेश वासुदेव मावळंकर ह्यांनीं हें सत्यवादी अभिधान सार्थ करून दाखविलें. कालान्तरानें घराण्याच्या अनेक शाखा निर्माण झाल्या. कांहींना सरदेशमुखी मिळाल्यावरून ते सरदेसाई उपनांव लावूं लागले, कांहीं अद्यापि मावळंकर हेंच नांव लावितात. संगमेश्वर, देवळें, वेरवली अशा शाखा हल्लीं आहेत. त्यांतील वेरवलीकरांत माझा जन्म जवळच्या गोवील गांवीं बुधवार ता. १७ मे, स. १८६५ ह्या दिवशीं झाला. अर्थात् मी आपलें वृत्त सांगण्यापूर्वी थोडी पूर्वपीठिका देणें अवश्य आहे. कारण प्रत्येक मनुष्य पूर्वजांचे कांहीं गुण स्वीकारून जन्मास येतो आणि पुढें तो परिस्थितीनें व स्वपराक्रमानें नवीन गुण पैदा करून आपलें जीवन बनवितो. चेहेऱ्याची ठेवण, अंगवर्ण व कित्येक बऱ्यावाईट सवयी त्यास पुष्कळशा पूर्वजांकडून मिळतात. मी इतिहासाचा अभ्यासक असल्यामुळें असें स्वभावाचें पृथक्करण करून प्रत्येकानें पूर्वसंचित आपल्याबरोबर काय आणिलें आणि स्वकष्टानें नवीन पैदास कोणती केली हें तपासण्याचा मला नाद आहे, आणि तदनुसार मी थोडीशी माझीच तपासणी सांगूं चाहतों.

आमचें घराणें शिवाजीच्या पूर्वीं बाराव्या शतकापासून राज्याच्या उद्योगांत सामील होतें. शिवाजीच्या उपक्रमांत ह्या घराण्यानें जो कार्यभाग केला तो ह्या घराण्याच्या इतिहासांत वर्णिलेला आहे. त्या वेळचे ऐतिहासिक कागदही प्रसिद्ध झाले आहेत. पुढें पेशवाईच्या काळांत ह्या घराण्याचा संबंध प्रतिनिधींशीं येऊन त्याला सरदेसाई उपनांव प्राप्त झालें. त्यांत प्रसंगानुसार त्यांनीं वतनें पैदा केलीं. सातारा व पुणें येथें मराठी राज्याचें अधिष्ठान असतांना ह्या सरदेसाई घराण्याचे पुरुष कामावर असत. त्या

कामीं ते आपणास नायक हें उपपद लावीत. माझे पणजे जनोबा नायक पेशवाईत पुण्यास कामावर असतां मराठी राज्य संपलें तेव्हां जी काय पैदास हातीं लागली ती घेऊन ते रत्नागिरी जिल्ह्यांत वेरवली येथें आपल्या वतनी गांवीं येऊन राहिले. तदुत्तर त्या प्रांतांत जनोबातात्यांची प्रतिष्ठा पुष्कळ वर्षे जाहीर झाली. मी त्यांचा पणतू. कुटुंबविस्तार झाला तेव्हां माझे वडील वेरवलीचें समाईक घर सोडून जवळच्या गोवील गांवीं स्वतंत्र घर बांधून राहूं लागले. धार्मिक विधिपूर्वक पणजोबांनीं माझें मुखावलोकन केलें, माझी आजी मला त्यांच्या भेटीस वेरवलीस घेऊन गेली असें ती मला सांगे. मी दोन वर्षांचा असतां हे माझे पणजोबा स. १८६७ च्या एप्रिल महिन्यांत चौऱ्यांशींचें वय असतां वारले. पणजोबांचे वडील महादेव आपाजी पुण्यास कारभारावर असतां ता. २८ नोव्हेंबर, स. १८१४ रोजीं वारले, त्या वेळीं जनोबा नायक हे आपल्या वडिलांजवळ पुण्यास होते. वडील वारल्यावर चारच वर्षांनीं मराठी राज्य संपलें आणि सरदेसाई मंडळींना तेथें काम उरलें नाहीं. जनोबा नायक त्या वेळीं ३०–३५ उमरीचे होते. ते लगेच पुण्याचा संसार आटपून थोडीबहुत मत्ता घेऊन कोंकणांत वेरवलीस घर बांधून राहूं लागले. जनोबा नायकांना दहा पुत्र झाले. त्यांतील सर्वांत वडील महादोबा नायक माझे आजोबा, त्यांना बाबाजीदादा म्हणत. त्यांचा जन्म स. १८०५ सालीं झाला. पुण्यास असते तर कदाचित् त्यांच्या शिक्षणाला स्फूर्ति मिळाली असती. वेरवलीच्या गांवठी वातावरणांत ते सर्वथा निरक्षर राहिले. गौरवर्ण व शरीरयष्टि भव्य असूनही विद्या नसल्यामुळें त्यांना जीवनांत महत्त्व प्राप्त झालें नाहीं. त्यांचा सर्व जन्म माझ्या वडिलांजवळ गोवील येथें गेला. गौरवर्ण, निकोप प्रकृति व दीर्घायुष्य हे माझ्या आजोबांचे गुण माझ्यांत उतरले असावे.

माझी आजी – पितामही वेणू उर्फ पार्वतीबाई हिच्या अनेक गुणांचा मला फार उपयोग झाला असें मला वाटतें. माझ्या आईला मुलें वरचेवर होऊं लागलीं, मी सर्वांत वडील नातू, आजीचा लाडका, तिच्याच अंगावर खेळून वाढलों. तोंड धुणें, आंघोळ, शरीराची निगा, इत्यादि बाबतींत स्वच्छतेचें बीज मी आजीकडून शिकलों. ती आम्हांस आंघोळ घाली तेव्हां अंगाचीं सालें निघतात कीं काय असें आम्हांस वाटे. तिनेंच मला प्रथम वेरवलीच्या मराठी शाळेंत नेऊन घातलें. विस्तृत समाईक कुटुंबाची जबाबदारी

सांभाळून जन्मभर तिनें जे कष्ट केले ते पाहून मला अद्यापि वाटतें माझें भाग्य म्हणून अशी आजी मला लाभली. तिच्या माहेरची थोडी हकीकत येथेंच देणें जरूर आहे.

मलकापुरपासून सहा मैलांवर आंबर्डें म्हणून गांव आहे तेथें राहणारें एक देशस्थ घराणें आंबर्डेकर म्हणून होतें, त्यांत त्या वेळीं राघोपंततात्या नांवाचे गृहस्थ प्रतिनिधींच्या पदरीं विशाळगडावर राहून धनगरमहालचा मक्ता करीत. सह्याद्रीच्या त्या जंगली प्रदेशांत शेतीचा व्यवसाय त्या वेळीं नसून मुख्य वस्ती धनगर लोकांची होती. ते गायी-म्हशींचे मोठाले कळप बाळगून दूध, लोणी, तूप ह्यांच्या विक्रयावर निर्वाह करीत. ह्या कारणास्तव त्या वेळीं शेतसारा लोकांवर बसविलेला नसून गुरचरणीबद्दल सरकार कर घेत असे. दरसाल ह्या गुरांची मोजदाद करून मालकाजवळून रुपया दोन रुपये खंड प्रत्येक जनावरामागें धनगरानें भरावा लागे. ह्याला धनगरमहाल म्हणत. सह्याद्रीच्या पूर्व-पश्चिम डोंगरी प्रदेशाला ही संज्ञा असून मृगारंभीं त्या महालाचें लिलाव करीत. लिलावांत जो कोणी सर्वांत जास्त रक्कम सरकारांत भरील त्याच्या नांवें दरसाल तो मक्ता कायम करण्यांत येई. हें काम मोठें जिकिरीचें असे. धनगर लोक आपलीं जनावरें डोंगरकपारींतून लपवून ठेवीत आणि त्यांचा कर चुकवीत. प्रसंगीं मक्तेदारास हे धनगर चोपही देण्यास चुकत नसत. म्हशी, रेडे मस्त झालेले अंगावर येऊन मोजणी करूं देत नसत. मोजणीचें काम दसऱ्याच्या सुमारास सुरू होऊन तें पुढें दोन तीन महिने चाले. कैक वर्षे हा धनगरमहालाचा मक्ता राघोपंततात्या आंबर्डेकर व त्यांचे चिरंजीव भिकाजीपंत ह्यांनीं सांभाळून त्यांत पैदास व प्रतिष्ठा मिळविली. काम फार मेहनतीचें असून घरची जमात चांगली असेल तरच तें व्यवस्थित चालणें शक्य होतें. मोजणीदार किंवा मक्तेदार गुरें तपासण्यास आले म्हणजे त्यांस शिधापाणी देऊन संतुष्ट ठेवणें धनगरांचें कर्तव्य असे. माझी आजी त्या राघोपंततात्यांची कन्या. माझे वडील सखाराम नायक पुष्कळ वर्षे मातुलांस ह्या कामीं निष्ठेनें साह्य करीत. मी माझ्या लहानपणीं वडिलांबरोबर ह्या धनगरमहालाच्या कामासाठीं डोंगरी मुलखांतून पुष्कळ हिंडलों आहें. खाण्याची मोठी चंगळ असे. शिपाईप्यादे बरोबर असत. सुंदर जिरगे तांदूळ, लोणी, तूप, दूध ह्यांची लयलूट असल्या-मुळें रानोमाळ हिंडण्यांत मला मोठी मौज वाटे. स्वयंपाकाचें काम मात्र

वडिलांसच स्वतः करावें लागे. हाताखालीं नोकर पुष्कळ असत, धनगरणी येऊन चूल, भांडीं, विस्तव सर्व सिद्धता करून देत. दुपारचें भोजन बाहेर ओढ्यावर किंवा झऱ्यावर रानांत व रात्रीं गुरांच्या गोठ्यांत. माझ्या अत्यंत प्रियकर आठवणींपैकीं हें माझें धनगरमहालचें जीवन मनावर चांगलें ठसलें आहे. माझ्या मुंजींत दोनशें धनगर गोरस घेऊन भोजनास आले होते.

राघोपंततात्या आंबर्डेकर त्या वेळच्या जमान्यांतले एक प्रतिष्ठित कर्ते पुरुष गणले जात. धनगरमहालावर त्यांनीं कमाईही चांगली केली. त्यांना मुलें झालीं त्यांत मुलगी वेणू आठ वर्षांची झाली, तेव्हां ते तिला वर शोधण्याच्या खटपटीस लागले. वेरवलकर सरदेसाई त्यांचे शेजारीं असून जनोबा नायकांचा बोलबाला त्या वेळीं विशेष होता. जनोबा नायकांचे वडील चिरंजीव महादोबा ऊर्फ बाबाजीदादा हे आठ नऊ वर्षांच्या वयाचे राघोपंततात्यांनीं जावई पसंत केले. ही वेळ मराठी राज्य संपण्याच्या आंतबाहेर होती. दोन तात्या—राघोपंत आंबर्डेकर व जनोबा नायक—व्याही बनले. माझी आजी रूपानें गोरीपान व बुद्धीनें चलाख होती. तिचे यजमान म्हणजे माझे आजोबा इतके मतिमंद निघतील अशी प्रथम कोणाचीच कल्पना नव्हती. लहानपणीं माझ्या मनावर काय संस्कार घडले, त्या वेळीं लोकांचे व्यवसाय व परिस्थिति कशा प्रकारची होती आणि तिचा परिणाम माझ्या पुढील आयुःक्रमावर काय झाला हें लक्षांत येण्यासाठींच मी धनगरमहाल वगैरेच्या ह्या तत्कालीन गोष्टी मुद्दाम विस्तारानें सांगत आहें.

धनगरांची राहणी अत्यंत गलिच्छ. पाण्याचें किंवा स्नानाचें त्यांना कधीं दर्शन नाहीं. वडील फिरतीवर असतांना एखाद्या सुंदर ओढ्यावर किंवा पाण्याच्या जागीं स्नान व स्वयंपाक ठरवीत. एकदां आम्ही मुक्कामाहून मैल दीड मैल अंतरावर वाहत्या पाण्याच्या ओढ्यावर भोजनास गेलों. आंघोळ व कपडे धुऊन स्वयंपाक तयार होतांच पत्रावळी लावून जेवायला बसलों. आश्विनाचा महिना असावा. एकदम आकाश भरून पाऊस कोसळला, त्याबरोबर जी धावपळ उडाली ती विचारूं नये. ओढ्यास पूर येऊन अन्नाचीं पात्रें वाहून गेलीं. धूम ठोकीत परत मुक्कामावर पोचतों कसे असें झालें. हा प्रसंग अद्यापि माझ्या स्मरणांत ताजा आहे.

ह्याच वेळीं मला पहिली अक्षरओळख झाली. वडिलांचा एक भरंवशाचा शिपाई भागूजी राऊत नांवाचा नेहमीं जवळ असे. पंचवीस वर्षें तरी त्यानें धनगरमहालावर वडिलांची नोकरी केली. तो आमच्या कुटुंबांत मिसळलेला नोकर होता. धनगर गुरें चोरून ठेवीत, त्याचा तपास ठेवून अचानक छापा घालून तीं गुरें पकडण्यांत ह्या भागूजीचा हातखंडा होता. पुष्कळ धनगर त्याला ठार मारण्यास टपले होते, पण त्यांस तो पुरून उरला. हा वृद्ध भागूजी मीं पाहिला होता आणि त्याच्या पश्चात् त्याचे मुलगेही आमच्या आश्रयास होते.

दररोज सकाळीं तीनचार तास धनगरांना जमवून त्यांची नांवनिशी व गायी, म्हशी, बैल ह्यांच्या याद्या तयार करण्याचें काम चाले. वडिलांस बालबोध लिहितां येत नव्हतें. सर्व व्यवहार मोडींत ठेवीत. अखंडित लक्ष्मी आलंकृत असा कित्ता वडिलांनींच मला मोडीचा प्रथम घालून दिला. पुढें दोन वर्षांनीं मी शाळेंत गेलों तेव्हां मग बालबोध पुस्तक वाचण्यास शिकलों. भागूजी राऊत मोठ्यानें धनगराचें नांव सांगे, तें वडील मोडींत कागदावर लिहून नांवासमोर गायी-म्हशींची संख्या लिहीत. मी जवळ बसून सर्व पाहत असें. असें करतांना महिना पंधरा दिवसांत मी मोडी वाचण्यास शिकलों. उत्तरोत्तर मीं अक्षरही बरें बनविलें. मोडी शिकण्यास हा प्रयोग मला फार उपयुक्त वाटला. हल्लीं राघोपंततात्यांचे वंशज हसोळ व वेरवली येथें आहेत. राघोपंतांचे चिरंजीव गणेशपंतबाबा हे त्या बाजूस पुष्कळ वर्षें प्रतिष्ठा पावले. माझ्या वडिलांचा व त्यांचा विशेष घरोबा असून आमच्या घरीं ते पुष्कळदा येऊन राहत.

राघोपंतांची कन्या बेगू ही माझी आजी म्हणून सांगितलें. तिची सासू दोनतीन मुलें होऊन लहानपणीं वारली. दरम्यान माझ्या आजीलाही एक कन्या व तीन मुलगे अशीं अपत्यें झालीं. जनोबा नायकांनीं दुसरें लग्न केलें, ती मावत्र सासू माझ्या आजीपेक्षां वयानें लहान होती. तिलाही भराभर मुलें होऊन तिचीं बाळंतपणें सुनेला करावीं लागलीं. ह्या सावत्र सासूला सात मुलगे व तीन कन्या अशीं दहा मुलें झालीं. हीं दहा व आजीचीं चार मिळून पंचवीस वर्षांत जनोबा नायकांचा कुटुंबविस्तार एवढा वाढला कीं इतक्यांची बाळंग, स्वयंपाक, इत्यादींनीं आजीला भारी कष्ट पडले. शिवाय घरांत सावत्र संबंध उत्पन्न झाल्यामुळें आजीच्या मुलांचे

हाल होऊं लागले. घरांत वेळेला पोटभर अन्न मिळूं नये असा प्रसंग हळूहळू आला. जनोबा नायकांची पुण्याहून आणलेली पुंजी खलास झाली. बरेंचसें चोरापोरांनीं उडविलें. जनोबातात्या आपल्या द्वितीय पत्नीच्या मुलांची निगा ठेवीत तशी ह्या नातवंडांची पर्वा करीत ना. आपल्या मुलांचीं मुंजी-लग्नें त्यांनीं केलीं, पण नातू त्यांहून वयानें मोठे असूनही त्यांच्या मुंजीची गोष्ट ते बोलेनात. घरीं मुलांस शिकविण्यास पंतोजी ठेवला त्यांतसुद्धां पंक्तिप्रपंच दिसूं लागला. तो आजीला सहन होईना. माझे भोळसर आजोबा त्यांच्या वडिलांना दृष्टिसमोर नकोसे झाले. हें एक जास्त कारण आजीच्या उद्वेगास झालें. ह्या संकटांतून आपणच मार्ग काढला पाहिजे असें तिनें ठरविलें. कुटुंबविस्तार झाला तशी नवीन पैदास वाढली नाहीं. जनोबा नायक स्वभावाचे कृपण. आपल्यापुरतें पाहत. ही सून त्यांची अत्यंत आवडती, फक्त राबण्यापुरती त्यांना हवी असे, पण तिला वेळेवर अंगावर वस्त्र मिळतें कीं नाहीं ह्याची विचारपूस ते करीत नसत. तोंडानें मात्र सारखा जप कीं "माझी वेणू आहे म्हणून अन्न मिळतें आहे. ती मला कधीं अंतर देणार नाहीं."

अशा कुचंबणेंतून आपली सुटका कशी करावी हाच विचार आजीच्या मनांत अहोरात्र घोळूं लागला. जनोबा नायकांना एकंदर अठरा मुलें, दोघां बायकांचीं मिळून झालीं. † सावत्र संबंधामुळें संसारांत तेढ उत्पन्न होणें हें त्या वेळच्या सामाजिक व्यवस्थेंत मोठें व्यंग होतें. राघोपंततात्या आंबर्डेकर ह्यांच्या घरांतही अशी दुही उत्पन्न झाली. ☉ ह्या मातुल घराण्याशींच माझ्या वडिलांचा अत्यंत घरोबा जडला आणि त्यांस त्याच घराण्याचा आधार अखेरपर्यंत होता. मातुलांचें धनगरमहालचें काम माझे वडील पाहूं लागले. माझ्या आजीला आणखी दोन वडील बहिणी वाराणसी व सखू नांवाच्या असून एक कशेळीस जायद्यांकडे व दुसरी मोर्डेकर सरदेसाई वामन नायक ह्यांस दिलेली होती. हे वामन नायक कोल्हापुरास

† ह्यांचा तपशील सरदेसाई घराण्याचा इतिहास, उत्तरार्ध, खं० २, पृ० १२०–१२१ वर आहे. भा० १, पृ० ८२ पाहा.

☉ राघोपंततात्यांना प्रथम कुटुंबापासून १२ मुलें झालीं. पैकीं बनाजीपंत व विठ्ठलपंत हे वेरवली बुद्रुक येथें स्वतंत्र घरें करून राहिले. तिसरे भिकाजीपंत वडिलांजवळ राहून धनगरमहालचा कारभार करीत. त्यांनीं हसोळ येथें स्वतंत्र

राहत असत. आजीनें आपल्या मुलांचे विद्याभ्यास नीट चालावे म्हणून वेरवलीच्या समाईक कुटुंबांतून बाहेर स्वतंत्र पाय काढण्याचें ठरवून बंधु-बहिणींच्या साह्यानें तिनें तो मार्ग सिद्धीस नेला. जनोबा नायकांचे चुलतबंधु गंगाधर बाजी नांवाचे कऱ्हाडास राहत असत. त्यांची बायको वेरवलीस आली असतां माझ्या आजीनें आपली कष्टमय कहाणी तिला निवेदन केली आणि ती परत कऱ्हाडास जाऊं लागली, तेव्हां आजीनें आपला दुसरा मुलगा गंगाधर ह्यास तिच्या स्वाधीन करून त्याच्या शिक्षणाची व्यवस्था तिकडे परभारें करविली. मलकापूर व कऱ्हाड हीं दोनही प्रतिनिधींचीं संस्थानें असून कऱ्हाडास शिक्षणाच्या व उद्योगाच्या सोयी जास्त होत्या. सरदेसाई प्रतिनिधींचे सेवक होते.

धाकट्या मुलाची रवानगी केल्यावर माझी आजी वडील मुलास घेऊन आपल्या बहिणीकडे कोल्हापुरास गेली; पण तितक्यांत बहिणीचे यजमान वामन नायक§ वारले आणि तिच्या संसाराची वाताहत झाली. अर्थात् माझी आजी सुमारें एक महिन्यानंतर कोल्हापुर सोडून वडील बंधु भिकाजीपंत धनगरमहालचें काम मलकापुरास पाहत होते त्यांजकडे गेली. तेथें माझ्या वडिलांनीं कांहीं काळ मधुकरी मागून लेखनवाचन व हिशेब ह्यांचा अभ्यास केला. त्या वेळीं भिकाजीपंतांनीं नुकतेंच आपलें

घर बांधून तेथें वास्तव्य केलें. विसाजीपंत म्हणून सर्वांत धाकटे चिरंजीव मलकापुरास प्रतिनिधींजवळ असत. राघोपंततात्यांनीं द्वितीय विवाह केला, त्या संबंधापासून त्यांस सहा मुलें झालीं, त्यांत गणेशपंत बाबा आंबर्डेकर हे वेरवलीस राहूं लागले. त्यांचे बंधु वासुदेवपंत ह्यांनीं आपला संसार कऱ्हाड येथें थाटला. गणेशपंतांच्या तिघी बहिणी आवडी, सई व बाळी ह्या माझ्या लहानपणीं कोंकणांत प्रसिद्धि पावल्या होत्या. जनोबातात्यांचें द्वितीय कुटुंब ताई देसाई व राघोपंत-तात्यांचें कुटुंब ताई आंबर्डेकर, ह्या दोघी त्या वेळीं तत्प्रांतीय समाजांत नांवाजलेल्या बायका होत्या. आंबर्डेकर व सरदेसाई ह्या घराण्यांचा हा निकट संबंध अद्यापि दृष्टीस पडतो. त्यांतील पुढील पिढी माझी समकालीन, पण शिक्षणाच्या बाबतींत मला जें प्रोत्साहन मिळालें तें ह्या आंबर्डेकर तरुणांना मिळालें नाहीं, हा विषय माझ्या जीवनांत विशेष स्मरणीय आहे.

§ ह्या वामन नायकांचे चिरंजीव दाजीबा ह्यांचा व माझ्या वडिलांचा अत्यंत ऋणानुबंध होता. दाजीबांचे चिरंजीव भालचंद्र हल्लीं मुंबईस वालचंद हिराचंद ह्यांजकडे प्रतिष्ठित कामावर आहेत.

घर हसोळ येथें बांधलें होतें. त्यांची वडील सून बळवंतराव आंबर्डेकरांची बायको बाळंत व्हायची त्यासाठीं त्यांनीं ह्या आपल्या बहिणीस म्हणजे माझ्या आजीस हसोळास पाठविलें. बळवंतराव व माझे वडील आते मामे भाऊ अत्यंत जिव्हाळ्यानें वागत. मात्र बळवंतराव तरुणपणीं लवकर वारले. भावाच्या सुनेच्या बाळंतपणासाठीं म्हणून आजी हसोळास आली. त्या सहवासांत तिची वेरवलीची दैन्यावस्था सर्वांस कळली. वेरवलीहून तूर्त ती मुलें तेवढीं घेऊन बाहेर पडली, पण सासऱ्याचें घर कांहीं तिनें कायमचें सोडलें नव्हतें. तिच्या बंधूंना म्हणजे भिकाजीपंतांना ती आपल्याजवळ राहवी असें वाटे, परंतु ती म्हणे मी नेहमीं माहेरीं तुमच्याजवळ कां राहवें! तेव्हां भिकाजीपंत व त्यांचे चिरंजीव बळवंतराव ह्यांनीं अशी तोड सुचविली कीं आमच्या ह्या हसोळच्या घराशेजारींच सरदेसायांचा वतनी गांव गोवील आहे. त्या गांवांत तुला स्वतंत्र घर बांधून देतों, म्हणजे तुझा संसार नीट चालेल व एकमेकांचा शेजार उपयोगास येईल. आपल्या घरापासून एका हाकेवर गोवीलच्या हद्दींत एक लहानसें चाळीस रुपये किंमतीचें घर त्यांनीं आजीकरितां बांधून दिलें आणि त्यांत ती आपला संसार थाटून स्वतंत्र राहूं लागली. दोघांच्या घरांमध्यें फक्त एका लहानशा ओढ्याची हद्द होती. माझा जन्म ह्या नवीन घरांत झाला.

माझे वडील सखाराम नायक ह्यांचा जन्म चैत्र शु. ९ शके १७५७ तारीख ७ एप्रिल, सन १८३५ च्या रामनवमीस झाला. घरांतील सावत्र चुलत्यांपेक्षां ते वयानें जास्त व संसार पाहण्यास लायक होते. गोविलास स्वतंत्र घर बांधण्यापूर्वीं ते वेरवलीस जाऊन जनोबातात्यांस भेटले. ते म्हणाले, "मी तुमचा वडील नातू. कागदोपत्रीं वतनास नांव माझें लागलें पाहिजे, तशी व्यवस्था करून द्या, नाहीं तर मी आपला पंथ वाटेल तसा ठरवीन." आजोबांचा सर्व प्राण आपल्या सावत्र संततीवर. त्यांना ही माझ्या वडिलांची सूचना पटली नाहीं. तेव्हां वडील तसेच वेरवलीचें वडिलार्जित घर सोडून रागानें उपाशीं गोविलास येऊन स्वतःच्या घरीं जेवले. जनोबातात्या सुनेला म्हणाले, "वेणू मला सोडून गेली, आतां तिच्या घरांत मी पाऊल ठेवणार नाहीं." अशा रीतीनें वडील स्वतंत्र झाले, तेव्हां माझे आजोबा प्रथम वेरवलीसच होते, त्यांना घरांत कोणीच विचारीत नसे. एके दिवशीं जनोबातात्यांनीं त्यांना एक मोलकरीण बरोबर देऊन गोविलास पोचतें केलें. ते म्हणाले,

"तुझी बायको व मुलगा गोविलास स्वतंत्र राहतात, त्यांच्याच जवळ तूं जाऊन राहा. आमच्या घरांत तूं नकोस." तेव्हां माझे आजोबाही आमच्या घरीं गोविलास येऊन राहिले.

आजोबांच्या ह्या येण्यास एक विशिष्ट कारण घडलें. त्यांना घरांत मुळींच मान्यता नव्हती. त्यांच्या पाठीवर दोन नायटे उठले ते लवकर बरे होईनात. तेव्हां हा महारोग असावा अशी कुजबूज सुरू झाली. एकदां ते पंक्तींत भोजनास बसले असतां सर्वांत वडील सावत्र बंधु सीताराम नायक ह्यांनीं त्यांस पानावरून उठवून अंगंक बसविलें. तेव्हां ते संतापून तसेच आपल्या बायको-जवळ गोविलास आले. नंतर त्यांस आजीनें सांगितलें, "तुम्ही नरसोबाच्या वाडीस जाऊन देवदर्शन घेत जा म्हणजे हा विकार बरा होईल." त्याप्रमाणें ते दरसाल देवदर्शनास जाऊं लागले आणि त्यांचा रोगही बरा झाला. एकदां जे ते गोविलास आपल्या चिरंजिवांजवळ आले ते अखेरपावेतों तेथेंच राहिले. माझ्या वडिलांनीं त्यांचा सांभाळ यथायोग्य केला. प्रकृतीनें ते निकोप होते. दरसाल नरसोबाच्या वाडीस शंभर मैल पायीं चालत जाऊन देवदर्शन करीत. घरच्या संसारांत मात्र ते लक्ष अगदीं घालीत नसत. माझा मुलगा श्यामकान्त त्यांना पणतू झाला तो सहा महिन्यांचा त्यांनीं पाहिला. त्यांचा जन्म शके १७२७ म्हणजे सन १८०५ चा असून ते गोवील येथें ता. १० डिसेंबर, सन १८९९ रोजीं ९४ वय होऊन वारले. त्यांच्या पूर्वी तीन वर्षे माझी आजी सवाष्णपणीं वारली. ह्यावरून आमच्या कुटुंबांत आयुर्मर्यादा चांगली दीर्घ दिसते.

माझे वडील सखाराम नायक ह्यांचा अभ्यास थोडाबहुत मलकापुरास झाला. त्यांच्या लग्नाची विचारपूस फारशी कोणीं केलीच नाहीं. एकदां ते गोविलास आपल्या मातुश्रीस भेटण्यास आले असतां ती त्यांस घेऊन कशेळीस आपली बहीण जायदे ह्यांजकडे गेली. तेथें त्यांस तिनें अभ्यासा-साठीं ठेवून दिलें. सुमारें महिनाभर वडील तेथें राहिले, पण चैन पडेना. कशेळींहून मालाचे मचवे मुंबईस जात त्यांतून ते कोणास न कळवितां मुंबईस गेले. त्या वेळीं ते सुमारें अठरा वर्षांचे असावेत. मुंबईस तीन-चार महिने राहून मास्तरगिरी केली. थोडी प्राप्ति झाली त्यांतून मुगटा, तांब्या, पंचपात्री, वगैरे भांडीं खरेदी केलीं. दरम्यान मावशीनें तपास काढून त्यांस

परत कशेळीस नेलें. पण त्यांना स्थाईक होतां आलें नाहीं. ते परत मलकापुरास गेले, तेथें बापूसाहेब तांबे कारभारी होते, त्यांनीं त्यांस कारकुनाची नोकरी दिली पण तीही फार टिकली नाहीं. ते पुढें मातुल भिकाजीपंतांजवळ धनगरमहालचें काम पाहूं लागले. त्या कामावर असतां गूळ, तूप, लोणी, वगैरेंची पैदास पुष्कळ होई. तेव्हां जनोबा नायक व त्यांचे पुत्र कृष्णोबा नायक वगैरे मलकापुरास येऊन वरील जिन्नस बरोबर घेऊन वेरवलीस परत जात. ह्याच वेळीं मीं हें धनगरमहालचें काम पाहिलें.

जनोबा नायकांना दुसऱ्या बायकोपासून मुलें होऊं लागलीं त्याच्या पूर्वीच त्यांचा नातू म्हणजे माझे वडील जन्मास आले. स. १८३५ चा त्यांचा जन्म म्हणजे कोंकणांत अव्वल इंग्रजीचा अंमल. त्या वेळीं सार्वजनिक शिक्षणाची जबाबदारी सरकारनें घेतली नव्हती. रत्नागिरीस इंग्रजी हायस्कूल होण्याला पुष्कळ अवकाश होता. जनोबा नायकांचे सर्वांत धाकटे दोन मुलगे थोडेंसें इंग्रजी शिकले होते. एकाला त्या शिक्षणावर पुष्कळ दिवस रेल्वेंत नोकरी करतां आली. रत्नागिरी जिल्हा अत्यंत मागासलेला, दळणवळणाच्या अभावीं एकलकोंडा असा होता. इंग्रजी राज्यांत नवीन सर्व्हे म्हणजे जमीनमोजणी व जमिनीची प्रतवारी करण्याचें काम सरकारनें चालू केलें, त्यांत त्या वेळच्या पुष्कळ लोकांना नोकऱ्या मिळाल्या. जनोबा नायकांचे तीन चार मुलगे सर्व्हेखात्यांत नोकरी करून प्रपंचास मदत करूं लागले.

माझ्या वडिलांचे दुसरे बंधु गंगाधर हे त्यांहून दोन-तीन वर्षांनीं लहान. त्यांना मातुश्रीनें अभ्यासासाठीं कऱ्हाडास पाठविलें होतें हें वर सांगितलेंच आहे. त्यांनीं अल्पावकाशांत चांगलें नैपुण्य मिळवून वकिलीचा अभ्यास केला. शाळेंत त्यांना स्कॉलरशिप मिळे. अक्षर उत्कृष्ट होतें. पुढें अभ्यास संपून तिकडेच त्यांना नोकरी लागली, तेव्हां त्यांचें लग्न झालें. लग्नास माझी आजी गेली होती. उंब्रज येथील देवांची मुलगी आजीनें सून करून घरांत आणिली. माझे वडील मोठे बंधु असतां त्यांचें लग्न झालें नव्हतें. लहान भावाचें लग्न अगोदर झालें, त्यांजवर आजीचा अगदीं जीव कीं प्राण होता. माझा जन्म सन १८६५ त झाला तें वर्तमान त्यांस कऱ्हाडास कळून त्यांनीं खुशालीचें पत्र पाठविलें आणि लवकरच

मी तुमच्या भेटीस गोविलास येतों असें उत्तर आलें. इतक्यांत ते एकाएकीं आजारी होऊन ता. ३० ऑगस्ट, सन १८६५, भाद्रपद शुद्ध ९ शके १७८७ ह्या दिवशीं दिवंगत झाले. आजी ह्या पुत्रशोकानें अत्यंत विव्हळ झाली. आजाराचें वर्तमान कळतांच ती त्यांच्या भेटीस गेली, नुसती दृष्टभेट होऊन आजी कऱ्हाडहून विधवा सुनेस घेऊन परत गोविलास आली. तिचें नांव दुर्गाबाई. ही माझी चुलती फार सात्त्विक वृत्तीची असून ती पुष्कळ वर्षें गोविलास राहिली. पायांत अधू होऊन तिला फिरणें अशक्य झालें. आम्ही बंधूंनीं तिची सेवा अखेरपावेतों निष्ठेनें केली. साठीच्या उमरींत ती गोवील येथें ता. २७ जुलई, सन १९१० रोजीं वारली. पण तिचा शुभाशीर्वाद आमच्या सर्वांच्या शिरीं कायम राहिला.

माझ्या वडिलांची पंचविशी उलटून गेली तरी त्यांच्या लग्नाची व्यवस्था बनली नाहीं. ते मलकापुरास धनगरमहालचे कामावर असत. साखरप्या-जवळ भडकंबें येथें राहणारे धोंडभट आठल्ये म्हणून भिक्षुकीवर निर्वाह करणारे गृहस्थ मलकापुरास नवरात्राच्या उत्सवास आले असतां, तेथील एक प्रसिद्ध पुरुष चिंतोपंत खेर ह्यांच्या मार्फत आठल्यांची व माझ्या वडिलांची ओळख झाली. त्यांची मुलगी साळू दहा-अकरा वर्षांची लग्नाची होती, तिच्या लग्नाची गोष्ट निघून धोंडभटांनीं माझ्या वडिलांस जावई करण्याचें ठरविलें. प्रथम मुलगी तर पाहिली पाहिजे. त्यासाठीं वडिलांचा जो विश्वासू शिपाई भागूजी राऊत जवळ होता त्यास त्यांनीं मुलगी पाहण्यास भडकंब्यास पाठविलें. तो जाऊन मुलगी पसंत करून आला. पुढें स. १८६० च्या फाल्गुनांत हें लग्न भडकंबें येथें झालें. त्यासाठीं वडील व त्यांचे मामेबंधु बळवंतराव आंबर्डेकर मलकापुराहून भडकंब्यास गेले. तेथें लग्न उरकून वरात मलकापुरास खेरांच्या घरीं आली. आजीला वेळेवर खबर न कळल्यानें ती लग्नास येऊं शकली नाहीं. तेव्हां गोवीलचें घर झालेलें नव्हतें. तें पुढें चार वर्षांनीं तयार झालें. मीच आईचा सर्वांत वडील मुलगा. तिच्या सोळाव्या वर्षी झालों. गोवीलचें घर नवीन बाळंतिणीस कसें मानवेल ह्या शंकेमुळें शेजारीं आंबर्डेकरांच्या हसोळच्या घरांत माझ्या आईचें बाळंतपण झालें. बाराव्या दिवशीं नामकरणास मला नवीन घरांत आणलें. तेथील घरदार व परडें परमूं तयार होऊन सर्व संसार नवीन थाटण्याचें मुख्य काम माझी आई व आजी ह्या दोघींनीं केलेलें आहे. वडील बाहेर धनगरमहालावर

राहून प्रपंचास साह्य करीत. गुरेंढोरें, शेती, भाजीपाला हीं कामें ह्या बायका पाहत.

गोवीलचें हें ठिकाण पाऊणशें वर्षांच्या आमच्या उद्योगानें फार मनोरम बनलें. मात्र पुढील भरभराटीवरून त्याची पहिली स्थिति लक्षांत येणार नाहीं. माझें बालपण त्या ठिकाणीं गेल्यामुळें मला त्या वेळचे संस्कार चांगले आठवतात. घरासभोंवार डोंगर व जंगल होतें. शेतें पाडलेलीं नव्हतीं. प्रथम लहानशी विहीर पाडून पाण्याची सोय करण्यांत आली. पहिलें घर म्हणजे लहानसें केंबळी झोपडें. जवळ शेजार तर नव्हताच. सभोंवार कोणी धनगर व गौळी गुरें बाळगून राहत. साप किरडूं व हिंस्र श्वापदें ह्यांचा सुळसुळाट असे. पुढें वडिलांनीं हळूहळू जंगलें तोडून जमीन साफ केली. शेतीच्या मळ्या आंखल्या. शेजारीं ओढा होता, त्यास धरणें बांधून परसांत वाहतें पाणी आणिलें. आंबे, फणस, सोनचांफे, नारळी, पोफळी, केळी अशांचे सुंदर बगीचे निर्माण झाले. गडी माणसें ठेवून वडील काम ठरवून देत त्याप्रमाणें सर्व उस्तवारी आई व आजी करीत. लहानपणीं मी थंडींत किंवा पावसांत शेतीच्या कामांत किंवा गुरें राखण्यांत राबत असें. आजी दशमी हातावर देई ती खात खात मी गुरांपाठीमागें हिंडत असें. लहानपणीं सृष्टिसौंदर्याचा अनुभव मिळणें हें शिक्षणाचें एक प्रधान अंग होय असें मी मानतों. भूक-तहान, पाऊस-चिखल, वगैरेंची सवय होऊन शरीर काटक व निरोगी बनतें आणि वृत्ति प्रफुल्लित राहते. आम्ही बंधु मिळविते झाल्यावर पूर्वीचें गवती झोपडें मोडून आम्हीं त्याच जागेवर मोठी दुमजली इमारत साग व फणस ह्या उंची लाकडांची उठविली. अशा एखाद्या कुटुंबाचा संसार म्हणजे लहानशा राज्याप्रमाणें वर्षोगणती चालतो तेव्हांच तो नांवारूपास येतो. सन १८६५ त गोवीलचें वास्तव्य निर्माण झालें, तें ठिकाण पुढें सन १९३५ त आम्ही सर्व बंधूंनीं विकून टाकलें. तें सांभाळण्यास कोणी नाहीं, परिस्थिति बदलली, उत्पन्न कांहीं नाहीं आणि खर्च मात्र वाढला. म्हणून तो सर्वच उद्योग सोडून द्यावा लागला. गोवील येथें आमची ही नांदणूक ऐशीं वर्षे टिकली. आतां तेथें आमचें कांहीं नाहीं ह्याची अद्यापि हळहळ वाटते.

३. माझी आई

माझें मातुल घराणें आठल्यांचें. हे भिक्षुकी वृत्तीनें भडकंब्यास राहत. सरदेसाई व आंबर्डेकर ह्यांचा बाणा गृहस्थी, तसा आठल्यांचा नव्हता. अलीकडे गृहस्थ व भिक्षुक हा भेद समाजांत सर्वथा बुजला आहे, तथापि माझ्या लहानपणीं तो बराच जाणवत असे. त्याचा उपसर्ग लग्नादि कार्यास पोचत नसे. तथापि आठल्ये घराण्याशीं जडलेला हा ऋणानुबंध प्रत्यक्ष माझ्या जीवनाला उपयुक्त कलाटणी देण्यास मुख्यत: कारण झाला. इतकेंच नव्हे तर बुद्धिमत्तेच्या सांस्कृतिक विषयांत आठल्ये मंडळी आम्हा गृहस्थांपेक्षां पुष्कळ वरचढ होती असें आतां मला वाटतें. शिपोशीच्या आठल्ये घराण्यांत आज पन्नास एक कुटुंबें नांदत असून विद्येच्या व कलाकौशल्याच्या कामांत त्या मंडळींचे अनेक कर्तबगार पुरुष निपजले, तसे ते इतरत्र फारसे आढळत नाहींत. आज तरी व्यवहारत: सरदेसाई व आंबर्डेकर आठल्यांच्या तुलनेनें पुष्कळच मागासलेले म्हणावे लागतील. माझे मातामह धोंडभट आठल्ये सात्त्विक परोपकारी वृत्तीचे असून बडोदें वगैरे ठिकाणीं भिक्षुकी करून प्रपंच भागवीत. त्यांचे धाकटे बंधु महादेवबाबा घरीं संसार चालवीत. सन १८६५ त माझा जन्म झाला त्या सुमारास धोंडभटबाबा बडोद्यास भिक्षुकीसाठीं गेले ते आठ वर्षे तिकडेच होते. पश्चात् त्यांचें कुटुंब प्रसूत होऊन दोन जुळे पुत्र झाले ते माझे मातुल हरि व विठ्ठल माझ्याहून वयानें एक वर्षानें मोठे. माझी मुंज वयाच्या ७ व्या वर्षी स. १८७२ च्या माघांत गोविलास झाली आणि लगेच फाल्गुनांत ह्या हरि-विठूंच्या मुंजी मोठ्यास झाल्या, त्या प्रसंगीं मी तेथें हजर होतों. हरि, विठू व मी अशा तिघांस धोंडभटबाबा संध्या शिकवीत तें मला आठवतें. त्यानंतर एकदोन वर्षांनीं धोंडभट बडोद्यास गेले आणि तिकडेच स. १८७४ च्या सुमारास वारले. त्यांच्या आजाराची बातमी आल्यावरून त्यांचे वडील चिरंजीव लक्ष्मणभटनाना भेटीसाठीं बडोद्यास गेले, पण त्या पूर्वींच ते आटोपले होते. माझी मातुश्री ही त्यांची एकच सर्वांत वडील कन्या. हिचा जन्म स. १८४९ चा. तिच्या पाठीवर चार बंधु लक्ष्मण, बळवंत, हरि व विठ्ठल. माझ्या एकंदर जीवनांत ह्या चौघा मातुलांचा आम्हांस मोठा उपयोग झाला. बळवंतराव ह्यांनींच माझी इंग्रजी शिकण्याची सोय रत्नागिरीस केली, त्या योगानें माझें पुढील भवितव्य सर्वथा बदलून

गेलें. स. १८७२ च्या श्रावणांत माझे मातामह धोंडभट आमच्याकडे गोविलास आल्याचें मला स्मरतें. एकदोन दिवस आमच्याकडे राहिले. त्या वेळीं त्यांनीं माझ्या वडिलांस गळ घालून सांगितलें, "दररोज विष्णुसहस्रनामाचा पाठ करून देवास तुळशी वाहत जा म्हणजे तुमचा भाग्योदय होईल." तदनुसार मीं पुढें विष्णुसहस्रनाम पाठ केलें तें अद्यापि मला येतें. वडिलांस तें येत नसे. संस्कृत उच्चारांची त्यांस बिलकूल माहिती नव्हती. विष्णुसहस्रनाम-स्तोत्राचे सुमारें १०० श्लोक असून ते म्हणण्यास १५ मिनिटें लागतात. तूं विष्णुसहस्रनाम रोज म्हणतोस ना असें आपल्या पत्रांत वडिलांनीं मला वारंवार लिहिलेलें आहे. झोपीं जातांना दुसरा उद्योग नसला तर अद्यापि तें म्हणत मी निजतों.

माझी आई व आजी ह्या दोघींच्या कर्तृत्वांत पुष्कळ भिन्नता होती. हा विरोध संसारास पूरकच झाला. स्वयंपाक, दूधदुभतें, काटकसर, टापटीप हे प्रकार आजीला जसे साधत तसे आईला साधले नाहींत. पाहुणे नेहमीं येत ते आजीला म्हणत, तुझ्यासारखा स्वयंपाक व दूधदुभतें अन्यत्र कोठें मिळत नाहीं. घरांतल्या व्यवहारांत आजी दक्ष होती, पण घराबाहेरच्या कामांत म्हणजे शेतभात, लागवड, झाडझाडोरा हे प्रकार मजूर आणून करणें हीं कामें आई करी तशीं आजीला साधलीं नाहींत. घरांत कांहीं उणें असलें कीं बाहेर खटपट करून आई तें लगेच भागवी. एकंदरींत घरांत आजी व बाहेर आई अशी आमच्या कौटुंबिक कामांची वांटणी सामान्यतः घडून आली, तेणेंकरून प्रत्यक्ष वडील फारसे घरीं नसतां आरंभीं कांहीं वर्षे संसार ठीक चालला.

दोघींच्या स्वभावांतही पुष्कळ फरक होता, तो उपकारकच झाला. सासवासुनांचें रहस्य फारसें नव्हतें. आजी तापट, करारी व कठोर वृत्तीची तर आईच्या ठिकाणीं मृदुता, कनवाळूपणा जास्त होता. ह्यास्तव शेजारी-पाजारी सर्व आईला अनुकूल असत. उसनेंपासनें आणून संसाराचा गाडा चालविण्यांत आजीचें लक्ष नसे. स्वयंपाक, देवपूजा, घरांतील स्वच्छता, वगैरे बाबतींत आजीचा हात कोणी धरूं शकलें नाहीं. आजी व आजोबा ह्यांचें तर कधींच पटलें नाहीं. आजोबा म्हणजे घरांतील एक अडगळ असाच जन्मभर समज होता. ते वेळेवर जेवणासुद्धां यायचे

नाहींत. आज मला हे लहानपणचे स्वभावभेद मोठे हृदयंगम वाटतात. कारण समग्र कुटुंबाचें हिताहित अशा स्वभावभेदांनीं बनत जातें हें आपण सर्वांनीं लक्षांत ठेविलें पाहिजे.

आजीनें मरेपर्यंत कष्ट केले. स. १८८६ सालीं मी बंधूंना शिक्षणासाठीं रत्नागिरीस ठेविलें, तेव्हां दोन एक वर्षे आजी तेथें मुलांना जेवण करून घाली. शंकरराव रायकर माझे एक स्नेही त्यांजवर देखरेख ठेवीत. तेथून परत स. १८८९ त आजी गोविलास आली आणि उत्तरोत्तर थकत गेली. अल्पकाळ शेवटचे पांच चार महिने तिला बुद्धिभ्रंश झाला. त्यांतच ती खितपत न पडतां सवाष्णपणीं कृतकृत्यतेच्या आनंदानें गोवील येथें नव्वद वर्षांच्या वयांत रविवार अधिक ज्येष्ठ वद्य ११ शके १८१८, ता. ७ जून स. १८९६ ह्या दिवशीं परलोकास गेली. तिच्या पश्चात् तीन वर्षांनीं आजोबा गेले. मातुश्रीच्या मरणसमयीं वडिलांनीं फार आक्रोश केला. यथाविधि उत्तरकार्य केलें. सासऱ्याचे व वडिलांचे दोन विस्तृत संसार ह्या आजीनें जन्मभर सांभाळले. अशा पुण्यवान स्त्रिया फार थोड्या आढळतात.

माझें मातुल घराणें व आम्हां सर्व बंधूंचा परिवार ह्या उभय कुटुंबांचें हार्दिक रहस्य पूर्वापार चालत असून सर्व मंडळी एकाच कुटुंबाप्रमाणें अद्यापि प्रपंचांत नांदत आहेत. हा प्रकार सामाजिक घटनेंत स्मरणीय होय. अशी एकमेकांचें अगत्य ठेवणारी वृत्ति सर्व समाजांत पसरेल तेव्हांच राष्ट्रास सामर्थ्य येईल. उदयाची संधि येणें आपल्या हातचें नाहीं. पण तशी संधि थोड्याबहुत अंशानें प्रत्येकास केव्हां तरी येतच असते. मात्र संधीचा वेळेवर उपयोग करून घेण्याची पात्रता प्रत्येकानें लहानपणापासून झटून पैदा केली पाहिजे. माझ्या शिक्षणाची व्यवस्था लागतांच अनुकरणानें आमचीं व आठल्यांचीं सर्व मुलें आपापल्यापरी उद्योग करून आज आपला योगक्षेम यथायोग्य चालवीत आहेत. जनोबातात्यांच्या विस्तृत घराण्यांत दुसरे पुरुष फारसे पुढें आले नाहींत.

माणसास संधि कशी येते आणि तिचा त्यानें उपयोग कसा करावा ह्या संबंधांत माझेंच उदाहरण सांगण्यासारखें आहे. भडकंब्यास आठल्ये राहत असतां शेजारच्या मोर्डे गांवाची मालकी सरदेसायांकडे होती. आमची वेरवलकरांची जशी एक कुटुंबशाखा तशी ह्या मोर्डेकरांची आणखी एक

शाखा निराळी होती. त्या शाखेंतील एक मुलगी शिपोशीचे सुप्रसिद्ध वासुकाका आठल्ये ह्यांस दिलेली असून ती बापाची एकुलती एक कन्या असल्यामुळें तिच्याकडे वतनाचा वारसाहक्क आला. तिला पुत्र झाले त्यांत यशवंत वासुदेव ऊर्फ बापूसाहेब हे विद्वत्तेनें व कर्तबगारीनें नामांकित झाले. त्यांच्या मातुश्रीचा मोर्ड्याचा कारभार हे भडकंब्याचे आठल्ये – माझे मातामह धोंडभटआबा – पाहत असत. धोंडभटांचीं मुलें, माझी मातुश्री व तिचे बंधु लहानपणीं सर्व ह्या मोर्डेकर सरदेसायांच्या घरांत वाढलीं. माझी मातुश्री आणि बापूसाहेब व त्यांचे बंधु अशा प्रकारें एकत्र राहिले म्हणून त्यांचा जिव्हाळा विशेष होता. मी गोवील येथून शिपोशीस शाळेंत जात असें. माझे मातुल विशेषतः बाळूमामा प्रथम रत्नागिरीस वासूकाकांजवळ व पुढें मुंबईस बापूसाहेबांजवळ कारकुनी कामावर असत. ह्या ओळखीमुळें वासूकाका व बापूसाहेब ह्यांच्याशीं माझा परिचय घडून त्यायोगानें माझ्या भावी शिक्षणाची तयारी सहज घडून आली. माझा पुढील एकंदर आयुष्य-क्रम ह्या योगानें निराळा बनला. आठल्ये व सरदेसाई जवळ जवळ शंभर वर्षे एकजीव राहिले. असा अनुभव क्वचित् दृष्टीस पडतो. माझे मातामह व त्यांचे बंधु महादेवबाबा आठल्ये हे अत्यंत प्रेमळ होते. महादेवबाबा मला नोकरी लागल्यावर ता. ३ नोव्हेंबर स. १८८९ रोजीं स्वर्गवासी झाले.

४. माझें बालपण, मराठी शाळा

त्या वेळच्या आमच्या गांवठी वातावरणांत शिक्षणाचें नांव नव्हतें किंवा कारकुनीपलीकडे ब्राह्मण समाजाची हाव गेलेली नव्हती. वर्तमानपत्रें नाहींत, आगपेट्या किंवा घासलेटचा संपर्क लोकांस पोचलेला नाहीं, अशा त्या अज्ञानांधकारांत माझें बालपण गेलें. वडिलांनीं मला मोडी चालू केलें तें कारकुनी शिक्षणासाठीं. शाळेंत मुलांस पाठविलें पाहिजे अशी भावना माझ्या वडिलांची नव्हती. घरांत हिशेबाच्या पावत्या किंवा लग्नमुंजीच्या हस्तलिखित चिठ्या लिहिण्यापलीकडे कागद नव्हता. वडिलांचें एक लहानसें दप्तर असे त्यांत वर्षाकांठीं पांचचार पातळ फ्रेंच कागदाचे ताव ते ठेवीत. तेसुद्धां दोन बोटें रुंदीच्या चिरफोळ्या फाडून ते वापरीत म्हणजे दुर्मिळतेमुळें कागदाचा वापर संकुचित होता. वडील बहुधा बाहेर फिरतीवर असत, पावसाळी दिवसांत शेतीच्या कामापुरते घरीं राहत. त्यांनीं धुळीची पाटी बनवून मला अक्षरओळख

1878 /

केली. घरचा सर्व व्यवहार आजी व आई पाहत. मिळून त्या वेळचें माझ्या दृष्टीचें क्षितिज किती आकुंचित होतें ह्याची कल्पना होईल. जोशी किंवा उपाध्या पंचांग सांगण्यास किंवा श्राद्धपक्षास वर्षाकांठीं आमचेकडे येई, तेवढ्याच परस्थांची आम्हा लहान मुलांस ओळख.

माझ्या लहानपणची सर्वांत पहिली आठवण मला होते, ती माझ्या पाठीवर झालेल्या बंधूच्या मृत्यूची. मी सुमारें साडेतीन वर्षांचा असतांना मी, मातुश्री व तो लहान चार दोन महिन्यांचा भाऊ, अशा तिघांस एकदम देवी आल्या. त्यांत तो मुलगा गेला. मातुश्री व मी दहा-पांच फोड्या येऊन बरे झालों. रात्रीं दिव्याजवळ फडक्यांत गुंडाळलेलें लहानसें मोटकुळें ठेवून जवळ आई, आजी रडत बसल्या होत्या तो देखावा माझ्या दृष्टीपुढें अद्यापि उभा राहतो. अर्थात् त्यांतलें बरेंवाईट मला त्या वेळीं कांहींच कळत नव्हतें. दुसरी आठवण दृष्ट लागण्याची. कित्येक माणसें ह्या दृष्टीसंबंधानें त्या बाजूस ठळकपणें ठाऊक असत. कांहीं चांगला पदार्थ, पडवळ, दुध्या, भोपळा, वगैरे भाज्यांची आळीं अशा माणसांच्या नजरेस पडलीं कीं तीं सर्व लगोलग खराब होऊन जात. "काय हो, तुमचीं हीं पडवळें सुंदर आलीं आहेत," अशी वाहवा त्या माणसाच्या तोंडून निघाली कीं पुरे. आमच्याच दारांतलें पडवळीचें आळें त्या माणसानें पाहतांच एक दोन दिवसांत सर्व फळें सुकून गळून पडलेलीं मीं पाहिलीं आहेत. दृष्ट लागणारे हे गृहस्थ आमच्या इतके परिचयाचे असत कीं ते दुरून दिसतांच आई-आजी आम्हांस सूचना देत कीं, तो .... येतो आहे बरें, त्याच्यापुढें तुमचे चांगले पदार्थ आणूं नका. एकदां आमची म्हैस व्याली, तिच्या ओटीची वाखाणणी त्या गृहस्थानें केली. लगेच तिच्या आंचळांतून दुधाऐवजीं रक्त येऊं लागलें. आम्हांस तेव्हां दृष्टीचा हा प्रकार खरा वाटे. आमची आई सालोसाल भाऊबिजेसाठीं आम्हां मुलांस घेऊन आपल्या माहेरीं जाई. एका सांच्याचीं गोरीं गोमटीं तरतरीत मुलें बरोबर घेऊन आई दहा मैल चालून जाई तेव्हां तिला माहेरचीं माणसें बजावीत, "अशीं आपलीं मुलें रस्त्यानें मिरवीत तूं आणूं नकोस, त्यांना दृष्ट लागेल वाटेनें." खरेंच आम्ही सर्व भावंडें लहानपणीं अगदीं सारखीं दिसत असूं. पण आतां मी पाहतों तों प्रत्येकाचें व्यक्तिमत्व अगदीं भिन्न बनलें आहे. एकाच आंब्याच्या कोया आपण शेंदोनशें एकदम रुजत घालतों, लहानपणीं ते रोपे इतके

हुबेहूब एकसारखे दिसतात कीं ते निराळे ओळखूं येणार नाहींत. पण पुढें त्यांचे मोठे वृक्ष बनले म्हणजे त्यांतला एक देखील तंतोतंत दुसऱ्यासारखा दिसत नाहीं. आनुवंशिक ठेवण कित्येक बाबतींत संततीच्या ठिकाणीं सारखी उतरत असली तरी पुढें परिस्थितीनें प्रत्येक इसम अगदीं वेगळा बनत जातो हा सृष्टीचा दंडक अनिवार्य आहे.

माझीं पहिलीं सात वर्षे गोवील येथेंच गुरें राखण्यांत किंवा आई-आजीच्या मागें हिंडण्यांत गेलीं. वडिलांचा व माझा संबंध फार थोडा आला. त्यांचा धाक मात्र आम्हां मुलांस विशेष वाटे. पहिलाच मुलगा मी, शिवाय वडिलांची त्या वेळीं बरीच चलती असल्यामुळें सातव्या वर्षीच माझी मुंज करण्याचें त्यांनीं ठरविलें. माझा जन्म स. १८६५ च्या वैशाखांतला आणि १८७२ च्या माघांत माझी मुंज गोवीलच्या मानानें मोठ्या थाटांत झाली. शंभर ब्राह्मण तरी जेवावे असें वडिलांचें म्हणणें, पण दहीं, दूध, लोणी, तूप, तांदूळ, वगैरे पदार्थ मुबलक घेऊन शेंदोनशें धनगर वडिलांच्या बोलावण्यानें जमा झाले आणि त्या सर्वांस उत्कृष्ट ब्राह्मणी भोजन यथेच्छ मिळून ते आनंदानें परत गेले. ब्राह्मणांऐवजीं धनगरांच्या जेवणावळीचा हा योगायोग वडिलांना त्या वेळीं आवडला, तितकाच तो मलाही आतांच्या विचारसरणीनें श्रेयस्कर वाटतो.

मुंज होतांच आजीनें मला वेरवलीच्या शाळेंत नेऊन माझें नांव दाखल केलें. तेथें तिचा भाचा होता त्याच्या घरींच माझ्या भोजनाची व्यवस्था केली. माझ्याबरोबर माझा आतेभाऊही रामा देसाई नांवाचा त्याच वेळीं माझ्याचसारखा वेरवलीस येऊन राहिला. सुमारें दीड वर्ष मी ह्या शाळेंत राहिलों. आमच्या घरापासून वेरवलीची शाळा सहा मैलांवर होती. रजेच्या वगैरे दिवशीं आम्ही कधींकाळीं घरीं येत असूं. पण खाण्याची व्यवस्था चांगली नसल्यामुळें आम्ही दोघेही तेथें अगदीं जेरीस येऊन गेलों. दुपारीं बारा वाजेपर्यंत आम्हांस पोटाला कांहींच मिळत नसे. चहाचा प्रघात त्या वेळीं नव्हता आणि अन्न म्हणून दूध घेण्याची प्रथाही नव्हती. कँडीकृत मराठी पहिलें व दुसरें पुस्तक हीं दोन रोज रोज वाचून आमचीं पाठ झालीं. शाळेंत घड्याळ नव्हतें. निदान ७ ते ११ पर्यंत सकाळीं व पुनः २–६ पर्यंत सायंकाळीं असे आम्ही सारखे शाळेंत डांबलेले. अंधारामुळेंच शाळा

बंद ठेवावी लागे तेवढीच आमची सुटका. अकरा वाजतां शाळा सुटल्यावर पातेरा जमवून पाणी तापवून आंघोळ केल्यावर मग दोन घास तोंडांत पडायचे. आमच्या घरून तूप, ताक, वगैरे आजी वरचेवर पाठवी, पण पांच सात जेवणारांस तें किती पुरणार? पुसाळकर नांवाचे शिक्षक होते ते पुस्तक वाचण्यापलीकडे दुसरें कांहीं शिकवीत नसत. दोन तास सायंकाळीं सर्व मुलें मोठमोठ्यानें परवचा म्हणत, तेवढीच थोडीशी करमणूक. रामा देसाई व मीं ह्या शाळेंत अगदीं वैतागून गेलों. दोघेही एकदां गोविलास आल्यावर आम्हांस ह्या शाळेंत जायचें नाहीं असा त्रागा करून बसलों. वडिलांनीं कारण विचारलें, पण तें सांगण्याची चोरी. भूक लागते, जेवण वाईट ही आजीच्या भाच्याची निंदा व त्याच्या बायकोचा जाच हें खरें कारण आम्हांस सांगतां आलें नाहीं. शेवटीं वडिलांनीं मला शिपोशीच्या शाळेंत नेऊन ठेविलें. आमच्या घरापासून ही शाळा अडीच मैल अंतरावर होती, सबब भोजनाची सोय शिपोशींतच शिवरामभटबाबा आठल्ये म्हणून एक सद्गृहस्थ होते, त्यांना दरमहा आठ पायली तांदूळ आम्हीं द्यावे आणि त्यांजकडे मी कायम राहावें असें ठरून स. १८७४ च्या आरंभीं मी शिपोशी गांठली. तो प्रयोग मला अत्यंत श्रेयस्कर' ठरला. तेथवलीस माझें वास्तव्य दीड वर्ष झालें.

आठल्यांची शिपोशी म्हणजे बुद्धिमान् पुरुषांचें आगर. गांवाच्या मधून वाहणारी नदी, कांठावर भातशेती, तिला लागून घरें, लोक उद्योगी, तरतरीत, भर पावसाच्या पुरांत नदींत उड्या टाकून कित्येक मैल पोहणारे, वेदाध्ययन, शास्त्र, वकिली, शिक्षण, इत्यादि विषयांत प्रवीण, गांवकुटाळींतही कित्येक परिपूर्ण; तीस एक कुटुंबांच्या वसतींत लग्नमुंजीचे किंवा सुवेरसुतकाचे प्रसंग सदा चालू. हरिहरेश्वराचा कार्तिकीचा वार्षिक उत्सव व तन्निमित्त भजन, नाटक, वगैरे विविध प्रकार चालत ते पाहण्यास शेजारच्या गांवांतून मोठा लोकसमुदाय जमत असे. मला त्या वेळीं हें सर्व पाहण्याची भारी मौज वाटे. त्याचे संस्कार माझ्या मनावर कायम ठसलेले आहेत. गांवठी नाटकें – त्यांत रामरावणाचे युद्धप्रसंग, सूत्रधार व विदूषक ह्यांचे विनोदी संवाद, गणपति-सरस्वतींचे आशीर्वाद हे सर्व प्रयोग अत्यंत मनोवेधक वाटत. रावणाला दहा तोंडें सावरण्याची कोण त्रेधा उडे. त्या वार्षिकी उत्सवाशिवाय शिपोशी गांवांत लग्नमुंजींचे समारंभ, प्रयोजनें,

पितृपक्षांतील महालयांची धांदल, हेही प्रसंग वारंवार घडून त्यांत गांवचे लोक झाडलोट, साहित्य, पत्रावळी, स्वयंपाक अशीं कामें करण्यांत सर्व झटून मदत करीत. त्यांत मलाही शक्त्यनुसार भाग घ्यावा लागे. मुख्यतः पंक्तिभोजनांत श्लोक म्हणण्याची पाळी म्हणजे तें एक दिव्यच वाटे. गांवांतील बहुधा प्रत्येक घरीं आम्हा मुलांस जेवणाचा योग येई. कांहीं गृहस्थ प्रतिष्ठित, सत्प्रवृत्त व उद्योगी होते तर गांवकुटाळही कांहीं कमी नव्हते. गोवील येथें माझ्या वडिलांस भेटण्यास शिपोशीचे पुष्कळ स्नेही येत, त्यांच्या गप्पा म्हणजे एक विशिष्ट करमणूकच वाटे. सारांश, शिपोशीच्या ह्या सामाजिक जीवनांत स. १८७४ पासून १८७९ पर्यंत माझीं तब्बल पांच वर्षे स्मरणीय व शिकाऊ वयाचीं गेलीं. हा माझा पहिला अपूर्व जन्मयोग होय. ह्याच कारणानें बापूसाहेब आठल्यांसारख्या थोर विद्वान् पुरुषाशीं माझा संबंध जडून माझ्या जीवनाला उत्कृष्ट कलाटणी मिळाली.

ता. १० एप्रिल, स. १८७४ ह्या तारखेचा एक दाखला वडिलांच्या दप्तरांत मला मिळाला, त्यांत मजकूर कीं “ विद्यार्थी गोविंद स. सरदेसाई ह्याचे वडील लोकलफंड भरीत आहेत सबब त्यास मासिक फी माफ करावी, ” असा लेख गोवीलगांवच्या पोलिसपाटलाचा आहे. त्यावरून कळतें कीं त्या सालच्या आरंभीं मी शिपोशीच्या शाळेंत दाखल झालों. तेथें मला मास्तरांनीं दुसरींत बसविलें. तीन वर्षांत तीन इयत्ता पुऱ्या झाल्या. पुढील दोन वर्षांत भाषा, गणित, वगैरे थोडें जास्त शिकत राहिलों, पण चौथीच्या पुढील इयत्ता शिकविण्यास शाळेस परवानगी नव्हती. सहावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर कारकुनी मिळे, पण माझें वय पंधरा पुरें नसल्यानें ह्या शाळेंतील माझीं शेवटचीं दोन वर्षे बरींचशीं फुकट गेलीं असें मला आतां वाटतें.

शिपोशीस शिक्षक व पालक दोघेही मला भले मिळाले. विनायकपंत जोशी हे सच्छील, निःस्पृह व शिस्तीचे शिक्षक शाळेवर मुख्य असून गुरुजी ह्या नांवानें अद्यापि त्यांचें घराणें शिपोशींत आहे. गणित विषयांत त्यांची गति विशेष होती. त्यांच्या हाताखालीं दामोदर नारायण आठल्ये असिस्टंट असून तेही नांवाजलेले शिक्षक पुढें सातारा जिल्ह्यांत प्रसिद्धीस आले. ह्या दोन शिक्षकांच्या नजरेखालीं माझा अभ्यास चांगला बनला.

शिवाय शशिशेखर दामोदर आठल्ये हे दुसरे एक नामांकित विद्वान् गृहस्थ त्या वेळीं आमच्या वरच्या वर्गांत विद्यार्थी होते. मोरोपंतादि कवींच्या कृति ते आम्हा विद्यार्थ्यांना भक्तीनें वाचून समजावून देत, हा आणखी एक फायदा आम्हांस सहज मिळाला. पण ह्या सर्वांहून मोठ्या भाग्याची गोष्ट म्हणजे त्रेवलीची कष्टमय आठवण विसरून जावी असे गृहस्थ ज्यांच्याकडे माझी राहण्याची व भोजनाची सोय वडिलांनीं करून दिली होती, ते शिवराम-भटबाबा आठल्ये, त्यांची कुटुंबिनी पार्वतीबाई, त्यांचे दोघे वडील बंधु हीं सर्व प्रेमळ व उद्योगी माणसें मला भेटलीं. स्वतःच्या मुलाप्रमाणें त्यांनीं माझा सांभाळ केला. शाळेंतील शिक्षणास जोड म्हणून शिवरामबाबांनीं मला पूजा, रुद्रावर्तन, नैवेद्यवैश्वदेव, विष्णुसहस्रनाम – शिवकवचादि स्तोत्रपाठ, पुरुषसूक्त, श्रीसूक्त, इत्यादि विषय शिकविले. हे कर्मठ वैदिक पुढें कैक वर्षे आमच्या वडिलांचे निकट स्नेही बनले. बडोद्याला नोकरी लागल्यावरही माझी प्रेमळ आठवण ते सारखी बाळगीत. पार्वतीवहिनींचे उपकार तर मला कधीं विसरतां येणार नाहींत. पूजादि विषयांव्यतिरिक्त दुसरीं दोन उपयुक्त कसबें शिवरामबाबा व त्यांचे बंधु ह्यांनीं मला शिकविलीं. एक बांबूच्या टोपल्या, चटया, वगैरे बनविण्याचें व दुसरें अंबाडीच्या दोऱ्या वळण्याचें. शिवरामबाबांच्या घरांत उत्कृष्ट बांबू तयार होत. ते तोडून त्याचे उपयुक्त जिन्नस बनविणें हें कसब त्यांजबरोबर काम करून मला साधलें व घरीं गेल्यावर गोविलास मीं त्याचा चांगला उपयोग केला. अद्यापि मला ह्या दोनही कसबांचा नाद असून, अंबाडीचें बीं रुजत घालून, झाडें मोठीं झाल्यावर तोडून तीं पाण्यांत कुजवून दोर काढणें व त्या दोरांचीं दावीं, दोऱ्या, नांगराच्या जोखड्या, बैलांच्या दावणी, वगैरे मीं तयार केल्या. हात व बोटें इत्यादींच्या व्यापारांत मन गुंतविणें हें शिक्षणाचें एक प्रधान अंग त्या वेळीं मला शिपोशीच्या निवासांत मिळालें, त्याचा मोठा फायदा झाला असें मला अद्यापि वाटतें. असें कांहीं तरी विशिष्ट कसब प्रत्येकाला अवश्य येत असलें पाहिजे. शिवरामबाबा पुढें संसारांत वैतागल्यामुळें मला त्यांचें घर सोडावें लागलें. शेवटचें एक वर्ष गोविलास जेवून मी शिपोशीस शाळेंत जात असें.

५. दैन्यावस्था

मी शिपोशीस शिकत असतांनाच आमची गृहस्थिति खालावत गेली तो प्रकार येथें सांगणें जरूर आहे. आरंभीं लहान थोडका संसार होता तोंपर्यंत

वडिलांच्या अल्प प्राप्तींत संसार निभावत गेला, पण उत्तरोत्तर आम्ही अनेक मुलें जन्मास येऊन खर्च वाढले. पूर्वीचें लहानसें झोपडें राहण्यास पुरेना. तेव्हां मूळ घराच्या काटकोनास जोडून एक लहान सोपा स. १८७६ च्या उन्हाळ्यांत वडिलांनीं वाढवून नवीन बांधला. त्या वेळीं विचार होता कीं पुढील सालीं बंधु नारायणरावाची मुंज करावयाची त्यास जागा पुरली पाहिजे. घरांत पुढील वेगमीचें धान्य व इतर साहित्य भरपूर ठेवून दरसालप्रमाणें मृगारंभीं वडील धनगरमहालच्या उद्योगासाठीं कोल्हापुरास निघून गेले. घरांत फक्त आम्ही मुलें व दोघी बायका. ता. ५ जून, स. १८७६ ह्या दिवशीं मध्यरात्रीनंतर आमच्या त्या गवती घरास एकाएकीं आग लागून तें अल्पावकाशांत जळून खाक झालें. मी शिपोशीस होतों. दुसऱ्या दिवशीं दोन प्रहरीं मला तेथें बातमी कळतांच मी आलों तों घराचा भीषण देखावा दिसला तो काय वर्णन करावा! आग कशानें लागली त्याचा खुलासा कधींच कळला नाहीं. मी आलों तेव्हां धान्य वगैरे पेटलेलें धुमसत होतें आणि सर्व आवारांतून धूर निघत होता. आई बाहेरची असून मुलांस घेऊन निघाली आणि आजीनें सर्व देव ओटींत घेऊन देव्हारा तेवढा ओढीत बाहेर आणला. इतक्यांत मेघगर्जना होऊन पावसाचा मोसम सुरू झाला, तेणेंकरून आग विझली. घराजवळ दुसरा शेजार नव्हताच. सकाळीं बाहेरचे लोक जमा झाले. घराच्या दक्षिण बाजूस टेकडीवर गुरांचा गोठा होता त्यांत आम्ही जाऊन राहिलों. दोनचार दिवसांत माझे चुलत आजोबा कृष्णोबा नायक आले, त्यांनीं गोवील गांवांतलेंच एक घर विकत घेऊन तें आमच्या जळालेल्या घराच्या जागेवर उभें केलें. त्यांत पुनः आम्ही जाऊन राहूं लागलों. इतक्यांत वडील आले. त्यांना कृष्णोबा आपांनीं कळविलें, "पुढील सालीं वेरवलीस आमच्या घरीं लग्नें-मुंजी आहेत, त्यांत तूंही आपला मुलगा घेऊन ये म्हणजे तुला मुंजीचा निराळा खर्च नको." वडिलांनीं तो प्रकार मान्य केला आणि स. १८७७ च्या फाल्गुनांत नारायणरावाची मुंज वेरवलीस झाली. तो समारंभ मनाजोगता झाला नाहीं म्हणून वडिलांस नेहमीं त्याचा खेद वाटे.

हाच आमच्या उतरणीचा आरंभ. स. १८७७ हें साल हिंदुस्थानांत अवर्षणानें पडलेल्या दुष्काळामुळें गाजलेलें आहे. त्या सालीं धनगरमहालचे मक्ते रद्द होऊन प्रांतांत जमीनसारा लागू झाला. वडील आजारी पडले.

भर पावसाळ्यांत घरांत अन्न नाहीं. उपास पडूं लागले. ह्या वेळचीं माझीं पत्रें विद्यमान आहेत, त्यांत ता. १७ सेप्टेंबर १८७७ चा खालील मजकूर आहे — " आईनें शेजारणीकडून दोन रुपये उसने आणले. सालपें गांवांत घाग नांवाचा धान्य विकणारा शेतकरी होता, त्याजकडून त्या पैशाचें भात विकत आणलें. शिवाय आणखी आणलें तें शेतें पिकल्यावर परत करायचें." ही जी आमची घसरपट्टी चालू झाली तिचें निवारण पुढें २५ वर्षांनीं मला नोकरी लागल्यावर व नारायणरावास रंगाच्या धंद्यांत कमाई होऊं लागल्यावर स. १९०२ सालीं झालें. अर्थात् आम्हां सर्व मुलांचा हा शिक्षणाचा काळ व लग्नमुंजीचे वाढते खर्च ह्यांच्या कर्जाचा जाच किती व कसा झाला तें आतां निराळ्या शब्दांनीं सांगण्याची जरूर नाहीं. धनगरमहाल संपल्यावर वडिलांनीं आंबेघाटांतलें टोलनाकें लिलावांत तीन वर्षें घेतलें, त्यांतही त्यांना बूडच आली. पुढें त्यांनीं कोल्हापूर संस्थानचा हिर्डा जमा करून विकण्याचा मक्ता घेतला. दोघेचौघे भागीदार जमविले, पण धंद्याच्या खरेदीविक्रीची वगैरे कांहींच माहिती वडिलांस किंवा इतरांस नसल्यामुळें सर्व उद्योग अंगाशीं आला. पहिलें कर्ज चारदोनशें होतें तें चारदोन हजारांवर गेलें. आम्हां सर्व बंधूंच्या उद्योगानें व एकोप्यानें संकट निवारण होऊन पंचवीस वर्षांनीं वडिलांस आम्हीं कर्जमुक्त केलें हा चिरंतन आनंद आम्हांस लाभला. आम्हा सर्व बंधूंच्या त्या वेळच्या पत्रांत हे विषय आज स्पष्ट दिसतात.

६. रत्नागिरीचीं पांच वर्षें

शिपोशीची शाळा मी स. १८७९ च्या मे महिन्यांत सोडली. ता. ५ ऑक्टोबर स. १८७८ च्या माझ्या पत्रांत " आमची पांचव्या यत्तेची परीक्षा पंधरा दिवसांत होईल", असें वाक्य आहे. त्याप्रमाणें परीक्षा होऊन पुढें सहावीचा अभ्यास चालू असतां मला रत्नागिरीच्या इंग्रजी शाळेंत जाण्याचा योग अकल्पित जमून आला. माझे मातुल बाळूमामा आठल्ये हें रत्नागिरीस बापुकाका आठल्ये वकिली करीत त्यांजपाशीं कारकुनीवर होते. स. १८७९ च्या वैशाखांत बापुकाकांचें सर्व कुटुंब भाऊसाहेबांच्या लग्नानिमित्तानें शिपोशीस जमलें. माझी मातुश्री व बापूसाहेब लहानपणीं एकत्र खेळलेले. शिपोशीच्या शाळेस बापूसाहेबांनीं भेट दिली त्या वेळीं माझी विचारपूस करून त्यांनीं मला अगत्यानें कळविलें,

"आईला सांग, सर्व मुलें घेऊन आमच्याकडे लग्नाला ये." त्याप्रमाणें आई सर्व मुलांना घेऊन लग्नाच्या दिवशीं त्यांजकडे गेली. बाळूमामांनीं बापूसाहेबांना आमचीं सर्वांचीं नांवें सांगून ओळखी करून दिल्या. त्यांत माझ्या अभ्यासाची विचारपूस करतां इंग्रजी शिक्षण चालविण्याची वडिलांस ऐपत नाहीं असें ऐकून बापूसाहेब म्हणाले, "तूर्त रत्नागिरीस तर आमच्या सर्व मंडळींबरोबर जा. तेथें हळू हळू सोय लागेल." एवढा आधार पुरेसा झाला. पुढें समारंभ आटोपला आणि जूनचे आरंभीं मी रत्नागिरीस गेलों. तेथेंही वासुकाकांचें घर होतें, खाणावळींत जेवून त्यांजकडे अभ्यासास राहण्याची सोय लागली. घराहून तांदूळ वगैरे आणून वारांऐवजीं चार आठ आणे वर्गणी जमवून खर्चाची निभावणूक होऊं लागली. बाळूमामा अडीअडचणीस कपडे, पुस्तकें वगैरे देत. ते आतां मुंबईस बापूसाहेबांजवळ कारकुनीवर राहूं लागले. स. १८७९ च्या जूनपासून नोव्हेंबर स. १८८४ पावेतों माझीं साडेपांच वर्षें रत्नागिरीस गेलीं. वासुकाकांचे जावई तात्या कुळकर्णी त्यांच्याचकडे राहून वकिली करीत, त्यांचें मला मोठें मार्गदर्शन झालें. वासुकाकांनीं रत्नागिरीस घराजवळ नवीन बंगला बांधला, त्यांत माझ्या राहण्याची उत्कृष्ट सोय झाली. त्या बंगल्यांत तात्यांजवळ मीही राहूं लागलों, त्यामुळें निर्मल जीवनाचा लाभ मला सहजीं घडला. त्यांच्या विहिरीचें उत्कृष्ट पाणी तर मला अद्यापि चांगलें आठवतें.

रत्नागिरीचें माझें पहिलें वर्ष जम बसण्यांत गेलें. स. १८८० च्या आरंभीं हायस्कुलांत दाखल झालों, तेव्हांपासून नियमित अभ्यासानें व सच्छील वृत्तीनें मी उत्तरोत्तर चढती पायरी गांठीत गेलों. केव्हां माफी, केव्हां एक दोन रुपये मासिक शिष्यवृत्ति मिळाल्यानें खर्च भागत गेला, अडचण भासली नाहीं. वर्षांत एकही दिवस गैरहजर नाहीं अशा विद्यार्थ्याला नियमितपणाचें बक्षीस — रेग्युलॅरिटी प्राइझ — मिळत असे, तें पांचांपैकीं दोन वर्षें मला मिळालें. शिवाय एक वर्षी एलिस प्राइझचीं पुस्तकें मिळालीं. माझे बहुतेक वर्गबंधु हुशार व अभ्यासू होते. त्यांची माझी चांगली चढाओढ चाले. दोनदां वार्षिक परीक्षेंत माझा नंबर पहिला आला. मुटाटचे गणेश अनंत लेले व राजापूरचे सोनार विद्यार्थी हरि सदाशिव बेलवलकर हेच माझे निकट सहाध्यायी व स्नेही असून आम्ही तिघेही पुढें बी. ए. होऊन उद्योगास लागलों. लेले तर माझ्याबरोबर

बडोदा संस्थानांतच नोकरीस लागले. हे गणपतराव लेले थोड्या वर्षांपूर्वी (कोंकणांत ता. १३ नोव्हेंबर, स. १९४७ रोजीं, नरसोपंत केळकरांनंतर एक महिन्यानें व महात्मा गांधींपूर्वी अडीच महिने) वारले, म्हणजे स. १८८० पासून १९४९ पर्यंत सत्तर वर्षे त्यांचा माझा ऋणानुबंध टिकून राहिला. बेलवलकर राजापूर हायस्कूल चालवीत होते. ते मात्र लवकर वारले. संस्कृतांत ते विशेष प्रवीण होते. आम्ही तिघेही विद्यार्थी चांगल्यापैकीं होतों.

सुदैवानें रत्नगिरीस आम्हांस शिक्षकही कळकळीचे व विद्यार्थ्यांवर प्रेम करणारे मिळत गेले. माधवराव काशीकर, रामभाऊ गांगण (वाणी), गोपाळराव करंदीकर, केशवराव रेगे हे दुसरीपासून पांचवीपर्यंत आमचे शिक्षक असून प्रत्येकाचा कांहीं तरी विशिष्ट गुण विद्यार्थ्यांच्या चिरंतन हिताचा बनला. शाळा दररोज तव्वल पांचसहा तास चाले. उगाच वेळ मारून नेणारा एकही शिक्षक आम्हांस मिळाला नाहीं. नृसिंहशास्त्री घाटे संस्कृत शिकवीत, त्यांस इंग्रजी फारसें येत नसतांही भांडारकरांचें संस्कृत पहिलें व दुसरें पुस्तक ते चांगलें समजावून देत, शिवाय मराठी कविताही शिकवीत. हे शास्त्री दोन वर्षेपावेतों आम्हांस घरीं खासगी रीतीनें दशकुमारचरित शिकवीत, त्याचा उपयोग आम्हांस चांगला झाला. आमचा वर्ग मोठा, साठांचे वर गेला, तेव्हां त्याच्या दोन तुकड्या करण्यांत आल्या. आम्ही वरच्या तुकडींत असूं. ह्या तुकडींतील आम्ही २७ विद्यार्थी मॅट्रिकला बसलों, त्यांतले २६ उत्तीर्ण झाले. ह्यावरून आमची प्रगति लक्षांत येईल. दर शनिवारीं सकाळीं आठवड्याची लेखी परीक्षा असे, तिचा आम्हांस फार उपयोग झाला.

ह्या वेळीं रत्नागिरी हायस्कुलांत एक विलक्षण रूपान्तर घडून आलें, त्यामुळें आम्ही पांच वर्षांत हायस्कूलचा अभ्यास पुरा करून मॅट्रिक होऊं शकलों. शाळेचे हेडमास्तर नाना साठे म्हणून कडक शिस्तीचे गृहस्थ होते. आमचा त्यांचा फारसा संबंध आला नाहीं. ते इंग्रजी व गणित बरें शिकवीत. स. १८८१ सालीं पुण्यास न्यू इंग्लिश स्कूल स्थापन होऊन नवीन वळणाचें केसरी पत्र निघूं लागलें, तें आम्ही रत्नागिरी येथें आवडीनें वाचूं लागलों. स. १८८२ च्या होळीच्या रंजेत रात्रीं समुद्रावर आट्यापाट्या खेळून परत येतांना मध्यरात्रीच्या सुमारास हेडमास्तरांच्या घरापुढें मुलांनीं जमून शंखध्वनि केला. त्यांत हेडमास्तरांच्या मर्जींत नसलेले एक दोन

म्होरके – पुण्याहून आमच्या शाळेंत आलेले – वाकडा डाव खेळत होते, हें मला किंवा इतरांस त्या वेळीं ठाऊक नव्हतें. पुढें होळीच्या सुटीनंतर शाळा भरली तेव्हां नेमून दिलेला अभ्यास झाला नाहीं ह्या सबबीवर हेडमास्तरांनीं ह्या म्होरक्यांस व सरसकट सर्वांस छडीनें झोडपून काढण्याचा प्रकार आरंभिला. त्या वेळीं एका धटिंगणानें वर्गांत छडी हातांत धरून सांगितलें, "सर, मारूं बिरूं नका, दंड करा किंवा शाळेंतून हाकलून द्या, पण छडीचा मार आम्ही सहन करणार नाहीं." त्यावर हेडमास्तर बोलले, "जा निघून शाळेंतून." असें म्हणतांच तो आपलीं पुस्तकें घेऊन बाहेर पडला. पुढें दुसऱ्यास विचारलें, तोही तसाच निघून गेला. म्हणतां म्हणतां बहुतेक सगळा वर्ग बाहेर पडला. लगेच शाळेच्या बाहेर त्या सर्वांनीं जमून ही शाळा सोडून पुण्याच्या न्यू स्कुलांत जाण्याचा ठराव केला. वीसएक विद्यार्थी तरी बाहेर पडले. कांहीं जे खुद्द रत्नागिरीचेच होते ते अगतिकत्वामुळें राहिले. मला वाटतें शिवराम महादेव परांजपे व वामनराव पोतदार हे ह्या मंडळीचे प्रमुख रत्नागिरी सोडून पुण्यास गेले. त्या सालीं रत्नागिरींतून एकही विद्यार्थी मॅट्रिकला बसूं शकला नाहीं.

रत्नागिरी हायस्कूल म्हणजे सर्व इलाख्यांत नमुनेदार गणलें जात होतें. जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति सालोसाल रत्नागिरीला मिळायची, तो प्रकार नाहींसा होऊन स. १८८२ सालीं मॅट्रिकला बसणारे विद्यार्थी नाहींत हें वैगुण्य डायरेक्टर चॅटफील्डना अत्यंत झोंबलें. स. १८८३ च्या मे महिन्यांत त्यांनीं मुद्दाम नाना साठे ह्यांस भेटीस बोलावून ठपका दिला. नानांनीं कळविलें, "माझ्या हाताखालीं योग्य शिक्षक नाहींत तर मी सुधारणा कशी करणार!" त्यावर सर्व इलाख्याची शिक्षकयादी नानांपुढें टाकून चॅटफील्ड म्हणाले, "ह्यांतले वाटेल ते दोन इसम तुम्ही पसंत करा. मी तावडतोब त्यांस रत्नागिरीस दाखल होण्याचा हुकूम देतों." त्यावर नानांनीं गणेश व्यंकटेश जोशी फर्स्ट असिस्टंट व मोरो वामन कीर्तने दुसरे असे गृहस्थ पसंत केले. मेअखेरच्या वादळी हवेंत ह्या दोघांना ५ जून रोजीं रत्नागिरीस दाखल होण्याचा हुकूम सुटला. आगबोटीचा दुर्घट प्रवास. बिचारे निमूट-पणें बोटीचे हाल सोशीत नोकरीवर रत्नागिरीस आले. व्यक्तिशः हा बनाव मुद्दाम दैवानें माझ्या हिताचा घडवून आणिला असें नंतर माझ्या प्रत्ययास आलें.

आमच्या वर्गांतील हुशार विद्यार्थी निवडून सहावीचा नवीन वर्ग बनविण्यांत आला आणि कीर्तने ह्यांनीं सहा महिन्यांत सहावी पुरी करून दिली. ते इंग्रजी व इतिहास हे दोन विषय चांगले शिकवीत. सन १८८३ च्या दिपवाळीस परीक्षा होऊन आम्ही लगेच मॅट्रिकच्या वर्गांत चढलों, तेव्हां आमचे गुरु जोशीबाबा बनले. टिळक, रानडे, गोखले ह्यांच्या तोडीचे हे विद्वान् गृहस्थ एक वर्ष आम्हांस लाभले हा आमचा सर्वांत मोठा लाभ होय. शांत, सावकाश, अस्खलित असा त्यांचा वचनौघ होता. सायंकाळचा शेवटचा तास सुरू झाला कीं ते व आम्ही अभ्यासांत एकचित्तानें देहभान विसरून सर्व विषय इतके भराभर शिकलों कीं अद्यापि त्यांचे ते उच्चार माझ्या कानांत घोळत आहेतसे वाटतात. सायंकाळ होत आली म्हणजे खोलीच्या बाहेर उघड्या जागेंत उभ्यांनीं काम चाले तें अंधार पडून दिसेनासें होईपर्यंत. ते सर्व टिपणें लिहून पाठ करण्यास देत. आम्ही तीं रात्रीं व सकाळीं खपून आत्मसात करीत गेलों. कोणाचा अभ्यास बरोबर झाला नाहीं तर ते जोशीबाबा अशा कठोर शब्दांनीं वर्गांत चर्चा करीत कीं अंतःकरणास जखमाच व्हाव्या. शाकुंतल वगैरेंतील श्लोक त्यांनीं आम्हांस शिकविलेले मी विसरूं शकणार नाहीं. मजवर त्यांचा लोभ विशेष होता आणि पुढेंही माझ्या रियासती वाचून त्यांनीं मला अखेरपावेतों चांगलें मार्गदर्शन केलें. सद्गुरु भेटणें ही भाग्याची गोष्ट होय. तशी त्यांजबद्दल आमची पूज्यबुद्धि कायम राहिली.

दुसरे शिक्षक मोरोपंत कीर्तने हे पुढें माझे श्वशुर बनले. जणूं काय मुलीला वर शोधण्याकरितांच आठनऊ महिने मला त्यांचा सहवास रत्नागिरीस घडला. मी त्यांचा विद्यार्थी अविवाहित आहें असें कळतांच त्यांनीं माझ्या वडिलांस मुलगी पाहण्यास बोलाविलें. वडील आले, त्यांना मी सांगितलें, "आम्ही आहों एवढ्यांचेंच पोषण आज होत नाहीं, मग आणखी एक प्राणी पोसण्यास कां वाढवावा!" मुलगी पाहून त्यांनीं पसंत केली, पण माझा हट्ट त्यांनीं कीर्तने ह्यांस सांगितला, त्यावरून त्यांनीं उलट कळविलें, "आम्ही आज मुलीच्या अंगावर चालचलाऊ दागिने घालूं. जावई समर्थ होईपर्यंत तिला माहेरीं पोसूं आणि माझा कॉलेजच्या अभ्यासाचा खर्च सोसूं." असें सांगितल्यावर मी निरुत्तर झालों. बापूसाहेब, तात्या कुळकर्णी, इत्यादि हितचिंतकांनीं माझी समजूत घातली. ता. २९ फेब्रुवारी, स. १८८४

रोजीं रत्नागिरीस विवाह होऊन आमच्या घरीं लक्ष्मी आली. पुढील महिन्यांत कीर्तन्यांची बदली पुण्यास होऊन ते तिकडे निघून गेले. एवंच, माझा हायस्कूलचा अभ्यास तर झालाच, पण कॉलेजच्या शिक्षणाचीही तरतूद सिद्ध झाली. हा माझ्या भाग्यशाली लग्नाचा विषय कोंकण प्रांतांत कैक दिवस विशेष गाजला.

७. कॉलेजचीं चार वर्षें

हायस्कुलांत जरी माझा नंबर वर राहत गेला तरी कॉलेजच्या अभ्यासांत मला नेहमीं तिसऱ्या वर्गांतच रखडावें लागलें. एकंदरींत माझी बुद्धि बेताचीच असून नियमित उद्योगानें मी आपला निभाव करीत गेलों. स. १८८४ च्या डिसेंबरांत मॅट्रिकचा निकाल लागतांच श्वशुरांनीं मला पुण्यास बोलावून जानेवारींत फर्ग्युसन कॉलेज नवीन निघणार होतें त्यांत दाखल होण्याची सूचना केली. श्वशुरांची नोकरी पुणें हायस्कुलांत सेकंड असिस्टंटची असून ते डोलकर आळींत राहत असत. जवळच गद्रे ह्यांच्या वाड्यांत नवीन कॉलेज चालू झालें. अर्थात् श्वशुरांकडे राहून कॉलेजचा अभ्यास थोड्या खर्चांत भागण्याची सोय झाली. ता. १ जानेवारी स. १८८५ रोजीं मी रात्रीं मुंबईहून निघून दुसऱ्या दिवशीं सकाळीं पुण्यास मुक्कामावर दाखल झालों. हा माझा पहिला आगगाडीचा प्रवास विशेष स्मरणीय वाटला. कॉलेजांत मला फी माफ झाली.

रत्नागिरीहून पुण्याचें वातावरण अगदींच भिन्न. तेथें टारगटपणा व खोडकर वृत्ति मला चहूंकडे अनुभवावी लागल्यामुळें माझें मन कधीं प्रसन्न राहिलें नाहीं. शिवाय श्वशुरगृहींचा तुरुंगवास, माझी बोली व राहणी कोंकणी, कीर्तने घराणें पुण्यांत नाणावलेलें, त्यांचे जावईही तेथें पुष्कळ, बहुतेक भपकेबाज व ऐपतवान, सणसमारंभानिमित्त दहापांच जावयांचा मेळावडा जमायचा. बडोद्याचे नायब दिवाण विनायकराव कीर्तने, त्यांचे बंधु नीलकंठराव व माझे चुलत सासरे केशवराव हे सर्व त्या वर्षीं पुण्यास जमले, त्या निमित्तानें जावयांच्या पंक्ती झाल्या. त्यांत मी अगदीं वेगळा पडायचा. कॉलेजच्या प्रत्यक्ष वर्गांत स्नेही असे मला कोणी लाभले नाहींत. न्यू इंग्लिश स्कुलांतीलच विद्यार्थी कॉलेजांत दाखल झालेले, बाहेरचे माझ्यासारखे फार थोडे, त्या सर्वांचे पूर्वीचे शिक्षक तेच आतां प्रोफेसर

बनलेले टिळक, आगरकर, आपटे, केळकर, इत्यादिकांशीं त्यांचे हे पूर्वीचे विद्यार्थी लगट करीत तशी सलगी आमच्यासारख्या बाहेरच्यांना शक्य नव्हती. वामन मोरेश्वर पोतदार, विनायकराव रानडे, वगैरे माझे सहाध्यायी त्या वेळीं ओळखीचे झाले, ते परवांपर्यंत साठ वर्षे आम्ही एकत्र परिचित राहिलों. आतां मीच तेवढा एकटा मागें एकलकोंडा राहिलों आहें. हरिभाऊ आपटे कादंबरीकार आमच्या वर्गांत होते, पण त्यांचा माझा निकट परिचय पुढील काळांत झाला. कॉलेजच्या दिवसांत ह्या पुणेंकरांचा मला अत्यंत धाक वाटे. या कारणास्तव मी कोणाशीं विशेष न मिसळतां आपल्या कामांत निमग्न राहिलों. फर्ग्युसन कॉलेजला प्रीव्हियसपुरतीच परवानगी होती.

पुण्यास माझें वास्तव्य फार तर सहा सात महिनेच म्हणजे स. १८८५ चे दोन विभाग, पहिला हिंवाळी जानेवारी-एप्रिलचा व दुसरा जून-सेप्टेंबरचा पावसाळी. ऑगस्टांत श्वशुरांची बदली सोलापुरास झाली आणि कॉलेजचा वार्षिक क्रम संपतांच सेप्टेंबरांत मी मुंबईस बापूसाहेब आठल्यांकडे आलों. नोव्हेंबरांत प्रीव्हियस परीक्षा होऊन मी पुढें मुंबईसच एल्फिन्स्टन कॉलेजांत दाखल झालों. बापूसाहेबांचा आधार व समागम हे बहुमोल फायदे मला मुंबईतच शक्य झाले. त्यांचे बंधु भाऊसाहेब, दुसरे एक तेथील विद्यार्थी गणेश विष्णु आठल्ये, त्याच घरांत खालील मजल्यावर राहणारे राजारामशास्त्री बोडस ह्यांचे चिरंजीव माधवराव व मी असे चार विद्यार्थी दररोज आगगाडीनें चर्नीरोडवरून महालक्ष्मी स्टेशनला जाऊन तेथून राणीच्या बागेसमोर एल्फिन्स्टन कॉलेज या वेळीं होतें त्यांत जात असूं. माझें भोजन खाणावळींत असून कधीं माफी, कधीं थोडीशी शिष्यवृत्ति, कधीं हायकोर्टांतील कागदांच्या नकलांचें काम बापूसाहेबांकडून मिळे त्याजवर निर्वाह चाले. अडीअडचणीस बाळूमामा आठल्ये होतेच. वर्ष दोन वर्षें शिकवणीची प्राप्ति पदरांत आली. मिळून अडचण अशी कधीं वाटली नाहीं. एकंदरींत कॉलेजचा तो माझा काळ मजेचा म्हणतां न आला तरी जीवनाच्या तयारींत बरा सुखाचा गेला ह्यांत संशय नाहीं. त्यांतून माझा सर्व खर्च भागविण्याची सोय श्वशुरांस नव्हती म्हणून त्यांचें आर्थिक साह्य न घेतां मीं स्वावलंबन स्वीकारलें हा चिरंतन अभिमानाचा प्रकार मला लाभला.

बापूसाहेबांचें घर म्हणजे निर्मळ आनंदानें वाहणारा सन्नीतीचा संतत प्रवाह, तो मला पूर्ण अनुभवण्यास मिळाला. भिन्न पेशाच्या विद्वद्व्यवसायांच्या व्यक्तींनीं त्यांचें घर सदैव गजबजलेलें असे. मंडलिकांसाठीं बापूसाहेब मनुस्मृतीचें संपादन करीत होते. खालच्या मजल्यावर राजारामशास्त्र्यांजवळ त्यांचें अध्ययन चाले. युनिव्हर्सिटीच्या वार्षिक परीक्षकांचें सत्र व प्रश्नपत्रिका एम्. ए. पासून मॅट्रिकपर्यंतच्या निघावयाच्या त्यांत जुने, अनुभवी व सर्वांच्या विश्वासास पात्र असे योग्य सल्लागार एक बापूसाहेब असल्यामुळें, भांडारकर पितापुत्र, काशीनाथपंत तेलंग, विश्वनाथ नारायण मंडलिक, जिनसीवाले, लक्ष्मण रामचंद्र वैद्य, वामन शिवराम व महादेव चिमणाजी आपटे, बाळ गंगाधर टिळक अशा नानाविध व्यक्ति कामानिमित्त बापूसाहेबांकडे येत. त्यांच्या निरोप्याचें काम मला मिळून, त्यांचा परिचय घडत गेला. ब्राह्मण सभेचा उगम त्याच वेळीं प्रथम बापूसाहेबांकडे निर्माण झाला. स. १८८५ च्या डिसेंबरांत इंडियन नॅशनल कॉंग्रेस ह्या राष्ट्रसभेची पहिली बैठक मुंबईस झाली त्या वेळीं बापूसाहेबांचे बंधु आपासाहेब मद्रासला डॉक्टरी करीत ते तिकडचे पुष्कळ प्रतिनिधि घेऊन मुंबईस बापूसाहेबांच्या घरीं उतरले. आर्. रघुनाथराव त्यांत होते. ह्या मंडळीची निगा टेवण्याचें, त्यांस गवालिया तलावाच्या इमारतींत पोचवून परत आणण्याचें, स्नानभोजनादि सांभाळण्याचें काम आम्ही करीत असूं. हा एक अपूर्व योग मला मिळाला. उमशेचंद्र व सुरेंद्रनाथ बानर्जी, आनंदा चार्लु, पंडित अयोध्यानाथ अशा अनेक राष्ट्रविभूतींचें पहिलें दर्शन मला त्या प्रसंगीं घडलें. बापूसाहेब आठल्ये म्हणजे एक झाकलें माणिक, आकृतीनें लहान पण विद्वत्तेनें थोर. भिन्न प्रकृतींच्या व्यक्तींकडून सहकार्य करवून एखादा इष्ट प्रयोग सिद्धीस नेण्याचें त्यांचें कौशल्य अनुपम होतें. सर्वांना ते पूज्य वाटत. त्यांचा निर्णय सर्वांनीं मनापासून मान्य करायचा. आदल्या वर्षी पुण्याच्या मुक्कामांत हिराबागेंतील वसंत व्याख्यानमालेस हजर राहण्याचा योग आला, त्या वेळीं माधवराव कुंठे व माधवराव रानडे ह्यांचे जाब प्रतिजाब ऐकायला मिळाले. तें पुण्याचें वातावरण व मुंबईचें हें भारतीय प्रतिष्ठितांचें संमेलन ह्यांचा मनोरम ठसा माझ्या शिकाऊ वृत्तीवर कायमचा उठला. त्यावरून मी कशा वातावरणांत वाढलों हें दिसून येतें.

पण मुंबईच्या या परिसरांत मला कॉलेजचें अभ्यासू जीवन व तेथील वसतिगृहाचा अनुभव मिळूं शकला नाहीं. मी व माझे कित्येक सहाध्यायी शहरांत राहून ठरीव तासांपुरते कॉलेजांत जात असूं. कॉलेजचें पुस्तकालय, क्रीडांगण, विद्यार्थ्यांच्या चढाओढी व गमती किंवा प्राध्यापकांचा परिचय ह्यांचा लाभ मला मिळाला नाहीं. वर्डस्वर्थसारख्यांचें इंग्रजी व्याख्यान मला बिलकूल समजत नसे, ह्याची मला मोठी हळहळ वाटे. एल्. आर्. वैद्यांनीं मालतीमाधव आम्हांस उत्कृष्ट शिकविलें, त्यांतलें पुष्कळसें मला अद्यापि पाठ येतें. कादंबरीचा अभ्यास आम्हीं घरींच केला. पीटर्सन संस्कृत शिकवीत, त्यांचें ज्ञान यथातथाच असे. हॉथार्नथ्वेट गणित शिकवीत, त्या विषयांत मी पास झालों. झळकीकरशास्त्री तर्कसंग्रह शिकवीत तें मला आकर्षक वाटलें नाहीं. पण घरीं अभ्यास करून स. १८८६ अखेर मीं पहिली बी. ए. संपादन केली.

ह्या सालची एक दुःखद आठवण म्हणजे बापूसाहेबांचे धाकटे बंधु आपासाहेब ह्यांचा मृत्यु होय. स. १८८५ सालीं ते राष्ट्रीय सभेच्या बैठकीस मद्रासहून मुंबईस आले होते. त्यांचा कामाचा व्याप भारी व महत्त्वाकांक्षा अनिवार, त्यामुळें त्यांना विश्रांति कशी ती मिळत नसे. प्रकृति सांभाळण्याकडे लक्ष नसल्यामुळें स. १८८६ च्या उन्हाळ्यांत त्यांना मद्रास येथें उन्मादवायूचा विकार झाला. बापूसाहेबांना मुंबईस बातमी कळतांच ते डॉ. नानासाहेब देशमुखांना घेऊन मद्रासेस गेले आणि चार दिवसांत आपासाहेबांना घेऊन मुंबईस आले. आपासाहेब शुद्धींत नव्हते; अंगावरचें वस्त्र फेकून भुईवर गडबडा लोळत. असे चार आठ दिवस गेल्यावर ता. १ जुलै रोजीं सकाळीं आपासाहेब वारले. सोनापुरांत आम्ही स्मशानयात्रेस गेलों. बरोबर विश्वनाथ नारायण मंडलिक वगैरे पुष्कळ परिचित मंडळी होती. ह्या घटनेचा परिणाम मुख्यतः बापूसाहेबांच्या प्रकृतीवर होऊन ते कुटुंबभारानें खचून गेले. तितक्यांतच त्यांची बायको दुखण्यानें वारली. तेव्हां रोजचें कामही त्यांना होईनासें झालें. जीर्णज्वर येऊं लागला. मुंबईच्या राहणींत आराम पडणें अशक्य वाटून त्यांनीं बडोद्याची नोकरी स्वीकारली. सयाजीरावांनीं मुंबई हायकोर्टाकडे जजाच्या जागेसाठीं एका तरुण वकिलाची मागणी केली होती. हायकोर्टाकडून बापूसाहेबांची शिफारस झाली. ता. २ मार्च, स. १८८७ रोजीं दरमहा

७०० रुपयांवर बापूसाहेबांनीं बडोद्याच्या नोकरीचा स्वीकार केला. लगेच गुढीपाडव्याच्या दिवशीं ते तेथें दाखल झाले. नोकरींत मुंबईपेक्षां जास्त आराम मिळेल अशी बापूसाहेबांची अपेक्षा होती ती खोटी ठरली. अधिकाऱ्यांकडून सडकून काम घेण्यांत सयाजीराव अत्यंत दक्ष. शिवाय बडोद्याची हवाही मुंबईहून खराब. बडोद्यांतच वैशाखांत नवीन मुलीशीं त्यांनीं लग्न केलें अर्थात् गृहसौख्य त्यांना कधीं लाभलेंच नाहीं. मला मात्र त्यांनीं बडोद्याच्या नोकरींत नेलें हा माझा फायदा आणि तेथें सतत सात वर्षे मला त्यांचा समागम मिळाला हें विशेष. मार्च १८९४ त ते आजारी होऊन मुंबईस गेले आणि लगेच ता. २९ रोजीं निवर्तले. बापूसाहेबांच्या तीव्र बुद्धीला निकोप शरीराची जोड नव्हती. आठल्ये घराण्याच्या इतिहासांत मीं त्यांचें व त्यांच्या वडिलांचें चरित्र लिहिलें आहे, त्यावरून मला ह्या घराण्याचा केवढा उपयोग झाला तें कळून येईल. माझ्या कॉलेजकाळाचे हे स्मृतिशेष होत.

बापूसाहेब बडोद्यास गेले, तेव्हां त्यांचें मुंबईचें घर मला सुटलें. नजीकच झावबाच्या वाडींत जनोबा किर्लोस्कर म्हणून बापूसाहेबांचे परिचित व व्यवहारज्ञ गृहस्थ होते, त्यांजकडे मी राहण्यास गेलों. तेथेंही माझा काळ चांगला गेला. पण स. १८८७ सालची माझी बी. ए. ची परीक्षा नापास झाली. वास्तविक त्या वेळीं फर्स्ट बी. ए. कठीण समजली जाई. तींत मला गोता आला नाहीं आणि दुसरी बी. ए. अत्यंत सोपी समजली जाई तींत मी दगावलों. त्यामुळें अल्पकाळ खर्चाची कुचंबणा झाली. पण बापूसाहेबांच्याच शिफारसीनें गोकुळदास तेजपाळच्या बोर्डिंग संस्थेचा आश्रय मला मिळाला आणि मी गवालिया तलावावरच्या त्यांच्या इमारतींत सुमारें ११ महिने राहिलों आणि स. १८८८ च्या नोव्हेंबरांत पुनः परीक्षेस बसून बी. ए. पास झालों. कॉलेजांत असतांच मी एल्‌एल्. बी. चा अभ्यासक्रम पुरा करीत होतों. ज्यूरिस्प्रूडन्सची माझी परीक्षा झाली. बी. ए. झाल्यावर तो विषय पुरा करावा अशा विचारांत मी असतां विधिघटना निराळीच बनली. बडोद्यास महाराजांना स्वतःजवळ रीडर म्हणून वर्तमानपत्रांचें व खासगी पत्रांचें कारकुनी काम करण्यास एक चलाख, बी. ए. झालेला इसम पाहिजे होता. "तुमच्या खात्रीचा कोणी असेल तर बोलवा," असें महाराजांनीं बापूसाहेबांस सांगितलें. त्या वेळीं मी मुंबईस

परीक्षेस बसलों होतों. "मी खात्री देऊं शकेन असा एक इसम हल्लीं परीक्षेस बसला आहे, तो आपणांस पाहिजे तर मी बोलावूं शकेन," असें बापूसाहेबांनीं महाराजांस कळविलें. त्यावर त्याला अवश्य बोलावून घ्या असा हुकूम महाराजांनीं लगेच बापूसाहेबांस दिला. त्यावरून त्यांनीं मला मुंबईस लिहिलें, "परीक्षा पास होऊन वकिलीकडे न जातां नोकरी करणें असेल तर तूं लगेच बडोद्यास ये." म्हणजे परीक्षेचा निकाल होण्यापूर्वीं माझें पुढील जीविताचें ताट अगोदरच वाढून सिद्ध होतें.

स. १८८८ च्या क्रिस्तमसच्या पूर्वदिवशीं परीक्षेचा निकाल होऊन मी लगेच बडोद्यास गेलों. दरम्यान महाराज आपल्या आजारी मुलाच्या प्रकृतीसाठीं महाबळेश्वरीं गेले. त्यांचे बंधु संपतराव सेक्रेटरी होते त्यांनीं ता. १ जानेवारी, स. १८८९ रोजीं दरमहा ७० रु. पगारावर माझी नोकरी चालू केली आणि महाराजांस कळविलें, "ह्या नवीन गृहस्थास राजवाड्यांतील रीतरिवाजांची वाकबगारी मुळींच नाहीं, सबब त्यास मी चार दोन महिने येथें बडोद्यांत मजजवळ ठेवून तयार करतों आणि मग आपलेकडे पाठवीन." त्यावर महाराजांचा जबाब तारेनें आला कीं त्या गृहस्थास येथेंच पाठवून द्या, रीतरिवाज तो आमच्याजवळ शिकेल. त्यावरून लगेच मी बापूसाहेबांकडून १०० रु. उसने घेतले आणि बाळूमामांसह मुंबईस आलों. तेथें नवीन कपडे वगैरे सर्व दरबारी थाट, कोट, पाटलोण, बूट, मोजे, पागोटें, वगैरे दोन तीन दिवसांत बनवून पुणें-वाठारपर्यंत आगगाडीचा प्रवास करून तेथून पुढें चाळीस मैल घोड्याच्या मेलतांग्यांतून ता. ११ जानेवारी, स. १८८९ रोजीं सायंकाळीं महाबळेश्वरच्या मुक्कामावर पोचलों. महाराजांचे डॉक्टर रामभाऊ तळवलकर स्वारींत महाराजांबरोबर होते, त्यांस बापूसाहेबांनीं ओळखीचें पत्र मजजवळ दिलें होतें. रात्रीं त्यांजकडे राहिलों. सकाळीं मला पर्सनल मॅनेजर आपासाहेब पुणेंकर म्हणून होते त्यांस रामभाऊंनीं भेटवून मला महाराजांकडे पोचविण्याची तजवीज केली.

शनिवार ता. १२ जानेवारी, स. १८८९, पौष शु. ११ शक १८१० ह्या दिवशीं महाराजांशीं माझी पहिली भेट कशी विचित्र झाली तो योगायोग अविस्मर आहे. सकाळीं आठानंतर स्नान व कपडे करून मी पुणेंकरांच्या तंबूवर गेलों. जवळच्या बंगल्यांत महाराज राहत असून ते त्या वेळीं

घोड्यावर फिरायला गेले होते. पुणेंकरही कपडे करून मला म्हणाले, "आतांच महाराज घोड्यावरून परत येत आहेत. मी जाऊन तुम्हांस भेटवितों." मला तंबूंत बसवून ते बंगल्यावर गेले. मी आल्याचें वर्तमान त्यांनीं महाराजांस कळविलें. तितक्यांत महाराजांची स्नानाची तयारी झाली. श्मश्रू वगैरे आटोपण्यास साडेदहा वाजले. मी तंबूवर तिष्ठत बसलों. महाराज व पुणेंकर दोघेही माझा विषय विसरून गेले. ११ वाजतां महाराजांचें भोजन चालू झाल्यावर मग पुणेंकर १२ च्या अंदाजांत परत तंबूवर येतात, तों मला पाहून ते लगेच म्हणाले, "तुमचें नांव मीं महाराजांस सांगितलें आहे. आतांच तुमची भेट करवितों." असें म्हणून त्यांनीं जासुदास बोलावून त्याजबरोबर मला महाराजांकडे पाठविलें. त्या वेळीं महाराज पुढच्या व्हरांड्यांत भोजनोत्तरची शतपावली करीत होते. सोललेले ओले बदाम हातांत घेऊन तोंडांत टाकीत बरोबर त्यांचे चुलत बंधु अवचितराव ह्यांच्याशीं बोलत असलेले ते मला प्रथम दिसले. अंगांत एक कुडतें, पायांत विजार व सपात, डोकें उघडें; पण अवचितराव मात्र पागोट्यासह पूर्ण वेषांत. अशा दोघांस पाहून क्षणभर मला पंचाईत पडली कीं ह्यांतले महाराज कोणते ? पण जवळ जातांच हा माझा भ्रम निरास पावला. महाराजांच्या सांगण्यावरून अवचितरावांनींच मला तुम्ही कोठले, नांव काय असे कांहीं प्रश्न विचारले. मी उत्तरें सांगतांच महाराजांनीं, तुम्ही बी. ए. कधीं झालांत, परिक्षेला विषय कोणते होते, दुसरी भाषा संस्कृत होती कीं काय ? त्यांचीं मीं उत्तरें देऊन मला संस्कृत भाषा परीक्षेला होती असें सांगितलें. त्यावर मोडी येतें काय, इंग्रजी अक्षर कसें आहे, असें विचारून ते मला बोलले, "आंत चला, तुमचें अक्षर कसें आहे पाहूं." मी त्यांजबरोबर आंत गेलों. खोली लहानशीच असून तींत एक टेबलखुर्ची व जवळ बिछाना घातलेला एक पलंग, टेबलावर लेखनसाहित्य. तें दाखवून मला महाराज बोलले, "खुर्ची घ्या आणि मी सांगतों तें लिहा." मी कागद टांक घेऊन लिहूं लागलों, ते मला तोंडानें इंग्रजी मजकूर सांगूं लागले. येथें थोडा पूर्वसंदर्भ सांगितला पाहिजे.

-- बडोद्यास जमीन-मापणी व इनामें-देवस्थानें ठरविण्याचें नवीन खातें नुकतेंच सुरू होऊन त्याची रचना ठरविण्यासाठीं दिवाण, नायब-दिवाण, सेटलमेंट कमिशनर, वगैरे अधिकारी महाबळेश्वरीं त्या वेळीं आले होते.

मी येण्यापूर्वी ८-१५ दिवस ह्या विषयाची वाटाघाट महाराजांपुढें चालून तदनुसार त्यांना आपला निकाली हुकूम द्यावयाचा होता. महाराजांच्या मनांत तत्संबंधीचे विचार घोळत असतां मी भेटीस आलों, तेव्हां अनायासें माझी परीक्षा पाहण्याच्या हेतूनें ते मला तोंडानें मजकूर सांगूं लागले. मीही तसाच नेटानें लिहूं लागलों. बारखळी, घरेणिया, वेचाणिया असे किती तरी अपरिचित शब्द महाराज तोंडानें सांगत ते मी तसेच लिहूं लागलों. मधून मधून ते फिरत व कांहीं वेळ पलंगावर बसून सांगत. लिहितां लिहितां किती वेळ झाला तें कळलें देखील नाहीं. वीस पंचवीस ताव तरी सहज लिहून झाले. मध्यंतरीं ते मला पूर्वीचा मजकूर पुनः वाचण्यास सांगत. त्यांना ठाऊक नाहीं कीं मला जेवायचें आहे. मलाही लेखनाच्या ओघांत दुसरा विषय बोलतां येईना. असें होतां होतां चार वाजून गेले. ते सारखे सांगताहेत आणि मी उपाशीं लिहितों आहें.

दरम्यान आपासाहेब आपल्या मुक्कामावर भोजन आटोपून, विश्रांति, चहा वगैरे उरकून साडेचारच्या सुमारास नित्यक्रमानुसार बंगल्यावर येऊन महाराज काय करताहेत त्याचा तपास करूं लागले. नोकरानें त्यांस सांगितलें, "दोन प्रहरीं भेटीस आलेले ते नवीन गृहस्थ व महाराज आंत लिहीत आहेत." हें ऐकून त्यांना उमज पडली कीं मी उपाशीं आहें. दबत दबत ते आंत आले आणि दिलगिरीच्या सुरांत महाराजांस म्हणाले, "ह्या गृहस्थांचें जेवण झालेलें नाहीं." महाराजांनाही आश्चर्य वाटलें आणि ते मला म्हणाले, "कां हो? तुमचं जेवण झालं नाहीं काय! मला कां नाहीं सांगितलंत? ठेवा ते कागद आटोपून आणि जा घरीं जेवायला." मला सहजीं एकादशी घडून जीवनाची खरी परीक्षा यशस्वी झाली. § कॉलेज संपतांच मी स्वकष्टानें जीवन कंठूं लागलों.

§ "श्री सयाजी गौरव ग्रंथ" ह्यांत मी ह्या आठवणी विस्तारानें दिल्या आहेत त्या पाहाव्या.

प्रकरण दुसरें

ज्ञानार्जनाची संधि

१. माझे प्रवास

२. अनुभवानुरूप राहणी

३. माझें वाचन व अभ्यास

प्रकरण दुसरें

ज्ञानार्जनाची संधि

१. माझे प्रवास

बडोद्याच्या नोकरींत मला सर्वांत मोठा फायदा झाला असेल तर तो प्रवासाचा होय. महाराज महाबळेश्वरीं असल्यानें तेथें मी प्रथम त्यांच्याजवळ दाखल झालों. त्या वेळचा सर्वच अनुभव मला नवा. पहिलें सबंध वर्ष प्रवासांतच गेलें. महाबळेश्वरास पांच महिने राहून महाराज महिनाभर पुण्यास व तेथून नीलगिरीस चार महिने काढून दिवाळीस बडोद्यास गेले. अर्थात् पहिल्या दहा महिन्यांतच मला मुंबई, पुणें, मद्रास, नीलगिरीपावेतोंच्या प्रदेशाची ओळख झाली. केवढें भाग्य नि काय मजा! रस्त्यांत महाराजांनीं मला आरकोनम स्टेशनवरून मद्रासेस सर टी. माधवराव ह्यांजकडे पाठविलें. त्या योगानें दोन दिवसपावेतों मला त्या थोर पुरुषाचा निकट समागम लाभला. ह्या माझ्या पहिल्या वर्षाचा पायगुणच कांहीं विलक्षण म्हटला पाहिजे. महाराज, महाराणी, मुलें, त्यांचे नातेवाईक, मानकरी, दिवाण, महाराजांचे गुरु एल्यट, कारकून, नोकर अशा हजार पांचशें नवीन व अनोळखी मंडळीचा सहवास मला एकाएकीं घडून आला. रत्नागिरीच्या कोंकणांतील एकान्त भूभागाच्या गांवढळ वातावरणांत वाढलेला मी तेवीस वर्षांचा युवा एकाएकीं नवीन सृष्टींत येऊन पडलों, हा काय अद्भुत योगायोग असेल त्याची कल्पना करावी. मात्र ह्या अपरिचित वातावरणानें मीं गांगरून गेलों नाहीं. जो कांहीं व्यवहार पुढें येईल तो पूर्ण तपासानें समजून घेऊन मी आपलें कर्तव्य बजावीत गेलों. निष्कपट शिकाऊ वृत्ति अंगीं असल्यामुळें माझें कधीं अडलें नाहीं. हा माझ्या नोकरीचा प्रयोग इतका यशस्वी झाला कीं शेवटीं शेवटीं मी त्या जीवनास कंटाळून महाराजांकडे बदली मागत असतां त्यांनीं अखेरपावेतों मला राजवाड्याच्या ठरीव मर्यादेंत व एकंदर कुटुंबाच्या शुश्रूषेंत कायम कोंडून ठेविलें. नीलगिरीस कुनूर व उटकमंड ह्या दोन्ही ठिकाणीं महाराजांचा मुक्काम झाला म्हणून त्या प्रदेशाची मला पूर्ण माहिती झाली. दररोज मी पायीं फिरण्यास जात असें, त्यांत बहुधा महाराजांचे डॉक्टर रामभाऊ तळवळकर हे मला सोबतीस मिळाल्यानें राजवाड्यांतील

वर्तनाची, खाण्यापिण्याची व इतर पुष्कळ उपयोगी माहिती मला मिळत गेली. महाराजांनीं युरोपांतून झिंगारा नांवाची एक सहलीची आगबोट ह्या वेळीं विकत आणली. तिजवरून महाराजांनीं बाणकोटपासून सुरतपावेतोंचा प्रवास पश्चिम किनाऱ्यावर केला, त्यांत मीही त्यांच्याबरोबर असल्यानें ती समुद्राची सहल मला अत्यंत रमणीय घडली. महाराजांचा व जमनाबाई महाराणींचा कौटुंबिक कलह बरेच दिवस चालू होता, तो बापूसाहेब आठल्यांनीं मिटविला. त्या प्रकरणांत बापूसाहेबांचा हस्तक म्हणून मीही वावरत राहिलों, तेणेंकरून हिंदी संस्थानांच्या जनानखान्याची व अंतर्गत व्यवहारांची माहिती मला कळून आली. ह्याचा मला इतिहासलेखनांत पुढें चांगला उपयोग झाला.

नीलगिरीची थंड हवा महाराजांस विशेष पसंत झाल्यामुळें तिकडे त्यांच्या खेपा वारंवार होऊं लागल्या. स. १८८९ पासून स. १९१२ च्या दरम्यान दहा तरी खेपा महाराजांनीं उन्हाळ्याच्या दिवसांत तिकडे केल्या, त्यांचा फायदा मलाही मिळाला. पुढें तर त्यांनीं उटकमंड येथें स्वतःचे बंगले बांधून आपली व्यवस्था हवी तशी करून घेतली. शिवाय महाराज लोनावळा, पुणें, देवळाली, महाबळेश्वर, इत्यादि ठिकाणीं जातच असत. अर्थात् मलाही हे प्रवास पुनः पुनः घडत गेले. बडोदें राज्यांत सुरतेजवळ समुद्रकांठीं उमरठ म्हणून गांव आहे तेथें महाराजांचे वाडे व बागा असून आरंभीं कैक वर्षे ते उन्हाळ्यांत तेथेंच राहत असत, पण पावसाळ्यांत ती जागा निरुपयोगी म्हणून पुढें सोडून दिली. समुद्रस्नान, आट्यापाट्या, शिकार, इत्यादि व्यवसाय महाराजांचे उमरठ येथें चालत. मिळून ह्या व्यवसायांनीं माझेंही जीवन त्या ठिकाणीं समरस बनत गेलें.

बडोद्याच्या पश्चिमेस वीस मैलांवर मही नदीच्या कांठीं डबका नांवाच्या गांवांत महाराजांचे वाडे होते. तेथें डुकराच्या शिकारीचीं विस्तीर्ण मैदानें आहेत. घोड्यावरून किंवा हत्तीवरून येथें सालोसाल महाराज शिकारीस जात. बरोबर दोनचारशें माणसांचा जमाव असून पुष्कळदां रेसिडेंट व त्यांचे पाहुणे तेथें शिकारीसाठीं येत. मही नदींत रात्रीं दारूकाम सुटे, त्याची मौज मोठी प्रेक्षणीय होती. डिसेंबर-जानेवारींतला हा शिकारीचा हंगाम सालोसाल घडून आठ पंधरा दिवस, बोरें, हुरडा, उन्ध्यें वगैरेंचें सेवन म्हणजे एक विचित्र टूम अनुभवण्यास मिळे. उन्ध्यें म्हणजे मातीच्या

मोठ्या मडक्यांत वांगीं, बटाटे, गाजरें, वालपापडी असे पदार्थ भरून त्यांत मीठमिरचीचे थर घालून तोंडें बंद करून उलटें ठेवतात आणि वरून गवतलाकडाच्या आगीनें भाजतात. त्यामुळें आंतल्या भाज्या सुंदर शिजतात. ही उन्ध्यांची मेजवानी म्हणजे एक अपूर्व प्रकार असून तो माझ्या स्मरणांत कायम आहे. हत्ती, घोडे, उंट किंवा बैलगाडी अशा वाहनांनीं आम्ही सर्व हा शिकारीचा प्रवास दरसाल कैक वर्षे केलेला आठवतो.

अशा प्रकारें मला महाराजांबरोबर सालोसाल निरनिराळ्या ठिकाणीं प्रवास करावा लागून काश्मीरपासून रामेश्वरपर्यंत व कलकत्यापासून पेशावरपर्यंतच्या हिंदभूमीशीं माझा परिचय घडला. प्रवासांत नानाविध अनुभव येऊन मन प्रफुल्लित राहिलें. नवीन माणसें, नवीन देखावे, रोज नवे व्यवसाय अशा अनुभवांनीं झटपट बांधाबांध करणें, चहूंकडचें व्यवधान ठेवणें, महाराणी-महाराजांची व त्यांच्या आप्तवर्गाची हरएक निगा संभाळणें, राजपुत्रांस नवीन स्थळें दाखविणें ह्या कामांत मी अत्यंत तरबेज बनत गेलों. ह्यांतच चार वेळां यूरोपच्या प्रवासाची भर पडल्यानें माझा अनुभव विशेष विस्तार पावला. ह्या प्रवासांत सरकारी खर्चाचा चोख हिशेब मला सादर करावा लागला, त्यामुळें माझ्या अंगीं बिनचूक हिशेब, टापटीप व नियमितपणा हे गुण वृद्धि पावले. कधीं वस्तु हरवली किंवा चोरी, अफरातफर झाली असा प्रसंग मजवर केव्हांही आला नाहीं. सयाजीरावांसारख्या दक्ष धन्याचें समाधान मी करूं शकलों हाच मी आपला मोठा गौरव समजतों. बडोद्याबाहेर नैनिताल, दिल्ली, मसूरी, काश्मीर, बनारस व त्या वाटेंतील आग्रा, बरेली, हरद्वार, अलीगड वगैरे ठिकाणें, तसेंच आबूचा पहाड, वगैरे हवेचीं ठिकाणें मीं पाहिलीं. जातां येतां नवीन शहरें पाहिलीं, नवीन व्यक्तींचा, संस्थांचा, मंदिरांचा परिचय मला सहजीं घडला. रस्त्यांतील नानाविध अनुभव मिळविणें हा महाराजांचा खास उद्देश प्रवासांत कायमचा ठरलेला असे, त्याचा फायदा मलाही आपोआप मिळत गेला.

तथापि मनोविकासाच्या दृष्टीनें युरोपचा प्रवास मला अत्यंत फायदेशीर झाला. खुद्द महाराज तर उत्तरकाळांत आपला निवास पुष्कळसा युरोपांतच करूं लागले. शेवटच्या वीस एक वर्षांत त्यांचे तीन चार महिने हिंदुस्थानांत व बाकीचे युरोपांत गेले. स. १८८७ त त्यांनीं युरोपचा प्रवास प्रथम केला

तेव्हां त्यांचा परिवार सुमारें दोनशें माणसांचा होता, तो शेवटीं शेवटीं चार दोन माणसांवर आला. पुढें पुढें ते एकटेच एका ए. डी. सी. सह तिकडे राहूं लागले. स. १८९२ सालीं त्यांची तिसरी खेप झाली तेव्हां मला ह्या प्रत्यंत देशागमनाची पहिली संधि मिळाली. त्यानंतर स. १९०० सालीं पॅरिसप्रदर्शन भरलें ती माझी दुसरी खेप होय. त्या वर्षी राजपुत्रांचें राहणें ऑक्सफर्ड येथें झाल्यानें मला त्या इंग्रजांच्या सरस्वती मंदिरांत सुमारें पांच महिने निवांतपणें अभ्यासांत घालवितां आले. त्या वेळीं तेथें रँग्लर परांजपे व बॅरिस्टर गोविंदराव गाडगीळ राहत होते, त्यांचा माझा परिचय जडला. ऑक्सफर्ड येथें मला टीचर्स ट्रेनिंग कोर्स व इतिहास, संस्कृत, मनःशास्त्र, इत्यादि विषयांचीं उत्कृष्ट व्याख्यानें ऐकायला मिळालीं. त्यानंतर एकदां १९०५ सालीं व पुनः १९११ सालीं पंचम जॉर्ज बादशहाचें राज्यारोहण झालें त्या प्रसंगीं मी युरोपांत होतों. ह्या सर्व खेपांत माझा पुष्कळसा काळ स्विझर्लंडमध्यें सेंट मॉरिट्स् येथें व लंडन, पॅरिस, रोम, स्कॉटलंड अशा ठिकाणीं गेला.

पहिल्या स. १८९२ सालच्या स्वारीस मी जातांना अगदीं एकटा गेलों. महाराज अगोदर गेले. त्यांनीं तार करून मागाहून मला बोलावलें. त्या वेळीं मी २६ वर्षांचा असून बडोद्याचाही माझा अनुभव राजवाड्याबाहेरचा कांहीं नव्हता. जुलै १५ ला मीं मुंबई सोडली, तेव्हां आरबी समुद्रांत पावसाचा जोर असल्यामुळें एडनला पोचण्यास नऊ दिवस लागले व आगबोटींत हाल झाले म्हणून एडन येथें एक आठवडा विश्रांति घेऊन नंतर सुवेझ, ब्रिंडीझी, मिलानवरून कोमो सरोवरांतून एक दिवस आगबोटीचा प्रवास केल्यावर, तेथून पुढें आगगाडी त्या वेळीं नसल्यानें, घोडागाडीच्या सहाय्यानें दोन दिवसांनीं मी सेंट मॉरिट्स् येथें महाराजांकडे पोचलों. सर्वच नवीन सृष्टि, एकट्याचा प्रवास, भाषा येत नसल्यामुळें इटलींत अनेक अडचणी भासल्या. स्विझर्लंडची रचना व राहणी अत्यंत मोहक वाटली. ह्या वेळीं मला मांसान्नाचा परिचय नसल्यामुळें बरेच हाल झाले. पण तरुणपणांत त्याची मला मौजच भासे. महाराज पुढें पॅरिस-लंडनला गेले ते नोव्हेंबरांत परत निघाले. लंडनांत मी शेक्सपियरचीं तीन नाटकें आठवा हेन्री, किंग लियर व हॅम्लेट हीं पहिलीं. सुप्रसिद्ध नट सर हेन्री अर्व्हिंग व नटी मिस् ॲलन टेरी ह्यांचा उत्कृष्ट अभिनय ह्या तीनही नाटकांत

मला पाहायला मिळाला. हा मी जन्मांतला अत्यंत दुर्लभ लाभ समजतों. सर्वच बाजूंनीं माझें पूर्वीचें आकुंचित जीवन विस्तारूं लागलें. संट मॉरिट्स्ला पोचेपर्यंत माझ्या डोक्यावर लांब शेंडी होती तिचा तेथें पोचल्यावर संपतरावांनीं उच्छेद केला. परत आल्यावर वडिलांनीं मला मुंबईंतून घरीं गोविलास नेऊन सक्षौर प्रायश्चित्त देवविलें, तो प्रकार मीं निराळ्या प्रकरणांत सांगितला आहे.

युरोपच्या ह्या प्रवासानें माझ्या राहणींत एकदम मोठासा फरक कांहींच झाला नाहीं. धूम्रपान किंवा मद्य ह्यांस मीं कधींच स्पर्श केला नाहीं म्हणून नैतिक दृष्ट्या मी अखेरपर्यंत निर्मळ राहिलों. खर्चाची बचत झाल्यानें पुस्तकें व उपयुक्त जिन्नस विकत घेण्याची ऐपत मला लाभली. महाराजांबरोबर गेलेले पुष्कळ गृहस्थ कर्ज करून परत आले तसा प्रसंग मजवर कधीं आला नाहीं. बायसिकली, शिवण्याचें यंत्र, घरांतील कित्येक उपकरणें, मधमाशा पाळण्याची सामुग्री, कपडे, पेट्या अशा कित्येक चिजा मीं बरोबर आणल्या. स. १९०५ सालीं खरीदलेलें एक खिशांतलें घड्याळ व एक टेबलावरचें टाइमपीस अद्यापि माझ्या वापरांत असून तीं उत्कृष्ट काम देत आहेत. जुन्या वापराच्या वस्तु कायम टिकविण्याचा मला एक प्रकारचा छंदच आहे.

स. १८९९ सालीं फत्तेसिंहराव मॅट्रिक झाले. त्यांस ऑक्सफर्ड येथें ठेवण्याचा महाराजांनीं निश्चय केला. महाराणींचीही शस्त्रक्रिया व्हायची होती, म्हणून स. १९०० सालच्या एप्रिलांत मला दुसऱ्यांदां युरोपास जाण्याची संधि आली. मार्सेल्स बंदरांत उतरून आम्ही पॅरिसला गेलों. ह्या वेळीं मुलें व महाराणी बरोबर असल्यानें परिवारही मोठा होता. नोकर, मोलकरणी, इत्यादींचें सामान, त्यांची राहण्याची व भोजनाची व्यवस्था आणि प्रवास हे प्रकार मलाच पुष्कळसे पाहावे लागत. लंडनांत चारआठ दिवस राहून मग तिघे राजपुत्र, त्यांचे व्यवस्थापक मि. फ्रेंच व मी ऑक्सफर्डला गेलों. तेथील विद्यालयांत ते राजपुत्र दाखल झाले. मी नजीकच भाड्याची जागा घेऊन राहिलों. दुकानांतून तांदूळ व मसुरांची डाळ आणून मीं खिचडीवर निर्वाह केला. मालकीण मला खिचडी उकडून देई. बाजारांत खोबऱ्याचा कीस व तिखटाची भुकटी (Cayenne powder) मिळे. त्यांचें मीं तोंडीलावणें बनविलें. थारेपालट म्हणून मी एखादे वेळीं उपाहारगृहांत जाऊन

वस्त्र किंवा केक वगैरे घेई. स्ट्रॉबेरी व क्रीम ह्या ऑक्सफर्डच्या चिजा फार मनोहर लागत. त्यावर हात मारण्यास मी आळस करीत नसें. स्नानाची अडचण भागविण्यासाठीं मी तीन महिन्यांचें तिकीट काढून दररोज दोन प्रहरीं तीनचार वाजतां ऑक्सफर्डच्या टेम्स नदीवर पोहण्यास जाऊं लागलों. तेथें ती नदी लहानशा ओढ्यासारखी स्वच्छ असे. व्यायाम व स्नान ह्या दोनही गोष्टी मीं ह्यांत साधल्या. शिवाय राजपुत्र बायसिकलवर फिरायला जात तेव्हां मलाही त्यांजबरोबर जावें लागून मी ती कला सहज शिकलों. ऑक्सफर्डला लागून अबिंग्डन म्हणून कारखान्यांचें गांव आहे, तेथची बायसिकल मीं खरेदी केली. किंमत महाराजांनीं दिली. मध्यंतरीं दोन आठवडे मी पॅरिसला जाऊन तेथील जगद्व्याळ प्रदर्शन पाहून आलों. मराठे नांवाचे एक नागपूरचे गृहस्थ मजबरोबर तें प्रदर्शन पाहण्यास होते. पुष्कळ मजा दिसली, पण खुद्द मला त्यांत शिकण्यासारखें कांहीं नव्हतें. आयफेल टॉवरवर चढून पॅरिसची मजा पाहिली. प्रदर्शनाचा हेतु व्यापाराचा होता, तो चांगला सिद्धीस गेला असें लोक बोलत.

बडोद्यांत पुढें वीस वर्षेंपावेतों बायसिकलचा मला चांगला उपयोग झाला. सामान्य राहणीच्या माणसास शहरांत वावरण्यास बायसिकलइतकें दुसरें वाहन हाताशीं नाहीं. त्याचा खर्च थोडा व त्रास फारसा नाहीं. हवेच्या नळीला भोक किंवा पंक्चर झालें तर तेंही मला दुरुस्त करतां येऊं लागलें. अद्यापि हेंच वाहन पुष्कळांना उपयोगी पडत असून त्यांत पुष्कळ सोयी आहेत. किंबहुना आधुनिक कालचें तेंच एक संचार वाहन बहुजनांच्या आटोक्यांत आहे. मी परत मुंबईस आलों तेव्हां लगेच आगबोटीनें वडिलांस भेटण्यास रत्नागिरीस गेलों. बरोबर बायसिकल नेली. त्यामुळें पुढें बोटींतून उतरतांच ३० मैल ह्या दुचाकीनें जाऊन सकाळीं ९–१० वाजतां गोवीळचें घर गांठलें, तो तिकडच्या लोकांस त्या वेळचा एक विक्रमच वाटला. हे तीस मैल बैलगाडीनें जाण्यांत एक दिवस मोडे. सर्वांस मोठी खुशाली झाली. इतउत्तर प्रायश्चित्ताची वगैरे गरज उरली नाहीं. पाश्चात्य लोकांनीं आपल्या शास्त्रीय ज्ञानाच्या बळावर आम्हां मागसलेल्या आशियनांना कसें जखडून टाकलें आहे हा प्रत्यय आमच्यासारख्या युरोपच्या प्रवासानें जनतेच्या मनावर ठसून समाजांत जागृति झाली, तेणेंकरून महात्मा गांधींसारख्यांना कॉंग्रेसची चळवळ फलद्रूप करतां आली.

२. अनुभवानुरूप राहणी

मी केव्हां केव्हां ह्या प्रवासांतील महत्त्वाच्या विषयाचीं टिपणें लिहून ठेवलेलीं संग्रहीं आहेत, त्यांतील कांहीं उतारे येथें दिल्यास वाचकांस मनोरंजक वाटून माझा प्रगतिपर कल कळून येईल.

मु. हिमालया बोट, तांबडा समुद्र,
शुक्रवार ता. १४ डिसेंबर, स. १९००

"हा जन्म म्हणजे एक लांबच लांब शिक्षण आहे. तें शिक्षण मिळण्याचे जितके जास्त प्रसंग मनुष्यास येतील, तितका तो लायक होत जातो. मिळविलेल्या अनुभवाचा उपयोग जो प्रत्यक्ष आचरणांत आणील, त्यास इहलोकच्या सुखाचा मार्ग बराच कळला असें म्हणतां येईल. मला युरोपच्या प्रवासाचे दोन प्रसंग प्राप्त झाले, त्यांतील पहिल्या प्रवासांत स्वावलंबनानें उद्योग करण्याची उत्कंठा मनांत उत्पन्न झाली. हल्लींच्या ह्या दुसऱ्या प्रवासांत मीं काय कमावलें हें आतां सांगतों.

पहिल्या प्रवासांत मी भांबावून गेल्यासारखा होऊन तारांबळ उडाली. त्यामुळें त्याचा कायम फायदा मला करून घेतां आला नाहीं. दुसऱ्या प्रवासांत तयारीला चांगला एक महिना सापडला. ठिकाणीं पोचल्यावर, ऑक्सफर्डसारख्या विद्येच्या नगरांत जवळ जवळ सहा महिने मी राहूं शकलों. बुद्धि व उत्सुकता असेल तर येथें शिकण्याचे विषय रगड आहेत. रमेशचंद्र दत्तांच्या ओळखीनें इंडिया ऑफिसच्या ग्रंथशाखेंत माझा प्रवेश होऊन मीं थोडेंबहुत ऐतिहासिक संशोधन केलें. पॅरिसच्या प्रदर्शनांत मीं दोन आठवडे घालविले, पण त्यामुळें मला प्रत्यक्ष फायदा असा कांहीं झाला नाहीं. फक्त सर्व जग त्या प्रदर्शनांत एकत्र आलेलें एका दृष्टिपथांत दिसलें. बुद्धिमान् मनुष्यानें एकाच विषयाचा अभ्यास करण्यास हें प्रदर्शन सोयीचें होतें. मागासलेल्या आम्हां हिंदी लोकांस पाश्चात्य सुधारणेचें हें शिखर गांठणें शक्य नाहीं. अशा प्रदर्शनांनीं बलवान् राष्ट्रांचें बल वाढतें, त्यामुळें दुर्बलांची जास्तच पायमल्ली होते. कोणत्या ठिकाणीं काय जिन्नस पिकतो, त्याचा खप कोठें कसा होतो हें शिकून पाश्चात्य राष्ट्रें आम्हांस जास्तच नागवितील. आमची हीन स्थिति, आमचें अगाध अज्ञान, पाश्चात्यांच्या पुढें डोकें वर उचलण्याची आमची असमर्थता हे प्रकार माझ्या मनांत उभे राहून मोठा उद्वेग वाटला. त्यांतल्या त्यांत माझा ऑक्सफर्डचा

निवास स्मरणीय बनला. पद्धतशीर उद्योग करण्याची पात्रता मला आली. त्यासाठीं खालील गोष्टी लक्षांत ठेवल्या पाहिजेत:

१. प्रकृतीची काळजी उत्तम प्रकारें घेऊन शारीरिक व मानसिक सुखवृद्धि समस्त कुटुंबांत होत राहील असा प्रयत्न करणें.

२. उद्योग दोन प्रकारचा, एक स्वतःच्या पोटाचा हा मुख्य, दुसरा परहिताचा. ह्या दोहोंत प्रमाणबद्धता असावी. शक्य असेल तेवढेंच काम आंखून घेऊन तें नियमितपणें पुरें करावें. एकंदर आयुष्याची इतिकर्तव्यता ठरवून तिचा सारखा पाठपुरावा करीत जावा."

ह्यांव्यतिरिक्त रोजच्या वर्तनाचे कित्येक सामान्य नियम मीं ठरविले ते असे:

"घरांत अभ्यासाची जागा स्वतंत्र ठेवावी. होतां होईतों राहतें घर बाहेर मोकळ्या हवेंत ठेवावें. सकाळीं निदान दोन तास कामाचे म्हणून पवित्र समजावे. सकाळीं दिसूं लागल्यावर बिछान्यांत पडून राहूं नये. व्यायाम व आहार ह्या दोन गोष्टींस अत्यंत जपावें. भोजन सावकाश व परिमित असावें. स्वतःचें व निकटवर्तीयांचें वेळापत्रक ठरवून सर्वांनीं आपापलीं कामें वेळेवर उरकावीं."

हे सर्व नियम मी पुढें नेहमीं यावच्छक्य पाळीत आलों हेंच माझ्या उद्योगाचें व दीर्घायुष्याचें बीज होय.

ह्यानंतर पांच वर्षांनीं स. १९०५ सालीं मला पुनः युरोपची यात्रा घडली. स. १९०० साल सयाजीरावांचा परमोच्च भाग्यबिंदु दाखवितें. तेथपर्यंतच्या चाळिशीच्या वयांत त्यांना गृहसौख्य व बाह्य लौकिक चांगला मिळून, उद्वेग देणारा कांहीं एक प्रसंग त्यांजवर आलेला नव्हता. पहिल्या अमदानींतील जुन्या अधिकाऱ्यांचें दडपण त्यांना सारखें बोचत होतें, तें हळूहळू दूर करून आपल्या पसंतीचे नवीन अंमलदार त्यांनीं नोकरींत घेतले. दिवाण मणिभाई ह्यांनीं त्यांजवर आणलेलें किटाळ व्यवस्थितपणें दूर होऊन श्रीनिवास राघवायंगार, बाबू अरविंद घोष, महंमद अली अशा अनेक कर्तबगार व्यक्ति त्यांनीं जवळ आणल्या. तितक्यांत लॉर्ड कर्झन व्हाइसरॉय म्हणून आले, त्यांच्याशीं झगडा करण्याचीं प्रकरणें

उपस्थित होऊन वरील सहायकांच्या मदतीनें महाराजांनीं कर्झनशाहीच्या अरेरावीवर ताण करून दाखविली.

पण उत्तरोत्तर त्यांच्या भाग्यास उतरती कळा लागली. त्यांचीं मुलें दुर्वृत्त निघून त्यांस आळा घालणें अशक्य झालें. वडील चिरंजीव फत्तेसिंहराव ऑक्सफर्ड येथें अनावर बनले. त्यांस महाराजांनीं स. १९०२ सालीं परत आणिलें. त्यांच्या संगतीनें दुसरीं मुलें बिघडूं लागलीं. प्रत्येकास वेगळें ठेवणें शक्य झालें नाहीं. हा प्रकार केवळ बडोद्याचाच नसून थोड्याबहुत फरकानें सर्वच संस्थानिकांचा आहे. सन १९०४ सालीं त्यांनीं फत्तेसिंहांचा विवाह केला पण त्यायोगें त्यांची उच्छृंखल वृत्ति निवळली नाहीं. अशा स्थितींत सर्व मुलांस घेऊन सन १९०५ सालीं महाराज पुनः युरोपास गेले. राजपुत्रांस सांभाळण्याचें जोखीम मजवर आल्यामुळें ह्या वेळीं मला पूर्वीचें स्वास्थ्य लाभलें नाहीं. त्या वेळचीं माझीं टिपणें उद्वेगकर बनलेलीं असून आज त्यांत ग्राह्यांश असा फार अल्प दिसतो. हा प्रवास लंडन, ईस्टबोर्न, पॅरिस, सेंट मॉरिट्स्, अशा ठिकाणीं होऊन परत येतांना व्हेनिस, फ्लॉरेन्स, रोम, नेपल्स्, पांपे, व्हेसुव्हियसचा ज्वालामुखी, इत्यादि स्थळें पाहिलीं. स्वित्झर्लंडांत बर्फाच्या डोंगरावर सफरी केल्या. मोठमोठ्या हॉटेलांत मोलवान भोजनें झोडून नानाविध देखावे व पाश्चात्यांचे चोचले पाहिले. प्रकृति सांभाळली, मांसान्नाची सवय केली, पण नवीन असें कांहीं शिकलों नाहीं. फ्रेंच भाषा शिकण्याचा उपक्रम केला, पण महाराजांच्या मुलांचीं कुलंगडीं सारखीं चालू राहून महाराजांनाच मनःस्वास्थ्य मिळालें नाहीं, मग आमच्या-सारख्या सेवकांची काय त्रेधा उडाली असेल त्याची कल्पना करावी. आतां सर्व राजकुमार अल्पायुषी व दिवंगत झाल्यानें झाल्या गोष्टी सांगण्यांत स्वारस्यही नाहीं. आपण जग सुधारलें पण स्वतःचें घर सुधारूं शकलों नाहीं, हा महाराजांचा मोठा उद्वेग बनला.

संस्थानी कारभार सर्वथा एकतंत्री मालकाच्या मगदुरावर अवलंबून असतो. महाराजांची कौटुंबिक दुरवस्था वाढत गेली. तिचा परिणाम अनुषंगानें आम्हां सेवकांवर व एकंदर राज्यावर होत गेला. स. १९०८ सालीं फत्तेसिंहराव वारले. त्यांचीं तीन अपत्यें मागें राहिलीं, त्यांची निगा ठेवणें हें आणखी जोखीम महाराजांवर पडलें. स. १९०९ सालच्या दसऱ्यास महाराष्ट्र साहित्य संमेलन बडोद्यास भरलें तें अनेक विद्वानांच्या

पुरस्कारामुळें चिरस्मरणीय बनलें. स. १९१० त राजे एडवर्ड दिवंगत होऊन पंचम जार्ज अधिकारारूढ झाले, त्यांचा राज्यारोहण समारंभ स. १९११ च्या जून महिन्यांत व्हावयाचा त्या निमित्तानें पुनः महाराजां-बरोबर मलाही युरोपांत जाण्याचा चौथा योग आला. ह्या वेळीं मुलांच्या व्यवस्थेशिवाय समग्र स्वारीखर्चाच्या हिशेबाचें सर्व काम मलाच करावें लागलें. ह्यास्तव हा माझा शेवटचा प्रवास धांदलीचा, काळजीचा व अस्वस्थतेचा झाला. त्यांत मी नवीन असें कांहीं कमावूं शकलों नाहीं. महाराजांची कन्या इंदिरा राजे ह्यांचा विवाह माधवराव शिंद्यांशीं ठरून तीं दोघेंही लंडनमध्यें त्या वेळीं हजर असल्यामुळें माझी तारांबळ अतोनात झाली. सुखरूप निभावून परत आलों हें भाग्य. पूर्वीं कधीं न झाला एवढा म्हणजे नऊ लाखांचा खर्च ह्या स्वारीचा झाला. तो सर्व मला पाहावा लागला. इंग्रज बादशहाच्या राज्यारोहणाचा हा प्रसंग आम्हांस विशेष जाणवला तर नवल नाहीं. सामान्यतः युरोपांत महाराजांचा दरमहाचा खर्च अर्ध्या लाखाच्या आसपास असे. ह्या वेळीं सात महिन्यांत तो नऊ लाखांवर गेला. लंडनमध्यें समारंभाची महागाई, अनेक संस्थानिक तेथें जमलेले, तशांत शिंदे सरकार जावई, त्यांचे दोस्त आगाखान, बिकानेरचे महाराज, कपुरथळा, पत्याळा येथील राजे असे किती तरी पाहुणे आमच्या महाराजांकडे असत. त्यांचे हस्तक आम्ही चार दोन सेवक, त्यामुळें आमची त्रेधा कशी उडत असेल ह्याची कल्पना करावी. योगायोगानें लॉयड जॉर्जची व माझी गांठ चार तास निवान्तपणें प्रेक्षकांच्या रांगेंत पडून पुष्कळ बोलणें झालें.

एकंदरींत ह्या स्वारींत मला भारी कष्ट पडले. पुष्कळ अनुभव शिकलों. लंडनचा समारंभ आटोपतांच महाराणी व इंदिरा राजे महिनाभर जर्मनींत नौहाइम येथें औषधोपचारासाठीं गेल्या. बरोबर मी होतों. शिंदे सरकारही तेथें आले. मग माझी धांदल काय विचारावी. माझे मित्र कै. प्रो. पां. दा. गुणे ह्या वेळीं थोडे दिवस आमच्याबरोबर जर्मनींत होते. महाराणींनीं व आम्ही ह्या वेळीं मोटरींच्या सहली पुष्कळ केल्या. जर्मनींतून आम्ही स्कॉटलंडांत इन्व्हर्नेसजवळ आल्नाशेलाख म्हणून अगदीं उत्तर टोक आहे तेथें दीड दोन महिने राहिलों. हवा उत्कृष्ट परंतु महाराज व महाराणी अत्यंत उद्विग्न व अस्वस्थ असल्यानें तेथें आमचें तरी चित्त स्वस्थ कसें राहणार. मुंबईस परत येतांच स्वारीचा नऊ लाखांचा चोख खर्च मीं रुजू

केला. माझा हिशेब रोजच्या रोज नियमित पुरा केलेला असल्यामुळें परत येतांच सर्व तयार होता. पूर्वीच्या स्वाऱ्यांचे हिशेब पुरे होण्यास कित्येक महिने लागत. ही माझी तत्परता पाहून महाराजांनीं लगेच माझी बदली खाजगी खात्याच्या चीफ अकाउंटंटच्या जागीं केली. माझ्या हुशारीचा प्रत्यक्ष फायदा मला मिळण्याचें बाजूस राहून मी अशा जागेवर आलों कीं आंकडे-मोडीशिवाय ज्ञानार्जनाची सवड इतउत्तर मला बिलकुल उरली नाहीं. राजपुत्रांचें शिक्षण संपलें आणि मी गोत्यांत येऊन वैतागलों. ह्यास्तव महाराजांना दुखवूनही मी १९२५ त सेवानिवृत्त झालों. १९११ त परत येतांना मीं बरींचशीं उपयुक्त पुस्तकें विकत आणलीं तीं अद्यापि मला सोबत करतात. ह्या स्वारींतील खालील अनुभव मीं लिहून ठेवलेले आढळतात.

मोंगोलिया बोट,

शनिवार ता. ४ नोव्हेंबर, स. १९११

ह्या सफरींत प्रकृतीचा व भोजनाचा जो अनुभव सहा महिनेपावेतों मला आला त्यावरून मला घरच्या नेहमींच्या भोजनांत कित्येक फरक करणें अत्यंत जरूर वाटतें. ह्या सहा महिन्यांत जेथें जें मिळेल तें मांसान्न मी घेत गेलों. हिंदुस्थानांत असतां घशाशीं व पोटांत जळजळ वाटे ती मला युरोपांत बिलकुल वाटली नाहीं. शौच्यास आपोआप साफ होई. कधीं डोकें दुखलें नाहीं कीं मूळव्याधीचा विकार जाणवला नाहीं. काम मरीमर करूनही वृत्ति आनंदित राहिली. झोप चांगली येई ह्याचें कारण मी हुडकूं लागलों तेव्हां अन्नांतील मुख्य फरक म्हणजे युरोपांत मसाले व भात सर्वथा वर्ज्य होता. ह्यास्तव पाश्चात्य पद्धतीचे कित्येक पदार्थ आपण स्वीकारले तर निर्मांस भोजनही तितकेंच रुचिकर व पौष्टिक बनेल. आमचें हिंदी भोजन चमचमीत असेल, पण असावें तितकें पौष्टिक नाहीं. मसाले, चटण्या, भजीं अशांवर भर विशेष. पोटाची पिशवी कशी तरी गच्च भरून काढायची, त्यांत शरीरपोषणाची दृष्टि नाहीं. ह्यास्तव मी खालील फेरफार सुचवितों.

१. दूध, क्रीम, लोणी, हें लहान मोठ्यांनीं पुष्कळ घेत जावें. मुलांस तर भरपूर द्यावें. खीर, फळें, इत्यादिकांत दूध, क्रीम भरपूर वापरावें.

२. आहारांत पुष्कळशीं फळें खात जावीं. पिकलेलीं फळें, तसेंच सुका मेवा, बेदाणा, खजूर, खारीक, द्राक्षें, संत्रीं, बदाम, पिस्ते, अक्रोड, असे अनेक पदार्थ मुलांससुद्धां भरपूर देत जावे. खिरी, कोशिंबिऱ्या, मुरांबे बनवून ते खावे. रुचीसाठीं थोडें लिंबू त्यांत पिळावें. चहा, कॉफी व कोको ह्यांतसुद्धां शक्य तर क्रीम वापरीत जावें.

३. गव्हाचा सांजा साधा शिजवून भातासारखा दूधक्रीम घालून घेतल्यास विशेष पौष्टिक, गोड व रुचकर लागतो. मात्र त्यांत गव्हाचा बारीक कोंडा असतो तोसुद्धां वापरावा. सातूचाही असाच सांजा चांगला होतो. इंग्रजांचें ओट पॅरिज तें हेंच रोजचें खाणें.

४. तुपापेक्षां लोणीच वापरणें जास्त चांगलें.

५. तांदळांच्या पिठाऐवजीं मक्याचें पीठ वापरतां येईल. आपण मक्याचा उपयोग विशेष करीत नाहीं पण तो पौष्टिक असून कण्या, उसळ, भाकरी अशा स्वरूपांत खातां येईल.

६. आपण गव्हाची चपाती तेवढी करतों, पण त्याच्या कण्या, उसळ, खुसखुशीत गाकर, आरोळ्या, केक, वगैरे पदार्थ बनवितां येतील. त्यांतच बेदाणा, वगैरे सुका मेवा घालावा. मुलांस तर हे पदार्थ अवश्य द्यावे.

७. हरभरे, वाटाणे, मूग, उडीद, वगैरे समस्त द्विदळधान्यें विशेष पौष्टिक असून तीं मोड काढून वापरल्यास शरीरपोषणास हितकर बनतात. उडीद फार पौष्टिक आहेत.

८. वरीचशीं आंबट फळें, कच्चे आंबे, पेरू, तुती, द्राक्षें, बोरें, करवंदें, जांभळें, अननस, पपनस जीं कांहीं फळें आढळतील तीं सर्व शक्य तोंवर उपयोगांत आणावीं. कांहीं फुकट जाऊं देऊं नये. ह्यांचें मिश्रण गव्हांशीं करतां येईल. इंग्रजींतली applepie ती हीच.

९. मसाल्याऐवजीं आलें, जिरें, कोथिंबीर, लिंबू, ओली हळद, आंबे हळद, नारळ, खोबरें वगैरे वापरल्यास रुचि व पुष्टि दोन्ही साधतील. हे पदार्थ खिचडींतही वापरतां येतील.

१०. आपण दहीं ताक वापरतों, तें फार आंबट करूं नये. सकाळ सायंकाळ ताजें दहीं, ताक घ्यावें म्हणजे त्याचा उपयोग चांगला होतो.

११. भाज्या ताज्या व स्वच्छ निसून चांगल्या चिरून खाव्या. नुसत्या पोटभरणीस खाऊं नयेत किंवा तळून चमचमीत करूं नयेत. गाजरें, बीट, कोबी, काकडी, नोलकोल, टोमाटो, कॉलीफ्लॉवर हे पदार्थ कच्चे किंवा थोडे वाफेवर शिजवून खावे.

१२. पदार्थांत शिजतांना मसाले घालूं नयेत. वेलची, लवंगा, दालचिनी, मिरीं अशांची पूड करून जवळ ठेवावी. आपणास पाहिजे तशी पदार्थावर घ्यावी. भुईमुगाचा चुराही पदार्थावर शिंपडावा. जिभेला रुचि कृत्रिम उपायांनीं न आणतां, ती लाळेनें आली पाहिजे. चांगलें चर्वण तोंडांत करीत जावें.

१३. सॉसिस म्हणजे पिठाच्या लापशीसारखे पदार्थ भाकरी, पुरी व पोळीबरोबर वापरतां येतील.

१४. अर्धकच्चें, शिळें, आंबलेलें, वगैरे अन्न पोटभरणीस किंवा फुकट जातें म्हणून पोटांत कोंबूं नये.

१५. बटाट्याचे किंवा वांग्याचे, बीटचे काप, भर्जी, भरलेलीं केळीं असे किती तरी नवे नवे पदार्थ कल्पनेनें बनविल्यास रुचिवैचित्र्य येऊन खाण्यास गोड वाटतील. जें आनंदानें खाल्लें जातें तें पचतेंही चांगलें. आपल्या भोजनसाहित्यांत फेरबदल करणें फार हितावह आहे.

१६. केळींभात, आंबेभात, अननसभात किंवा भाताऐवजीं गव्हाचा सांजा, ह्यांत फळांचें मिश्रण करावें. ह्यामुळें फार रुचि येईल.

१७. भाज्यांचीं व फळांचीं सॅलड्स् म्हणजे मिश्रणें किती तरी रुचकर बनवितां येतील.

१८. अंडीं वापरतां आलीं तर चांगलेंच. पण तीं न वापरतांही वरीलप्रमाणें लक्षपूर्वक स्वयंपाक बनविल्यास अन्नपोषण, हें शरीराचें आद्य प्रयोजन चांगलें सिद्धीस जाईल.

सर्वकाळ मोकळी हवा, ताजें थंड पाणी, भरपूर उद्योग व विश्रान्ति ह्या गोष्टी लक्षपूर्वक आचरणांत आणल्यास प्रकृति चांगली राहून मनुष्य दीर्घायुषी व यशस्वी बनलाच पाहिजे.”

हे विचार मी स. १९११ सालीं लिहून शक्य तितके कृतींत आणले म्हणूनच आज चाळीस वर्षांनंतरही त्यांची योग्यता वाढतच आहे.

अलीकडे व्हिटॅमिन्स वगैरेचे शोध लागले, त्यांचें बीज वरील विवेचनांत स्पष्ट दिसतें. मी तरी स्वत: ह्या शरीरव्रताचें एक उदाहरणच होय. आज नव्वदीच्या वयांत मी उद्योगक्षम व तरतरीत आहें ह्याचें कारण वरील आचारपद्धतिच होय. हे सर्व नियम मीं जवळच्यांस नुसते समजून दिले इतकेंच नाहीं तर ते लिहून मी सर्वांच्या माहितीकरितां स्वयंपाकघरांत टांगले होते. कुटुंबीयांकडून मीं त्यांची अंमलबजावणी कसोशीनें केली. अलीकडे महागता वाढल्यानें दूध तूप हे पदार्थ सर्वांस विपुल मिळणें अशक्य झालें आहे, परंतु मी बडोद्यास असतां पूर्वी मुद्दाम मुलांमुलींस हवें तितकें दूधदुभतें वापरास देत असें. महाराजांच्या वाड्यांत किंवा त्यांच्या नोकरांस हे सर्व विषय मला समजून द्यावे लागल्यानें ते मला नित्य सवयीचे झाले आहेत. स्वत: महाराजही ते शक्य तोंवर पाळीत असत. बडोद्याचा राजवाडा म्हणजे सर्वांगीण प्रगतीचें एक प्रदर्शनच असून त्यांत माझ्यासारखे अनेक गृहस्थ सदा वावरत होते. महाराजांच्या स्वयंपाकासाठीं फ्रेंच, इटॅलियन, मोगली पद्धतीचे स्वयंपाकी असून शिवाय दक्षिणी, गुजराती, कानडी, तामीळ ह्या सर्व हिंदी पद्धति त्यांनीं मुद्दाम स्वीकारलेल्या होत्या. त्या पद्धतींचे आचारी माझ्या घरीं येऊन आपापलें कसब दाखवीत असत. पांच सात वर्षेपावेतों राजवाड्यांतील नोकरांस व दासदासींस गृहव्यवस्था (Domestic Economy), आरोग्य (Hygiene), स्वच्छता (Cleanliness) हे विषय शिकविण्याचे वर्ग महाराजांच्या हुकमानें मला चालवावे लागले, तेणेंकरून ते माझ्या अंत:करणांत भिनून गेले आहेत. पाकशास्त्राचे पुष्कळसे नवीन ग्रंथ महाराजांनीं बनविले आणि त्या कामीं खर्च व श्रमही अतोनात केले. त्यांत माझा हात आहे.

ह्या बाबतींत माझी कुटुंबिनी उत्कृष्ट साह्यकर्ती बनली हें मी मोठें भाग्य समजतों. त्यांना रोज नवे पदार्थ करण्याची मोठी हौस असून आमचें घर मुलांमुलींनीं सदा गजबजलेलें असायचें. त्या सर्वांना ह्यांत मोठी मौज वाटे. बडोद्याच्या राजवाड्यांत मी प्रमुख असल्यामुळें अशा अनेक सोयी मला सुलभ मिळाल्या. अशा राजाश्रयाशिवाय हे विषय सुधारणें शक्य नाहीं. बडोद्यास गेस्ट हाऊस म्हणून एक सुंदर भोजनसंस्था खुद्द महाराजांनीं चालविली होती. त्यांत देशी व युरोपीय पद्धतीचीं भोजनें मिळत. मी तेथें मुलंबायका घेऊन किंवा पाहुणे बोलावून मुद्दाम सवडी-

नुसार भोजनास जात असें. तेणेंकरून आनंद व शिक्षण हे दोनही हेतु साधत. ताटपाटाची हिंदी पद्धति व खुर्च्यामेजांचा युरोपीय थाट दोन्ही तेथें अनुभवांत येत. वर्षांतून चारदोन वेळां तरी आम्ही गेस्ट हाऊसमध्यें जेवणास जात असूं. भोजनाच्या पदार्थांच्या नाना तऱ्हा तसेंच निरनिराळ्या तऱ्हेची नयनमनोहर मांडणावळ हें सर्व तेथें सहज शिकतां येई. अलीकडे मी तरी रोज जेवतांना चमचा काटा वापरतों, तेणेंकरून माझी घाईनें जेवण्याची खोड सुधारली. मनुष्यप्राणी प्रगतिपर व सुधारणाप्रिय आहे. तो सदैव नवीन गोष्टी शिकून पुढील मजल गांठीत असतो. सर्वांचें बघावें, अनुभवावें, आस्थापूर्वक समजून घ्यावें, झेपेल तें स्वीकारावें, नको असेल तें टाकावें, आपलें जीवन सर्वदा भरीव बनवावें, पण सावेपणा व स्वतंत्र विचार सोडूं नये. मला वाटतें माईच्या साह्यानें मीं आपल्या कुटुंबांत नव्याजुन्याचा हृदयंगम मिलाफ घडवून आणिला. माईंना ह्याचा मोठा अभिमान वाटे आणि सर्वांना ह्या गोष्टी त्या प्रेमानें व आवडीनें समजावून देत. फ्रुट सॅलड म्हणजे विर्याणी हा पदार्थ माईंनींच घरांत चालू केला.

ह्या गोष्टी क्षुल्लक दिसतात, पण एकंदर जीवनाशीं त्यांचा निकट संबंध असून केवळ प्रवासानें, निरनिराळ्या चालीरीतींच्या निरीक्षणानें आणि त्यांचा विचारपूर्वक संग्रह केल्यानें मी त्यांत एक प्रकारचा तज्ज्ञच बनलों असें म्हणण्यास चिंता नाहीं. जीवनरहस्य मी ओळखूं शकलों असें मला वाटतें. ह्याशिवाय अन्य परमेश्वर मी ओळखीत नाहीं. माझें सर्व जीवन साधें, प्रगमनशील व अनुकरणीय बनलें आहे असें मीं म्हटलें तर त्यांत वावगें कांहीं नाहीं. पूर्वी मी घरांत धोतर नेसत असें, तें अवजड म्हणून टाकून मी आतां सुटसुटीत विजारी वापरतों. उगाच शरीराला अनावश्यक भार कां द्यावा ? पावसांत व थंडीच्या दिवसांत मी घरीं मोजेबूट घालून कामास बसतों, तेणेंकरून विशेष तरतरी वाटते. प्रत्येक गोष्ट मी विचारपूर्वक ठरवितों. जग सदैव पुढें जात आहे. तें पूर्वपदावर मागें जाणें कधीं शक्य नाहीं. हे प्रकार प्रवासानें अंगांत मुरतात. तशा प्रवासाची भरपूर संधि मला सयाजीरावांच्या सेवेंत मिळाली आणि ते प्रकार अमलांत आणण्याचें क्षेत्र पुढील आयुष्यांत मला मिळालें, तसेंच त्याचें सार्थक अद्यापपावेतों मला कामशेतच्या निवासांत करतां येत आहे, हाच माझा अप्रतिम योगायोग होय.

३. माझें वाचन व अभ्यास

लेखन जसें कागदावर वठलें, तसें माझें वाचन कसें वाढत गेलें हें निश्चित स्वरूपांत आज दर्शवितां येणार नाहीं. माझें मलाच त्याचें पूर्ण स्मरण नाहीं. वाचलेल्या पुस्तकांची स्वतंत्र यादी मीं ठेवलेली नाहीं. इतिहासाच्या किंवा इतर विषयांच्या अभ्यासांत किंवा राजपुत्रांस शिकविण्यांत ज्या ग्रंथांची जरूर लागली ते मी वाचीत गेलों. रियासतींच्या ग्रंथांत आधारभूत पुस्तकांचा निर्देश ठिकठिकाणीं मीं केला आहे. मी घाईघाईनें वाचणारा नसून हातांत पेन्सिल घेऊन आपणांस ग्राह्य भाग कोणता त्याच्या खुणा मी वाचलेल्या पुस्तकांत करतों. मात्र ह्या खुणा स्वतःच्या पुस्तकांत सर्वत्र चिताडलेल्या आज आढळतात. त्याशिवाय लोकांकडून किंवा लायब्ररींतून अनेक पुस्तकें आणून मीं वाचलीं व परत केलीं, अशांची यादी मोठी होईल. माझ्या स्मरणवह्या पुष्कळ असून त्यांत मीं जरूरीपुरतीं केलेलीं टिपणें व वाचनीय पुस्तकांच्या याद्या पाहतां हिंदुस्थानच्या इतिहासावरील बहुधा कोणतेंही महत्त्वाचें पुस्तक माझ्या वाचनांतून सुटलें असें दिसत नाहीं. माझ्या पुस्तकांवर शेवटीं मीं वाचल्याची तारीख व थोडीबहुत टीका लिहून ठेवल्याचा उल्लेख आढळतो. बडोद्यास खुद्द महाराजांची मोठी खासगत लायब्ररी होती, ती राजपुत्र विद्यालयाच्या इमारतींतच कैक वर्षें असून, त्या इमारतींत माझें वास्तव्य वीसएक वर्षें झालें. आरंभीं शिकविण्याचें कामही थोडें होतें, म्हणून त्या लायब्ररींतील पुष्कळशीं पुस्तकें वाचण्याची संधि मला मिळाली, इतिहास व राजकारण हे विषय महाराजांच्या अनुषंगानें माझेही आवडीचे बनले, पण त्यांशिवाय शिक्षणविषयक ग्रंथ, भूगोल, मानसशास्त्र, गृहव्यवस्था, आरोग्य व स्वच्छता, शरीरशास्त्र, सुप्रजाजनन (Eugenics), निरनिराळ्या शास्त्रांचीं मूलतत्त्वें (Science Primers), आहारमीमांसा (Dietetics) अशा अनेक विशिष्ट विषयांचे ग्रंथ मीं सवडीनुसार अभ्यासले. महाराजच स्वतः असे विषय मुद्दाम वाचीत आणि मी त्यांचा जवळचा रीडर असल्या-मुळें त्यांच्या तयारीसाठींही आणि त्यांच्या मुलांच्या संगोपनार्थ असे अनेक व्यावहारिक विषय मलाही शिकावे लागले. जो विषय पुढें येई त्याची भरपूर माहिती मिळवायची हा माझा स्वभावच बनला. पत्नीला गर्भधारण झाल्याचें लक्षांत येतांच त्या विशिष्ट विषयाचीं व बालसंगोपनाचीं वगैरे

अनेक पुस्तकें मीं इंग्लंडांतील तज्ज्ञ गृहस्थांकडून मुद्दाम मागवून आणलीं आणि श्यामकान्त व श्रीवत्स ह्या माझ्या दोघा पुत्रांचें संगोपन जितक्या कसोशीनें करतां येईल तितकें मी करीत गेलों. ह्याचा फायदा प्रत्यक्ष महाराजांच्या संततीस व माझ्या आप्त शेजाऱ्यांस मिळाल्याशिवाय कसा राहील ?

लहानपणापासून मुलांची जिज्ञासाशक्ति मी वाढवीत गेलों. मुलें नाहीं नाहीं ते प्रश्न विचारून भंडावून सोडतात, तेव्हां त्यांचा हिरमोड कधीं न करतां उलट त्यांस उत्तेजन देऊन मी त्यांचें समाधान करीं. सवड नसली तर मुद्दाम पुढें वेळ काढून मी मुलांस अनेक विषय शिकवीत गेलों. सदानसदा आमचा विवाद घरांत चालू असायचा. शक्य तोंवर आम्ही रात्रीं बाहेर उघड्या चौकांत अगर गच्चीवर सर्वांचीं आंथरुणें घालून रात्रीं भोजनोत्तर अर्धा एक तास कांहीं श्लोक, कांहीं गाणीं, कांहीं रोजच्या वर्तमानपत्री बातम्या किंवा असेच अन्य विषय बोलून मी मुलांचें मनोरंजन व जीवनविषयक मार्गदर्शन करीत असें. जर्मन युद्ध सन १९१४ सालीं सुरू झालें त्याच्या रोजरोज येणाऱ्या बातम्या मुलें मला उत्कंठेनें विचारीत. त्यांचीं उत्तरें देण्यांत सहजगत्या भूगोल, राजकारण, इत्यादि विषयांची ओळख माझ्या मुलांस होत गेली. मला वाटतें प्रत्येकानें घरांतील मुलांचें असें संगोपन करीत राहणें हें त्याचें पवित्र कर्तव्य आहे. हें करणें नसेल तर मुलें न होण्याचा बंदोबस्त करावा. विषय स्वीकारला तर त्याची जबाबदारीही पार पाडलीच पाहिजे. मुलें-मुली बरोबर घेऊन सर्वांनीं एकत्र भोजन करण्याचा रिवाज मीं कधीं चुकविला नाहीं. पुष्कळसे गृहस्थ सायंकाळीं क्लबांत वगैरे बाहेर राहून रात्रीं, दुपारीं मुलांचीं भोजनें अगोदर आटपतात आणि आपण एकटे मागाहून उशीरां जेवतात. हा प्रकार मी अत्यंत निंद्य मानतों. भोजन ही एकच वेळ अशी आहे कीं त्यांत समरस होण्याची उत्कृष्ट संधि प्रत्येक गृहस्थास असते. ती कधीं वायां दवडूं नये. प्रत्यक्ष महाराजांचीं मुलें आपल्या तक्रारी मन मोकळें करून मला सांगत, त्या मी महाराजांच्या नजरेस आणून त्यांना इशारा देईं कीं तुमचीं मुलें पोरकीं आहेत. तुम्ही त्यांचे आईबाप जन्मदाते खरे, पण तुम्हीच त्यांच्या पोटांत शिरून ममतेची पाखर त्यांस दिली पाहिजे. ही तुमची जबाबदारी आम्हा सेवकांस कधीं साधणार नाहीं. माझा इशारा ध्यानीं घेऊन

महाराजही जबाबदारी ओळखूं लागले. पण मुलांच्या मनाची पकड त्यांना कधीं साधली नाहीं. म्हणून त्यांचा संसार शोचनीय बनला.

सारांश, सर्व जीवन एकत्र गुंतलेलें असून त्याचा आधार वाचन व ज्ञानप्राप्ति हेंच आहे हें ओळखून मीं आपलें वाचन वाढवून त्याचा उपयोग व्यवहारांत केला. कादंबऱ्या वाचण्याचा नाद मला नाहीं. तथापि स्कॉट, व्हिक्टर ह्युगो, लॉर्ड लिटन, डिकन्स, वॉशिंग्टन अर्व्हिंग, मोर्ले, अरेबियन नाइट्स् व त्याजवरील सर रिचर्ड बर्टनचा टर्मिनल एसे, बेकन, मेकॉले, बर्क, मिल्ल, गिबन, प्लुटार्कचीं चरित्रें, एच्. जी. वेल्सचें आउटलाईन ऑफ हिस्टरी, नेल्सन–नेपोलियनचीं चरित्रें, ग्रीसरोमचे व इंग्लंडचे इतिहास, असे अनेक ग्रंथ माझ्या वाचण्यांत आले. शिवाय रियासती लिहितांना जे उपयोगांत आणले त्यांची यादी त्या त्या पुस्तकांत दिली आहे. बी. ए. चा माझा ऐच्छिक विषय Logic and Moral Philosophy असून तत्संबंधीं माझें वाचन कॉलेजांतच झालें. त्याचा विस्तार पुढें हळूहळू होत गेला. इंग्लंडचे व अमेरिकेचे पुष्कळ इतिहास मीं वाचले. बकल, ड्रेपर, डार्विन, हर्बर्ट स्पेन्सर ह्यांचे ग्रंथ मीं सवडीनुसार वाचले. हर्बर्ट स्पेन्सरचें एज्युकेशन हें पुस्तक तर आरंभीं मला सूत्रमय वाटलें. फ्रोबेलची बालोद्यान पद्धत, मॉन्टिसेरी पद्धत, महात्मा गांधींची बेसिक पद्धत ह्या मीं हाताळल्या. मुंबईंत मूळव्याधीच्या शस्त्रक्रियेंत मी शय्यासीन असतां हॅकेलचें रिडल् ऑफ धि युनिव्हर्स हें उत्कृष्ट पुस्तक मीं वाचलें. त्यामुळेंच मी जीवनाच्या बुद्धिवादी शिकवणींत एकरूप बनलों.

अशीं चिकित्सक व बौद्धिक विचारांचीं पुस्तकें वाचल्यावर माझी पूर्वीची धार्मिक अंधश्रद्धा नाहींशी होऊन मी एक प्रकारचा निरीश्वरवादी, विचारास पटेल तें आचरणांत आणणारा स्वतंत्र विचारी बनलों. उपास तापास, भजन पूजन, सोवळें ओवळें हीं सोंगें सर्व टाकून मी स्वतंत्र विचारानें शास्त्रीय शोधांचें ग्रहण करीत आलों आहें. घरांतही हे सर्व प्रकार मीं मुद्दाम चालू केले. पुष्कळ वेळ प्रवासांत आगबोट-आगगाडींत मला काढावा लागल्यामुळें आगाऊ वाचनाची तयारी मी बरोबर ठेवीत असें. आगबोटीवर तर लेखनवाचन हाच मुख्य व्यवसाय. वर आकाश व खालीं पाणी, भोजन फराळाची चंगळ, अशा त्या बोटीवरच्या प्रवासांत एकान्त तंद्रीच्या भावनेंत इतिहासविषयक पुष्कळसें लेखन मी केलेलें आठवतें.

आगबोटीच्या कोठल्या तरी दूर कोपऱ्यांत मी एकीकडे मुद्दाम जाऊन बसे. तेणेंकरून प्रफुल्लित मनांत विचारसौंदर्य प्रगट होत असे. उटकमंड-सारख्या ठिकाणीं किंवा खुद्द बडोद्यास बाहेर झाडाखालीं बसून लेखन-वाचन करण्याचा माझा प्रघात होता. राजपुत्रांचे शिक्षणवर्गही पुष्कळदा आम्ही बाहेर झाडाखालीं चालवीत असूं. अशा खुल्या वातावरणांत कोणतेंही काम प्रफुल्लित मनानें करतां येतें. हल्लीं कामशेतलाही मला ह्या उघड्या हवेचा मोठा फायदा होत आहे. अशा ह्या वाचनाचा उपयोग मी आपल्या लेखनांत करीत आलों आहें. इतिहासशास्त्रावर Frederic Harrison's 'Meaning of History', Renniers 'Method and Purpose of History' असे अनेक ग्रंथ मीं वाचले असून इतिहासाची व्याप्ति दाखविणारीं टिपणें व उतारे मीं स्वतंत्र ठेवले आहेत.

माझें वर्तमानपत्री वाचनही खोंचदार होतें. उगाच भाराभर वाचीत बसण्याचा नाद मला नाहीं. टाइम्स ऑफ् इंडिया किंवा बॉम्बे क्रॉनिकलसारखें एखादें दैनिक मी आरंभापासून आतांपर्यंत साक्षेपानें वाचीत असून तें न झालें तर चैन पडत नाहीं. W. J. Stead चा रिव्ह्यू आफ रिव्ह्युज मी आवडीनें वाची. तो पुढें बंद झाल्यावर गांधींचा 'यंग इंडिया' व 'हरिजन' हीं पत्रें समग्र वाचल्याशिवाय मी राहिलों नाहीं. तसाच Modern Review हा माझा आवडीचा प्रबंध असून सारखा चाळीस वर्षें मी त्याचा ग्राहक व वाचक होतों. त्याचा सर्व संच मीं अद्यापि संग्रहांत जपून ठेवला आहे. त्यांत केव्हां केव्हां माझेही लेख आले असून सर जदुनाथांचे इतिहासविषयक लेख तर बहुधा दर अंकांत असतातच. टिळकांच्या हयातींत 'केसरी'चे अंक मी नियमानें वाचीत आलों. आगरकरांचा 'सुधारक' व हरिभाऊंची 'करमणूक' व पुढें मित्रांचें 'मनोरंजन' व 'विविधज्ञानविस्तार' हेही माझ्या वाचनांत असत. जवाहरलालचें 'आत्मचरित्र' व 'डिस्कव्हरी ऑफ् इंडिया' हे ग्रंथ मला अत्यंत उद्बोधक वाटून मीं त्यांचें विस्तृत परीक्षण लिहिलेलें आहे. रघुनाथराव कर्व्यांचें 'समाजस्वास्थ्य' मीं नियमितपणें वाचलें. त्यांतील अवास्तव विचारप्रणाली मला सर्वथा मान्य नसली तरी त्यांतील एकंदर जीवनाचा प्रगतिपर विचार मला स्वीकारार्ह वाटतो. संततिनियमन प्रत्येकानें अवश्य करावें आणि विषयप्रवृत्ति भडकूं न देतां आवरून धरावी

असें मानणारा मी आहें. अण्णा कर्व्यांची मानवी समता तर मला अत्यंत उद्‌बोधक वाटली. थिऑसॉफींत माझें मन रंगलें नाहीं.

इतिहास विषयाचा अभ्यास म्हटला कीं त्यास अनेक शास्त्रांची जरूर लागते. तसे ग्रंथ मला आढळले व झेपले तेवढे मीं वाचून उपयोगांत आणले. त्यांची एकंदर यादीच करणें झाल्यास माझ्या रियासतींच्या निरनिराळ्या भागांत विविध ग्रंथांचा व तौलनिक विवेचनाचा निर्देश दिला आहे, तो पाहावा म्हणजे माझ्या उद्योगाचा विस्तार लक्षांत येईल. माझा स्वतःचा पुस्तकसंग्रहही बहुतेक सर्व दुर्मीळ पुस्तकांचा, पन्नास साठ वर्षांच्या परिश्रमानें बनविलेला मजजवळ विद्यमान आहे. इ. स. १६००–१९५० ह्या साडेतीन शतकांच्या हिंदुस्थानविषयक इंग्रजी मराठी ग्रंथांचा बहुतेक परिपूर्ण असा माझा संग्रह असून त्यांतले मोलवान ग्रंथ आतां दुर्मीळ व बाजारांत विकत न मिळणारे आहेत. हा संग्रह बनविण्यांत सर जदुनाथ सरकारांचें साह्यच मला विशेष उपयोगी पडलें. त्यांच्याजवळ कित्येक ग्रंथांच्या दुप्पट प्रती होत्या, त्या त्यांनीं मला कायमच्या दिल्या. वॉरन हेस्टिंग्जच्या कारभाराचे ग्रंथ, फॉरेस्टनें निवडलेल्या लेखांचे भाग माझे पूर्ण असून वेलस्ली व वेलिंग्टन ह्यांचे खलिते, शीखांचे इतिहास, फोर्ब्स, माल्कम, लोगिन, टॉड, स्लीमन, इत्यादींचे ग्रंथ, मन्रोचे सुंदर लेख, स. १८५७ च्या क्रांतीचे अनेक वृत्तान्त, हि० रे० कमिशनचे अहवाल, पर्शियन कॅलेंडरची संपूर्ण माला, असे सर्व मीं जतन करून ठेवले आहेत. मला हा सर्व संग्रह बहुमोल वाटतो आणि माझ्या पश्चात्‌ तो निगेसाठीं एखाद्या संस्थेस देण्याची व्यवस्था मी हल्लीं करीत आहें.

राजपुत्रांना मी मराठी, संस्कृत, अंकगणित, इतिहास व भूगोल हे विषय शिकवीत असें. कारणपरत्वें महाराज व महाराणी ह्यांनाही मी कित्येक विषय शिकविले आहेत. अर्थात्‌ तुकाराम, रामदास, वामन, रघुनाथ पंडित, मोरोपंत, इत्यादि मराठी कवींचे ग्रंथ मीं वाचले असून हें प्रचंड वाङ्मय आज माझ्या संग्रहीं नाहीं ह्याचा भारी खेद वाटतो. बडोद्यांत भाड्याच्या घरांत पुस्तकसंग्रह करणें जमलें नाहीं आणि पुढें माझा संग्रह असा वाढत जाईल ही कल्पना प्रथम मनांत नव्हती. ह्यास्तव पुष्कळ सुंदर मराठी संस्कृत ग्रंथ केवळ हलगर्जीपणानें हातीं आलेले मीं घालविले. कामशेतला स्वतंत्र घरांत आलों म्हणूनच मला आपला संग्रह असा चोख बनवितां

आला. मुंबई-पुण्यासारख्या ठिकाणीं हें शक्य नव्हतें. मी ह्या संग्रहामुळें सदा थोरांच्या संगतींत वावरतों आहें असाच आनंद अनुभवीत असतों. एकंदर आयुष्याचा कार्यक्रम (Planning) आगाऊ ठरवून तशा धोरणानें प्रत्येक वस्तूचा संग्रह करीत जाणें, सर्वांगीण नजर सारखी ठेवणें हें कठीण काम तर खरेंच, पण प्रथम तारुण्यांत त्याची कल्पना येत नाहीं. माझ्या इतिहासाचा एवढा परिपोष होत जाईल ह्याची मला तरी आरंभीं काय कल्पना असणार! पुष्कळ पुस्तकें निरर्थक गमावलीं ह्याचा मला आतां मोठा खेद वाटतो. मराठींतील अनेक नामांकित ग्रंथ, नाटकें, कादंबऱ्या, निबंधमाला, स्मारक ग्रंथ, घराण्यांचे वृत्तान्त, ऐतिहासिक व सामाजिक चर्चेचे विषय, मासिकांतले लेख मीं बरेच वाचले असून मला कोणी मागासलेला म्हणूं नये अशी माझी धडपड सदा चाललेली असते. संस्कृतांतल्या मोठमोठ्या कवींच्या कृति, संक्षिप्त रामायण व महाभारत, शिलालेखांचीं पुस्तकें असें पुष्कळ वाङ्मय मीं सवडीनुसार वाचलें असून संस्कृत मराठीचें माझें पाठान्तरही थोडें नाहीं. अलीकडे भगवद्गीता, उपनिषदांचे भाग मी थोडेबहुत वाचून त्यांचा उपयोग प्रसंगानुसार करीत असतों. गीता बरीच पाठ येते. बडोद्यास असतां ह्या विषयांस फुरसत मिळत नसे. कामशेतच्या निवासांत अलीकडे कौटुंबिक पाश सर्व संपल्यामुळें वाचनास, लेखनास व पठनास पुष्कळ वेळ मिळतो.

मासिकांत निरनिराळ्या विषयांवर माझे लेख पुष्कळ प्रसिद्ध होत असून सुमारें तीनशें फुटकळ लेखांचा संग्रह मीं ठेविला आहे. ज्ञानेश्वरी वाचण्याचा प्रयत्न मीं केला पण त्यांत मन रमलें नाहीं. टिपणें करून ठेवण्याची मला आवड असून सुभाषितें, उतारे, वेंचे ह्यांचा संग्रह मीं बराच केला आहे. लेखन सर्व माझें मीच करतों. तोंडानें सांगून दुसऱ्याकडून लिहविणें मला जमत नाहीं. सर्व कामें झपाझप करण्याची मला सवय असली तरी लेखन-वाचन सावकाश व आगाऊ विचारपूर्वक मुद्दे ठरवून मगच करतों. व्याख्यानेंही अलीकडच्या पंचवीस तीस वर्षांत मीं पुष्कळ दिलेलीं असून त्यांचीं टिपणें संग्रहीं आहेत. नागपूर व पटणा येथें मराठी इंग्रजी व्याख्यानें दिलेलीं छापलीं आहेत. एकंदरींत माझें आयुष्य कारणीं लागलें असें म्हणतां येईल. हीच माझी जीवनाची मुख्य जोड होय.

प्रकरण तिसरें

स्मरणीय अनुभव

१. अत्यंत दुःखाचा दिवस

२. माझें गाजलेलें प्रायश्चित्त

३. जेव्हांच्या तेव्हां, जेथल्या तेथें

४. कामशेतचा निवास

प्रकरण तिसरें

स्मरणीय अनुभव

१. अत्यंत दुःखाचा दिवस

माझ्या सर्व आठवणींत निरतिशय आनंदाचे असे पुष्कळ दिवस सांगतां येतील. पण अत्यंत दुःखाचा असा एक विशिष्ट दिवस माझ्या स्मरणांत सदैव जागृत आहे, तो बुधवार ता. ७ डिसेंबर, स. १८९२, मार्गशीर्ष व० ४ शके १८१४ हा होय. मी युरोपच्या प्रवासास प्रथम १५ जुलई, स. १८९२ ह्या दिवशीं बडोद्याहून निघालों आणि दुसऱ्या दिवशीं बोटींत बसून मुंबई सोडली, तो पुनः परत मुंबईंत वरील ७ डिसेंबर रोजीं सकाळीं ८–९ च्या सुमारास धक्क्यावर उतरलों. ह्या वेळीं माझें वय २७ असून आमचें राहतें बिऱ्हाड बडोद्यास होतें, तेथें माई व नारायणराव, आबा वगैरे बंधु राहत होते. अर्थात् मुंबईंत आम्हांस उतरण्याची अशी घरची सोय नव्हती. स्नेही-सोबती मुंबईंत पुष्कळ होते, त्यांत मुख्यतः भाऊसाहेब आठल्ये हे तेथें त्या वेळीं खंबाला हिलवर मंडलीकांच्या चाळींत राहत होते. तेच मला घेण्याकरितां बंदरांतील धक्क्यावर आले. त्यांजबरोबर बहुधा केशवराव परांजपेही असावे. धक्क्यावरून त्यांनीं मला सामानासह व्हिक्टोरिया गाडींत बसवून आंग्रेवाडींत डॉक्टर नानासाहेब देशमुख ह्यांच्या घरीं आणिलें. सकाळचा सुमारें १०–११ चा अंदाज होता. बोटींतून उतरतांना मला बिलकूल कल्पना नव्हती कीं मला नानासाहेबांच्या घरीं भोजनास जावें लागेल. भाऊसाहेब गाडींत बसल्यावर मला म्हणाले, "आतां जेवणाची वेळ आहे, मीं नानासाहेबांना सांगून ठेवलें आहे, त्यांनीं आग्रह करून तुला आपल्याकडेच जेवायला बोलावलें आहे." हल्लीं जशी सरदारगृहासारखी प्रवाश्यांना उतरण्याची सोय आहे तशी त्या वेळीं मुंबईंत रूढ नव्हती. शिवाय नानासाहेबांकडे जावें लागेल ही जाणीव नसल्यामुळें मी ऐटींत विलायती सूट घातलेला बोटींतून उतरलों. नेसण्याचें धोतर वगैरे बरोबर कांहीं नव्हतें. सामानाच्या पेट्या परस्पर खंबाला हिलवर गेल्या. भाऊसाहेब माझेच वर्गबंधु व स्नेही मला बापूसाहेबांइतकेच पूज्य

होते. आज सुंदर हिंदी भोजन मिळणार, मग आगबोटीवर विशेष खा कशाला ! अशा समजुतीनें मीं बोटीवर फारसें कांहीं खाल्लें नाहीं. शिवाय उतरण्याच्या दिवशीं सर्वच आपापल्या धांदलींत व बांधाबांधींत निमग्न. मला घरीं येईपावेतों सडकून भूक लागली.

नानासाहेबांकडे आलों तों त्यांचें सोवळ्यांत देवतार्चन चालू होतें. आल्याबरोबर त्यांना वंदन करणें हें पहिलें काम. माझ्याजवळ धोतर वगैरे कांहीं नाहीं. गळ्यांत कॉलर नेकटाय व खिशांत हातरुमाल. विजार सुद्धां गरम एकेरी, आंत दुसरा मांडचोळणा नव्हता. भाऊसाहेबांनीं मला एक पंचा नेसण्यास आणून दिला. नाहीं होय म्हणण्याला अवकाशच नाहीं. मी मोठ्या संकटानें पंचा नेसून शर्टासह नानासाहेबांपुढें जाऊन नमस्कार केला. ते देवघरांत सोवळे होते. बाहेरून नमस्कार करून परत आलों. स्नानाचा प्रश्न निघाला तेव्हां मी सांगितलें कीं मीं स्नान सकाळींच केलें आहे. आणखी चार मंडळी होती त्यांच्याशीं बोलतांना मी पाश्चात्य रीत-रिवाजांचा बडेजाव बोलूं लागलों कीं लगेच ही मंडळी आपल्या सनातन धर्माचा, सोवळ्या ओवळ्याचा, देवतार्चनाचा एवढा बडेजाव गात कीं मला ती त्यांची बडबड ऐकणें सुद्धां सहन होईना. ते सनातन्यांच्या बालेकिल्ल्यांत, तर मी एकटा सुधारकपंथी चोर. मला सर्व बोचून खाऊं लागले. पुढें जेवणाची तयारी झाली. तेथें पाहतों तों मोठी पंगत सोवळी व माझें पान दूर लांब एके बाजूस मांडलेलें. हा प्रकार पाहून मी अत्यंत कष्टी झालों. सहा महिने युरोपच्या मोकळ्या वातावरणांत वावरून हिंदुस्थानच्या मायभूमींत पाऊल ठेवतांच हा बहिष्काराचा प्रकार अनुभवणें जिवावर आलें. वाटलें ह्या क्षणीं तोंड घेऊन कोणीकडे तरी चालतें व्हावें. मला पाणी दिलें तें सुद्धां विटाळशीसारखें दुरून, न जाणों एखादा तुषार सोवळ्यांत उडेल. मला जेवणही गोड लागलें नाहीं. साधेंच जेवण, तिखट वगैरे झणझणीत त्यानें तोंड भाजून गेलें. त्या दिवशीं माझें उष्टें मींच काढलें कीं काय आठवत नाहीं, पण तो एकंदर अनुभव मी ज्यांना गुरुस्थानीं समजें, त्या नानासाहेब देशमुखांच्या घरीं मला मिळावा, त्यांचे वडील गोपाळराव हरि कट्टे सुधारक, त्यांच्या कुटुंबांत माझी ही अवस्था ! असे किती व काय विचार मनांत आले ते आतां सांगतां येत नाहींत. सर्व निमूटपणें सोसून भोजन होतांच पहिले कपडे घालून मी

बाहेर पडलों आणि गाडी करून खंबाला हिलवर खोलींत जाऊन रडत बसलों. माझे अश्रु कांहीं केल्या थांबेनात. एवढ्या अफाट हिंदी जगांत माझें असें कोण नाहीं, मला जागा नाहीं, खाणेंपिणें मिळूं नये, अशी काय गुन्हेगारी मीं केली. पाश्चात्य मुलखाचा प्रवास करून आल्यावर स्वबांधवांकडून माझें अभिनंदन व्हावें त्याऐवजीं मला ह्या मुंबई नगरींत उभें राहण्यास जागा नाहीं ह्याचा एवढा उद्वेग वाटला कीं सर्वांग भाजत आहे असा भास सर्व दिवसभर मला होत होता. त्या दिवशीं सायंकाळीं मी जेवलों नाहीं, चहादेखील घेतला नाहीं. भाऊसाहेब कोठें तरी आपल्या कामांत होते. त्यांना माझ्या यातनांची कल्पनाही आली नव्हती. रात्र झाली. भयंकर उष्मा वाटूं लागला. खोलींत गुदमरल्यासारखें वाटून मी अस्वस्थ झालों. ८॥–९ च्या सुमारास एकटाच बाहेर पडलों. त्या वेळीं खंबाला हिलवर मोठें जंगल व उंच वृक्ष होते. एका वृक्षाखालीं दगडावर बसून दोन तीन तास अश्रु ढाळीत मोठ्या आवेशानें चिंतन करूं लागलों. बारांच्या पुढें केव्हां तरी परत येऊन जमिनीवर अंग टाकलें. सर्व जग झुगारून देऊन मी आतां पुढें आपला स्वतंत्र मार्ग काढायचा निश्चय केला. दुसऱ्या दिवशीं बडोद्यास गेलों. त्या दिवसापासून मी जो पक्का स्वयंविचारी बनलों, तो तसा आतांपर्यंत वागत आहें.

२. माझें गाजलेलें प्रायश्चित्त

समुद्रयानानें प्रत्यन्त देशांत जाऊन आल्याबद्दल प्रायश्चित्तानें शुद्धि मिळविण्याचा प्रचार कधीं निघाला तें निश्चित नाहीं. आर्यधर्माचा प्रसार पूर्वद्वीपप्रदेशांत झाला तेव्हां समुद्रतरण निषिद्ध मानलें जात नव्हतें. हेमाद्रीच्या वेळेपासून हा निषेध उत्पन्न झाला असावा. पेशवाईंत स. १७८२ सालीं रघुनाथरावदादाचा वकील राजापुरचा ब्राह्मण हणमंतराव व मणियार पारसी असे दोघे लंडनास जाऊन परत आले. तेव्हां हणमंतराव स्वज्ञातींत परत येऊं शकला नाहीं. देशत्याग करून तो गुजरातेंत भडोचला जाऊन राहिला अशी माहिती मिळते. अलीकडच्या काळीं इंदूरचे गणेशशास्त्री व कृष्णराव मुळ्ये वगैरे कित्येक गृहस्थ व मुंबईकडील श्रीपाद बाबाजी ठाकूर अशी मंडळी युरोपांत राहून आलेली प्रायश्चित्तानें शुद्ध झाली. स. १८८७ त सयाजीराव महाराज शेंपन्नासांचा लवाजमा घेऊन आठ महिने युरोपांत राहून

परत आले, त्या सर्वांच्या शुद्धिकरणास सुमारें तीन लाख खर्च झाला. इतकेंही करून त्या सर्वांस जातीकडून मान्यता मिळालीच असें नाहीं. पापपुण्याचा विचार बाजूस राहून भला मोठा द्रव्यदंड उपटण्याची संधि सनातनी समाजास प्राप्त झाली एवढाच ह्या प्रायश्चित्ताचा आधुनिक परिणाम बनला. मला स्वतःला युरोपास गेल्याबद्दल प्रायश्चित्त नको होतें. महाराजांनीं मला तारेनें युरोपांत बोलावलें, त्यांत त्यांनीं स्पष्ट इशारा दिला कीं प्रायश्चित्ताचा खर्च सरकारांतून मिळणार नाहीं. बापूसाहेब आठल्ये माझे पुरस्कर्ते, ते सांगतील तसें वागायचें असें ठरवून मी युरोपास निघून गेलों. बापूसाहेबांना सामाजिक बंडखोरी पसंत नव्हती, शक्त्यनुसार प्रायश्चित्त घेऊन पुढें जावें असा मार्ग त्यांनीं मला सुचविला. पापपुण्याचा विचार धर्मवेत्ते ठरवितील तो सर्वांनीं मान्य करावा असें ते म्हणत. प्रत्यक्ष विधि करतांना उच्चार करावा लागतो तो असा : “ म्लेंच्छ देशगमन, ज्ञाताज्ञात, शूद्रादि सर्वविधसंसर्ग, स्नानसंध्योपासनादि नित्यकर्मलोप, भक्ष्याभक्ष्य पेयापेयादि पापानां निरासार्थं ” हे शब्द संकल्पांत आहेत. हीं पापें तर युरोपांत न जाऊन सुद्धां येथील कोणते इसम रोजरोज करीत नाहींत ! माझें मन सांगे मीं कांहीं एक पाप युरोपांत केलें नाहीं. मी प्रवासांत असतां वडिलांनीं कोंकणांत माझ्या प्रायश्चित्ताची चर्चा कित्येकांशीं करून ठरविलें कीं परत येतांच मी थेट गोविलास जाऊन तेथें घरचे घरीं प्रायश्चित्त-विधि उरकावा. पंचक्रोशींतील पुढारी धर्मनिष्ठांनीं हा मार्ग सुचविला, तदनुसार वडील मुंबईस येऊन मला घेऊन स. १८९३ च्या फेब्रुवारींत घरीं कोंकणांत गेले. तत्पूर्वी त्यांनीं प्रायश्चित्तासंबंधानें कित्येक शिष्टांची लेखी संमति मिळविली होती. ह्या एकंदर प्रकरणाचे बनलेले कागद आज माझ्या संग्रहीं आहेत.

भाऊ पाध्ये मोघे कोलधेकर त्या प्रांतांतले नामांकित शिष्ट समजले जात होते, त्यांस आणण्यास वडिलांनीं माणसें पाठविलीं. पण त्यांनीं येण्याचें नाकारून उलट नानाप्रकारच्या सबबी लिहून पाठविल्या. वडिलांचे मातुल गणेशपंत बाबा आंबर्डेकर हे आमच्या घरीं ह्या विषयाचा पुढाकार घेऊन निभावणी करीत होते. सर्व सरदेसाई मंडळी माझ्या बाजूनें एकमतानें वागली. परंतु बाहेरचे कांहीं गुंड प्रथमपासून प्रायश्चित्ताच्या निमित्तानें भली मोठी रक्कम उपटण्याच्या विचारास लागले.

'मीं कांहीं तरी घोर अपराध केला आहे, त्यांतून मला सोडवा' अशी गुन्हेगारीची भावना ते पदोपदीं माझ्या पदरीं बांधूं लागले. त्या दृष्टीनें ते वडिलांस नडवूं लागले. प्रायश्चित्ताचा दिननिश्चय, तत्प्रांतीय शिष्टांची पायधरणी, आमंत्रणें, निमंत्रितांचा परामर्श, मंडपाची व भोजनाची सोय अशा अनेक बाबतींत अगोदरपासून मोठी यातायात सुरू झाली. एखादें लग्नकार्य बरें असा प्रकार निर्माण झाला. माझे चौघे मातुल व घरचे आप्त सर्व एकजुटीनें मनापासून झटले म्हणूनच तो प्रसंग शेवटीं निभावला.

युरोपांतून परत आल्यापासून स्वतःच्या घरीं देखील मी अपंक्त होतों. मजबरोबर पत्नीही अपंक्तच मानली जाऊन तिचा स्पर्श घरांत नव्हता. वडिलांना मात्र ह्याबद्दल भारी त्वेष वाटला. त्यांचा समज कीं माझा मुलगा दुर्मार्गगामी होणें शक्यच नाहीं. ह्यास्तव घरांत ते मला दूर न ठेवतां भोजनप्रसंगीं माझें पान ते नेहमींप्रमाणें आपल्या जवळ घेत. माघ वद्य १२ इंदुवार शके १८१४, ता० १३ फेब्रुवारी स. १८९३ हा दिवस प्रायश्चित्ताचा ठरला. सुमारें दोनशें पात्र व्हावें अशी भोजनाची तयारी केली. सभोंवार मोठे मंडप घातले. त्या वेळचें आमचें घर लहान जुनें तेंच होतें. चार दिवसांपासून अगोदर मंडळी जमूं लागली. आदल्या रात्रीं भट भिक्षुक, आप्त स्त्रीपुरुष वगैरे शेपन्नास पावेतों जमा झाले. त्या सर्वांची एकसारखी चर्चा चालली, त्या योगानें सर्व आवार गजबजून गेलें. वाजंत्री वगैरे शुभ प्रसंगाचे उपचार प्रायश्चित्तांत नसल्यामुळें ह्या समारंभास आनंदोत्सव म्हणतां आलें नाहीं. विचारशक्ति गहाण टाकल्याचे किती तरी प्रकार त्या दोन दिवसांत माझ्या नजरेस आले, तें सांगण्यांत आतां तात्पर्य नाहीं. सर्वच बाजार अंधश्रद्धेचा. प्रत्येकानें मन मानेल तसें बडबडत सुटावें. ह्यामुळें माझ्या मनाला मात्र तीक्ष्ण यातना सारख्या होत होत्या.

थंडीच्या ऋतूंतला तो माघ महिना. सूर्योदयींच मला कुलोपाध्यांनीं थंड पाण्याचें विपुल स्नान घालून, न्हाव्याकडून सक्षौर डोक्याची हजामत वस्तऱ्यानें करविली. नंतर पुनः स्नान घालून लहान पंचा नेसवून उघड्या शरीरानें मला होमाच्या स्थंडिलासमोर पाटावर नेऊन बसविलें. पुढें प्रथम संकल्प करायचा त्यांत कोणकोणत्या पापांचे उच्चार व्हावयाचे त्याबद्दल प्रचंड वाद निरनिराळ्या वैदिकांचा सुरू झाला. त्यांत निश्चिति म्हणून होईना. दिवस वर आला, दुपार झाली तरी संकल्पास ठिकाण नाहीं कीं होमकुंड

चालू होईना. सकाळीं सातपासून सायंकाळीं चारपावेतों मी ह्या स्थितींत उपाशीं बसून कळकळून गेलों. हेंच खरें देहदंडाचें पापक्षालन असें त्या वेळीं मला वाटलें. तोंडांत पाणी नाहीं, मग चहा कुठला! जवळ एक गोमूत्राचें मोठें पात्र मात्र भरलेलें डोकावत होतें. होमाचें व पूजेचें साहित्य सर्व तयार होतें. प्रायश्चित्ताचा विषयच इतका अपरिचित होता कीं त्यांत कोणते विधि कसे करायचे ह्याचे तपशील नक्की होणें व एकवाक्यतेनें ते सर्व पार पडणें दुरापास्त झालें. त्यांत पुढें दहा वाजल्यापासून गांवोगांवची आमंत्रित मंडळी जमूं लागून त्यांनीं वादांत भाग घेतल्यामुळें जास्तच घोटाळा माजला. नवीन शंकाकुशंका निघाल्या. तेणेंकरून एकमत असें कांहींच ठरेना. नवीन गृहस्थ आला त्याला पूर्वीच्या वाटाघाटीची दाद नाहीं. नाहीं व्यवस्थित सभा किंवा तिचें नियंत्रण. दुपारपावेतों शेंदीडशें मंडळी जमली. त्यांत खरे विद्वान किंवा अधिकारी पेशानें बोलणारे कोणी नव्हते. ह्यामुळें बाचाबाची व गोंधळ उडाला. जे कोणीं गांवगुंड पैसा उपटण्याच्या मतलबानें बोलत त्यांचा ओरडा अनिवार्य बनला. मी मात्र उघडाबोडका पाटावर बसून गुन्हेगारासारखा सर्व प्रकार निमूटपणें पाहत होतों. दुसरें मी तरी काय करणार! बारा वाजले तेव्हां स्वयंपाक तयार होऊन पानें मांडलीं तरी धार्मिक विधीस आरंभ होईना. गणेशपंत बाबा, कृष्णोबा नायक सरदेसाई अशी शिष्ट मंडळी समजूत घालतांना रडकुंडीस आली. सर्व लोक जीव तोडून प्रयत्न करूं लागले. वाढलेल्या पानांच्या पंक्ति वाऱ्यानें धूळ खाऊं लागल्या. आंतील बाहेरील सर्व लोक चिंताक्रान्त झाले.

प्रकरण सिद्धीस न जातां जर सर्व फिसकटलें तर पुढें काय करायचें ही धास्ती उत्पन्न झाली. विशेषतः वडिलांनींच हा सर्व घाट जुळवून आणला असल्यामुळें ते ह्या ग्रामस्थांच्या कारवाईनें अत्यंत संतापून गेले. त्या प्रांतांत आमच्या वडिलांचा कोपिष्ट स्वभाव लोकांना परिचित होता. त्यांचा क्रोधाग्नि भडकूं लागला हें मीं दुरून ताडलें. विशेषतः माझे हाल पाहून त्यांचा जीव कासावीस झाला. कित्येक गुंड नुसता घोळ घालून अडवूं लागले, त्यांचें खासगी आचरण जगजाहीर होतें. त्यांनीं आपल्या मुलाची अशी विटंबना करावी हा विचार दुःसह होऊन वडिलांची कान्ति लालभडक झाली. सायंकाळच्या चार वाजण्याचा सुमार झाला, तरी सुरुवात नाहीं, हा काय धर्म, कीं न्याय अशा भावनेंत वडिलांनीं रुद्रावतार धारण केला.

त्यांचें देहभान सुटलें म्हणण्यास हरकत नाहीं. कित्येकांचीं खासगी बिंगें लोकचर्चेत जाहीर होतीं तीं उच्चारीत वडील पुढें आले आणि मोठ्यानें एकएकास नावानें हाक मारून सर्वांच्या देखत सांगूं लागले, "ए अमक्या, तूं घरांत असें असें पाप करतोस कीं नाहीं बोल. खोटें सांगशील तर जिव्हा झडून जाईल." शेवटीं कातावून ते ओरडले, "तुम्ही माझ्या मुलाला प्रायश्चित्त देण्यास लायक नाहीं. तुमचीं पापें एवढीं घोर आहेत कीं प्रथम तुम्हांलाच माझ्या मुलाकडून प्रायश्चित्त देवविलें पाहिजे. उठा सर्व लोक, पानावर बसा आणि जेवण झाल्यावर मग पुढचा विचार पाहूं." हा प्रचंड घोष ऐकून एकदम चहूंकडे गडबड उडाली. गणेशपंत बाबांनीं पुढें येऊन वडिलांस धरून घरांत नेऊन बसविलें आणि म्हणाले, "तूं आतां जास्त बोलूं नको. स्वस्थ घरांत बस. मी सगळें संपवितों." त्यांनीं आमच्या उपाध्यांस पुढें आणून त्यांजकडून कसा तरी संकल्प सांगवून होमाची सिद्धि केली आणि मंडळींस पानांवर बसवून जेवण सुरू केलें. भटजींनीं माझ्या हातावर गोमूत्र व पंचामृताचें आचमन दिलें तें मीं कुंडांतील अग्नीस अर्पण केलें. पांच मिनिटांत सर्व प्रकार संपला. मी धोतर नेसून पंक्तींत जेवायला बसलों. भोजन होऊन लोक आंचवतात तों अंधार पडला. गणेशपंतांनीं प्रायश्चित्ताचा मसुदा तयार केला होता, त्यावर भोजनोत्तर सर्वांनीं भराभर सह्या केल्या. अशा रीतीनें माझा तो दिवस परिणामीं पूर्ण यशस्वी बनला.

त्या दिवसाच्या अशा सर्व गमती कागदावर दाखल करणें शक्य नाहीं. वडिलांनीं कित्येकांचा जाहीर उद्धार केला तो लिहितां येत नाहीं. वडिलांच्या सात्त्विक आवेशाचा परिणाम होऊन प्रकरण संपलें हेंच विशेष. सर्वच मनुष्यप्राणी स्खलनशील आहेत. धर्माचें थोतांड मतलबी लोक उगाच वाढवितात, त्यांत तथ्य नसतें. झालेला प्रकार पुढें सर्वांस गोड वाटून चहूंकडे गाजला. कित्येक दिवस हा विषय लोकांच्या तोंडीं राहिला. वडिलांच्या सात्त्विक कोपास यश आलें. प्रायश्चित्ताचें हातीं घेतलेलें कार्य लौकिकांत यशस्वी झालें ह्याबद्दल वडिलांस नेहेमीं अभिमान वाटे. त्यानंतर अनेकवार मी युरोपास गेलों, पण प्रायश्चित्ताची गोष्ट पुन: निघाली नाहीं. आतां त्या गोष्टीस साठ वर्षें होऊन गेलीं. ह्या दीर्घ कालांत धर्माचारांत एवढी क्रान्ति घडून आली आहे कीं प्रायश्चित्त म्हणजे

काय हेंही लोक विसरले आहेत. माणूस करूं शकत नाहीं तें काळ उरकून टाकतो.

ह्या प्रायश्चित्ताच्या निमित्तानें खालील प्रशस्तिपत्र ता० १३ फेब्रुवारी स. १८९३ रोजीं मला ब्रह्मवृंदांनीं लिहून दिलें. "यादी ठराव रा. रा. गोविंद सखाराम नायक सरदेसाई, राहणार गोवेल हे बडोदें सरकारकडे नोकर असून सरकारच्या बोलावण्यावरून विलायतेस समागमें जाऊन परत आल्यावर घरीं येऊन समस्त ब्रह्मवृंद, धर्माधिकारी, ज्योतिषी, देशाधिकारी ह्यांजकडे विनंती केल्यावरून सर्वांची संमति घेऊन सर्वानुमतें यथाशास्त्र प्रायश्चित्त देऊन मुक्त करून पंक्तिपावन करून घेण्याचा विचार ठरल्याप्रमाणें आजरोजीं आम्ही पंचमहालांतील ब्राह्मणसमुदाय ह्यांनीं सरदेसाई ह्यांच्या घरीं जमून संस्कार कौस्तुभ, प्रायश्चित्त मुक्तावलि, नारायण भट्टी, धर्मसिंधु इत्यादि ग्रंथांच्या शास्त्राधारें सक्षौर पडब्द प्रायश्चित्त देऊन पुनरुत्थानादि विधि करून मशारनिल्हे सरदेसाई ह्यांस दोषमुक्त करून पंक्तिपावन करून घेतले आहेत. आतां ह्यांजविषयीं कोणी शंका घेण्याचें कारण नाहीं." ह्याखालीं सुमारें दीडशें ब्राह्मणांच्या सह्या आहेत.

प्रायश्चित्त आटोपल्यावर मी बडोद्यास गेलों. महाराजांनीं हकीकत ऐकून खुषी दर्शविली, किती खर्च आला म्हणून विचारलें. मी सांगितलें, रोख दक्षिणा रुपये अडीचशें व भोजनखर्च अडीचशें असा खर्च आला. लगेच महाराजांनीं पांचशें रुपये दिले. ह्यांपैकीं ४० रुपये दक्षिणा म्हणून शंकराचार्यांकडे पाठविले आणि सर्व प्रकार तसाच केसरी पत्रांत प्रसिद्ध केला. ता. २८ मार्च स. १८९३ च्या अंकांत तो दिला आहे. तें पत्र असें :—

"रा० रा० केसरी कर्ते ह्यांस,

श्रीमंत बडोदें सरकारांबरोबर मी गेल्या वर्षी युरोपास जाऊन आल्याबद्दल घरीं कोंकणांत जाऊन यथोक्त प्रायश्चित्त घेतल्याचा आपण आपल्या अंकांत उल्लेख केला होता. त्यानंतर ह्या संबंधांत मी जगद्गुरु शंकराचार्यांशीं पत्रव्यवहार करून त्यांचेंही अनुमोदन आणविलें. तो पत्रव्यवहार, बडोद्याचे नायब दिवाण रा० ब० आठल्ये ह्यांचें श्रींस पत्र व त्यांचे त्यांना व मला आलेले जबाब लोकांस माहीत होणें युक्त वाटल्यावरून ह्यासोबत आपल्याकडे

प्रसिद्धीसाठीं पाठविले आहेत. त्यांस सवडीनुसार आपल्या पत्रांत प्रसिद्धि दिल्यास मी आपला आभारी होईन. प्रायश्चित्ताच्या युक्तायुक्ततेबद्दल आतां फारसा वाद उरला नाहीं. तें कोणतें व कसें घ्यावें व त्यास काय अडचणी समाजांत येतात हें लोकांस समजणें इष्ट वाटतें. शिवाय ज्या माझ्या ग्रामस्थ बांधवांनीं आपली प्रस्तुत कालची जबाबदारी ओळखून इतर ठिकाणच्या सुशिक्षितांसही कित्ता घालून देण्यासारखें वर्तन केलें, त्यांचे प्रसिद्धपणें आभार मानून उतराई होण्याची संधि मला द्यावी. कळावें."

हें पत्र व सोबतचे ६ कागद त्याच अंकांत केसरीनें प्रसिद्ध केले.

३. जेव्हांच्या तेव्हां, जेथल्या तेथें

Desire to improve at every moment and in every detail is the strongest urge for life's fulfilment.

हें ब्रीदवाक्य माझ्या टिपणांत वारंवार नोंदून ठेवलेलें मला आढळतें. त्यांतच माझ्या स्वभावाची मुख्य खोंच बनली आहे. होस हो म्हणून कशी तरी वेळ मारून नेण्याची शक्कल मला जन्मांत कधीं साधली नाहीं. काम अगदीं लहान व हलकें असो कीं श्रमाचें व महत्त्वाचें असो, तें शक्य तितकें परिपूर्ण किंवा यथास्थित करण्यांत मीं कधीं हलगर्जीपणा दाखविला नाहीं. तें वेळेवर, किंबहुना वेळेच्या आधीं आणि आपली सर्व अक्कल खर्चून होईल तितकें चांगलें करून दाखवायचें ही सवयच माझ्या अंगवळणीं पडून गेली. कोणीं एखादा लेख मागितला किंवा कोणाला एखादा इतिहासांतला किंवा अन्य संदर्भ हवा असला, पत्रानें किंवा प्रत्यक्ष तशी पृच्छा आली कीं शक्य तोंवर ती लवकर सिद्धीस नेल्याशिवाय मला चैनच पडायचें नाहीं. तें काम हातावेगळें होईपर्यंत मनास सारखी टोचणी लागलेली असायची. बडोद्याच्या नोकरींत महाराजांकडून दररोज असें कांहींना कांहीं काम निघायचें, मुलांना शिकवितांना किती तरी प्रश्न क्षणोक्षणीं उपस्थित व्हायचे, पण ते मीं कधीं अंगाबाहेर टाकले नाहींत. आपली शिकस्त करून हरएक कामाची पूर्तता हटकून करायची अशी माझी वृत्ति पहिल्यापासून बनल्यामुळें कोणाचींही बोलणीं खाण्याची पाळी मला कधीं आली नाहीं. उलट प्रत्येकाची अशी खात्री असे कीं ह्यांनीं कबूल केलेलें काम बिनदिक्कत होणार, कधीं चुकायचें नाहीं. पत्राचा जबाब वेळेवर जायचा, पत्रें बिनजबाबानें पडून राहिलीं

असें कधीं व्हायचें नाहीं. स्वच्छता, नीटनेटकेपणा, व्यवस्था, टापटीप, जेथल्या तेथें, जेव्हांच्या तेव्हां, इत्यादि सर्व कांहीं गुण एकाच मुख्य वृत्तीचे पर्याय आहेत. वेळेवर जेवण, वेळेवर झोप, वेळेवर उठणें, जणूं काय सर्व व्यवहार घड्याळाच्या नियमित गतीनें चालू असायचे, त्यांत व्यत्यय केवळ आजाराच्या किंवा अशाच अपरिहार्य कारणानें आला तरच. हा माझा एकंदर कित्ता जवळच्यांच्या इतका परिचयाचा झाला होता कीं ज्यांत ज्यांत माझा एकत्र संबंध यायचा, त्या कामांत ते सर्व मला भिऊन वागत. सर्वांनीं वेळेवर जेवायला यायचें, कपडालत्ता, पुस्तकें, कागद, व्यवस्थित जागच्या जागीं ठेवायचे, केव्हांही कोणी आला तरी घरांत त्यास अव्यवस्था म्हणून दिसायची नाहीं. अशी माझी घरची पद्धत पडून गेल्यामुळें आमचे व्यवहार सुलभ व नियमित उलगडत. सर्व कुटुंबालाच असें वळण लागत गेलें. त्यांतून सुदैवानें ह्या प्रवृत्तीचें पोषण सयाजीराव महाराजांच्या तशाच रेखीव व नियमित स्वभावामुळें माझ्या अंगवळणीं पडत गेलें. संगतीनें अशा सवयी कायमच्या बनतात.

व्यवहारांत हरहमेश अनेक प्रसंग इष्ट किंवा अनिष्ट घडून येतात. अशा प्रसंगांनीं मनाचें स्वास्थ्य बिघडून अंतःकरणास सारखी खिन्नता उत्पन्न होते. घरांतल्या मंडळीशीं किंवा स्नेहीसोबत्यांशीं स्पष्टपणें बोलून कित्येक लोक आपलें मन हलकें करीत असतील. माझा मात्र ह्या बाबतींतला क्रम बराच वेगळा होता. एखादा विषय मनास त्रास देऊं लागला कीं मी लगेच बसून त्याचें निदान कागदावर टिपून ठेवीत असें. कागदावर तपशील मांडूं लागलें म्हणजे गुणावगुण व दोषार्हता स्पष्ट होते. आपली चूक असली तर पदरांत घ्यावी, दुसऱ्याची असली तर ती त्याच्या माथीं मारावी, ही सोय लेखानें होते आणि ही न्यायाधीशाची भूमिका स्वीकारून एकदां निवाडा लिहून टाकला कीं तें प्रकरण संपून मनास पुनः स्थैर्य प्राप्त होतें. नवरा-बायकोंतील धुसपूस, कुटुंबीयांचे व्यवहार, देवघेवीचे वगैरे विषय, नोकरचाकरांच्या कलागति असले प्रकार हमेशा घडून आवेशाच्या भरांत आपण भलताच शब्द बोलून जातों किंवा भलतेंच आचरण करतों. मागाहून त्याचा पस्तावा होतो. असले किती तरी विषय त्या वेळीं लिहून ठेवलेले माझ्या टिपणांत आज मला आढळतात. मला वाटतें आपणच आपला निवाडा निष्पक्षपातानें करणें ह्यांतच माणुसकीची उत्कृष्ट

भलाई आहे. ह्या लेखनोपायाचा मला अतिशय उपयोग झाला आणि मी सावधपणा धारण करूं लागलों. अद्यापि तीं टिपणें मला मार्ग-दर्शन करितात. विस्तारभयास्तव तीं मला येथें देतां येत नाहींत.

महाराजांचा मी निकटवर्ती नोकर असल्यामुळें हरहमेश कांहींना कांहीं कारणानें त्यांकडून भलाईचे किंवा ठपक्याचे उद्गार निघत. पुष्कळदां माझा कांहीं एक अपराध नसतां ते मला कठोर शब्दांनीं निष्कारण दोष देत. मर्यादा संभाळून मी जबाबही वेळेवर सुचेल तो देई, पण अशा प्रतिजबाबामुळें यांचा राग वाढून ते जास्तच बोलत. उघडच आहे, ते धनी व मी चाकर. चाकराची चुकी नसली तरी ती त्यानें आपण होऊन पदरांत घेतली म्हणजे यजमानाचें समाधान होतें. पण नाहक भलताच दोष पदरांत घेण्यास चाकर तरी कसा तयार होणार? असे खटके उडाले म्हणजे चाकराची दैना काय विचारावी! "सबबी सांगूं नका, जा चालते व्हा येथून," असे शब्द निमूटपणें ऐकून कित्येकदां परत यावें लागे. घरीं आल्यावर मीं तें प्रकरण कागदावर लिहून न्यायाधीशाचा निकाल देई. तेणेंकरून मन शांत होई. कधीं विषय निघाला तर कल पाहून मी तो निकाल महाराजांचे नजरेस आणीं. अशा वृत्तीचा एक प्रसंग सांगतों म्हणजे त्यांच्याशीं वागण्याची तऱ्हा कळून येईल.

एके दिवशीं महाराज सकाळीं ९ च्या सुमारास राजपुत्रांच्या शाळेंत आले. मुलांचीं कामें पाहून फार खूष झाले. परत निघाले तेव्हां तोच विषय बोलत मी चार पावलें त्यांजबरोबर चालत गेलों. तोंडानें माझ्या कामाची वाखाणणी ते करीत होते. मी त्यावर त्यांस म्हणालों, "परवां आपण मला ह्याच बाबतींत ठपका दिला आणि आज ही शाबासकी चालली आहे. खरें म्हणजे मी दोहोंसही पात्र नाहीं. मी आहें तसाच आहें. शक्य तितक्या काळजीनें मी आपलें कर्तव्य बजावतों. इतकाच माझा सेवकाचा अधिकार." जबाब ऐकून माझा आशय ते समजले. कानउघाडणी सफल झाली.

राजवाड्यांत नाना वृत्तींचे नोकर असतात. सर्वांशीं माझा संबंध येई. पुष्कळदां त्यांस कठोर शब्दांनीं ताडणही करावें लागे. असे किती तरी प्रसंग उद्भवले कीं त्या नोकरांनीं महाराजांकडे जाऊन माझ्याबद्दल खोट्या चहाड्या कळविल्या. पण पूर्ण तपास केल्याशिवाय महाराजांनींही भलताच

निकाल कधीं केला नाहीं. जामदारखान्यांतील एका नोकराची गोष्ट घडली ती मी कधीं विसरणार नाहीं. इतकेंच काय पण प्रत्यक्ष महाराणींनीं जयसिंहरावांच्या लग्नांत होळकरमहाराजांच्या सत्कारांत कांहीं व्यंग घडलें म्हणून मला १०० रुपये दंड केला. महाराजांनीं सर्व प्रकरण कागदावर लिहून पुरावा घेतला. त्यांत महाराणींची व माझी अशा साक्षी झाल्या. चूक माझी नव्हती असें माझ्या खिशांतील चोपडीच्या पुराव्यानें सिद्ध झालें. दंडाची शिक्षा महाराजांनीं मंजूर केली नाहीं. मी मोठ्या पेचांतून दोषमुक्त झालों. माझ्या टापटिपीच्या वर्तनाचा हा परिणाम होय.

पुढें आलेलें काम यावच्छक्य काळजी घेऊन बजावीत गेलें कीं माणसाचा उदय झालाच पाहिजे अशी माझी ठाम समजूत आहे. उदयाची संधि सर्वांसच सारखी येईल असें नाहीं, पण बहुधा केव्हांना केव्हां अशी संधि प्रत्येकास येते, मात्र ती येईल तेव्हां तिचा उपयोग करण्याची अंगची पात्रता त्यानें सदैव कमावीत असलें पाहिजे. शिपोशीच्या शाळेंत, रत्नागिरीच्या हायस्कुलांत, मुंबईत बापूसाहेब आठल्यांच्या घरीं किंवा पुढें बडोद्याच्या महाराजांच्या सेवेंत मी आपल्या व्यवस्थित वर्तनानें सदैव भलाई मिळवीत गेलों हा परिणाम माझ्या निरलस वृत्तीचा होय. दुसऱ्यानें वाईट केलें तर त्याचें फळ तो भोगील, मीं होऊन त्याचा सूड घेण्याची भलतीच बुद्धि मनांत कधीं बाळगली नाहीं. दुसऱ्याचें अहित करण्यांत आपल्याच यातना नाहक वाढतात हें लक्षांत ठेवून मी वागलों, म्हणूनच मला वाटतें माझ्यासारख्या सामान्य माणसाला कांहीं एक विशिष्ट करामत पैदा करतां आली. "आत्मैवह्यात्मनो बंधुः आत्मैव रिपुरात्मनः" हें तत्त्व मला पूर्णपणें पटतें. प्रत्येकाचें बुद्धिसामर्थ्य कमी अधिक असेल, तें आपणांस बदलतां येणार नाहीं, पण सद्भावना मात्र सर्वस्वीं प्रत्येकाच्या हातची आहे. पत्करलेलें काम मनोभावानें पूर्ण करायचें, त्याचा मोबदला मिळो अगर न मिळो, मिळेल तेवढ्यांत संतुष्ट राहायचें, ही भगवद्गीतेची शिकवण आपण व्यवहारांत पाळली कीं आपला कार्यभाग संपला. §

§ भगवद्गीता, अध्याय १८·२६ ह्यांतील सात्त्विक कर्त्याची व्याख्या, तसेंच अध्याय १८-५१–५४ ह्यांतील निष्काम कर्माचा निर्देश हे सर्वथा रोजच्या व्यवहारासही लागू पडणारे आहेत.

बडोद्याच्या नोकरींत किंवा पुण्या-मुंबईकडील बाह्य वातावरणांत अनेक भिन्न वृत्तींच्या व्यक्तींशीं माझा संबंध आला, पण मी आपली छाप सर्वांवर बसवूं शकलों. सर्व मला एक प्रकारें वचकून असत. खुद्द महाराजांशीं माझी तेढ वाढली, तींतही मी आपलें सत्त्व राखीत गेलों. मनस्तापाचे प्रसंगही पुष्कळ अनुभवावे लागले, पण कधीं अपयश पत्करावें लागलें नाहीं. सर्व राजपुत्र मला वचकून असत. मनूभाई-सारखे वरिष्ठ अधिकारीही मला कधीं भलत्या रीतीनें वागवूं शकले नाहींत. संपतराव, महाराणी अशी अनेक मंडळी मला ओळखून असत. अलीकडील निवृत्तीच्या काळांत देखील नानाविध लहानमोठ्या व्यक्तींशीं माझा विरोध झाला असतांही अखेरीस त्यांजवर मी आपलें वजन पाडूं शकलों. पेशवे दफ्तरासारखीं मोठीं कामें मीं संपूर्ण केलीं, त्यांत कित्येकांनीं भलत्याच कारवाया केल्या, परंतु त्या माझें कांहीं वांकडें करूं शकल्या नाहींत हा मी आपला एक विजयच समजतों. सर जदुनाथ सरकार म्हणजे एक आधुनिक युगांतली विलक्षण जाज्वल्य व्यक्ति, त्यांच्याशीं मी चाळीसपन्नास वर्षांच्या दीर्घ काळांत संपूर्ण गोडवा टिकवूं शकलों हाही प्रकार मला लक्षांत भरण्यासारखा वाटतो. आपली सद्भावना कायम असली कीं तिजपुढें कोणाचें कांहीं चालत नाहीं. मात्र प्रत्येकानें आपलें सामर्थ्य ओळखून झेपेल तेवढीच उडी घ्यावी. ह्याचमुळें रेकार्ड कमिशन किंवा इंडियन हिस्टरी कॉंग्रेस अशा कित्येक संस्थांस माझी मान्यता वाटते.

गुण मिरविण्याची मला हौस नाहीं, तशी अंगचे दोष झाकण्याचीही नाहीं. माझे मलाच कित्येक दोष उघड दिसतात, पण ते आवरतां येत नाहींत. उच्चारआचारांत पाचपेच सांभाळण्याची सावधगिरी मला साधत नाहीं. सहज वाटेल तें बोलून गेल्यावर मागून पस्तावण्याची पाळी येते. वाक्संयम व व्यावहारिक पोच मला साधत नाहीं. माझी स्मरणशक्ति फार कोती आहे. मुलांनीं सांगितलेली एखादी साधी गोष्ट सुद्धां माझ्या लक्षांत राहत नाहीं. अमुक प्रसंगीं तुम्ही असें बोललांत असें पुष्कळ लोक सहज माझ्या पदरांत घालतात, तें मला मुळींच साधत नाहीं. लिहून टिपणें ठेवण्याची सवय जडल्यामुळें स्मरणशक्ति गारठली. जदुनाथ तर तीस चाळीस वर्षांपूर्वींचें वाक्य किंवा कृत्य सहज सांगून मला चकित करतात.

वाचलेल्या पुस्तकांतील संदर्भ ते लगोलग दाखवितात. मला तसे संदर्भ आठवत नसल्यामुळें पुष्कळ हिरमोड होतो. शिवाय कामें घाईनें उरकण्याची सवय जडल्यामुळें लेखांत किंवा भाषणांत दोष राहून जातात, त्यांबद्दल मागाहून पस्तावा होतो. व्याख्यानांतले मुद्दे मी नीट टिपून घेतों, पण ऐनप्रसंगीं बोलतांना व्यवधान राहत नाहीं आणि कित्येक सुंदर विचार बोलायचे राहून गेल्याबद्दल मागाहून हळहळ वाटते. अलीकडे मीं आपलीं सर्व व्याख्यानें लिहून वाचण्याचा रिवाज स्वीकारला आहे. ह्यामुळें गफलत होत नाहीं. माझ्या स्वभावांत सहनशीलता किंवा सबुरी, दमखाऊपणा नाहीं. दोन द्यावे दोन घ्यावे ही मनाची व्यावहारिक ठेवण अनेक लहान-मोठ्यांना साधते ती मला नाहीं, त्यामुळें उगाच शुल्लक बाबती मी मनास लावून घेतों. झटपट राग व लगेच शांति असा मनाचा प्रघात बनल्यामुळें व्यवहारांत ठेंचा खाव्या लागतात. सयाजीराव तर ह्या बाबतींत अगदीं उलट कोटीचे होते. एखादा रागद्वेष वर्षोगणति ते मनांत सांठवून ठेवतील, बाहेर त्यांचा अंतस्थ कावा कधीं दिसायचा नाहीं. पण वेळ आली म्हणजे पुरेपूर वचपा घेतल्याशिवाय ते राहयचे नाहींत. अशा प्रकारची आपण आपल्या मनाची तपासणी करीत जाणें हा माझा एक नेहमींचा व्यवसायच बनला आहे.

४. कामशेतचा निवास

देव, परमेश्वर इत्यादि काय कल्पना आहेत त्यांचें आकलन मला होत नाहीं. मला इतकेंच कळतें कीं आपण जन्मास आलों खरे आणि आपणाला बरेंवाईट ओळखण्याची अक्कलही आहे. मग ही अक्कल वापरून भलेपण मिळविणें हेंच आपलें कर्तव्य आहे. हें कर्तव्य प्रत्येकाला साध्य असून त्यावरच समस्त मानवी संसार आधारलेला आहे. तुकारामबोवांनीं तरी देवाजवळ दुसरें काय मागितलें. “नलगे मुक्ति धनसंपदा, संतसंग देगा सदा.” देवाची ही देणगी मला भरपूर लाभली असें मी मानतों. ‘सतांसद्भिः संगः कथमपि हि पुण्येन भवति,’ ह्या न्यायानें माझी ह्या जगांतील पुण्याई मला लहान वाटत नाहीं. माझ्या पितृ-मातृ कुलांत हीणकस असें कांहीं नव्हतें. समजूं लागल्यावर शैक्षणिक व्यवसायांत मला गुरु म्हणून भेटले ते यच्चयावत् वंदनीय होते. पुढें कौटुंबिक संबंध जडले ते सर्व सद्गुणी व श्रेयस्कर बनले. प्रथम बापूसाहेब आठल्ये व उत्तरायुष्यांत सर जदुनाथ

सरकार ह्यांचें मार्गदर्शन मला लाभलें आणि प्राप्त परिस्थितींत हा लाभलेला नरदेह मीं सत्कारणीं लावला हें समाधान कांहीं लहान नव्हे. ‘तुझा विसर न व्हावा’ हीच मागणी मी तुकारामबोवांप्रमाणें सदैव मागत राहीन. ‘तुझा’ म्हणजे ‘मानवी कर्तव्याचा’ एवढाच बदल फार तर मी करीन. हेंच माझें तत्त्वज्ञान.

प्रत्यक्ष आचरणांत हें तत्त्वज्ञान मला पदोपदीं अनुभवास येतें. शक्यतों-वर दुसऱ्याच्या उपयोगी पडत राहवें ही कौटुंबिक वृत्ति आम्हा सर्व बंधूंच्या ठिकाणीं व आमच्याशीं सदैव निगडित असलेल्या आठल्यांच्या मातुल घराण्यां-तील मंडळीच्या ठिकाणीं दृष्टीस पडते. दोनही कुटुंबांतील माणसें आजपावेतों एकमेकांच्या उपयोगी पडत आलीं. त्यामुळें दोघांचाही सर्वतोपरी उत्कर्ष झालेला दिसून येतो. दोनही कुटुंबांतले तरुण पूर्वींच्या मानानें आज जास्त उत्कर्ष पावलेले दिसतात, त्याचें रहस्य ह्या कौटुंबिक सहकारांत आहे. प्रथम बाळूमामांनीं मला इंग्रजी शाळेंत घातलें म्हणूनच आमचें भावी जीवन प्रगतीच्या मार्गास लागलें. हल्लीं बाळूमामांचीं व त्यांच्या बंधूंचीं मुलें आमच्याशीं एकाच कुटुंबांतल्या प्रमाणें वागतात. तात्यामामांच्या मुली सईताई, गीतृताई व द्वारकूताई आमच्या संसाराशीं सर्वथा एकजीव आहेत. माई गेल्यावर मला ह्या सर्वांनीं संसारांत उणें भासूं दिलें नाहीं. कृष्णा व जयराम ह्यांनींच आरंभाचे कष्ट सोसून कामशेतचा निवास ऊर्जितावस्थेस आणिला. विठूमामा व हरिमामा ह्यांनीं कैक वर्षें आमचा गोवीलचा संसार अत्यंत काळजीनें सांभाळला. हरिमामा आमच्याच बरोबर बडोद्यांत व इतरत्र उद्योग करून वाढत गेले. सर्पदंशानें त्यांचा मृत्यु गोविलास १८ फेब्रुवारी स. १९१४ ह्या दिवशीं झाला. बाळूमामा त्यांच्या पूर्वी थोडे दिवस ता. ६ डिसेंबर स. १९१३ ह्या दिवशीं भडकंब्यास वारले. त्यांचे वडील बंधु लक्ष्मणतात्या ता. २ मार्च स. १९२५ रोजीं मोर्ड्यास वारले. विठूमामा तर सदैव आमच्याच बरोबर राहिले. त्यांचा अंत थोड्या वर्षांवर द्वारकेस ता. २२ एप्रिल १९३८ ला झाला. आज आठल्ये व सरदेसाई हीं दोनही कुटुंबें एकजीव आहेत.

कामशेतच्या निवासांत मला शेवटचें परमोच्च स्वास्थ्य लाभलें. त्यामुळेंच माझें जीवन इतकें समृद्ध होऊं शकलें. पूर्वायुष्यांत तयारी झाली तिची सांगता ह्या शेवटच्या कालखंडांत प्रत्ययास आली. महाराष्ट्रांत तर कामशेतचा

माझा आश्रम सुविदित आहेच, पण महाराष्ट्राबाहेरही सरदेसाई व कामशेत हे शब्द दृढमूल बनले आहेत. हें स्थल निवडून तेथें इंद्रायणीच्या पवित्र कांठीं एवढा प्रचंड प्रपंच उभारण्याचें भाग्य बंधु भाऊंनीं निर्माण केलें, त्या कल्पनेची महती काय वर्णावी ! ता. २६ जानेवारी स. १९१८ च्या पत्रांत त्यांनीं मला बडोद्यास लिहिलें,

'I am getting very busy nowadays and have to spend most of my time in building the Free Ophthalmic Hospital. The work is daily increasing and we want men. Our people are too lazy to utilise their time properly. I lately heard J. C. Bose speaking in Bombay. He shows by his work what a man can do by patient and persistent hard work. Such a man alone is a saint. I am going shortly to build a small house at Khadkala and would very much wish that you complete your life's work there away from the worries and cares of life. You have brought us all up and we must pay back our debt to you."

ह्यावरून आम्हा बंधूंचें कौटुंबिक ध्येय काय बनलें ह्याची कल्पना होईल. सरदेसाई-मावळंकर घराण्याचा मूळपुरुष नृसिंहभट सत्यवादी हा अद्यापि आपल्या वंशजांस योग्य स्फूर्ति देत आहे. ह्यानंतर कामशेतचें स्थल निर्माण झालें तो प्रकार वाचकांस विदित आहे, येथें सांगण्याची जरूर नाहीं.

प्रकरण चौथें

सयाजीरावांची सेवा

१. आरंभींचा गोडवा

२. उतरती कळा

३. परिणामांतील कटुता

प्रकरण चौथें

सयाजीरावांची सेवा

भाग्यानि पूर्वतपसा खलु संचितानि ।
काले फलन्ति पुरुषस्य यथैव वृक्षाः ॥

१. आरंभींचा गोडवा

बडोद्यांतील माझ्या ह्या नोकरींत प्रवासाचा लाभ जरी मोठा असला तरी बौद्धिक विषयाचे अवांतर फायदे मला कांहीं थोडे मिळाले नाहींत. दुसऱ्या एखाद्या खात्यांत मी लागलों असतों तर पगार कदाचित् जास्त मिळाला असता, पण विद्यार्जनाची जी संधि मला महाराजांच्या संगतींत प्राप्त झाली, ती इतरत्र साधली नसती खास. सरकारवाड्यांत राहिल्यानें सहजीं मला थोरामोठ्यांच्या ओळखी करतां आल्या. राजवाड्यांत हरहुन्नराचे लोक महाराजांकडे येत, त्यांचीं व्याख्यानें, कीर्तनें, नाटकें, गायनादि जलसे, शतावधानींचें नैपुण्य असे किती तरी प्रकार मला अनुभवतां आले. पहिलीं चारपांच वर्षें हे सर्व प्रयोग मलाच ठरवावे लागत, पुढें राजपुत्रांचें शिक्षण वाढून मला वाड्यांतील अशा कामांस फुरसत मिळेना म्हणून तीं मला दूर लोटावीं लागलीं. तरी त्या सर्वांशीं माझा संपर्क साफ तुटला असें कधीं झालें नाहीं. राज्यांतील सर्व प्रमुख अधिकाऱ्यांशीं माझा निकट परिचय झाला. नाना व्यासंगांचीं नामांकित माणसें नोकरींत घेण्याची महाराजांची प्रवृत्ति असल्यामुळें अशा पुष्कळ कर्तबगार व्यक्तींचा परिचय मला अनायासें घडला. श्रीनिवास राघव ऐयंगार, अरविंद घोष, रमेशचंद्र दत्त, व्ही. पी. माधवराव, व्ही. टी. कृष्णमाचारी अशा अनेक थोर पुरुषांशीं माझ्या ओळखी झाल्या. म्हैसूर, ग्वाल्हेर, इंदूर, कोल्हापूर अशा संस्थानांचे अधिपति पाहुणे म्हणून बडोद्यास आले असतां त्यांची सरबराई ठेवण्याचें काम करतांना त्यांचेही रीतरिवाज मला कळून आले. अब्बास तैयबजी हे एक उदार वृत्तीचे थोर गृहस्थ महाराजांच्या नोकरींत न्यायाधीश असून त्यांच्या सहवासाचा बडोद्यांतील सामाजिक जीवनावर फार मोठा परिणाम झाला. दर रविवारीं त्यांजकडे

चहापार्टीचा मेळवडा जमे, त्यांत आमच्या मनांतील जातिभेद व सामाजिक आकुंचन पार नाहींसें झालें. सारखा वीस पंचवीस वर्षें तैयबजींचा हा उत्कृष्ट प्रयोग यशस्वी बनून बडोद्याचें एकंदर वातावरण उन्नत होत गेलें. युरोपच्या प्रवासांतही अशा अनेक व्यक्तींशीं माझा परिचय घडून माझें स्वतःचें जीवन पुष्कळच विस्तारलें.

ह्याचें एक नमुनेदार उदाहरण म्हणून दादाभाई नौरोजी ह्या थोर पुरुषाशीं माझी ओळख होण्याचा योग कसा अकल्पित घडला तें सांगतों. म. १८९२ सालीं मी महाराजांबरोबर पॅरिस येथें होतों. त्यांना लंडनास जावयाचें म्हणून मला त्यांनीं पुढें पाठवून तेथील हॉटेलांत सर्वांच्या सोयीच्या जागा ठरविण्यास सांगितलें. मी पॅरिसहून एकटाच लंडनास जाऊन चेरिंग क्रॉसच्या मध्यवर्ती हॉटेलांत उतरलों. मॅनेजरच्या मार्फत महाराजांच्या राहण्याची व्यवस्था ठरवून मी तसें पॅरिसला तारेनें कळविलें. इतक्यांत महाराजांची प्रकृति थोडी बिघडल्यामुळें मला त्यांनीं कळविलें, तूर्त तेथेंच राहा, आपणांस बरें वाटतांच येतों. लंडनांत माझी कोणाशीं ओळख नसल्यामुळें मी त्या भरवस्तीच्या विस्तीर्ण नगरांत एकटा कष्टी बनलों. बोलायचें कोणाशीं? सकाळीं चहापाणी झाल्यावर समोरच्या भव्य स्ट्रँड रस्त्यावर इकडून तिकडे शतपावली करीत असतां सहजीं एकदोन हिंदी गृहस्थ दृष्टीस पडले. धीर करून मी त्यांना भेटून बोललों, “ मी येथें एकटा आहें, तुम्ही हिंदुस्थानचे दिसतां, मला तुमच्यासारख्यांची ओळख पाहिजे. कांहीं कालक्रमणेचें साधन सांगा. ” त्यांनीं उत्तर दिलें, “ हा येथें जवळच नॉर्थब्रुक इंडियन क्लब असून तेथें दादाभाई नवरोजी राहतात. पुष्कळसे हिंदी गृहस्थ तुम्हांस तेथें भेटतील. वर्तमानपत्रें व लायब्ररी आहे त्यांचा उपयोग करा. ” लगेच त्यांनीं मला दादाभाईकडे नेऊन त्यांस भेटविलें. दादाभाई पूर्वीं बडोद्यास दिवाण असून महाराजांबद्दल त्यांना आदर होता. पुढें पंधरा एक दिवस पावेतों मी रोज त्या क्लबांत जाऊं लागलों. दादाभाईनीं मला प्रेमानें वागवून मार्गदर्शन केलें. पुढें महाराजही आले आणि त्यांच्या भेटी झाल्या. दादाभाईंची ही भेट म्हणजे मला अत्यंत मोलाचा योगायोग वाटतो. पुढें पंचवीस वर्षांनीं महाराजांनीं दादाभाईंना उत्तरावस्थेच्या आपत्तींत निर्वाह वेतन करून दिलें, तेणेंकरून महाराजांवर इंग्रज अधिकाऱ्यांचा रोष झाला तो प्रकार बाहेर महशूर आहे.

मी मोठा नशीबवान असें मला सदैव वाटतें त्याचें कारण असले अकल्पित योगायोग होत.

सयाजीरावांसारख्या उद्योगी व टापटिपीच्या यजमानाकडे माझी योजना झाली हाच माझा पहिला मोठा सुयोग होय. धनी जर अव्यवस्थित व अनीतिमान भेटला असता तर माझ्या जीवनाचें मातेरें होऊन त्याला अनिष्ट वळण लागलें असतें. टापटीप व नियमितपणा ह्या गुणांची महाराजांची प्रखर शिस्त आमच्या अंगीं सदा भिनत गेली. स्वतः एक क्षण फुकट न घालवितां दुसऱ्या कोणालाही ते रिकामा बसूं देत नसत. त्यामुळें माझी नियमित उद्योग करण्याची उत्कंठा सदैव वाढत गेली. सदतीस वर्षांच्या नोकरींत पहिलीं पंचवीस तीस वर्षें राजपुत्रांचें शिक्षण व पुढचीं दहापांच वर्षें खाजगी खात्याचे चीफ अकाउंटंट अशी माझी सर्व नोकरी सरकारवाड्यांतच निभावली. शेवटीं शेवटीं मला ह्या रेखीव तावेदारीचा कंटाळा येऊन मी बदली मागितली तेव्हां महाराज म्हणाले, "धनी आपली सोय प्रथम पाहणार, त्यांत सेवकानें संतुष्ट राहिलें पाहिजे."

माझ्या नोकरीची सुरुवात रीडर म्हणून झाली. महाराजांचें रोजचें टपाल व वर्तमानपत्रें पाहून तीं त्यांच्या सवडीप्रमाणें वाचून दाखविणें, खासगी पत्रांचीं उत्तरें लिहिणें, महाराज पुस्तकें वाचीत त्यांतले कठीण शब्द काढून टिपणें करणें, असें हें सामान्य कारकुनी काम फार तर दोन तीन तास मला पुरे. बाकीचा माझा वेळ रिकामा जातो हें तात्काळ महाराजांच्या नजरेस आलें. मॅकिआव्हेलीचें 'प्रिन्स' व सीलीचें 'एक्स्पॅन्शन ऑफ् इंग्लंड' हीं पुस्तकें त्यांनीं वाचलीं. मराठींत त्या वेळीं ह्या नवीन पाश्चात्य विचारांचीं पुस्तकें नव्हतीं हें जाणून त्यांनीं मला त्या पुस्तकांचें मराठी भाषांतर करण्याचें काम दिलें. नाहीं होय म्हणण्याची मला सोय नव्हती. बी. ए. झालों म्हणून मराठी थोडेंच लिहितां येणार? मीं प्रयत्न केला. कैक दिवस मोठी कुचंबणा वाटली. भाषांतराचें किती काम झालें म्हणून महाराज वरचेवर विचारीत. पोहतां न येणाऱ्या माणसास एकदम पाण्यांत फेकावें तशी माझी अवस्था झाली. प्रथम एक वर्षानें 'राजधर्म' ह्या नांवानें मॅकिआव्हेलीचें पुस्तक व पुढील दोन वर्षांत 'इंग्लंड देशाचा विस्तार' हें सीलीचें पुस्तक दोनही महाराजांच्या खर्चानें छापून निघालीं. परभारें लेखनव्यवसायांत माझा प्रवेश झाला. माझ्या मतें हें पहिलें लेखनकाम यथातथाच झालें, पण

माझा पहिला उद्योग बाहेर आला. सीलीचें पुस्तक मी त्या प्रोफेसरांस केंब्रिज येथें स्वतः भेटून नजर केलें. ह्याला मी म्हणतों नशीब.

नोकरीच्या पहिल्या दिवसापासून माझ्या लायकीची प्रत्यक्ष खात्री महाराजांस पटत गेली. मी आळशी नसून कामसू आहें हें पाहून ते माझा उपयोग अनेक कामांत घेऊं लागले. पहिल्याच वर्षी महाराज मुलांसह नीलगिरीस असतां फत्तेसिंहांचा सातवा वाढदिवस साजरा झाला. स्वारींत उपाध्ये होते त्यांनीं पत्रिकापूजन वगैरे विधि रिवाजाप्रमाणें केले. महाराजांना वाटलें फत्तेसिंहांच्या शिक्षणास सुरुवात करण्याचा हा दिवस आहे. पण तें काम स्वीकारणारा गुरु कोणी तेथें नियोजित नव्हता. मी रीडर म्हणून जवळ होतों, म्हणून त्यांनीं पत्रिकापूजनांत मला आज्ञा केली "तुम्ही आतांपासून घटका अर्धी घटका रोज मुलास अक्षरओळख, वाचन, अंक, पाढे, वगैरे शिकवीत जा. तूर्त हें काम थोडे दिवस तुम्ही करा, पुढें बडोद्यास गेल्यावर कायम योजना ठरवूं." कदाचित् कांहीं काळ ह्या कामांत माझी परीक्षा पाहण्याचाही त्यांचा विचार असावा. प्रथम मला शिक्षणकामाची कल्पना नव्हती. पण पुढें आलेलें काम लहानमोठें न पाहतां आपल्याकडून होईल तितकें चोख करायचें असा माझा परिपाठ असल्यामुळें, मी लगेच शिक्षणविषयक पुस्तकें आणून लेखनवाचन, मनोरंजक गोष्टी वगैरे मुलांस शिकवूं लागलों. श्रावणापासून दिवाळीपर्यंत दोन तीन महिने हा प्रयोग चालला. फत्तेसिंहराव चांगले वाचूं लागले, लिहूंही लागले. मीही नानाविध उपकरणें जमवून मुलांचें मन रिझवूं लागलों. त्या वेळीं महाराजांचा मुलगा एकच फत्तेसिंहराव व त्याजबरोबर खेळणारीं एक दोन नोकरांचीं मुलें होतीं. दिवाळीस महाराज बडोद्यास येतांच स्वतंत्र राजपुत्र विद्यालय बनविण्याचा विशिष्ट प्रयोग सुरू झाला. न बोलतां माझी नेमणूक राजपुत्र-शिक्षक म्हणून कायम ठरली.

महाराज स्वतः लहान असतां त्यांच्या शिक्षणासाठीं एक स्वतंत्र प्रशस्त अशी मोकळी इमारत लक्ष्मीविलास वाड्याला लागूनच सर टी. माधवरावांनीं बांधली होती. तीन मोठीं दालनें व सभोंवार रुंद उघडा व्हरांडा अशी ही भरपूर हवाउजेडाची सुंदर इमारत महाराजांच्या आवडीची होती, तीच त्यांनीं आपल्या मुलांच्या शिक्षणाकरितां ठरवून दिली आणि राजपुत्र विद्यालय हें नांव देऊन माझी बदली मुलांस शिकविण्याच्या कामाकडे

केली. रीडर हें माझें नांव कागदावर बंद झालें तरी अगदीं अखेरपावेतों तोंही त्यांचा व्यवसाय मला पाहवा लागे. ह्याच इमारतींत महाराजांची खासगी लायब्ररी असून प्रथमपासूनच तिचा मला मोठा उपयोग झाला. शालोपयोगी साहित्य, मुलांचीं बांकें, त्यांच्या सोयीच्या लहान सुंदर खुर्च्या, टेबलें, कपाटें, पेट्या, टेनिस क्रिकेट खेळ, तालीमखाना, पोहण्याचा हौद अशा सर्व सोयी चार दोन महिन्यांत तयार झाल्या. आणि मीच त्या सर्वांचा चालक बनलों. फत्तेसिंहरावांबरोबर सहाध्यायी म्हणून तीन ब्राह्मण व दोन तीन स्वजातीय आप्त असे मुलगे पसंत करण्यांत आले. लेखन मास्तर, चित्रकला मास्तर, गुजराती मास्तर, क्रिकेटचे तज्ज्ञ असे नवीन इसम हळूहळू नेमण्यांत आले. अश्वारोहण, गोळीबार, शिकार, असे व्यवसाय चालू होऊन त्या देखरेखींत पंचवीस वर्षेपर्यंत माझा सर्व दिवस त्या शाळेच्या आवारांत जाऊं लागला. सकाळीं सूर्योदयाबरोबर घरून शाळेंत जावयाचें तें रात्र पडल्यावर परत. माझें दुपारचें भोजन, चहापाणी सर्व ह्या वीस वर्षांत घरीं कधीं झालें नाहीं. सर्व व्यवसाय, मग ते वर्गांतील शिक्षणाचे असोत किंवा बाहेरचे असोत, ते नियमितपणें इतरांच्या साह्यानें सर्व करवून घेणें हें काम माझें होतें. अर्थात् अशा सर्व विषयांची तज्ज्ञ मंडळी एक प्रकारें माझ्या हाताखालचे सहायक बनल्यानें राजपुत्र विद्यालय ही एक नामांकित संस्था तयार होऊन तींत सर्वांगीण शिक्षणाची सोय झाली. जरूर प्रसंगीं महाराजांस भेटून मी सर्व अडचणींचें निराकरण करीत असें. तेही वारंवार शाळेंत येऊन आम्ही शिकवीत असतांना आमचें काम पाहत बसत आणि जरूर त्या सूचना करीत. पुष्कळदां वाड्यांतील आपलें नेहमींचें काम आटपून तेथून ते शाळेंत येत, मुलांबरोबरच चहाफराळ करीत आणि टेनिस, क्रिकेट वगैरे खेळांत मुलांबरोबर आपणही भाग घेत. सन १८९० त शाळेची सुरुवात झाली ती स. १९११ त श्री. इंदिरा राजांची मॅट्रिक परीक्षा संपेतों चालली. ह्या वीसबावीस वर्षांत मी स्वतः श्रीगणेशायनमः पासून बी. ए. पर्यंतच्या अभ्यासक्रमांत सालोसाल वाढत गेलों. इतर शालेय शिक्षक तोच तो विषय सारखा वर्षानुवर्ष शिकवीत बसतात, तसा प्रसंग मजवर आला नाहीं. म्हणून मला दरवर्षी नवी तयारी करावी लागे. राजपुत्र विद्यालय चार वर्षे चालल्यावर मुलांना इंग्रजी भाषा शिकण्याची वेळ आली तेव्हां महाराजांनीं मि. फ्रेंच नांवाचे एक

इंग्रज गृहस्थ मुख्याध्यापक म्हणून नेमले. तेव्हां मी त्यांचा मुख्य मदतनीस बनलों. ते सज्जन व करारी वृत्तीचे असल्यामुळें मला त्यांचा पुष्कळ उपयोग झाला. बहुधा ते सर्व मुलांना इंग्रजी व गणित हे विषय शिकवीत. मराठी, संस्कृत, इतिहास वगैरे विषय मी शिकवीं. बारा वर्षांनंतर महाराजांनीं मि. फ्रेंच ह्यांस रजा दिली. दरम्यान फत्तेसिंहराव ऑक्सफर्ड येथें असतां खोडकर निघाले, तेव्हांपासून विद्यालयास निराळें स्वरूप लागलें. महाराजांच्या जीवनालाही उतरती कळा लागली. फत्तेसिंहराव स. १९०८ सालीं पंचविशीच्या वयांत दिवंगत झाले.

बडोद्याच्या ह्या नोकरींत मला स्वतः पुष्कळ नवीन गोष्टी शिकण्याची संधि मिळाली, तसे अवांतर फायदेही पुष्कळच प्राप्त झाले. राज्यांत महाराजांची जशी सर्वांगीण दृष्टि होती, तशा मलाही एकंदर जीवनांत पुष्कळ सुधारणा करतां आल्या. बडोदें शहराचा कित्ता जसा इतर संस्थानिक घेऊं लागले, तसेंच माझ्या स्वतःच्या संसाराचें झालें. माझे सर्व बंधु व आप्तवर्ग शिक्षणाच्या बाबतींत त्वरेनें पुढें सरसावले. माझ्या मुलांना शिक्षणाच्या सोयी सहज प्राप्त झाल्या. त्यांतून राजपुत्र विद्यालयांतले सर्व शिक्षक खासगी वेळांत माझ्याही मुलांना घरीं शिकवूं लागले. अश्वारोहण, संगीत, निशाण-बाजी, पोहणें, कसरत, चित्रकला हे सर्व विषय माझ्या घरचीं मुलें शिकूं लागलीं. बडोद्यास कलाभवन निघालें, त्याचे निर्माते प्रो. गज्जर माझे स्नेही असून त्यांच्या हाताखालीं माझे बंधु नारायणराव वर्ष दोन वर्षांत उत्कृष्ट रंगारी बनले, इतकेंच नाहीं तर टिकाऊ रंगांच्या निर्मितींत त्यांना मोठी किफायतही सत्वर होऊं लागली. मी बौद्धिक प्रगतींत वृद्धि कमावूं लागलों तरी द्रव्यार्जनांत मला अल्पसंतुष्ट राहवें लागलें. पण ही उणीव नारायणरावांनीं भरून काढल्यामुळें आमचें सर्व कुटुंब ऊर्जितावस्थेस येऊं लागलें. तिसरे बंधु गणपतराव मॅट्रिक होऊन वीणकामांत तयार झाले आणि साबणाचा कारखाना बनवून उद्योगास लागले. चौथे बंधु दिनकर-भाऊ हे तर राजपुत्र विद्यालयांत फत्तेसिंहरावांचे सहाध्यायी होऊन स्वावलंबनानें अखेरपर्यंत आपला खर्च भागवूं शकले. दरम्यान बंधु-भगिनींचीं लग्नें, वस्त्रपात्र, कोंकणचा संसार अशा वाढत्या खर्चाचें ओझें सहन करण्याची ताकद आम्हां बंधूंस आली. सर्व पुढारपण मजकडे असून स. १९०५ च्या आंतबाहेर आमच्या कुटुंबाचें पूर्वीचें दैन्य निवारण

झालें. कर्ज वारून आम्ही कोंकणांत सुंदर दुमजली घर उभारलें. स. १९०२ सालीं मी व बंधु नारायणराव कोंकणांत घरीं गेलों. सर्व सावकारांस भेटून त्यांच्या तोडी केल्या आणि वडिलांस पांच एक हजारांचें कर्ज होतें त्यांतून त्यांस मुक्त केलें. हा काळ आमच्या कुटुंबाचा परमोच्च भाग्याचा होय.

बडोद्यांत सभासंमेलनें, व्याख्यानें, नाटकें, हत्तींच्या टकरा, पक्ष्यांचे खेळ, शिकार, स्वाऱ्या, प्रदर्शनें, मिरवणुका, अशा अनेक बाबतींत करमणूक व ज्ञानार्जन ह्यांचा फायदा माझ्या द्वारा महजगल्या आम्हां सर्वांना होऊं लागला. किर्लोस्कर नाटक मंडळी, शाहू नगरवासी, गंधर्व कंपनी अशांना महाराज आश्रय देऊन त्यांचे खेळ करवीत, तेही अनायासें माझ्या घरच्या मुलांमुलींस पाहवयास मिळत. वक्तृत्व समारंभ, टेनिस क्रिकेटचे सामने, कुस्त्यांच्या शर्यती, गायनवादनाचे जलसे जे इंग्रजी राज्यांत सहसा पाहण्यास मिळावयाचे नाहींत त्यांचा लाभ आम्हांस आपोआप घडत गेला.

बडोद्याची प्रगति सयाजीरावांच्या पुरस्कारानें त्वरेनें वाढत जाऊन आचारविचारांतला पूर्वीचा आंधळेपणा लयास गेला. स्पर्शास्पर्श, शिवाशीव, जातिभेद असले अंध प्रकार हळुहळू निरास पावून समाज विचारसरणीच्या एका बौद्धिक पातळीवर येऊं लागला. चहूंकडे बडोद्याचा बोलबोला होऊन हरएक बाबतींत बडोद्याचें उदाहरण बाह्य प्रांतांस अनुकरणीय बनलें. बडोद्यास बापट कमिशनचें प्रकरण निघालें तेव्हां लोकमान्य टिळक कित्येक महिने तेथें राहिले तेणेंकरून महाराजांच्या राज्यकारभाराची चर्चा समाजांत फैलावली. स. १८९५ च्या सुमारास कोल्हापुरास वेदोक्तवादाची लाट निर्माण होऊन ब्राह्मण मराठ्यांचा द्वेष वाढूं लागला, त्याचा संपर्क बडोद्यासही झाल्याशिवाय राहिला नाहीं. तथापि सयाजीरावांनीं युक्तीनें आपले हेतु साधून प्रकरण विकोपास जाऊं दिलें नाहीं. मराठे क्षत्रिय कीं शूद्र हा प्रश्न ह्या प्रकरणाच्या मुळाशीं होता. महाराजांनीं आपल्या धर्मकृत्यांत क्षत्रियांचे विधि वेदोक्त मंत्रांनीं करण्याचा परिपाठ घातला; पूर्वींच्या उपाध्ये मंडळींना नोकरींतून कमी करून वेदमंत्रांनीं कर्में करणारे नवीन उपाध्ये नेमिले. ह्या कामीं महाराजांचे हुकूम बरोबर पाळले जातात कीं नाहीं, पूजा, श्रावणी इत्यादि प्रसंगांत जे मंत्र म्हटले जातात ते वेदांतले कीं बाहेरचे हें तपासण्याचें काम त्यांनीं मला सांगितलें. त्यासाठीं सर्व सोळा संस्कारांच्या

विधींचें मराठी भाषांतर करून छापण्याचें काम मीं केलें. अर्थात् हा एक नवीनच धर्मसंशोधनाचा व ज्ञानार्जनाचा लाभ मला अप्रत्यक्षपणें मिळाला.

स. १८९८ त महाराजांनीं आपल्या त्रिवर्ग पुत्रांचे उपनयनविधि वेदोक्त पद्धतीनें करून समारंभ गाजविला. हे उपनयनविधि व तसेंच पुढें त्यांचे विवाह झाले ते विधि, शिवाय त्यांच्या वडील-मातुश्रींचीं श्राद्धें इत्यादि जे कांहीं प्रकार राजवाड्यांत होत त्या सर्वांचे मूळ अर्थ व हेतु महाराजांनीं मजकडून समजून घेतले. त्यासाठीं दोन तीन वर्षेंपावेतों मी महाराजांना संस्कृतही शिकवीत होतों. त्यांनीं आपल्या धर्मखात्याची आमूलाग्र सुधारणा केली, त्यांत माझा कार्यभाग बराच महत्त्वाचा होता. एवंच राजपुत्र विद्यालयांतील माझ्या नोकरीचें पहिलें दशक (स. १८९०–१९००) माझ्या बुद्धीचा फैलाव होण्यास अत्यंत महत्त्वाचें बनून आलें. नं समजतां ह्या सर्व सुधारणा आमच्या कुटुंबांत रुजल्या. मांसान्नाचा बाऊ होता तो गेला. मी वाड्यांत उघडपणें महाराजांच्या पंक्तीस जेवूं लागलों. माझ्या घरीं सर्व जातींचे स्नेही, खिस्ती, पारसी, मुसलमान व सनातनी असे भोजनास येऊं लागले. घरच्या बायकाही त्यांना जातिनिर्विशेषानें वाढूं करूं लागल्या. स. १८९९ त पुत्र श्यामकान्त जन्मास आल्यावर अपत्यसंगोपनाच्या जबाबदारींत पूर्वींची आमची प्रगति आणखी फैलावूं लागली. प्रत्यक्ष महाराजांचीं मुलें बुद्धिमान्, तरतरीत निघून शाळाकॉलेजच्या अभ्यासांत नांव गाजवूं लागलीं. अर्थात् माझ्या शिक्षणाचा हा परिणाम महाराजांस पटून स. १९०० सालीं फत्तेसिंहराव मॅट्रिक परीक्षा पास झाले तन्निमित्त त्यांनीं मला एक हजार रुपये बक्षीस दिले. त्यांत ५०० रुपयांची एक सुंदर नक्षीची सुवर्णकंठी मला मिळाली ती अद्यापि संग्रहीं आहे. माझी पत्नी, माई ती कंठी वापरीत, आतां ती डॉक्टर भाऊंच्या पत्नीजवळ आहे.

शिक्षकाचा धंदा आणि तोही सर्व साधनांनीं अनुकूल आणि सायजीरावां-सारख्या चोकस व दक्ष धन्याच्या देखरेखींत मला चालवावा लागला हा मी आपल्या जीवनांतला सर्वांत मोठा लाभ समजतों. केव्हां इतकें आयुष्य गेलें तें समजलें देखील नाहीं अशी आज भावना वाटते. जें कांहीं लहान मोठें काम करायचें असेल तें आपल्याकडून शिकस्तीच्या प्रयत्नानें सिद्धीस न्यावयाचें असा माझा स्वभाव बनला. आपली पूर्वपरंपरा व संस्कृति टिकविणें आणि रूढी व धर्माच्या नांवाखालीं चालणारे अनाचार बंद करून

नवीनांचा स्वीकार करणें, ह्या दोन विरुद्ध कल्पनांचा मिलाफ आचरणांत आणणें हें अवघड काम मी संसारांत पुष्कळ अंशीं यशस्वी करूं शकलों असें मला वाटतें. भोजनांत स्पर्शास्पर्श नाहींसा करून स्वच्छतेच्या तत्त्वावर नवीन प्रघात चालू केले. संध्या, यज्ञोपवीत, शिखा हे प्रकार गेले तर मंत्रपाठांत उपनिषदांतले कित्येक सुंदर वेचे मीं चालू केले. संध्येचें बीज केवळ अर्घ्यप्रदानांत आहे. नदीच्या स्वच्छोदकांत स्नान करतांना गायत्री मंत्र म्हणून त्याच ओंजळभर उदकानें सूर्यास अर्घ्य देऊन सृष्टिकर्त्याचे उपकार स्मरणें ही पवित्र कल्पना माझ्या मनांत रुजली. कामशेतच्या इंद्रायणींत शरदृतूच्या स्वच्छोदकांत शक्य तितका हा नेम मीं पाळला. तसेंच भोजनारंभीं ईशस्मरण चालू केलें. मला वाटतें प्रत्येकानें आपलें अंत:करण सदैव तपाशीत गेलें पाहिजे. माझ्या लेखनांतील विचारांस चालना देणारी माझ्या बुद्धीची तयारी कशी बनत गेली हें माझ्या या आयु:क्रमांत निदर्शनास येईल.

माझ्या रीडरच्या कामांतून इंग्रजी ग्रंथांचीं मराठी भाषांतरें प्रसिद्ध करण्याची सुरुवात झाली. मला ह्या भाषांतरांचा कंटाळा येऊन वर्गांत राजपुत्रांस शिकविण्यासाठीं मी इतिहासाच्या गोष्टी मराठींत लिहून काढूं लागलों. इतिहास एखाद्या नियमित पुस्तकावरून न शिकवितां गोष्टीच्या रूपानें सांगत जावा ही सूचना महाराजांनीं मला केली, ती स्वीकारून मी स्वत:चें लेखन करूं लागलों. हा प्रकार स. १८९५ च्या सुमारचा आहे. त्यापूर्वी Story of the Nations Series ह्या मालेचीं मराठी भाषांतरें करण्याचें महाराजांनीं योजिलें. युक्तीनें तें काम मीं अंगावरून दूर केलें आणि तत्प्रीत्यर्थ शाळाखात्यांत नवीन भाषांतर शाखा महाराजांनीं निर्माण केली. दरम्यान माझें लेखन वाढून स. १८९८ त मुसलमानी रियासत हा मीं पहिला ग्रंथ प्रसिद्ध केला, त्याचा परिपोष उत्तरोत्तर झालेला बाहेर महशूर आहे. ह्याशिवाय सोळा संस्कारांचे मराठी ग्रंथ, क्रिकेट टेनिस वगैरे खेळ, पाकशास्त्राचीं कित्येक पुस्तकें, राजवाड्यांत चालणाऱ्या अनेक नित्यनैमित्तिक कृत्यांचे नियम असे बहुविध व्यवसाय महाराजांच्या हुकमानें मला नेहमींच सांभाळावे लागत. राजपुत्रांचे विवाह झाले, त्यांतले कित्येक अहवाल सर्वथा माझ्याच श्रमानें तयार झाले. 'इंग्रजी भाषेची गृहशिक्षा' ह्या लहानशा चोपड्यांत परकीय भाषा झटपट शिकण्याची उत्कृष्ट पद्धत

मीं जाहीर केली, ती आमच्या कुटुंबांत अत्यंत यशस्वी झाली आहे. 'मराठ्यांच्या राज्यकथा' हेंही माझ्या परिपक्व वाचनाचें फल होय.

२. उतरती कळा

महाराजांच्या बहुतेक नोकरांत मीच बहुधा दीर्घ काल पावेतों अत्यंत निकटवर्ती होतों. एक क्षणही फुकट जाऊं न देण्याची महाराजांची वृत्ति असल्यामुळें श्मश्रु करतांना देखील ते मला वाचण्याचें किंवा पत्रलेखनाचें काम जवळ बसवून करवीत. पुष्कळदां महाराज–महाराणी दोघांच्याही सन्निध असून मला कामें करावीं लागत. उभयतांकडे केव्हांही जाण्यास मला बहुधा मुभा होती. नोकरीच्या पहिल्या दोन तीन वर्षांत तर रात्रीं महाराजांच्या पलंगाजवळ बसून तासन तास वाचावें लागे. रात्रीं दहा अकरा वाजतां सुरुवात करून पहांटे तीन चार वाजेपर्यंत वाचण्याचें काम मीं कैक दिवस केलें आहे. निद्रानाश हा महाराजांचा मुख्य विकार असून वेळ जाण्यासाठीं वर्तमानपत्रें, इंग्रजी मराठी ग्रंथ, कादंबऱ्या, तुकारामाचे अभंग असे प्रकार मी त्यांस वाचून दाखवीत असें. मात्र खोलींत भडक उजेड न ठेवतां बारीक घासलेटचा दिवा उशाजवळ भुईवर घेऊन मी वाचीत बसें. पण त्याही वेळीं डोकीचें पागोटें सुद्धां काढून ठेवण्याची आमची छाती नव्हती, अशी महाराजांची शिस्त कडक असे. मी वाचीत असतां दुसरे कोणी नोकर पाय दाबीत, तेल वगैरे घाशीत बसत. गोष्टी सांगणारेही रात्रीं हजर असत. वाचनाचा कंटाळा आला म्हणजे महाराज गोष्टी सांगणारास बोलावीत. मधून मधून विचारीत 'सरदेसाई, किती वाजले?' मग मी घड्याळ पाहून 'दोन तीन वाजले' असें सांगत असें. बाकी चारसहा तास माझें चाललेलें वाचन त्यांना किती कळत असे किंवा माझा आवाज तरी किती स्पष्ट राहत असे भगवान जाणे. ए. डी. सी. वगैरे बाहेर हजर असत पण वाचण्याच्या कामीं ते बहुतेक मलाच बोलावीत. पुष्कळदां पडसें ताप किंवा सांधे दुखणें वगैरे विकार महाराजांचे चालू असतां सकाळीं सायंकाळीं केव्हांही ते मला वाचण्यास बोलावीत. मला फार शीण झाल्यासें त्यांना दिसलें तर कींव करून मला बजावून सांगत, "फार वेळ झाला, तुम्ही आतां जाऊन निजा, भरपूर झोप घ्या, उद्यां मी तुम्हांस लवकर बोलावणार नाहीं." अशी त्यांची वाणी माझ्या-संबंधानें सदैव गोड व मृदु असे.

आपण हरएक विषय परिश्रमानें शिकावा, आपणांस कोणीं नांवें ठेवूं नयेत, आपलें व्यंग लोकांना दिसूं नये अशी दक्षता महाराज विशेष बाळगीत. बाराव्या वर्षी दत्तविधान होऊन ते बडोद्यास आल्यावर पुढील चारपांच वर्षांत शिक्षण असें त्यांना फारसें मिळूं शकलें नाहीं. अठरा वर्षें होतांच अधिकारसूत्रें हातीं आलीं तेव्हां त्यांना व्यावहारिक गोष्टी मोठेपणीं शिकाव्या लागल्या. स्विझर्लंडच्या डोंगरांत बसून अपूर्णांक गणित; काश्मिरांतील गुलमर्ग येथें मराठी व्याकरण, नैनिताल येथें भाषांतर पाठमाला, मसुरी येथें Kale's Lessons in English Translation असे विषय मीं त्यांस शिकविले. महाराज स्वतःच्या वस्तु–छत्री, काठी–सांभाळणें, वाचनाचें पुस्तक किंवा अन्य वस्तु प्रवासांत गहाळ न करणें ह्यासंबंधानें ते आपल्याकडून पुष्कळ दक्षता बाळगीत. पण हीं हलकीं कामें सर्वदा सेवक करीत असल्यामुळें त्यांना कधीं साधलीं नाहींत. युरोपांत असतां पुष्कळदां मी त्यांना आगगाडींत त्यांच्या डब्यांत बसवून छत्री-काठी-टोपी-पुस्तक ह्या वस्तु उतरतांना विसरूं नका म्हणून बजावीं आणि आपल्या जागेवर जाऊन बसें. गाडी थांबतांच येऊन पाहवें तों कित्येक वस्तु गाडींत विसरून हे तसेच खालीं उतरले आणि गाडी तर चालू झाली. हिंदुस्थानांत त्यांचे सेवक सदा सर्व कामें करीत, तशीं युरोपांत किंवा अन्यत्र आपलीं कामें आपण करावीं ही महाराजांची मोठी हाव मनांत, पण सवयी जडल्या निराळ्या. ह्यासंबंधानें ते पुष्कळदां वैतागत. मी सांगें ही व्यर्थ हाव धरा कां? ज्यानें त्यानें आपलें स्थान संभाळावें, प्रत्येकास सर्व कामें करीं येतील? पण ह्यासंबंधानें त्यांची समजूत कधींच पडली नाहीं.

तथापि नेहमीं आपण आपली सुधारणा करीत जावें हा त्यांचा मनोदय मुळींच वावगा नव्हता आणि पुष्कळ कामें ते मोठेपणीं अत्यंत कष्ट घेऊन शिकले. एखाद्या समारंभास भाषण करावें लागे, तेव्हां तें ते पुष्कळ वेळां वाचून मला अगोदर म्हणून दाखवीत. प्रत्यक्ष भाषणाचा विषय, मुद्दे किंवा मसुदा ते स्वतः ठरवीत किंवा तोंडीं सांगून लिहवीत; आणि मला सांगत, तुम्ही सभागृहांत दूर कोपऱ्यांत बसून माझें भाषण ऐका, माझा आवाज दूरपर्यंत पोचतो कीं नाहीं, उच्चार किंवा हावभाव बरेवाईट कोणते होतात तें मला सांगत जा म्हणजे पुनः प्रसंग येईल तेव्हां मी आपली सुधारणा करीत जाईन. सारांश, सयाजीरावांची सर्व

योग्यता अत्यंत कष्टानें पैदा केलेली असून नवीन सुधारणेचे प्रकार किंवा प्रसंग त्यांनीं कधीं फुकट घालविले नाहींत. त्यांच्या वेळीं ध्वनिक्षेपक यंत्र प्रचारांत नव्हतें म्हणून सभेंत बोलतांना ते अत्यंत काळजी घेत. बुद्धि मूळची सामान्य, पण चौकस व कष्टाळु वृत्तीनें हिंदुस्थानच्या समकालीन प्रमुख राष्ट्रीय व्यक्तींत त्यांनीं उच्च स्थान मिळविलें आणि अनेक प्रसंगीं आपल्या प्रौढ वाणीनें आणि विचारी भाषणानें त्यांनीं पुष्कळ लौकिक मिळविला. शेवटीं शेवटीं पूर्वविचार न करतांही ते इंग्रजी-मराठींत सुंदर भाषणें अस्खलित करूं लागले. त्यांचा कोटिक्रम बहुधा बिनतोड असे. पांगारकर, आहिताग्नि राजवाडे, हंसस्वरूप स्वामी, अशांचीं प्रवचनें ऐकून त्यांनीं शेवटीं आपल्या समारोपांत त्यांस सर्वथा निरुत्तर केलें. मोठमोठे विद्वान अधिकारी त्यांच्या शंका निवारण करण्यास असमर्थ बनत. हायकोर्टानें फाशीची शिक्षा फर्मावलेली त्यांजपुढें मंजुरीसाठीं आली असतां महाराजांचें समाधान करणें पुष्कळदां त्या न्यायाधीशांस अवघड पडे.

स. १९०२ च्या सुमारास महाराज चाळिशीस पोचतात तोंच त्यांस मुलांच्या दुराचरणाचा पहिला तीव्र धक्का मिळाला. तदुत्तर त्यांची पहिली हसण्याखेळण्याची प्रफुल्लित वृत्ति मावळत गेली. ह्या दीर्घ कालांत त्यांच्या हातून जरी स्वकर्तव्यांत उणेपणा कधीं घडला नाहीं, तरी ते जास्त जास्त दुःखी कष्टी बनत गेले. होतां होतां जवळ कोणी मनुष्य नको, कोणाची भेट नको कीं बोलणें नको असा त्यांचा स्वभाव बनला. पुष्कळदां भोजन-सुद्धां ते एकटे एकान्तांत करूं लागले. वाढणारानें टेबलावर सर्व तयारी करून निघून जावें, फक्त तयारीची घंटा वाजवून सूचना द्यावी, पण स्वतः पुढें येऊं नये असा महाराजांचा प्रकार बनला. एका पाठीमागून एक सर्वच मुलगे अव्यवस्थित निघाले, हा प्रकार घरांत, तर बाहेर राजकारणांत सार्वभौम सरकारची त्यांजवर गैरमर्जी ह्या कारणांनीं त्यांना जगांत कठोर औदासीन्य प्राप्त झालें. स. १९११ च्या डिसेंबर १२ ला इंग्रज बादशहाचा दिल्ली दरबार भरला, त्या प्रसंगीं त्यांच्याकडून गैरवर्तन घडल्याचा बोभाटा झाला, अल्पकाळ त्यांजवर भीषण आपत्ति उत्पन्न झाली. त्यांतून अंतिम अनिष्ट परिणाम कांहीं निर्माण झाला नाहीं तरी हा प्रसंग त्यांच्या उतरत्या कळेचा निदर्शक बनला. त्याच प्रसंगीं त्यांची कन्या इंदिरा हिचा ग्वाल्हेरकर माधवराव शिंद्यांशीं ठरलेला विवाहसंबंध एकाएकीं विसकटला, तेणेंकरून

महाराजांना मोठी उद्विग्नता प्राप्त झाली. ह्या घडामोडी कशा व कां घडल्या तो प्रकार येथें अप्रस्तुत म्हणून मी सांगत नाहीं. मात्र ह्यानंतरचें महाराजांचें जीवन भिन्न पद्धतीचें बनलें, त्याचा संपर्क अल्पांशानें मलाही पोंचला. स. १९११ नंतर त्यांच्या मुलांनातवंडांचे विवाहादि समारंभ झाले त्यांत मलाही भाग घ्यावा लागला, तरी आवश्यक कर्तव्यापलीकडे खुद्द महाराजांचें अंतःकरण त्या समारंभांत रंगलें नाहीं. महाराजांच्या ह्या चित्तवृत्तींतला फरक माझ्यासारख्या निकटवर्तीयांना सहज कळे, आणि त्यासंबंधानें आपसांत आमचीं पुष्कळ बोलणीं चालत. आम्ही त्यांचे जवळचे सेवक त्यांच्या अंतःकरणास तजेला आणण्याचा मनापासून प्रयत्न करीत असूं, याचें एक उदाहरण म्हणून माझा अनुभव सांगतों.

एके दिवशीं सकाळींच मला वाड्यांतून महाराजांचें बोलावणें आलें. लगेच कपडे करून मी गेलों, तों ते खालीं फिरायला जाण्याच्या तयारीनें उभे होते. मला पाहतांच म्हणाले, 'चला सरदेसाई, आपण थोडे फिरायला जाऊं. मुद्दाम कांहीं मनोवेधक गोष्टी तुम्ही सांगाव्या म्हणून बोलावलें. आज मला जरा अस्वस्थता वाटते.' हा आशय समजून आम्ही मोटरींत बसलों आणि मीं तोंडाचा पट्टा चालू केला. मकरपुऱ्याच्या रस्त्यानें दोनतीन मैल गेल्यावर ते मोटरींतून उतरून तासभर पायीं चालले. मकरपुऱ्याच्या बागांतील सर्व रस्ते चालून संपले. नंतर दीडएक तासानें ते परत मोटरीनें वाड्यांत आले. मोठ्या दरवाजानें आंत जातांना मोटर थांबवून त्यांनीं मला खालीं उतरवून घरीं जाण्यास रजा दिली. मला महाराजांच्या ठिकाणीं त्या वेळीं कांहीं एक गैर दिसलें नाहीं.

मी घरीं गेल्यावर सुमारें अर्धा तास झाला असेल, इतक्यांत फिरून वाड्यांतील निकडीचें बोलावणें आलें. त्याबरोबर मी पुनः तसाच गेलों तों खालीं भलताच प्रकार नजरेस आला. ए. डी. सी., डॉक्टर, दिवाण, खाजगी कारभारी सर्व एकत्र जमून महाराजांच्या अस्वस्थतेची चर्चा करीत होते. मला पाहतांच त्यांनीं माझी खोदखोदून जबानी घेतली. त्यांचा समज कीं मीच कांहीं तरी क्षोभकारक प्रकरणें त्यांस बोललों. त्यांनीं अगोदरच महाराजांस वर नेऊन पलंगावर निजवून ठेविलें होतें. महाराजांच्या अस्वस्थतेला मी कारण झालों असा त्यांचा समज होऊन त्यांनीं

माझी उलट तपासणी चालविली, कीं मी काय त्यांस बोललों आणि त्यांनीं काय विचारलें. मीं झालेला सर्व प्रकार अक्षरशः निवेदन केला. मुळांतच कांहीं नाहीं तर मी तरी त्यांना काय जास्त सांगणार! माझ्याशीं बोलतांना महाराज रोजच्यासारखे शांत होते, दोन तीन मैल चालून परत आले, एवढेंच उत्तर मीं केलें. तथापि त्या मंडळींनीं मला बजावण्यास कमी केलें नाहीं, कीं भलत्यासलत्या चीड येणाऱ्या गोष्टी महाराजांच्या कानांवर तुम्ही कधीं घालीत जाऊं नका. सांगायचें तात्पर्य इतकेंच कीं उत्तरोत्तर महाराजांच्या चित्तवृत्ति क्षुब्ध होत जाऊन त्यांची प्रकृति ढासळत गेली. पहिला तरुणपणचा उत्साह मावळला.

दुसरा एक असाच निराळा प्रसंग मला आठवतो. महाराज एकटेच कांहीं दिवस मकरपुऱ्यास राहत होते. रात्रीं दोन वाजतां शहरांत माझ्या घरीं सरकारी मोटर आली कीं महाराज बोलावतात. मी तसाच कपडे घालून चार मैल गेलों. वाड्यांत खालीं ए. डी. सी. होते त्यांस विचारलें, 'कां बोलावलें ? मला महाराजांकडे घेऊन चला.' ए. डी. सी. म्हणाले, 'मला तुमच्याबरोबर येण्याचा हुकूम नाहीं, ते वर आहेत, कोठें काय करताहेत मला माहीत नाहीं. तुम्ही त्यांस शोधून भेटा.' मी जिन्यावरून वर गेलों. अंधुक प्रकाशांत एका टेबलाजवळ स्वारी पुस्तक वाचीत बसलेली दिसली. मी जवळ जाऊन वंदन केलें. मला बोलले, 'झोप येईना म्हणून कांहीं तरी गप्पा कराव्या म्हणून तुम्हांस बोलावलें.' मग मी पुराणांतल्या कथा चालू केल्या. कालिदास, रघुवंश, तुकाराम, रामदास सर्वांची त्यांजपुढें झडती घेतली. आम्हांला ही नेहमींची सवयच होती. सुमारें तास अर्धातास बोलून त्यांनीं मला रजा दिली. साडेचार वाजतां पहांटे घरीं जाऊन मी पुनः निजलों. अशा घटनेला पुष्कळदां मुलांच्या भानगडींचे व त्यांच्या कौटुंबिक दुरवस्थेचे प्रश्न कारण असून त्यांत गुरफटून गेल्यामुळें महाराज चिडखोर बनत आणि तशा स्थितींत कित्येक दिवस ते सर्वथा मनुष्यसंपर्क वर्ज्य करून एकटे एकटे राहत. अशा कष्टमय जीवनांत त्यांचीं शेवटचीं दहापंधरा वर्षें तरी गेलीं. कोठेंही असले तरी रोजचीं सरकारी कामें ते नियमितपणें करीत. सेक्रेटरीनें येऊन कामें दाखवावीं. त्यांवर ते सांगतील तो हुकूम तसाच अक्षरशः लिहून घ्यावा. विचारल्याशिवाय त्यांना स्वतः कांहीं बोलूं नये असा कामाचा मामला चालू

झाला § प्रत्येक बाबत अधिकाऱ्यांशीं मोकळेपणें चर्चा करून ठरवावी हा पूर्वींचा त्यांचा प्रकार पुढें बदलून गेला. जो अधिकारी त्यांजला असें नव्हे असें सांगूं लागे, त्याची ते बदली करूं लागले. नवीन कामगार नेमले जात, त्यांच्या मानानें आतां महाराजच वयानें व अनुभवानें श्रेष्ठ, सर्वांनीं निमूटपणें हुकमाची बजावणी करावी असा त्यांचा प्रघात ह्या शेवटच्या उत्तरायुष्यांत विशेष बनला. दिवाण व्ही. टी. कृष्णमाचारी त्यांच्या जवळ असत त्यांनीं किती तरी त्या वेळच्या महाराजांच्या गमती मला सांगितल्या. महाराणी चिमणाबाई देखील हा विषय बोलत आणि महाराजांच्या ह्या चिडखोर स्वभावाला कंटाळून जात. स. १९२५ त मी सेवानिवृत्त झालों आणि महाराज ता. ६ फेब्रुवारी स. १९३९ रोजीं मुंबईत दिवंगत झाले. ह्या चौदा वर्षांत त्यांचा माझा पूर्वींचा निकट सहवास सर्वथा तुटला. हा योगायोग कां व कसा घडला हें सांगणें अवश्य आहे.

३. परिणामांतील कटुता

महाराजांना आपलें चरित्र संपूर्ण आपल्या देखत प्रसिद्ध व्हावें अशी मोठी हाव होती. मीं लेखक व त्यांचा निकटवर्ती सेवक तेव्हां मला त्यांनीं तशी सूचना पुष्कळदां केली. मीं सांगितलें माणसाची खरी योग्यता त्याच्या पश्चात् अजमावली जाते. मी त्यांचा पगारी नोकर, तोंडावर त्यांचे गुणावगुण कसे लिहूं शकणार ! तथापि चरित्राचीं सर्व साधनें पत्रें, हुकूम, फोटोग्राफ, भाषणें, प्रासंगिक घडामोडी, बनाव हें सर्व साहित्य जमवून एकत्र ठेवणें अवश्य होतें. मुलांचे व्यवहार, प्रवास, विवाहादि समारंभ ह्यांचे बनलेले कागद ठिकठिकाणीं अव्यवस्थित होते ते सर्व एकत्र करून नकोत ते फाडून बाकीचे सांभाळून विल्हेवारीनें निगेत ठेवणें हें काम महत्त्वाचें होतें, तें मीं सुचविलें, त्यांना पटलें आणि लगेच चरित्रसंग्रह नांवाची स्वतंत्र शाखा काढून माझी त्यांनीं त्याकरितां विशेष नेमणूक केली. हाताखालीं दोन कारकून नेमले. स. १९१६ च्या डिसेंबरपासून तीन वर्षें मी ह्या स्वतंत्र कामावर राबलों. (१) महाराजांनीं लिहिलेलीं समस्त खासगी पत्रें जुन्या बारनिशा वगैरेंतून काढून त्यांच्या वीस प्रती छापल्या. (२) महाराजांचीं सर्व भाषणें जमवून तीं प्रसिद्ध केलीं. (३) समस्त राजपुत्रांचे कागद, पत्रें, हिशेब, नेमणुका इत्यादि सर्व जमवून प्रत्येकाचे स्वतंत्र संच व्यवस्थित

§ शेवटच्या दहावीस वर्षांतले त्याचे हुकूमच ह्याची उत्कृष्ट साक्ष देतात.

लावून ठेविले. (४) कौटुंबिक व इतर फोटोग्राफ्स् सर्व एकत्र जमवून कालक्रमानें व्यवस्थित केले. दरसालच्या वाढदिवसास असे महाराजांचे व कुटुंब—दरबारांचे फोटोग्राफ्स् घेत ते त्यांच्या चरित्राचें एक मोठें साधन बनलें. (५) खासगी खात्याचे व राज्याच्या व्यवहारांचे महाराजांनीं वेळोवेळीं दिलेले हुजूर हुकूम सर्व एकत्र मंच जमवून निराळे ठेविले. असे हुकूम पन्नास वर्षांतले निदान वीस हजार तरी होते. तेंच महाराजांचें स्वतःचें मोठें लेखन असून त्यांतच त्यांची खरी योग्यता उतरलेली होती. (६) त्यांचीं व मुलांचीं हस्ताक्षरें, टिपणें, वस्तुसंग्रह असे हुडकून मीं एकत्र केले.

ह्याशिवाय महाराजांच्या कारभारांतील मुख्य घडामोडी, त्यांच्या स्वाऱ्या, त्यांचे प्रवास, त्यांनीं केलेल्या मुख्य सुधारणा, त्यांचे दरबार व समारंभ, मुलांचे जन्मोत्सव व विवाहादि प्रसंग, खुद्द महाराजांचें दत्तविधान व शिक्षण, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांची काम करण्याची पद्धत, त्यांनीं बांधलेल्या इमारती अशा अनेक विषयांचें वर्णन करणारे लहान मोठे लेख मीं मराठींत तयार करून त्यांच्याही वीस प्रती छापून ठेवल्या. वीस प्रतीच छापण्याचें कारण ह्या लेखांचा उपयोग पुढील चरित्र-लेखकास व्हावा इतकाच होता. त्यांचीं पत्रें देखील सर्वच एकदम प्रसिद्ध करण्याजोगीं नव्हतीं. फक्त जुन्या बारनिशा फाटत चालल्या, त्यांतून हीं पत्रें वाचून मी एका संग्रहांत आणलीं. सारांश, शिवाजीसारख्या राष्ट्रपुरुषाचें चरित्र लिहिण्यांत ज्या अडचणी आज इतिहासकारास भासतात, तशा सयाजी-रावांसंबंधानें पुढें भासूं नयेत अशी सर्व सिद्धता मीं परिपूर्ण करून ठेविली. हें सर्व काम मीं चोख केलें तें त्यांसही पसंत पडलें. त्यावरून त्यांची कल्पना तीव्र बनली कीं मींच त्यांचें समग्र चरित्र लिहावें. मीं स्पष्ट कळविलें, मी पगारखाऊ सेवक, चरित्रनायकाचे गुणदोष स्पष्ट सांगण्यास असमर्थ; व्यक्तीच्या पश्चात् चरित्र लिहिलें जावें हा शहाण्यांचा रिवाज आहे. माझें म्हणणें त्यांस खोडून काढतां येईना, पण मनांतला आग्रहही सोडवेना. चरित्रसंग्रहाचें काम मात्र त्यांनीं बंद करून पुनः चीफ अकौंटंटच्या जागीं मला बदललें. त्यांच्या इच्छेस मीं उघड विरोध केला हा प्रकार त्यांच्या मानी स्वभावास रुचला नाहीं. माझ्यावरचा पूर्वीचा त्यांचा लोभ ओसरत चालला हें मला स्पष्ट दिसूं लागलें.

अशा स्थितींत स. १९२१ सालीं माझ्या वयाचीं ५६ व नोकरीचीं ३३ वर्षें पुरीं होऊन मी नियमानुसार सेवानिवृत्तीस पात्र झालों. महाराजही संधिवाताच्या विकारानें अस्वस्थ होऊन उपचारासाठीं आपला काळ पुष्कळसा युरोपांत काढूं लागले. तिकडे त्यांनीं लंडन पॅरिसमध्यें स्वतःच्या मालकीचे निवास तयार केले. मलाही बडोद्याच्या निःसत्त्व हवेनें क्षीणता वाटूं लागली. पुष्कळसे लोक निवृत्त न होतां नोकरीची मुदतवाढ मागतात ती मला नकोशी होऊन मीं निवृत्तीची मागणी केली. इच्छा एवढीच कीं नोकरीची परतंत्रता तोडून उर्वरित आयुष्य एखाद्या शांत ठिकाणीं इतिहासलेखनांत घालवावें. ह्या उलट महाराजांची इच्छा कीं मीच एक त्यांचा जुना निकटचा खात्रीचा प्रामाणिक सेवक, तेव्हां मीं अखेरपर्यंत नोकरींत राहून पूर्ण पगार घ्यावा. ते बडोद्याबाहेर राहत असल्यामुळें त्यांचे कुटुंबाचे व्यवहार दक्षतेनें सांभाळणारा मी जाग्यावर असावें. ह्या दोन विरोधी मनोवृत्तींचा तीव्र झगडा उत्पन्न झाला. दोघांनींही एकमेकांच्या भावना स्पष्टपणें ओळखल्या. त्यांनीं अनेकवार मला काकुळतीनें सांगितलें, "तुम्हीं मला सोडूं नये. धन्याची मर्जी सांभाळणें हें सेवकाचें पहिलें कर्तव्य. You must not leave me; you must die here in my palace," असे त्यांचे उद्गार वारंवार निघत. दरसाल माझ्या निवृत्ति-वेतनाचा प्रश्न त्यांजपुढें निकालास जाई, त्यावर "आणखी एक वर्ष ह्यांना नोकरींत राहूं द्यावें," असा हुकूम ते देत गेले. 'मला आतां सोडवा' अशी माझी स्पष्ट मागणी वाचून ते जास्तच चिडून गेले. शिवाय मी त्यांच्या नजरेस आणलें कीं माझ्याबरोबरचे सर्व नोकर दरमहा हजार आठशेंच्या कमाईस पोचले, आणि मी मात्र एकटा पांचशेंलाही पोचलों नाहीं. तरी द्रव्यरूपानें मला पूर्ण मोबदला द्यावा. खर्चाच्या बाबतींत महाराजांचा हात सढळ नव्हता, हा एकच त्यांचा दोष सर्व लोकच काय, पण त्यांचे कौटुंबीय सुद्धां काढून त्यांना उघड नांवें ठेवीत. माझा पगार दरमहा रु. ४८५ होता, त्यांत त्यांनीं वाढ केली नाहीं, उलट "कृपावंत होऊन ह्यांस आणखी एक वर्ष नोकरींत मुदतवाढ देण्यांत येत आहे", असे त्यांचे हुकूम आले. मीही त्यांच्याइतकाच चिडून गेलों. महाराजांनींही दर्शविलें कीं हट्टानें मीं त्यांच्या हुकमाविरुद्ध वागल्यास त्याबद्दल मला पुढें पस्तावावें लागेल.

दरम्यान कामशेत येथें जमीन घेऊन तेथें शांतपणें मी लेखनव्यवसाय करणार हा माझा मनोदयही मीं महाराजांस स्पष्ट कळविला, ह्यांत त्यांना आणखी एक वैषम्य वाटलें तें असें. आपल्या नोकरांनीं बडोद्याचा पैसा बाहेर न नेतां तेथेंच वास्तव्य करावें ही महाराजांची तीव्र इच्छा असे. तिच्या विरुद्ध मीं बाहेर जाण्याचें ठरविलें तें त्यांना आवडलें नाहीं. मीं उघडपणें त्यांचा उपमर्द करतों अशी त्यांची भावना बनली. मलाही ती दुरुस्त करतां येईना. स. १९२५ च्या मार्चांत महाराज युरोपास निघाले त्या प्रसंगीं रात्रीं १० वाजतां मला बोलावून सद्गदित अंतःकरणानें तीन लहान नातवंडांदेखत ते मला बोलले, "ह्या मुलांचें संगोपन करण्यासाठीं तुम्ही येथें राहा. सोडून जाऊं नका." क्षणभर मला अवघड वाटलें. वाचा फुटेना. मी एवढेंच बोललों, "मला काय सांगायचें तें पूर्वीं सर्व स्पष्ट सांगितलें आहे, जास्त कांहीं नाहीं." माझ्या ह्या उत्तरानें ते क्षणभर विपण्ण बनले. इतक्यांत स्टेशनवर जाण्याची वेळ होऊन ते व मी मुलांसह दोन जिने उतरून हलके हलके खालीं आलों. ते मोटरींत बसले, मी पायरीवर उभा होतों, शेवटचें वाक्य म्हणाले, "माझी इच्छा ध्यानांत ठेवा, तरच परिणाम ठीक होईल." ह्या शब्दांचें इंगित मीं ओळखलें. ते मुंबईस गेले आणि मी घरीं आलों.

लगेच मीं अर्ज देऊन दिवाणांस कळविलें, "मी आतां नोकरींत राहूं इच्छीत नाहीं, मला मुक्त करा आणि अकौंटंटच्या जागेवर माझ्या ठिकाणीं दुसरा इसम नेमा." यथाकाल माझा अर्ज युरोपांत महाराजांकडे जाऊन माझें निवृत्तिवेतन नियमानें दरमहा दोनशें साडेसदतीस रुपये बसलें तें मंजूर झालें. हुकमांत एक वाक्य अधिक होतें कीं "ह्यांच्यासंबंधानें आणखी कांहीं हुकूम देणें आहे तो यथाकाल मागाहून देऊं." ह्याचा अर्थ मी तेव्हांच समजून चुकलों. तेव्हांपासून पाठीमागच्या नोकरींतील माझीं उणीं हुडकून काढण्याचें शुष्ककाष्ट माझ्यामागें लागून त्यांवर माझे जबाब मागण्यास सुरुवात झाली. मीं त्यांचीं उत्तरें नम्रपणें पण ठांसून दिलीं. त्यावर महाराजांनीं हुकूम केला कीं माझ्या निवृत्तिवेतनांत ६० टक्के कपात करावी. ह्या हुकमानें मला पेन्शनचे फक्त दरमहा नव्वद रुपये राहिले. कांहीं दिवस ते मीं घेतले नाहींत. पुढें चिमणाबाई वगैरेंनीं आग्रह केल्यावरून मी ती कपात रक्कम घेऊं लागलों. ह्या मोठा

अन्याय झाला असें पुष्कळांनीं महाराजांस सांगितलें. पण त्यांनीं तें मनावर घेतलें नाहीं. अशीं बारा वर्षे माझी रक्कम सुमारें वीस हजार बुडाली. ता. ६ फेब्रुवारी, स. १९३९ रोजीं महाराज मुंबईस दिवंगत झाले आणि नातू प्रतापसिंह गादीवर आले. त्यांनाही मीं शिकविलें असून ते मला स्वतः ओळखीत होते. त्यांचा राज्यारोहणसमारंभ झाला, त्या प्रसंगीं त्यांनीं मला अगत्यपूर्वक बडोद्यास बोलावून माझें कपात झालेलें वेतन पहिल्याप्रमाणें पुढें चालू केलें. मात्र बारा वर्षांची झालेली कपात त्यांना भरून देतां आली नाहीं. आपल्या सत्तेंत सयाजीरावांनीं केलेला हा हुकूम मीं आतां फिरविला तर आणखी अनेकांचे असे अर्ज मनावर घ्यावे लागतील, असें आपलें समर्थन प्रतापसिंहांनीं कळविलें. माझें हें वेतन पूर्ण मिळूं लागलें म्हणून मला आतां उत्तरावस्थेंत स्वावलंबनानें आपला निर्वाह चालवितां येत आहे. ज्या सयाजीरावांच्या आश्रयावर मी व माझें सर्व कुटुंब पोसून ऊर्जितावस्थेस पोचलों त्याचा असा खेदजनक परिणाम व्हावा, हा माझाच दैवदुर्विपाक होय. दुसरें काय म्हणावें !

आपलें चरित्र लिहविण्याचे अनेक प्रयत्न सयाजीरावांनीं केले. सेंट निहालसिंग त्याच कामावर कैक वर्षे खपले. पण त्यांचा लेखनकलाप महाराजांस पसंत पडला नाहीं. नंतर Sir Stanley Rice व Mr. Sargeant ह्यांजकडून त्यांनीं आपलीं दोन चरित्रें पृथक्पणें इंग्रजींत लिहवून प्रसिद्ध केलीं. त्यासाठीं त्या दोघांनाही त्यांनीं आपल्या पदरीं नोकरींत ठेविलें. चरित्रलेखनाच्या कामीं मीं जमविलेलें साहित्य त्यांच्या उपयोगी पडलें. माझीं मराठींत छापलेलीं सर्व टिपणें इंग्रजींत भाषांतर करून त्यांना पुरविण्यांत आलीं. तथापि ह्या लेखकांस महाराजांच्या जीवनाचा व साठ वर्षांच्या दीर्घ कर्तृत्वाचा आत्मिक ओलावा अंगीं मुरलेला नसल्यामुळें त्यांच्या लेखांत अंतःकरणाची रसोत्पादक तळमळ उमटली नाहीं असें मला वाटतें. महाराजांचा एकंदर व्याप समस्त भारत राष्ट्राच्या उन्नतीचा असून, त्यासाठीं त्यांनीं आपलें संस्थान नमुनेदार बनविलें. कलाभवन, शाळा, रस्ते, आगगाड्या, सक्तीचें शिक्षण, लायब्रऱ्या अशा नानाविध विषयांत त्यांनीं सुराज्याचा एक उत्कृष्ट नमुना प्रत्यक्ष सार्वभौम इंग्रज सरकारास सिद्ध करून दाखविला. इंग्रजी अंमलाच्या शंभर वर्षांत हिंदी राष्ट्रोद्धाराच्या सर्वांगीण सुधारणेचा जो आदर्श सयाजीरावांनीं अत्यंत परिश्रमानें निर्माण केला आणि ज्याबद्दल ते त्या

सरकारच्या नाराजीस पात्र झाले, तो त्यांच्या खऱ्या कर्तृत्वाचा उत्कृष्ट पुरावा होय. ह्या दृष्टीनें सयाजीरावांचें राष्ट्रोद्बोधक चरित्र कधीं लिहिलें गेलें नाहीं, आणि आतां सर्व संस्थानेंच विलीन झाल्यानें पूर्व स्थिति इतकी पालटून गेली आहे कीं सयाजीरावांची आठवण सुद्धां पुढील पिढीस आहे कीं नाहीं कोण जाणे. मी नुकताच (स. १९४९ सालीं) बडोद्यास गेलों तेव्हां लक्ष्मीविलास राजवाड्याची व बडोद्याच्या नवीन रूपान्तराची ती दुरवस्था पाहून माझ्या व मत्सम अनेक अनुभवितांच्या डोळ्यांतून अश्रुधारा गळाल्या. महाराणी शांतादेवी व त्यांचीं अपत्यें केविलवाणीं पाहून माझ्या पोटांत भडभडून आलें. सारांश, सयाजीरावांचा अस्त इतका त्वरित व परिपूर्ण झाला हा प्रकार भारताच्या इतिहासांत नमूद होण्याची शक्यता उरली नाहीं. हा हिंदी राष्ट्राचा अपमान होय असें मी मानतों. महाराजांनीं दुसऱ्या कित्येकांकडून आपलीं चरित्रें इंग्रजीमराठींत लिहवून प्रसिद्ध केलीं आणि माझ्या पेन्शनाची केलेली बचत त्या कामीं भरपूर वापरली, तरी प्रत्यक्ष परिचयाच्या अभावीं तीं उठावदार बनलीं नाहींत, त्यांत महाराजांच्या कर्तृत्वाचें हार्दिक स्वरूप उतरलें नाहीं. सयाजीराव ही आधुनिक मनूची एक स्मरणीय विभूति होय. त्यांनींच जगभर प्रवास करून फ्रान्स, अमेरिका इत्यादि राष्ट्राधिपतींच्या किंवा जर्मन कैसरच्या प्रत्यक्ष गांठीभेटी घेऊन राष्ट्रोन्नतीचा भावी मार्ग पतित हिंदी राष्ट्रास दाखवून दिला, सार्वभौम सरकारच्या रोपाची क्षिति कधीं बाळगली नाहीं, प्रत्यक्ष अमेरिकेंत तत्त्वज्ञान परिषदेचें अध्यक्षपद स्वीकारून भारतीय संस्कृतीचा उच्च दर्जा जगास पटवून दिला. इतकेंच काय, पण लोकमान्य टिळक किंवा गोखले, लाला लाजपतराय किंवा सुरेन्द्रनाथ बानर्जी, अथवा शेवटचे महात्मा गांधी ह्या सर्व राष्ट्रपुरुषांना पहिली स्फूर्ति सयाजीरावांनीं आपल्या उदाहरणानें पुरविली, हा प्रकार विचारवंतास स्पष्ट दिसतो. अशा थोर पुरुषाचें संपूर्ण चरित्र लिहिण्याची पात्रता मला होती कीं नाहीं कोण जाणे, पण विधिघटनेंत तसा योग नव्हता, हें निश्चित आहे. हा सर्व प्रकार गतकालीन अंधकारांत आतां तर गडप झाला असून तत्संबंधीच्या आठवणी मात्र माझ्या स्मरणांतून कधीं लोपणार नाहींत. तशा थोड्या बहुत आठवणी हल्लीं मी प्रसिद्ध केल्या आहेत. (स. १९५५).

प्रकरण पांचवें

आमचें कौटुंबिक जीवन

१. स्वतंत्र धंदा

२. शेतीचे प्रयोग

३. बिलिमोऱ्याचा कारखाना

४. गोड शेवट

प्रकरण पांचवें

आमचें कौटुंबिक जीवन

उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः ।

१. स्वतंत्र धंदा

लेखनव्यवसायांत माझा प्रवेश झाला, त्याचप्रमाणें माझे सर्व बंधु शिक्षण संपादून स्वतःचा म्हणून स्वतंत्र धंदा करूं लागले. मी वडील असल्यामुळें वडिलांपासूनचे आमचे कागदपत्र मीं जपून ठेवलेले आज मजपाशीं असून ते सर्व वाचून विभागवार स्वतंत्र पुडक्यांत बांधून ठेवले आहेत. ते वाचले असतां आम्हां प्रत्येकाची कौटुंबिक स्थिति कशी बनत गेली तें लक्षांत येतें. हे बहुतेक मोडी लिपींत असून त्यांत बायकांचीं, मुलांमुलींचीं, आप्तमंडळीचीं अशीं पत्रें जपून ठेवलेलीं आहेत. पुढें त्यांची व्यवस्था काय करायची हा आज मजपुढें प्रश्न आहे. आम्हां बंधूंच्या पत्रांत मुख्य चर्चेचा विषय उद्योगधंद्याचा असून द्रव्यार्जनाशिवाय उत्कर्ष नाहीं आणि तें द्रव्यार्जन नोकरीपेक्षां स्वतंत्र धंदा किंवा कारखाना उभारल्याशिवाय साधणार नाहीं, हा विचार मी सारखा वीस पंचवीस वर्षें आपल्या मंडळीस लिहीत आलेला दिसतो. इंग्रज राज्यकर्त्यांनीं आमचे नैसर्गिक धंदे मारून देशास दैन्य आणिलें, तो प्रकार प्रथम सुधारला पाहिजे. हा विषय त्या वेळीं जनतेंत प्रामुख्यानें चर्चिला जात होता. बडोद्यांत तर ह्या विषयाची एवढी लाट उसळली कीं त्यासाठीं स. १८९० त कलाभवनची स्थापना झाली. तिचे मुख्य उत्पादक प्रो० गज्जर, त्यांचे पुरस्कर्ते बापूसाहेब आठल्ये व दिवाण मणिभाई आणि मी त्यांचा निकटवर्ती सहचर. अहोरात्र स्वदेशी धंदे उभारण्याच्या नवीन नवीन योजना निघून, त्या कागदावर मांडणें, त्या वेळीं टाईपरायटर नसल्यामुळें हातानें त्यांच्या नकला करून अभिप्रायाकरितां बाहेर रवाना करणें, दररोज आपसांत व महाराजांकडे चर्चेसाठीं तासनतास बैठकी भरणें, हींच कामें गज्जरांच्या देखरेखींत मला करावीं लागत. दोन तीन वर्षें तरी मी त्यांचा निकटवर्ती

सहायक असून पुष्कळदां माझें भोजन, शयन वगैरे त्यांजकडेच होत असे. गज्जर म्हणजे अचाट कल्पनांचें प्रचंड भांडार. द्रव्योत्पादनाची गोष्ट म्हणजे महस्रलक्षांचे ऐवजीं कोटींच्या मापानें त्यांच्या मुखानें चाललेली ऐकायला मिळे. ते नेहमीं म्हणत, "गोविंदराव, चारदोन महिन्यांत मी पहा किती कोटि पैदा करतों ते. लोखंडाचें सोनें बनविणारा मी परीस आहें." तसे पैसे त्यांनीं मिळविले आणि घालविलेही खरे. ह्या विषयांत टी. के. गज्जरांचें सर्वच चरित्र भारताच्या इतिहासांत प्रामुख्यानें गाजलें पाहिजे. सुरतेस स. १९०७ च्या डिसेंबरांत कॉंग्रेसची गाजलेली बैठक मोडली, त्या वेळीं गज्जर त्या मुख्य मंडपाजवळ राहत असून मीही तो देखावा त्यांच्याजवळ राहून आस्थेनें पाहत होतों.

कलाभवनची निर्मिति हा समस्त हिंदभूमींतला देशी धंद्यांच्या उत्तेजनाचा पहिला प्रयोग होय. पुढें त्याच्या नकला चहूंकडे निघून आतां तर त्या विषयाचा परिपोष सर्वत्रच झालेला आपण पाहतों. १८९० त कलाभवन निघालें, नंतर दोन वर्षांनीं मी प्रथम युरोपास गेलों. तदुत्तर स. १९०० सालीं पॅरिसचें प्रदर्शन पाहून आल्यानें त्या विषयानें माझ्या मनाची पकड कायमची घेतली. मी व बंधु नारायणराव ह्यांचा तर तो सारखा निदिध्यासच बनला. त्यांतून मी अल्प वेतनाच्या कायम नोकरींत बांधला गेल्यामुळें प्राप्तीच्या दृष्टीनें नारायणरावांचा जीवनयोग चांगला फलद्रूप झाला. पुनः मॅट्रिकच्या अभ्यासांत कालापव्यय न करतां गज्जरांच्या आग्रहावरून ते स. १८९१ च्या आरंभीं कलाभवनांत दाखल होऊन रंगाच्या रसायनांत ते गज्जरांचे पट्टशिष्य बनले. बुद्धिप्रभावांत नारायण मला वरचढ असून त्यांची धडाडीही पुष्कळ जास्त होती. गज्जरांच्या अचाट कल्पनांचाही परिणाम त्यांच्या मनोवृत्तींवर झाल्याशिवाय राहिला नाहीं.

नारायणरावांचें शिक्षण रत्नागिरि हायस्कुलांत झालें. स. १८९० त त्यांची मॅट्रिक परीक्षा उतरली नाहीं. मग ते कलाभवनांत गेले. तेथें सुमारें वर्षभर अभ्यास करून सन १८९१ च्या डिसेंबरांत नागपूरच्या एम्प्रेस मिलमध्यें त्यांनीं रंगखात्यांत नोकरी धरली. माझें लग्न रत्नागिरीस २९ फेब्रुवारी, स. १८८४ रोजीं झालें, नंतर दोनअडीच वर्षांनीं ता. १६ मे, स. १८८६ रोजीं नारायणरावांचें लग्न गद्रे कुटुंबांतील मुलीशीं झालें. तिचें नांव

यमुनाबाई. ती तात्या कुळकर्णी ह्यांच्या मामांची मुलगी. बडोद्यांत आम्ही दोघे बंधु एकत्र बिऱ्हाड करून राहत असतां, यमुनाबाई देवीच्या विकारानें आजारी झाली. बरी होतांच स. १८९३ च्या सेप्टेंबरांत बाळंतपणासाठीं ती कोंकणांत गोवील येथें गेली. आठव्या महिन्यांत प्रसूत होऊन ती तेथेंच ता. १ नोव्हेंबर, स. १८९३ रोजीं वारली. वडिलांनीं पुढील मे महिन्यांत नारायणरावांचें दुसरें लग्न शिपोशीचे सीतारामपंत आठल्ये ह्यांच्या मुलीशीं केलें, त्या यमुनाबाईचे पुत्र हल्लीं नारायणरावांचा उद्योग नेटानें पुढें चालवीत आहेत.§

कलाभवनांत नारायणरावांनीं गज्जरांच्या हाताखालीं रंगकला साध्य केली. त्याच कामांत एक वर्ष नागपुरास राहून ते परत बडोद्यास आले आणि लवकरच मुंबईस जाऊन पेटिटच्या ओरिएंटल मिलमध्यें नोकरीस लागले. तेव्हांपासून रंगाच्या धंद्यांत त्यांची भरभराट होत जाऊन ते त्या विषयाचे चांगले तज्ज्ञ म्हणून गाजले.

तिसरे बंधु गणपतरावही कलाभवनांत वीणकाम शिकून स्वावलंबी बनले. मिळून रंग व वीण हे कापडाचे दोन मुख्य धंदे आमच्या घरचे होऊन, नारायणराव व गणपतराव ह्यांच्या हार्दिक सहकारानें धंदा व कुटुंब दोघांचीही ऊर्जितावस्था जमून आली. स. १९०० च्या ता. ६ जून रोजीं गणपति व बगूताई ह्यांचीं लग्नें सोलापुरजवळ कडबगांव येथें होऊन किर्लोस्करांशीं आमचा संबंध जुळला. स. १९०० च्या एप्रिलांत नारायणरावांनीं सोलापुरच्या वारद गिरणींत नोकरी स्वीकारून ते मुंबईहून तेथें गेले. त्या गिरणींत असतां ता. २२ एप्रिल, स. १९०१ ह्या दिवशीं आधण-पाण्याची फिरकी सुटून नारायणरावांचें सर्वांग भाजलें. उपचारान्तीं बरे झाले. सन १९०४ च्या आरंभीं त्यांनीं भायखळ्याजवळच्या खटाव मिलमध्यें नोकरी पत्करली व ग्रँटरोडजवळच्या अभ्यंकर चाळींत बिऱ्हाड करून राहूं लागले. सन १९०६ त त्यांनीं माधवजी धरमसी मिलमध्यें नोकरी पत्करिली, ती स. १९१२ डिसेंबरांत सोडून स. १९१३ च्या सुरुवाती-पासून ते बिलिमोरा येथें कायमचे राहून स्वतंत्र धंदा करूं लागले.

§ नारायणरावांची ही दुसरी बायको यमुनाबाई ता. ११ मे, १९४५ रोजीं व खुद्द नारायणराव ता. ९ ऑक्टोबर, स. १९४८ रोजीं बिलिमोरा येथें वारले. त्यांचा जन्म २० मे, स. १८६९ चा असून वय ७९ होतें.

ह्यावरून लक्षांत येईल कीं सुमारें वीस वर्षें नारायणरावांनीं गिरणीच्या नोकरींत काढून त्या धंद्यांत अप्रतिम प्रावीण्य मिळविलें. अनेक खात्यांपैकीं डाइंग, ब्लीचिंग, फिनिशिंग हीं येथील मुख्य अंगें जर्मन व्यापाऱ्यांनीं हस्तगत करून आपले रंग व तेलें खपवून विलक्षण पैदास केली. जर्मन व्यापाऱ्यांची ही कल्पि प्रो० गज्जरांच्या मार्फत नारायणरावांनीं पूर्णपणें हस्तगत केली आणि पुढील वीस वर्षांत आपल्या हस्तकांच्या द्वारा त्या कलेचा देशभर फैलाव केला. ह्या धंद्यांत नारायणरावांची छाप चहूंकडे बसून त्यांस त्या कामीं किफायतही चांगली होऊं लागली. रंग विकत घेऊन ते गिरणींत वापरायचे आणि रंगवलेलें सूत व कापड परत गिऱ्हाइकांस विकायचें. ह्या दोन्ही बाबतींत मालकास नुकसानींत न आणतां राजरोस कमिशन घेण्याचा प्रघात आहे. तें कमिशन नारायणरावांस मिळूं लागलें. शिवाय त्यांचा दरमहाचा दोनचारशें पगार असे तो वेगळा. नारायणरावांनीं अनेक महाराष्ट्रीय रंगारी आपल्या हाताखालीं तयार करून ते देशभरच्या गिरण्यांत बाहेर कामाला पाठविले. मिळून गिरणींतील रंगकामाचा हा धंदा कैक वर्षें नारायणरावांनीं काबीज केला. मात्र गिरणींच्या त्या दोषी वातावरणांत त्यांची पचनक्रिया बिघडली, तो त्रास त्यांना अखेरपावेतों सहन करावा लागला. नारायणरावांचा हा विक्रम माझ्या रियासतीपेक्षां व्यापारी दृष्टीनें महाराष्ट्राला मोठें भूषण आणणारा बनला आणि त्यांचे उपकार मानणारे पुष्कळ इसम अद्यापि ठिकठिकाणीं आहेत.

नारायणराव अभ्यंकरांच्या चाळींत राहत असतां कोंकणांतून आमचे वडील बडोद्यास येण्यासाठीं मुंबईस आले. तेथें तिपारी जखमेच्या व्यथेनें त्यांचा एकाएकीं अंत झाला. दसऱ्याच्या आदल्या दिवशीं ता. १५ ऑक्टोबर सन १९०७ रोजीं ते वारले. तेव्हां त्यांचें वय ७३ वर्षांचें होतें. मला बडोद्यास तार गेली, पण मी येऊन दाखल होण्यापूर्वींच त्यांचें दहनही आटोपलें होतें. अकस्मात् मृत्यु आल्यानें आम्हा सर्वांस व मातुःश्रीस फार कठिण वाटलें. पण खुद्द त्यांना कोणतीही काळजी अशी उरली नव्हती. त्यांचें सर्व ऋण आम्ही फेडून राहतें घर मोठें बनविलें होतें. आम्ही सर्व मुलगे उद्योगास लागून आपापल्यापरी प्रतिष्ठा मिळवूं लागलों. लग्नादि कार्यें व्यवस्थित होऊन आमचें कुटुंब उत्तरोत्तर प्रगतीच्या

पंथास लागत होतें. इहलोकचें कर्तव्य वडिलांस कांहीं उरलें नसून त्यांना पूर्ण निश्चिति लाभली होती.

२. शेतीचे प्रयोग

स. १८९२ त मी स्वित्झर्लंडचें लोकजीवन पाहून आल्यावर कोंकण प्रदेशाच्या भूरचनेंत नद्या, डोंगर, पर्जन्य, हवा इत्यादींची अनुकूलता लक्षांत येऊन हें केवळ नंदनवन सहज बनूं शकेल, अशी माझी भावना झाली. फक्त लोकांचा सहकार व सरकारचा पाठिंबा एवढीच उणीव तेथें वाटली. घरोघर जलशक्तीनें वीज खेळवून तिजमुळें शेती, बागा, वृक्षोत्पादन असे व्यवसाय सहज वाढवितां यावे, युरोपची बर्फाळ हवा प्रतिकूल असतां जर स्वित्झर्लंडची एवढी भरभराट होते, तर कोंकणच्या माफक हवेंत जास्तच फायदेशीर धंदे निर्माण करतां येतील, रस्ते-आगगाड्यांनीं लोकांचें जीवन समृद्ध बनेल, लोक उद्योगी व बुद्धिमान्, साध्या राहणीचे, अल्पसंतुष्ट असल्यामुळें, ह्या प्रदेशाची भरभराट तावडतोब व्हावी असा अंदाज मीं बांधला आणि तशी सूचना मी कांहीं काळ लेखांनींही जाहीर करीत गेलों. धो धो वाहाणारे जलप्रवाह सर्व समुद्रांत फुकट जातात, त्यांचा उपयोग केला तर सोनें पिकलें पाहिजे. पण अनेक अडचणींस्तव हें माझें स्वप्न साकार होऊं शकलें नाहीं. अद्यापि (स. १९५५ च्या एप्रिलांत) तें दूरच आहे. असो.

बडोद्यांत त्या वेळीं नवीन उद्योगांची लाट पसरत होती. गुजरातच्या जमिनी सुपीक, सरकारचें साह्य भरपूर, आमचें कोंकणांतलें दैन्य तेथें नाहीं. जवळच्या मंडळींस कांहीं तरी उपयुक्त काम पुरविणें जरूर आहे असें आम्हां बंधूंस वाटूं लागलें. त्यांतल्या त्यांत माझ्याच वयाचे आमचे दोन मातुल हरि व विठ्ठल रिकामे होते, त्यांना कामास लावण्याची निकड उत्पन्न झाली. हरिमामा कुटुंबासह आमच्याकडे बडोद्यास राहून कलाभवनांत सुतार, फिटर अशीं कामें करीत. त्यांत त्यांचा निर्वाह भागूं लागला. नारायणराव व मी बोलून ठरविलें, कीं बडोद्यांतच थोडी जमीन घेऊन तेथें विठूमामांस आणावें. शेतीचा धंदा एकदम फायदेशीर होणारा नसला तरी त्यांत नुकसानीची भीतिही फारशी नाहीं. उद्योग केल्यास पोट भरण्यास अडचण पडूं नये. अशा विचारानें आम्ही स. १८९४ त

बडोद्यापासून १० मैलावर खाळगांवीं थोडीशी शेतजमीन विकत घेऊन तेथें विठूमामांस ठेविलें. घर, जनावरें, शेतीचीं आयुधें इत्यादि बनविण्यास खर्च फार लागूं लागला. त्या वेळीं आमची प्राप्ति अगदीं बेताची, कोंकणांतील वडिलांचा खर्च अंगावर, अशा कारणांनीं हा शेतीचा प्रयोग आम्हांस थोडासा जडच वाटूं लागला. कोंकणांत भिका चंदूरकर नांवाचा माझ्याच वयाचा आमचा विश्वासू नोकर होता, त्यास बायकोसकट आम्हीं खाळ येथें आणून ठेविलें. दोनतीन वर्षें हा उद्योग आम्हीं कसाबसा झेपला. स. १८९७ त सर्वत्र प्लेगचा फैलाव होऊन दुष्काळ पडला. चहूंकडे धामधूम उडाली. त्या सालच्या ऑगस्ट–सेप्टेंबरांत दुष्काळग्रस्त भटक्यांनीं खाळच्या आमच्या त्या झोपडीवर रात्रीं हल्ला करून नाहक त्या इमानी नोकरास ठार मारिलें, त्यामुळें आम्हांस व विठूमामांस वैताग येऊन आम्हीं ती खाळची जमीन सोडून दिली. उद्योग अंगाशीं आला असेंच म्हणावें लागतें.

नारायणरावांची उमेद मात्र त्यामुळें खचली नाहीं. गिरणीच्या कामांत त्यांची प्राप्ति व प्रतिष्ठा दिवसेंदिवस वाढत गेली. हिंदुस्थानांतील दूरदूरच्या अनेक गिरण्यांत रंगाच्या बाबतींत त्यांचा हात धरणारा दुसरा कोणी नव्हता. पुष्कळ तरुण उमेदवार त्यांचा आदर ठेवून आपलीं कामें चोख बजावूं लागले. वडिलांच्या खर्चाच्या वगैरे व्यवहारासंबंधानें आम्ही दोघे एकविचारानें वागून सर्व निकाल करीत गेलों. नारायणराव क्वचित् प्रसंगीं वडिलांशीं कठोरपणानें वागत, तो प्रकार मला मानवत नसे. मी समजुतीच्या वाटेनें वडिलांची मर्यादा राखून निभावणूक करीं. तथापि आम्हां दोघा बंधूंत पुष्कळ काळपर्यंत उत्कृष्ट गोडवा नांदत गेला.

स. १९०४ पासून सुमारें चार वर्षें नारायणराव अभ्यंकरांच्या चाळींत राहत होते. तेथें असतांच बंधु भाऊंचें लग्न ता. २८ नोव्हेंबर, स. १९०५ सालीं झालें, तेणेंकरून रत्नागिरीच्या खेर मंडळींशीं आमचा परिचय चालू झाला. अभ्यंकरांच्या चाळींत आमचे स्नेही परांजपे बंधु राहत होते, तेच नेटिव्ह ओपिनियन पत्र चालवीत. आमचा त्यांचा परिचय जडला. डॉ० गंगाधर परांजपे तर गोकुळदास तेजपाळच्या बोर्डिंगस्कुलांत मजबरोबर राहत असून माझ्याच सूचनेवरून ते बडोद्यास गेले. गजरनीं त्यांना

कलाभवनांत नोकरीवर घेतलें. पण चारदोन महिन्यांतच त्यांचें पटेनासें होऊन ते स्वतंत्र दवाखाना घालून बडोद्यांत डॉक्टरीचा धंदा करूं लागले. माझ्या बडोद्याच्या सबंध नोकरींत ह्या परांजप्यांशीं आमचा निकट घरोबा होता. त्यांचे बंधु केशवराव व विनायकराव मुंबईस अभ्यंकरांच्या चाळींत राहत, त्यांच्याशीं नारायणरावांचा तशाच प्रकारचा स्नेहसंबंध जुळला. ही परांजपे मंडळी गोड व बुद्धिमान् खरी, परंतु त्यांचें आमचें पटेना. मी हें ओळखून त्यांस दूर ठेवून सावधपणें वागलों. परांजप्यांशीं सख्य ठेवूं नये अशी सूचनाही मला महाराजांकडून मिळाली. मुंबईंत नारायणरावांस परांजप्यांची संगत नसावी अशी सूचना मला वडिलांनीं देखील केली. त्यावरून मी हलक्या वाटेनें नारायणरावांस सांगून अभ्यंकर चाळींतून त्यांचा मुक्काम हलविला. स. १९०८ च्या जून महिन्यांत नारायणराव ग्रँटरोडवरील जागा सोडून विलेपार्लें येथें वैद्यांच्या शेजारीं राहण्यास गेले, आणि गणपतीनें आपलें वेगळें बिऱ्हाड दोन हत्तींच्या मंगळदास वाडीच्या जागेंत नेलें. नारायणराव पार्ल्याहून रोज आगगाडीनें माधवजी धरमसीच्या गिरणींत कामास जात. स. १९१० सालीं मीं सहा महिने रजा घेऊन पार्ल्यासच नारायणरावांकडे राहून रियासत छापण्याचें काम केलें. पार्ल्यास वैशाख व० ५ रविवार ता. २९ मे, स. १९१० ह्या दिवशीं श्रीवत्स व मकरंद ह्या आमच्या दोघां मुलांच्या मुंजी मोठ्या उत्साहांत सिद्धीस गेल्या.

स. १९०९–१० सालापासून आम्ही त्रिवर्गबंधु विभक्तपणें आपापले उद्योग निर्माण करण्यास नेटानें लागलों. तत्पूर्वी स. १९०५ पासून गणपतरावआबा गिरणींत लागणारा पातळ साबण, तेलें वगैरे जिन्नस अल्पप्रमाणावर बनवूं लागला, त्यास नारायणरावांच्या शिकवणुकीचा उपयोग विशेष घडला. मलबारमध्यें धूपा नांवाचें एक फळ उत्कृष्ट तेल देणारें वायां जात होतें, त्याचा तपास लावून धाकटा बंधु भास्कर ह्यास त्या कामगिरीवर रवाना केलें. स. १९१० त मेणबत्तीच्या लहानशा उद्योगाची जुळवणीही ह्या बंधूंनीं केली. हे धंदे प्रथम मंगळदास वाडींत सुरू होऊन पुढें त्यांचा विस्तार बिलिमोऱ्यास झाला. दरम्यान चि. भाऊ इंग्लंडांत नेत्रविद्येचें अर्जन करीत चार वर्षें कामांत होते ते स. १९१२ अखेर परत येऊन स. १९१३ च्या ऑक्टोबरांत पावेल बिल्डिंगमध्यें राहून काम करूं लागले. तोंपावेतों वरील बंधूंचे उद्योग मंगळदास वाडींत चालले.

३. बिलिमोऱ्याचा कारखाना

माझा बंधु गणपतरावआबा बडोदा हायस्कुलांतून मॅट्रिक झाल्यावर स. १८९८ सालीं कलाभवनांत जाऊन वीणकाम शाखेंत दाखल झाला. नंतर कांहीं दिवसांनीं सोलापुरचे लक्ष्मणराव टिकेकरही बडोद्यास येऊन त्याच शाखेंत शिकूं लागले. एक वर्ष शिक्षण मिळवून ते दोघे सोलापुरास गेले आणि तेथें १८९९ त त्यांनीं हातमागाचा स्वतंत्र धंदा चालू केला. त्यांत ते स्त्रियांचीं तऱ्हेतऱ्हेचीं लुगडीं व पातळें काढूं लागले. हीं नवीन हातविणीचीं टिकेकरी लुगडीं महाराष्ट्रभर नामांकित बनलीं. चारपांच वर्षें एकत्र काम केल्यावर दोघांना तेथें पुरेसें काम नाहीं असें वाटून आबा स. १९०५ सालीं मुंबईस आला आणि सोलापुरचा सर्व कारखाना टिकेकरांचा झाला. मुंबईस नारायणराव आपला पसारा वाढवीत होते, त्यासाठीं गणपतीला त्यांनीं हाताशीं घेतलें आणि साबण बनविण्याचा खासगी धंदा चालवून त्यांतच रंगांचीं तेलें वगैरे आणखी कांहीं पदार्थ उत्तरोत्तर त्यांनीं वाढविले. कांहीं काळानें ह्या कामाला त्यांनीं मेणबत्त्या तयार करण्याची जोड दिली. हीं कामें मंगळदासवाडींतच चालू होऊन स. १९०५ पासून पुढें सातआठ वर्षांत चांगली किफायत देऊं लागलीं. कुटुंबखर्च सांभाळून ह्या कारखान्यांत चाळीस-पंचेचाळीस हजारपर्यंत किफायत झाली. तेव्हां नारायणरावांनीं हा कारखाना बिलिमोऱ्यास नेण्याचें ठरवून त्यांत त्यांनीं आपले साठपांसष्ट हजार व गणपतीचे चाळीसपंचेचाळीस हजार मिळून एक लाख स्वतःचें भांडवल घालून तेथें आपला स्वतंत्र कारखाना चालू केला.

दरम्यान जपानांत रसायनाचा शिक्षणक्रम पुरा करून परत आलेले व्ही. नारायणराव नांवाचे एक आंध्रप्रांतीय तरुण पदवीधर गृहस्थ नारायणरावांस भेटले. त्यांनाही नवीन काम अंगावर घेण्याची उत्कंठा असल्यामुळें तेलाचें पृथक्करण करण्याची योजना ठरवून जर्मनीहून यंत्रसामुग्री आणण्याकरितां व्ही. नारायणराव ह्यांस तिकडे स. १९१० च्या डिसेंबरांत रवाना केलें. मिळून बिलिमोरा येथें तेलपृथक्करणानें अनेक वस्तु बनविण्याचा मोठा कारखाना सिद्ध करण्याचा घाट जमून आला. तेथील कारखान्याचा पाया घालण्याचा समारंभ ता. ३१ मार्च, स. १९११ रोजीं

गुढी पाडव्याच्या मुहूर्तानें सिद्धीस गेला. मी त्या समारंभास बिलिमोऱ्यास हजर राहून लगेच पुढें महाराजांच्या स्वारीबरोबर युरोपास गेलों. ती माझी युरोपची चौथी खेप होय.

त्या वेळीं माधवराव गोडबोले ह्यांचा चाकोलेटचा कारखाना बिलिमोऱ्यास होता त्यास लागूनच जास्त जागा खरेदी करून आमच्या तेलकारखान्याच्या इमारती त्वरेनें बांधण्यांत आल्या. दरम्यान गोडबोले ह्यांनीं चाकोलेट कारखाना सरकारांत गहाण टाकून कर्ज घेतलें होतें, त्याची फेड न झाल्यामुळें त्या चाकोलेट कारखान्याचें लिलाव होऊन तोही नारायणरावांनीं अकरा हजार रुपयांस खरेदी केला. अशा रीतीनें ते दोन कारखाने एका मालकीचे बनले.

बडोद्याचे एक नामांकित सरदार नरसिंगराव बाबासाहेब घोरपडे हे सद्गृहस्थ आम्हां बंधूंच्या निकट परिचयाचे असून त्यांजपासून मंगळदास-वाडीच्या कारखान्यासाठीं जरुरीप्रमाणें पांचसात हजार रुपये रक्कम भांडवल म्हणून वेळोवेळीं घेतलेली होती. हे घोरपडे व गणपतरावआबा बडोदा हायस्कुलांत वर्गबंधु असून निकट स्नेही होते. पुढें जेव्हां बिलिमोऱ्याचा मोठा कारखाना वाढूं लागला तेव्हां यंत्रसामुग्री वगैरेच्या खर्चाकरितां जास्त भांडवल पाहिजे होतें म्हणून त्यांत घोरपडे ह्यांनीं आणखी रक्कम कारखान्यास कर्जाऊ दिली. पहिलें व नवीन मिळून पंचवीस हजार भांडवल केवळ गणपतरावांच्या विश्वासावर घोरपड्यांनीं ह्या कामीं गुंतविलें. एक दोन वर्षांत बिलिमोऱ्याचा कारखाना प्रसिद्धीस येऊन सरदेसाई बंधूंचें कर्तृत्व बाहेर प्रगट झालें आणि बऱ्याच स्नेही व आप्त मंडळींनीं आपल्या रकमा त्यांत गुंतविल्या. युरोपांतून यंत्रें आलीं तीं उभारण्यांत येऊन कारखान्याचा पसारा वाढत गेला. लहानमोठ्यांचें सर्व मिळून दीड लाखांवर भांडवल आपसांत उभें झालें. पण एवढ्या भांडवलावर काम भागेल असें वाटलें होतें, तो अंदाज चुकून आणखी दोन लाख तरी रक्कम कारखाना चालविण्यास पाहिजे अशी निकड उत्पन्न झाली. आंध्र सहकारी व्ही. नारायणराव ह्यांनीं जर्मनीचीं यंत्रें आणलीं, पण पुढें त्यांचें न पटून ते दुसरीकडे निघून गेले.

अशा प्रकारें आमच्या उद्योगाचा गाडा त्वरेनें उत्कर्ष पावत असतां त्यांत एक अनपेक्षित विघ्न उपस्थित झालें. मला वाटतें संसारांत भलतींच विघ्नें

उत्पन्न होणें हा सृष्टिक्रमच आहे. मी वडील बंधु व माझे होतकरू दुसरे चार बंधु असे पांच असामी सदा एकत्र मोकळेपणीं प्रत्येक लहानमोठी बाब उरकीत होतों. एखाद्याची दृष्ट लागावी एवढा आमचा हार्दिक एकोपा उत्साहदायक होता. त्यांत माझी वृत्ति बुद्धीस पटेल तो आचार करण्याची असून तींत प्रचलित अंधश्रद्धा, जपजाप्य, फलज्योतिष अशा अवान्तर गोष्टींस थारा नव्हता. ह्या बाबतींत नारायणरावांची भावना भिन्न तऱ्हेची बनत गेली, त्याची प्रथम मला कल्पना नव्हती. त्यांना निराळ्या माणसांची संगत मिळत चालली हें आम्ही जाणून होतों, पण त्याचा परिणाम कारखान्याच्या व्यवहारावर उत्तरोत्तर घडूं लागला. विष्णुपंत लेले, हंसस्वामी, केडगांवचे नारायणमहाराज अशांच्या भेटींत व सहवासांत नारायणरावांचीं मतें भिन्न बनूं लागलीं. ते कुंडल्या व ग्रह ह्यांचा विचार व्यवहारांत करूं लागले. स्नानसंध्या, भजनपूजन ह्याही बाबतींत ते आमच्याहून भिन्न विचारसरणी स्वीकारूं लागले. बिलिमोऱ्यास स्वतंत्र वातावरण प्राप्त झाल्यावर हंसस्वामी व त्यांचा शिष्यवर्ग त्यांच्याभोवतीं गोळा होत गेला आणि गुरुकृपेनें अवघड गोष्टी साध्य होतात, त्या गुरूची सेवा हातून घडावी अशी त्यांची वृत्ति बनत जाऊन त्याचा परिणाम कारखान्यावर होऊं लागला. हा कारखाना गायकवाडी राज्यांत असल्यामुळें इंग्रजी राज्यांत न मिळणाऱ्या कित्येक सवलती त्यास तेथें मिळत गेल्या आणि मी खुद्द महाराजांजवळ असल्यामुळें सहजीं त्याची माहिती महाराजांस व अंमलदारांस होत गेली.

आम्ही सर्व बंधु आपापले उद्योग आपसांत एकत्र मोकळेपणीं वाटाघाट करून पूर्ण विचारानें ठरवीत होतों. महाराजांच्या कामांत माझा लौकिक वाढला, त्याच्या लागोपाठ माझे आणखी चौघे बंधु निरनिराळ्या व्यवसायांत तयार होऊन नवीन उद्योग करूं लागले, तेणेंकरून समाजांत व धंद्यांत आमची पत व प्रतिष्ठा वाढत गेली. स. १९१४ सालीं युरोपांत युद्ध सुरू झालें तेणेंकरून तयार मालास विशेष मागणी येऊं लागली. पण पुरेसें भांडवल नसल्यामुळें कारखान्याचें काम अडून बसलें. बडोद्यांत आमचा लौकिक होताच, त्यांतही माझ्या परिचयाचे व्ही. पी. माधवराव हे दिवाण म्हणून बडोद्यास आले. त्यांस मीं कारखान्याची हकीकत कळवितांच त्यांनीं सरकारांतून भांडवल देण्याची झटपट त्वरेनें करून महाराजांची मंजुरी मिळविली. गणपतरावास मुंबईहून बोलावून आम्ही दोघांनीं दिवाणांची भेट

घेतली. त्यांनीं एका दिवसांत सर्व काम सिद्ध करून बडोदा बँकेमार्फत एक लाख रक्कम बिलिमोऱ्याच्या कारखान्यास भांडवल म्हणून देवविली. तेव्हांपासून बँकेचे मॅनेजर रॅंडल ह्यांचा व आमचा एकमेकांशीं आर्थिक व्यवहार सुरू झाला. आमच्या कारखान्याच्या कामांत महाराणी चिमणाबाई ह्यांचेंही लक्ष होतें. त्यांनीं चॉकोलेट कारखान्याला पंचवीस हजार रुपये कर्जाऊ भांडवल दिलें. त्याबद्दलचें कर्जखत नारायणराव व गणपति ह्या दोघांच्या सह्यांनीं पूर्ण झालें.

बिलिमोरा येथील ह्या नवीन उद्योगाच्या उभारणीस अनेक अनुभव व योग सहजासहजीं जमत गेले. ह्याच सुमारास बडोद्यास एक शेतीचें प्रदर्शन भरलें, त्यांत उद्योगधंदे वाढविण्याचा महाराजांचा मुख्य हेतु होता. प्रदर्शन पाहण्यास बाहेरचे तज्ज्ञ लोक आले, त्यांत बंगालचे नामांकित केमिस्ट पी. सी. रॉय हे एक असून त्यांनीं महाराजांच्या आग्रहावरून देशी उद्योगधंद्यांसंबंधीं एक अत्यंत उद्बोधक व्याख्यान कॉलेजांत दिलें. महाराज व अनेक मोठी मंडळी त्यास हजर असून रॉय ह्यांच्या प्रतिपादनानें लोकांत प्रचंड उत्साह निर्माण झाला. त्यांच्या व्याख्यानाचा भर तैलद्रव्य-पृथक्करणाचाच मुख्यत: होता. ह्या विषयाकडे पूर्वी कोणाचेंही लक्ष नव्हतें. हिंदुस्थानांत नानाप्रकारचीं तेलें उत्पन्न होत असून तीं सर्व परदेशीं निर्यात होतात, ही संपत्तीची मोठी हानि होय. कोणत्याही तेलांत स्टीरिन, ग्लिसरीन व ओलीन हीं द्रव्यें मुख्य असून ह्यांजपासून शेकडों व्यवहारोपयोगी वस्तु बनवितां येतात. मात्र तेलांचें पृथक्करण करून हीं द्रव्यें वेगळीं करावीं लागतात. हाच विषय त्या व्याख्यानांत स्पष्ट झाला. तोच प्रयोग नारायणराव व गणपति ह्यांनीं बिलिमोरा येथें निर्माण केला होता. त्याचा चांगला पुरस्कार बडोदें संस्थानाकडून झाला. एवढें अनुकूल वातावरण व उत्साह बहुधा दुसऱ्या कोणत्याही धंद्यास लाभत नसतो. बाह्य भानगडींमुळें हा प्रयोग त्या वेळीं विफल झाला आणि अद्यापि (स. १९५४ त) बिलिमोऱ्याचा हा तैलपृथक्करणाचा कारखाना संपूर्ण सिद्ध झालेला नाहीं.

कारखान्याच्या सुरुवातीसच आणखी एक नवीन किटाळ उत्पन्न झालें. स. १९१० पासून हिंदुस्थानांत इंग्रज सरकारविरुद्ध क्रांतिकारकांची चळवळ उपस्थित झाली, तींत इंग्रज सरकारचा संशय सयाजीराव व त्यांचे अंमलदार ह्यांजवरही थोडाबहुत निर्माण झाला. दोनतीन वर्षेंपावेतों

हें किटाळ बडोद्यांत वावरत होतें. स. १९११ च्या दिल्ली दरबारांतील महाराजांच्या वागणुकीनें त्यांत आणखी भर पडली. बॉंब उडविण्याचे प्रयोग बडोदें राज्यांत होतात त्यांचें निर्मूलन करण्याचा उद्योग इंग्रज सरकारनें चालू केला. त्यांत मॅक्रे नांवाचा एक इंग्रज अधिकारी पोलीस कमिशनर होऊन बडोद्यास दोन वर्षें राहिला. ह्याच संकटाच्या निवारणासाठीं महाराजांनीं व्ही. पी. माधवराव ह्यांस दिवाणगिरीवर आणलें. स. १९१३ सालीं ही धामधूम जोरांत होती. बिलिमोऱ्याच्या कारखान्यांत बॉंबची पैदास होत असावी म्हणून त्याचा तपास मॅक्रेनें कारखान्यांत येऊन बारकाईनें केला. पण मुळांतच कांहीं नाहीं त्यास त्याला तरी तेथें काय सापडणार! पुढें स. १९१४ सालीं युरोपांत युद्ध सुरू होऊन महाराजांनीं इंग्रज सरकारास अल्प स्वल्प लष्करी मदत केली तेव्हां पुढील राजकारणास निराळें वळण लागलें. मात्र अल्प काळ आम्ही सर्व बंधु ह्या संशयी आंदोलनांत सापडलों.

तैलपृथक्करणाचा कारखाना चालू झाला तरी नारायणरावांचे शेतीचे प्रयोग सुरूच होते. ह्यापूर्वीच रत्नागिरीस थोडी जमीन घेऊन आंब्यांचीं कलमें लावण्याचा उद्योग त्यांनीं स. १९०९ पासून केला असून त्या कामांत गोविंदरावआपा आठल्ये त्यांचे सहाय्यक होते. वास्तविक हे प्रकार निरुपयोगी होते असें नव्हे, पण आपणांस स्वतः झेपेल तेवढींच कामें अंगावर घ्यावीं, स्वतःच्या देखरेखीशिवाय कोणताही उद्योग यशस्वी होत नसतो, हें धोरण लक्षांत न ठेवतां नारायणराव जवळच्या मंडळीच्या भरीस पडले. ह्याच कारणास्तव रत्नागिरीची जमीन त्यांस काढून टाकावी लागली. पण तेवढ्या अनुभवानें स्वस्थ न बसतां त्यांनीं दमणच्या वापी स्टेशनच्या पूर्वेस सात मैल लवाशा म्हणून खेडें आहे तेथें सुमारें दीडशें एकर जमीन खरेदी केली आणि तिची व्यवस्था पाहण्यास त्यांनीं विठूमामांस तेथें कुटुंबासह आणून ठेविलें. आणखी एका कुटुंबाचा खर्च, घरें, विहिरी वगैरे तजविजी ह्या खर्चाच्या बाबी त्यांच्या अंगावर आल्या. म्हणजे बिलिमोरा येथील कारखान्याच्या उभारणींत ही आणखी एक नवीन ब्याद त्यांस संभाळणें भाग पडलें. लवाशाची जमीन वाईट नव्हती, पण हे धंदे यशस्वी होण्यास कित्येक वर्षांचा अवधि व रगड भांडवल पाहिजे. नारायणरावांचा हा अंदाज चुकला. विठूमामांस खर्चाची अडचण पडूं

लागली म्हणून नारायणरावांनीं त्यांना कळविलें, "तूर्त तुम्ही आपसांत उसनवारीनें अगर कर्ज काढून काम भागवा, पुढें सवड होतांच लोकांचें देणें फेडूं." बिलिमोऱ्याच्या कारखान्यांतून ताबडतोब फायदा होईल ही त्यांची कल्पना चुकली, उलट तो कारखाना चालू होण्यास बडोद्याचें मोठें कर्ज काढावें लागलें. हें कर्ज उभारण्याचें मुख्य तंत्र चि. आबानें शिकस्तीच्या खस्ता खाऊन सिद्ध केलें. त्यांचा दोघांचा तो एकोपा सारखा कायम राहता तर हे उद्योग फलदायी होण्यास फारशी अडचण नव्हती. पण ह्याच वेळीं बिलिमोऱ्याच्या कारखान्याचीं तंत्रें हंसस्वामीच्या सान्निध्यांत उलट दिशेनें फिरूं लागून मुख्य काम बिघडत गेलें.

लवाशाच्या खर्चाकरितां विठूमामांनीं उसन्या रकमा घेतल्या त्या फिटेनात, तेव्हां नारायणरावांनीं सांगितल्यावरून मामांनीं धरमपूरकर राजाच्या बंधूकडून साडेतीन हजार रुपये कर्ज काढून चालूचें किरकोळ देणें फेडिलें. ह्या कर्जाची प्रॉमिसरी नोट नारायणराव आपल्या सहीची देणार होते त्यासंबंधानें भानगडी उपस्थित होऊन मामा अवास्तव खर्च करतात याची जबाबदारी आपणावर नाहीं असा वाद चालला. त्यांनीं मामांजवळचे हिशेबाचे कागद मागवून घेतले तेव्हां कर्ज फेडण्याची निकड मामांना उत्पन्न झाली. अशा स्थितींत धरमपूरकरांनीं नारायणराव मालक व मामा व्यवस्थापक ह्या दोघांवर बलसाड कोर्टांत फिर्याद केली, तेव्हां उभयतांत तडजोडीचें बोलणें चालून चार हजारांवर निकाल करण्यास धरमपूरकर सावकार तयार असतां, नारायणरावांनीं असा दावा कोर्टांत मांडला कीं मामांनीं आपल्या मुखत्यारीनें भलतसा खर्च केला आहे, त्यास मी जबाबदार नाहीं. त्यावर मामांनीं आपल्या तर्फेचा पुरावा कोर्टांत दाखल केला. सर्व काम पुरें होऊन खर्चा सुद्धां एकंदर सोळा हजारांचा हुकूमनामा नारायणरावांविरुद्ध कोर्टानें देवविला. ह्या परिणामानें नारायणरावांना मोठा खेद होऊन त्यांनीं हायकोर्टाकडे अपील केलें. हायकोर्टानें खालील कोर्टाचा निकाल कायम केला. अशा प्रकारें हें प्रकरण नारायणरावांच्या अंगावर येऊन आपसांतील कौटुंबिक स्वास्थ्य बिघडलें. विठूमामांना उगाच कष्ट भोगावे लागून ते पुढें कोंकणांत आमचें गोवीलचें ठिकाण सांभाळून राहिले. तेथील खर्च अखेरपावेतों मींच चालविला. पुढें विठूमामा द्वारकेस आपल्या मुलाजवळ राहण्यास गेले तेथेंच त्यांचा अंत झाला.

व्यवहारांत संकटें व अडचणी पदोपदीं येतात, त्यांचें निरसन सचोटीनें करणें प्रत्येकाचें कर्तव्य होय. नारायणरावांच्या मनोरचनेंत हा जो नैतिक व्यत्यास उत्पन्न झाला, तो आम्हा इतर बंधूंत बिलकूल नाहीं. ह्याचा उगम माझ्या मतें त्यांचे गुरु हंसस्वामी ह्यांजकडे पोचतो. बिलिमोऱ्यास कारखाना गेल्यापासून कित्येक वर्षें त्यांचें अधिष्ठान तेथें कायम होतें. ह्याच हंसांचे चेले पुरोहितबावा शंकरराव गजानन पुढें इंग्लंडास जाऊन गुरु बनले तो प्रकार महाराष्ट्रांत महशूर आहे. मिळून ह्या दोघांच्या सहवासानें नारायणरावांना नसती उपाधि उत्पन्न झाली. बडोद्यांतून भांडवल मिळालें तरी कारखान्याचें काम बरोबर चालेना. नारायणराव तोंडानें म्हणत, ' गणपति माझा उजवा हात, ' पण अंतःकरणांतून तो त्यांना नकोसा झाला. कारखान्याच्या कामाची वाटाघाट नारायणराव हंसस्वामींशीं करूं लागले. ह्याचा परिणाम आप्तइष्ट व नोकरवर्ग इत्यादिकांवर सहज होऊं लागला. अशा रीतीनें अल्पकाळ स्वामींचें प्रस्थ वाढून त्याचा उपरोध व्यवहारावर होऊं लागला. स्वामींच्या आशीर्वादानें आपलीं कामें यशस्वी होतात, त्यांचा संतोष राखणें हेंच आपलें कर्तव्य अशी नारायणरावांची समजूत होऊन त्या धोरणाचा परिणाम कारखान्यावर होऊं लागला. स. १९१६ च्या मार्च महिन्यांत मातुःश्रींच्या उत्तरकार्यासाठीं आम्ही सर्व बंधु व मातुलमंडळी बिलिमोऱ्यास जमलों असतां मी मुद्दाम संधि घेऊन हे अनिष्ट प्रकार नारायणरावांच्या नजरेस आणले. वडीलकीच्या नात्यानें सर्वांचें मार्गदर्शन करून संभाव्य धोक्याचा इशारा देणें माझें कर्तव्यच होतें, तें मीं केलें. पण नारायणरावांस माझी कानउघाडणी रुचली नाहीं.

कोणत्याही उद्योगास घरचें हार्दिक मनुष्यबळ असेल तरच तो यशस्वी होतो. प्रस्तुत प्रकरणीं पाहतां गणपतीवर नारायणरावांचा विश्वास नाहीं हें मला उघड दिसूं लागलें, तेव्हां त्यानें व मीं त्यांना वारंवार स्पष्ट कळविलें कीं कारखान्यासाठीं अनेकांकडून लहानमोठ्या रकमा कर्जाऊ आणलेल्या आहेत त्यांचा हिशेब करून तुम्हीच सर्व जबाबदारी आपल्याकडे घ्या आणि गणपतीस पूर्णपणें कारखान्यांतून मुक्त करा, म्हणजे तो आपला उद्योग स्वतंत्र व वेगळा करूं लागेल. हा योग्य मार्ग नारायणरावांनीं न स्वीकारतां उलट कर्जाची जबाबदारी गणपतीच्या अंगावर टाकून आपण अलिप्त राहवें असा डाव आरंभिला. गणपति चुकत असेल, नारायणरावांना

तो ह्या कामांत नको असेल तर स्पष्ट बोलून सर्व व्यवहारांचा निकाल करणें हें त्यांचें कर्तव्य होतें, तें ते करीनात. स. १९१७ त ते माझ्या भेटीसाठीं अकल्पित बडोद्यास आले. दोन तीन दिवस राहिले. श्रीकान्त त्यांचा मुलगा कॉलेजांत शिकत होता, त्याच्या लग्नाचा विषय त्यांनीं मजकडे काढिला. शीव येथें नवरे म्हणून ऐपतवान गृहस्थ राहत होते त्यांची मुलगी नारायणरावांनीं पसंत केली. त्यांतला हेतु असा कीं, नवऱ्यांचा आश्रय स्वीकारून कारखान्याचें दैन्य भागवूं. मला हा व्यवहार पटला नाहीं. सोयरिकीच्या बाबतींत असा देवघेवीचा आर्थिक संबंध ठेवणें अत्यंत अनिष्ट असें मीं त्यांस स्पष्ट बजावलें. पुढें त्यांनीं तें लग्न जुळवून नवऱ्यांची मुलगी घरांत आणली, तेणेंकरून आर्थिक भानगडी पुढें उपस्थित झाल्या त्या येथें सांगण्याची जरुरी नाहीं.

बडोद्यांतून दीड लाख घेऊनही कारखान्याचें काम भागेना. यंत्रें, नोकरचाकर, इमारती, असे अनेक खर्च उत्पन्न होऊन ते नारायणरावांना एकट्याच्या जबाबदारीवर भागवितां येईनात. तेव्हां सर्वांनीं स्पष्टपणें एकत्र चर्चा करून मार्ग ठरविणें जरूर होतें, तसें न करितां नारायणरावांचीं अंतस्थपणें अनेक कारस्थानें चालू झालीं. भांडवल पुरत नाहीं तर लिमिटेड कंपनी बनविणें हा उघड मार्ग होता, पण आपल्या हातची मालकी कंपनी केल्यानें नाहींशी होते म्हणून ते इतर मार्गांत शिरूं लागले. बडोदा बँकेचा मॅनेजर रँडल ह्याच्या मनांत ते गणपतिसंबंधानें अविश्वास उत्पन्न करूं लागले. रँडल मला ह्यासंबंधानें विचारणा करी, त्यांत मला कांहींच सांगतां येईना. अशा किती तरी भानगडी दोनचार वर्षें चालल्या, त्यांची आतां उजळणी करण्याची जरूर नाहीं. अशा स्थितींत कांहीं तरी योजना ठरवून नारायणराव १९२१ च्या फेब्रुवारींत शंकरराव पुरोहित व शंकर खंडो तळवलकर ह्या आपल्या दोघां हस्तकांस बरोबर घेऊन मुंबईस आले. कंपनीचें सर्व दप्तर मुंबईत पॅविल बिल्डिंगमध्यें गणपतीच्या ताब्यांत होतें. ते सर्व कागदपत्र आपण कबजांत घेऊन पुढील विचार ठरवावा हा त्यांचा उद्देश. ता. २६ फेब्रुवारीं रोजीं दोन प्रहरचीं जेवणें एकत्र होऊन, गणपति बाहेर कामास गेला अशी वेळ साधून, नारायणरावांनीं बाहेरचे मजूर आणून कपाटांतले कागदपत्र, हिशेबाच्या चोपड्या, पत्रव्यवहार, बारनिशा वगैरे काढून त्यांचे भारे बांधले आणि ते भारे त्यांनीं लगोलग

बिलिमोऱ्यास पाठवून दिले. स्वतः नारायणराव रोजच्याप्रमाणें घरांत राहिले, पण वरील कृत्याचें अक्षर त्यांनीं गणपतीजवळ काढलें नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं टाइम्सपत्रांत नारायणरावांच्या सहीची जाहिरात प्रसिद्ध झाली कीं " बिलिमोऱ्याच्या कारखान्याचे मालक आपण एकटे आहों, गणपतराव माझा नोकर असून त्यास मीं कामावरून दूर केला आहे, त्याजकडे आतां कोणीं पैशाचा व्यवहार करूं नये. तसा व्यवहार केल्यास त्याची जबाबदारी आपणावर नाहीं. माझे कागदपत्र मीं आपल्या ताब्यांत घेतले आहेत." नारायणरावांनीं आपले कागद ताब्यांत घेतले ह्यांत गैर कांहीं नाहीं. मात्र उघडपणें गणपतीला सांगून वाटाघाटीनें व्यवस्था केली असती तर पुढील अनिष्ट कलह एकमेकांच्या सलोख्यानें मिटून कोर्टाचा आश्रय टळला असता. आपण सर्व प्रकार सोयीनें मिटवूं, त्यांत पोलिसांचा संबंध आणूं नये असा विचार गणपतीनें ठरविला. आम्हां इतर बंधूंस ह्या बनावानें केवढा उद्वेग वाटला तें लिहिण्याची जरूर नाहीं. मीं त्या वेळीं बडोद्यास होतों.

आजपर्यंत सुरळीत चाललेलें आमचें कौटुंबिक जीवन एकाएकीं निरास पावलें. सरदेसाईबंधूंचा लौकिक ढांसळला. आमच्या अनेक हितचिंतकांस हा प्रकार अत्यंत उद्वेगकारक वाटला. प्रकरण विकोपास जाऊं नये म्हणून मीं लगेच नारायणरावांस सूचना केली कीं बडोद्याचे दोघे हायकोर्टजज आमचे स्नेही रामभाऊ गोखले व आपासाहेब शारंगपाणी ह्यांनीं ह्या कलहाचा निर्णय करावा आणि तो उभयतांनीं मान्य करावा. मीं ह्या जज्जांस तशी विनंती केली. आपसांतला हा तंटा कोर्टांत जाऊं नये आणि कारखाना सुरळीत चालावा अशी माझी योजना होती, ती मीं नारायणरावांस कळविली. त्यांनीं आपल्या तर्फेनें बोलण्यास पुरोहित ह्यांस बडोद्यास पाठविलें. त्यांनीं गोखले व शारंगपाणी ह्यांची भेट घेऊन दोन दिवस खल केला. पुढील विचार नारायणरावांस भेटून कळवितों असें सांगून पुरोहित बिलिमोऱ्यास परत गेले. दुसऱ्या दिवशीं त्यांची मला तार आली कीं तडजोड आपणांस कबूल नाहीं. याचा परिणाम देणेंदारांकडे गणपतीचे लेख गुंतलेले असल्यामुळें नारायणरावांवर कोर्टांत दावा मांडणें गणपतीस प्राप्त झालें. १९२१ त नवसारी कोर्टांत फिर्याद दाखल झाली. माझ्या व इतरांच्या अंतःकरणास हा परिणाम अतिशय झोंबला. तीन वर्षें कोर्टांत काम चाललें. माझ्या व

इतरांच्या साक्षी झाल्या. प्रथम जिल्हाकोर्ट व पुढें बडोद्यास हायकोर्ट अशा-खालीं कैक दिवस काम चालून शेवटचा निकाल नारायणरावांविरुद्ध लागला. घोरपड्यांचें पंचवीस हजार घेतलेलें कर्ज बुडालें. बाई खेर ह्यांचे पांच हजार रुपये कारखान्याकडे कर्ज म्हणून घेतले ती त्यांची रक्कम वसूल झाली नाहीं. चिमणाबाई महाराणींनीं मात्र जागरूकपणें इलाज करून आपली रक्कम वसूल केली. माझी सर्व जीवनतपश्चर्या खलास झाली ह्याचा खेद किती वाटला म्हणून सांगूं !

४. गोड शेवट

नारायणरावांनीं सरळ मार्ग सोडून वाकडा डाव टाकला ह्यास ते स्वतः जबाबदार किती, किंवा हंस-पुरोहितांसारखे त्यांचे सल्लागार किती हें मला सांगतां येत नाहीं. परंतु अशा ह्या वृत्तीनें त्यांचा विशेष कांहीं फायदा झाला नाहीं हें उघड आहे. बिलिमोऱ्याचा हा एकमेव तैलपृथक्करणाचा हिंदुस्थानांतला कारखाना टोलेजंग बनण्याची सिद्धता होती ती फुकट जाऊन थोडाबहुत राष्ट्रघातही झाला ह्यांत संशय नाहीं. एकंदरींत ह्या व्यवहारांत अनेक कारणांनीं नारायणरावांवर उत्तरोत्तर नानाविध भीषण आपत्ति येत गेल्या, तेणेंकरून त्यांचें मनःस्वास्थ्य व प्रकृतिदेखील सर्वथा बिघडून गेली. कारखान्यावर संकटें आलीं. वाढत्या कुटुंबाचा खर्च चालविण्याची जबाबदारी उत्पन्न होऊन प्राप्ति फारशी उरली नाहीं. अशा परिस्थितींत चार दोन वर्षें त्यांचा काळ अत्यंत कष्टांत गेला. एक प्रकारची ही कठोर ग्रहदशाच म्हणावी. त्यांतून धैर्यानें त्यांनीं निभावणी करून यशस्वी मार्ग गांठला हें आज मोठें भाग्यच समजलें पाहिजे. ह्या परिस्थितींत मला सारखें वाटूं लागलें कीं आमचें कौटुंबिक बळ आतां नष्ट झालें. सुमारें पंधरा वीस वर्षें पावेतों आम्ही बंधु बरेच दुरावलों होतों ते पुनः सर्व एक होऊन योग्य मार्गास लागलों हें आम्हां सर्वांचें भाग्य होय. स. १९३८ च्या शारदोत्सव प्रसंगीं कामशेतला ऐतिहासिक संमेलन भरलें, त्यास नारायणराव सहकुटुंब हजर राहिले तेव्हांपासून दिलजमाई घडून आली आणि आज त्यांचे सुपुत्र त्यांचा धंदा नेटानें व नेकीनें चालवीत आहेत हें पाहून आम्हा सर्वांस मोठी धन्यता वाटते. नारायणरावांचा पुत्र श्रीकान्त अल्पायुषी झाला, तो हे प्रकार आम्हांस स्पष्ट बोलून दाखवीत असे. लवाशाचें ठिकाणही नारायणरावांच्या हातचें गेलें.

दैवयोगानें गेल्या गोष्टी सुधारून आज आमची सर्व नवीन पिढी आणि आठल्ये मातुलांची पिढी सदाचारानें उद्योग करून नांव काढीत आहेत हा प्रकार अत्यंत अभिनंदनीय होय आणि ह्यांतच उच्चतम राष्ट्रहित घडतें असें मला वाटतें.

उत्तरोत्तर नारायणरावही पूर्ववत् कुटुंबांत मिसळून गेले. स. १९४१ च्या नृसिंहजयंतीस ते व मी बरोबर गोविलास जाऊन तेथील देवदेव्हारा मला सांभाळतां येत नव्हता तो त्यांनीं बिलिमोऱ्यास आणून उत्कृष्ट निगेंत ठेवला हें पुण्य नारायणरावांस आहे. ते माझ्याहून लहान असतांही माझ्या अगोदर परलोकास गेले ह्याचें मला सदैव दुःख वाटतें. ७९ वर्षें वय होऊन ता. २९ ऑक्टोबर स. १९४८ शुक्रवारीं त्यांचा अंत बिलिमोऱ्यास झाला. †

स. १९३८ सालीं कामशेत येथें वर उल्लेखिलेला इतिहाससंमेलनाचा जो स्मरणीय समारंभ एक आठवडा झाला, त्या प्रसंगीं आम्ही सर्व बंधु, आप्त व मुलेंमुली एकत्र जमलों असतां बुधवार ता. ५ ऑक्टोबर रोजीं सायंकाळीं मीं माझें जीवनहृद्गत व्यक्त करणारा पुढील लेख वाचून दाखविला.

" ह्या प्रसंगीं आम्ही सर्व बंधु, त्यांचीं कुटुंबें, बहीण ताई, बगूताई, गोदूताई, सईताई वगैरे मुली, बापू जमेनीस, जयराम व श्रीराम आठल्ये, नाना प्रभानवल्लीकर अशा सर्व लहान थोर घरच्या मंडळीस मीं प्रेमपूर्वक आशीर्वाद देऊन अंत्यप्रयाणाची रजा घेतली. घर भरलेलें पाहून प्रेमाश्रु आले. मी म्हणालों, हा संसार सुखदुःखानें भरलेला आहे, त्यांतूनच प्रत्येकानें एकीनें व नेकीनें वागून आपला उत्कर्ष करून घ्यावा. सर्वांनीं एकमेकांचें साह्य केलें तरच मोठीं कामें सिद्धीस जातात. वडील मातुश्री, बंधु नरहरि व भास्कर, आवांच्या बायका, मातुल मंडळी दिवंगत झाली, त्यांचें दुःख करीत न बसतां आतां पुढील मार्गाचा उद्योग प्रत्येकानें करावा. उमेदीनें काम करीत राहवें. भलाई पैदा करावी. आपल्या शरीराचा व बुद्धीचा उपयोग दुसऱ्याचें भलें करण्यांत करावा, प्रथम आपण आपल्या मनाची शाबासकी मिळवावी, इतरांच्या निंदास्तुतीची परवा करूं नये. वडिलांच्या पश्चात् आज एकतीस वर्षें मला जमलें तसें कुटुंबनेतृत्व मीं सांभाळलें. त्यांत हातून बरें वाईट घडलें असेल, कोणाचें वाईट केलें असेल त्याची मला क्षमा करावी. जन्मतः मनुष्य रडत उत्पन्न होतो तर शेवटीं त्यानें

† पृ. ११७ वर ९ ऑक्टोबर दाखल आहे ती चूक होय.

आनंदांत निघून जावें. पुनः आपण सर्व असे एकत्र जमूं कीं नाहीं कोणीं सांगावें! आज जमलों आहों तर सर्वांनीं मला प्रयाणाची रजा द्यावी. तुम्हां सर्वांचे वाढते संसार सुखी व्हावे अशी प्रार्थना मी परमेश्वरापाशीं करतों. बरें वाईट काम करूं तेवढेंच मागें राहील. सर्वांनीं मला आनंदानें निरोप द्यावा. मी सर्वांचें कल्याण चिंतितों."

सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नुयात् ॥

प्रकरण सहावें

ऐतिहासिक पत्रसंभार

१ माझी भूमिका

२ चतुर्विध साह्यकर्ते, न्या० रानडे

३ पारसनीस

४ किंकेड

५ साने, भावे, आठल्ये

६ बा० ना० देव

७ चिंतामणराव वैद्य

८ नरसोपंत केळकर

९ मुनीर हुसेन किडवै व मायर्स

१० लॉर्ड लिटन

११ आणखी सन्मान्य व्यक्ति

१२ अपरिचितांकडून अभिनंदन

१३ दादासाहेब मावळंकर

प्रकरण सहावें

ऐतिहासिक पत्रसंभार

सत्संगतिः कथय किं न करोति पुंसाम् ॥

१. माझी भूमिका

इ. स. १८९८ सालीं माझी पहिली कृति मुसलमानी रियासत प्रसिद्ध झाली. ह्या कामाचा विस्तार पुढें एवढा होईल अशी प्रथम कल्पना नव्हती. संधि व स्वास्थ्य मिळत गेलें तसा माझा हुरूप वाढला. वाचन, भेटी, प्रवास, पत्रव्यवहार, वादविवाद अशा साधनांचा उपयोग करून मी श्रम करीत गेलों. कांहीं अडचण आली कीं तन्निरसनार्थ सुचतील ते उपाय लगोलग करीत गेलों. सहायकही मिळूं लागले. मुख्यतः बाहेरच्यांस पत्रें लिहून सदैव माहिती व मार्गदर्शन पैदा केलें. उत्तरें आलीं तीं बहुतेक मीं जपून ठेविलीं. ज्यांचें काम होऊन निरुपयोगी वाटलीं तीं फाडून टाकलीं. आज जीं शिल्लक आहेत तीं माझ्या मतें एकंदर पत्रांचा एक दशांश असेल. अलीकडे स्वास्थ्य मिळतांच मीं हीं सर्व पत्रें पुनः नीट लावून त्यांचें निरीक्षण केलें. त्यांत सुमारें शंभरएक गृहस्थांचा पत्रसंचय माझ्या नजरेस आला, त्यांत कोणाचीं चारदोन, कोणाचीं दहावीस अशीं पत्रें मला आढळतात. आणखीही ह्या मंडळींचीं पत्रें पुष्कळ होतीं, पण तीं काम झाल्यावर फाडून टाकलीं. त्या सर्वांत जुनें पत्र पुण्याचे प्रो. भानु ह्यांचें ता. १२ ऑगस्ट, स. १८९६ चें आहे. माझा मुसलमानी रियासतीचा हस्तलिखित ग्रंथ सर्व वाचून तो अवश्य छापावा अशी सूचना ह्या पत्रांत त्यांनीं मला केलेली आहे. त्यानंतर त्यांचा माझा पत्रव्यवहार खासगी व वर्तमानपत्रांतून टीकात्मक सारखा चालू होता आणि पुष्कळ मतभेद असूनही उभयतांचा स्नेह अखेरपावेतों अकृत्रिम राहिला. ते वारले तेव्हां पुण्यास त्यांच्या कौटुंबीयांचे सांत्वनार्थ मी गेल्याचें स्मरतें. ते पुष्कळ वेळां मजकडे बडोद्यास येऊन राहत व मी पुण्यास गेल्यावर त्यांजकडे भोजनचहा वगैरेचें अगत्य ते मला विशेष दाखवीत. फर्ग्युसन कॉलेजांत हरिभाऊ लिमये व भानु दोघेही इतिहासाचे प्रोफसर होते, पण हरिभाऊंची

अभ्यासाची मार्मिकता व बुद्धीचा पल्ला माझ्या मतें भानूंच्या ठिकाणीं नव्हता. पेशव्यांचे व नाना फडणिसांचे ते थोडे बहुत अंधभक्त असावे व ह्या आकुंचित भावनेंत महादजी सिंदे वगैरे ब्राह्मणेतरांच्या कर्तबगारीस त्यांच्या मांडणींत तितकासा वाव नसे, असें मला वाटतें. पेशवाईचा पहिला भाग मीं प्रथम प्रसिद्ध केला तेव्हां पहिल्या बाजीरावाची कर्तबगारी उठून दिसावी असा पुरावा विद्यमान नव्हता, त्यामुळें माझ्या विवेचनांत बाजीरावाचें वैगुण्य प्रगट झालें, त्यावर प्रो. भानूंनीं इंदुप्रकाशांत चार दोन महिने सारखे लेख लिहून माझ्यावर झोड उठविली. हा प्रकार होऊन गेल्यावर पेशवेदप्तरच्या तपासणींत बाजीरावाचा प्रचंड पत्रसंभार माझ्या नजरेस आला आणि त्यांत बाजीरावाचा पराक्रम इतका अलौकिक नजरेंत भरला कीं अलीकडील नवीन आवृत्तींत मीं आपलीं पूर्वीचीं मतें साफ बदलून बाजीरावाची योग्यता भरपूर दाखविली आहे. अद्यापि मला राहून राहून वाटतें कीं हा माझा बाजीरावाचा नवीन भाग वाचण्यास जर भानु जगले असते तर त्यांनीं माझें केवढें तरी कौतुक केलें असतें. मी अद्यापि म्हणतों कीं इतिहासलेखकानें आपली भूमिका न्यायाधीशाप्रमाणें सर्वथा निर्विकार ठेवली पाहिजे. जसा पुरावा पुढें येईल तसा तसा आपला निष्कर्ष बदलत जावा, त्यांत पूर्वग्रह बिलकुल असूं नये. आणि ह्या माझ्या पत्रसंभारांतून जर कोणता मुख्य सूर निघत असेल तर बहुतेकांनीं, परिचितांनीं किंवा अनाहूतांनीं, माझ्या ह्या निष्पक्षपात वृत्तीचें भरपूर कौतुक केलेलें आढळतें. हा ब्राह्मण तेवढा माझा व हा अन्यजातीय म्हणून परका अशी भावना माझ्या मतें मीं यत्किंचित् दाखविलेली नाहीं. इतिहासलेखकावर ही मोठी जबाबदारी आहे ह्याची जाणीव मी प्रतिक्षणीं बाळगीत आलों आहें. ह्यासंबंधानें रा. ब. बाळकृष्ण आत्माराम गुप्ते ह्यांच्या पत्रांत मला खालील उल्लेख आढळतात. हे गृहस्थ कसे करारी व एककल्ली होते हें ज्यांस ठाऊक असेल त्यांस त्यांच्या ह्या अभिप्रायाची किंमत विशेष वाटेल.

" तुमची कामाची चिकाटी व दीर्घ प्रयत्न हे गुण वर्णनीय असून अंधभक्तीनें एकपक्षी बनलेल्या लेखकांप्रमाणें तुमच्यांत हेकेखोरपणा नाहीं. उपलब्ध माहितीची चर्चा न्यायदृष्टीनें करण्याची तुमची हातोटी तुमचें नांव चिरकाल कायम ठेवील ह्यांत संशय नाहीं. " दुसऱ्या एका प्रसंगानें

ते लिहितात, " Sardesai is an eminent historian and writer who writes in a balanced mind. His Riyasats are great works which inspire readers and create enthusiasm and love for history. " हें लेखन स. १९२० सालचें आहे. पूर्वीचे दिल्लीच्या दप्तरखान्याचे डायरेक्टर सुरेन्द्रनाथ सेन ह्यांनीं कलकत्ता युनिव्हर्सिटीकडून " Administrative System of the Marathas " ह्या विषयावर ग्रंथ लिहून Doctorate ची पदवी मिळविली. तो ग्रंथ तपासण्यांत देवदत्त भांडारकर, गुप्ते व मी तिघे परीक्षक होतों. गुप्ते ह्यांचीं पत्रें १९१०–२० च्या कालांतलीं मजजवळ आहेत.

हिंदुस्थानच्या समग्र भागांतील, अनेक लहान मोठ्या व्यक्तींस पत्रें लिहून नानाविध माहिती मीं मागविली आणि बहुतेकांनीं ती मला संतोषानें पुरविली ह्याबद्दल मला ह्या सर्व माणसांचे फार मोठे उपकार वाटतात. ह्या उपकारांची फेडही मीं तितक्याच तत्परतेनें केली आहे. मी ज्याप्रमाणें अनेकांकडे याचना करीत आलों तशीच याचना मजकडे करणारे लोकही कांहीं थोडे नाहींत. बहुधा आठवड्यांतून एक दोन तरी पत्रें मला येतात, त्यांत नाना प्रकारची माहिती मागितलेली असते. अशी माहिती मी आपल्या शक्तीप्रमाणें ताबडतोब पूर्ण संदर्भासह नीट समजूत पडेल अशा प्रकारें प्रत्येकास सदैव पुरवीत आलों आहें. त्यांत कितीही श्रम पडले तरी कधीं कंटाळा मानला नाहीं, कीं पृच्छक लहान मोठा कोण आहे ह्याची पर्वा मीं कधीं केली नाहीं. आज पन्नास वर्षें हा माझा एक मोठा उद्योगच झाला असून कामशेतला ग्रंथसंग्रह हाताशीं व वेळाची सवड पुष्कळ म्हणूनच मला हें काम करतां आलें, आणि त्याजबद्दल सर्वांकडून मला भरपूर दुवाही मिळत आला आहे. स. १९०० सालीं मराठ्यांचा इतिहास किती तुटपुंजा होता आणि आज त्याला भरीव रूप कसें आलें आहे हा विचार माझ्या निरनिराळ्या आवृत्त्यांतून नजरेस आला म्हणजे ह्या महनीय कामांत माझाही थोडा बहुत हातभार लागला ह्याबद्दल मला कृतकृत्यता वाटते. जगांतील सर्वच कामें अशा अनेकांच्या उद्योगानें सिद्ध होतात. मात्र जितकी विषयाची परिपूर्णता होत जाते, तितके त्यांतले दोष किंवा उणीवाही जास्त नजरेंत येऊन तदनुसार लेखकाच्या भावी उद्योगाला तेज चढतें. सुधारणेला शेवट कधींच नसतो.

इतिहास विषयांत लोकांच्या गरजा काय आहेत हें समजून घेण्यांत मीं कधीं हयगय केली नाहीं. हा विषय मी देशोन्नतीकरितां लिहीत आहें, त्यापासून राष्ट्राला भावी कर्तव्याची स्फूर्ति मिळाली पाहिजे, केवळ दोषाविष्करणानें लोकांची नाउमेद होऊं नये हा उद्देश मी आपल्या विवेचनांत सदैव दृष्टीपुढें ठेवीत आलों. ह्याचा अर्थ मी असत्य इतिहास सांगतों असा नव्हे. बाप मुलांस धीर देत असतो, त्यांस पराक्रमोत्सुक बनवितो, तें काम राष्ट्राकरितां इतिहासकाराला करावयाचें असतें. ग्रँट डफसंबंधानें बोलतांना माझे गुरु कै. ग. व्यं. जोशी मला एकदां म्हणाले, "अहो सरदेसाई, तुम्हीच जर पेशव्यांची भरमसाट निंदा करूं लागलां तर त्यांचा वाली तरी कोण आहे बरें! आणि अशा निंदेचा उपयोग तरी काय!" मला हा विवेक पटला.

प्रसिद्ध झालेल्या कृतींतील दोष लोकांनीं दाखविले म्हणजे मीं विव्हळ होऊन केव्हां ह्या चुका दुरुस्त करीन अशी उत्कंठा लागे. लोकांच्या मनांत चुकीचे ग्रह उत्पन्न करण्याचा मला बिलकूल हक्क नाहीं. तें मी पाप समजतों. त्यापेक्षां गप्प बसणें बरें. माझ्या लेखांवर विसंबून लोक त्यांचा उपयोग करतात, ह्यास्तव झालेल्या चुकांची सुधारणाही मी शक्य तितक्या त्वरेनें करीत आलों आहें.

पत्रद्वारा माझ्या थोरामोठ्यांशीं ओळखी होऊन, त्यांच्या विविध सूचनांचा मला फार उपयोग झाला. वर्तमानपत्रांतील अभिप्रायांचीं कात्रणें मीं जपून ठेवलीं असून नवीन आवृत्तींत मी त्यांचा उपयोग करीत आलों आहें. पण माझा अनुभव आहे कीं पुष्कळदां हे अभिप्राय नुसते वरवर टोलवाटोलवीचे असून त्यांत अंतःकरणांतील कळकळ उतरत नसते. पूर्वपरिचित रागद्वेषांची भरपाई करण्याची ही एक संधि अभिप्रायलेखकांस सापडते आणि अशा अभिप्रायांपासून खरें मार्गदर्शन न होतां उलट वैताग येतो कीं ग्रंथ लिहिण्याची ही भलतीच उठाठेव मीं कशाला केली! तथापि इतरांच्या मानानें ह्या बाबतींत मी एकंदरींत बरा निभावलों असें आतां वाटतें. वर्तमानपत्रांच्या अभिप्रायांपेक्षां खासगी पत्रांचा उपयोग मात्र मला अतिशय झाला आहे. जपून ठेवलेलीं हीं सर्व पत्रें आज मला बहुमोल वाटतात. त्यांचा नाश करणें जिवावर येतें. पण ठेवून तरी त्यांचा पुढें उपयोग काय अशी टोचणी मनास लागते.

मात्र माझ्या एकंदर जीवनोद्योगाची वाढ कशी होत गेली, कोणीं कसें साह्य केलें, मीं आपला विषय सुधारण्यांत कसे परिश्रम केले ह्याचें प्रत्यंतर ह्या पत्रांत मिळतें. तसेंच माझ्या इतिहासाची इमारत कशी उठत गेली हें ह्या पत्रव्यवहारांत वाचून मनास समाधान वाटूं लागतें.

एकदां विषयांत पाऊल टाकलें, म्हणजे त्यामुळें पुष्कळदां वादही खेळण्याचा प्रसंग येतो. शिवजन्मतिथि, मंडलोई कागदांची बनावट, नानासाहेब किंवा नाना फडणीस अशा कित्येक व्यक्तींची कर्तबगारी ह्यांसंबंधानें खासगी व जाहीर लेखांत वाद माजलेले कित्येकांस ठाऊक असतील. माझी मुसलमानी रियासत मुस्लीमभावना दुखविणारी असल्यामुळें सरकारनें तिला बंदी घालावी असेही प्रचार झाले ते आतां कोणास ठाऊकही नसतील. उगाच एखाद्याची निंदा करावी हें माझ्या बुद्धींत नाहीं. गुणगौरव मी मुक्तकंठानें करीत आलों आहें. दोषाविष्करण सुद्धां सत्य न सोडतां हळूवार भावनेनें जखमेवर डाग न पडेल अशा वृत्तीनें मी करीत असतों. उद्योगसातत्य व मनाचें भलेपण हे गुण मी आपला तोल सांभाळून कृतींत आणले असे मला वाटतें. मी आपले दोष सुधारण्याची संधि कधीं वायां दवडली नाहीं. कणशः क्षणशः अशी उंछवृत्ति माझ्या ठिकाणीं बाणलेली आहे.

खासगी पत्रव्यवहार सोडून निदान शंभरांवर तरी लेखकांचा पत्रसंग्रह मजजवळ विद्यमान आहे, त्यांचीं नांवें वर्गवारीनें लक्षांत घेतलीं म्हणजे ह्या पत्रव्यवहाराचा विस्तार मला कसा सांभाळावा लागला हें लक्षांत येईल. कै. सयाजीरावांपाशीं असल्यामुळेंच मला अशा थोर व्यक्तींशीं विचारविनिमय करतां आला. तर्त मी सोयीकरितां चार वर्ग कल्पून त्याखालीं ठळक व्यक्तींचीं नांवें सांगतों. बहुतेक व्यक्ति आतां दिवंगत आहेत हें सांगणें नकोच. अलीकडील दहा बारा वर्षांतील साह्यकर्त्यांचीं नांवें मी येथें दाखल करीत नाहीं.

२. चतुर्विध साह्यकर्ते

(१) **गुरुस्थानीय मार्गदर्शक.** प्रो. भानु, धनुर्धारी रामभाऊ टिकेकर, राजाराम रामकृष्णशास्त्री भागवत, न्या. मू. रानडे, रा. ब. ग. व्यं. जोशी, वि. रा. नातू (बेळगांव, महादजी सिंदे चरित्रकर्ते), सखाराम गणेश देऊसकर (बंगाल्यांत स्थायिक झालेले महाराष्ट्रीय पंडित),

का. कृ. लेले (धारचे विख्यात गुरु), वि. मो. महाजनी (अकोला), बाळकृष्ण नारायण देव (इंदूरचे मार्मिक अभ्यासक), नाना पावगी (प्राचीन भारताचे आद्य इतिहासकार), कृष्णाजी बल्लाळ गोडबोले (कुरुंदवाडचे विद्वान् लेखक, एल्फिन्स्टोनचरित्रकर्ते), डॉ. भालचंद्र कृष्ण भाटवडेकर व बंधु विष्णु कृष्ण. अशा ह्या व्यक्तींशीं माझा शिष्यत्वाचा समागम घडला. त्यांजकडून मला पहिलें मार्गदर्शन प्राप्त झालें.

(२) **महाभ्यासक.** रा. ब. का. ना. साने, पांडोबा पटवर्धन, विश्वनाथ का. राजवाडे, सरदार मेहेंदळे (पुणें), न. चिं. केळकर (संपादक केसरी), गणेश अनंत लेले (बडोद्यांत सहसेवक, मार्मिक विवेचक), य. रा. गुप्ते (संशोधक पुणें), भास्कर रा. भालेराव (संशोधक ग्वाल्हेर), द. ब. पारसनीस (सातारा), सुरेन्द्रनाथ सेन (कलकत्ता, अलीकडील डायरेक्टर जनरल ऑफ् आर्काइव्हस, दिल्ली), प्रो. कानुंगो (हल्लीं लखनौ), रमेशचंद्र मुजूमदार, विनायक लक्ष्मण भावे, श्री. वि. आठल्ये (मार्मिक संशोधक व लेखक), अनंत नारायण भागवत (इंदूरचे इतिहाससंशोधक), वा. वि. ठाकूर (इंदूर), वा. गो. आपटे (आनंदकर्ते), सरदार मा. वि. किबे, प्रो. सी. एम्. श्रीनिवासाचारी (अन्नमलाई युनिव्हर्सिटि), प्रो. ए. जी. पवार (कोल्हापूर), प्रो. रॉलिन्सन, न्या. मू. सी. ए. किंकेड (मराठ्यांचे इतिहासकार), ह्या सर्व मंडळींनीं समक्ष, पत्रांनीं किंवा लेखांनीं माझें साह्य केलें, माहिती दिली, विवेचन केलें त्याचा मला मोठा उपयोग माझ्या लेखनांत झाला.

(३) **जिज्ञासु हितचिंतक.** एस्. एल्. गोखले (अमेरिका), प्रो. आळतेकर (बनारस), नीलकंठशास्त्री (मद्रास), म. ह. मोडक (पडघवली), बाबासाहेब घोरपडे (संस्थान इचलकरंजी), महाराजकुमार रघुवीरसिंह (सीतामऊ), नबाब अलीयावर जंग (हैदराबाद), श्री. दा. सातवळेकर (औंध, पुरुषार्थकर्ते), शेख मुनीरहुसेन किडवै (कान्स्टांटिनोपल), प्रो. पिसुर्लेकर (गोवा), नाथमाधव (कादंबरीकार, मुंबई), भास्करराव जाधव, मुकुंदराव जयकर (मुंबई), रामानंद चॅतरजी (मॉडर्न रिव्ह्यू, कलकत्ता), पी. व्ही. एन्. मायर्स (अमेरिकन इतिहासकार), आप्त गोविंदरावदादा सरदेसाई (कोल्हापूर), प्रो. पुणतांबेकर, श्री. व्यं. केतकर (ज्ञानकोशकार) इत्यादींचें मार्गदर्शन मला मिळालें.

(४) **सामान्य निरीक्षक.** संपतराव गायकवाड, माधवराव सिंदे (ग्वाल्हेर), प्रो. टी. के. गज्जर, ग. वा. मावळंकर (स्पीकर दिल्ली), कर्नल हक्सर (ग्वाल्हेर), सेंट निहालसिंग (डेहेराडून), व्ही. पी. माधवराव, व्ही. टी. कृष्णमाचारी, रवीन्द्रनाथ टागोर, अशीं आणखी पुष्कळ नांवें माझ्या पत्रांत आहेत. ह्या सर्व मंडळींना माझ्या उद्योगाचें कौतुक वाटे.

आणखी पुष्कळ लहानमोटीं नांवें आहेत, पण मी कांहीं येथें सर्वांचाच उल्लेख करीत नसून सामान्य मांडणीला वरील नांवें पुरे आहेत.

ह्यांपैकीं बऱ्याच मंडळींशीं माझा निकट परिचय असून पुष्कळसे मजकडे बडोद्यास राहिलेले होते. बहुतेकांनीं मला नाना प्रकारें मनापासून साह्य केलें, मागितलेली स्थानिक माहिती पुरविली, पुष्कळांनीं नवीन अप्रसिद्ध कागद पुरविले. कांहीं तर माझा उद्योग पाहून स्वयंस्फूर्तीनें मला बहुमोल कागद पाठवूं लागले. पुष्कळांनीं माझे दोष दाखविले आणि कित्येकांनीं माझ्या उद्योगाचें एवढें कौतुक केलें कीं त्यांनीं आपण होऊन कळविलेले विचार वाचून माझ्या अंगावर मूठभर मांस चढलें. साताऱ्यास वा. त्रि. जोशी म्हणून एक मार्मिक अभ्यासक असून त्यांना छत्रपतींच्या दप्तरांची पूर्ण माहिती होती. तशा कागदांच्या नकला त्यांनीं मला आपण होऊन मीं न मागतां पुरविल्या. प्रथम अशा रीतीनें माझी त्यांची ओळख झाली. ह्यांखेरीज आणखी एक वर्ग कठोर टीकाकारांचाही होता. त्यांची वृत्ति सदा एक प्रकारच्या अहंमन्यतेची, इतरांना तुच्छ लेखण्याची होती. अशा वृत्तींच्या लोकांना चांगलें असें कांहीं दिसतच नाहीं. राजवाड्यांच्या अंगीं अनेक बहुमोल गुण होते, पण त्यांबरोबर वरील अहंमन्यतेची छटा त्यांच्या स्वभावांत असल्यामुळें सहज बोलतांना देखील अनेकांना ते एकेरी विशेषणांनीं संबोधीत, ती शैली त्यांच्या पश्चात् कित्येक संशोधकांमध्यें प्रचलित झालेली माझ्या नजरेस येई. पण आतां हा प्रकार बहुधा कोठे आढळत नाहीं.

समकालीन व्यक्तींमध्यें कित्येकांशीं माझा पत्रव्यवहार प्रसंगानें तिखटही बनला. प्रो. पोतदार, प्रो. शेजवलकर, श्रीपादराव टिकेकर ह्यांच्या माझ्या लेखांचा प्रपंच कांहीं लहान नव्हे. अल्प काल मी अशा गृहस्थांसंबंधानें अस्वस्थही बनलों, पण माझ्या सुदैवानें व कालौघानें हीं प्रकरणें आतां गोड आठवणींचीं बनलीं आहेत. प्रो. पोतदारांशीं तर माझे आरंभींचे वात्सल्यसंबंध पुनः पहिल्यासारखे निवळले ह्याचा मला मोठा अभिमान वाटतो. पोतदार

म्हणजे थोर कर्तृत्ववान व्यक्ति. ते आज महाराष्ट्रीय व बाह्य जनतेला उत्कृष्ट मार्गदर्शन करीत आहेत. विचारप्रवर्तक वक्तृत्वानें व बिनतोड युक्तिवादानें त्यांनीं पहिल्या प्रतीचा लौकिक मिळविला असून तो दिवसेंदिवस वृद्धिंगत होत जावा अशी अपत्यनिर्विशेष भावना त्यांच्यासंबंधीं माझ्या अंतःकरणांत वास करते. अशा माझ्या पत्रव्यवहारांतील कित्येक ठळक मुद्दे पुढें दाखवितों म्हणजे त्याचें सार निदर्शनास येऊन कित्येक गतकालीन आठवणी गंमतीदार वाटतील.

इतिहास विषयांत पाऊल टाकण्यास मला दोन व्यक्ति कारणीभूत झाल्या, एक शंकर मोरो रानडे व दुसरी रामभाऊ टिकेकर धनुर्धारी. पैकीं रानडे बडोद्यांतच नोकरीस असून मराठी भाषेचें त्यांचें प्रभुत्व अव्वल दर्जाचें होतें, त्याचा मला लाभ मिळाला. रामभाऊ टिकेकर पट्टीचे विद्वान् नव्हते, पण खुसखुशीत लेखांनीं वाचकांचीं मनें आकर्षून घेण्याची कला त्यांना अवगत होती. ता. २६ डिसेंबर, स. १८९७ चें त्यांचें एक इंग्रजी पत्र मजजवळ आहे, त्यांत ते लिहितात, "I have carefully gone through your ms copy and I offer you a few suggestions." ह्या पत्रापूर्वी दोन तीन महिने ते बडोद्यांत आले असतां मी राजपुत्रांस शिकवितों असें कळल्यावरून सहजीं भेट होऊन कित्येक दिवस उभयतांचा विचारविनिमय झाला. मुलांस इतिहास शिकवायचा तो आगाऊ गोष्टी-सारखा लिहून तोंडानें सांगावा अशी मला महाराजांची सूचना होऊन तदनुसार मोडींत लिहिलेलीं माझीं पुष्कळ टिपणें रामभाऊंनीं वाचलीं. त्यांचा अड्डा सयाजीविजयपत्रसंपादक दा. सा. यंदे यांजकडे होता. यंद्यांनीं त्यांजकडे लेख मागितले. ह्यांनीं त्यांस कळविलें, "तुमच्या बडोद्यांतच लेखक आहेत, त्यांच्या कृति तुम्ही कां छापीत नाहीं!" यंद्यांनीं कोण म्हणून विचारतां, त्यांनीं माझा हस्तलेख वाचण्यास नेला होता तोच यंद्यांना दिला आणि एक दिवशीं पाहतों तों इतिहासाचें पहिलें प्रूफ त्यांनीं स्वतः आणून मला दाखविलें. मी एकदम चकित झालों. माझे लेख छापण्याच्या दृष्टीनें तयार केलेले नव्हते. मी थोडासा रुष्ट होऊन धनुर्धारींना बोललों, "हा उपद्व्याप तुम्हांला कोणीं सांगितला?" ते म्हणाले, "गोष्ट होऊन गेली आहे, आतां पुढील विचार तुमचा तुम्ही पहा." अशा रीतीनें इतिहासांत माझा प्रवेश झाला आणि मुसलमानी

रियासत जानेवारी १८९८ त प्रसिद्ध झाली. म्हणजे धनुर्धरींच्या वरील पत्रानें माझा धीर चेपला. रियासत हें ग्रंथाचें अन्वर्थक नांव शंकर मोरो रानडे व मीं एकत्र बोलून नक्की केलें. धनुर्धरींच्या पुष्कळ आठवणी माझ्या मनांत घोळत आहेत. यथाकाल ते आमचे आप्त बनले.

गुरुस्थानीं मानलेल्या पहिल्या परिच्छेदांतील व्यक्तींच्या माझ्या आठवणी सर्वच जिव्हाळ्याच्या असल्या तरी त्या वर्णन करण्यास येथें अवकाश नाहीं. कांहीं थोड्याच सांगतां येतील. त्यांतल्या त्यांत गणेश व्यं. जोशी हे तर मला मॅट्रिकवर्गांत प्रत्यक्ष गुरु असून, तदुत्तर माझ्या रियासती बाहेर येऊं लागल्या त्यांचें त्यांनीं कौतुक करून नाना प्रकारें बोध केला. पुण्यास जाऊन मीं त्यांच्या भेटी घेतल्या. तासनतास बोलून त्यांनीं पुष्कळ नवीन मुद्दे सांगितले ते संवाद मीं टिपून ठेवलेले अद्यापि संग्रहांत आहेत.

न्यायमूर्ति रानडे थोर विभूति, त्यांजपुढें माझा पाड काय ! होतकरू माणसांस पुढें आणून कामास लावणें ही संग्राहक बुद्धि प्रथम त्यांनींच प्रगट केली. ' Rise of the Maratha Power " म्हणून जो त्यांचा स्फूर्तिग्रंथ पाणिनीच्या अष्टाध्यायीप्रमाणें, मराठी इतिहासाचा उगम समजला जातो, तो त्यांनीं एकदम एकतंत्रानें बनविलेला नसून सवडीनुसार एक एक मुद्दा घेऊन तो ते व्याख्यानरूपानें जाहीर करीत. त्यांचें सार वर्तमानपत्रांत येई तें आम्ही वाचूं. प्रसंगानें अफझलखान प्रकरणावर मीं त्यांस पत्रानें कांहीं शंका विचारल्या. जबाब आला कीं "पत्रानें खुलासा होणार नाहीं, तुम्ही कधीं मुंबईस येत असल्यास रविवारीं सायंकाळीं भेटा, वेळ असल्यास जेवणास रहा म्हणजे पुष्कळ बोलतां येईल." ह्या उत्तरानें माझ्या वृत्ति उल्लसित झाल्या. स. १८९९ च्या नोव्हेंबरांत फत्तेसिंहराव मॅट्रिक परीक्षेसाठीं मुंबईस असतां एका रविवारीं मी रानड्यांच्या भेटीस सायंकाळीं गेलों. हातांतील काम पुरें करून ते मला भेटले. खंबाला हिलवर त्यांचा बंगला होता. खालीं झोपाळ्यावर येऊन बसले. मला जवळ घेऊन बोलूं लागले. तीन एक तास तरी भेट चालली. पत्नी रमाबाईनीं भोजनाची तयारी केली. मीं त्यांच्या पंक्तीचा लाभ घेतला. जन्मभर पुरेल एवढें प्रचंड ज्ञानभांडार त्यांनीं माझ्या-पुढें उभें केलें. भोजनोत्तरही तास अर्धातास बोलून ९॥–१० च्या अंदाजांत

मी परत आलों. कांहीं तरी अलभ्य लाभ मिळाला असें वाटलें. त्यांच्या बोलण्यांत मृदु हास्य व विनोदी कोटिक्रम मला विशेष आढळला.

राजाराम रामकृष्ण शास्त्री भागवत ह्या दुसऱ्या एका भिन्न व्यक्तीचा परिचय मला ह्याच सुमारास घडला. ते बडोद्यास महाराजांकडे थोडे दिवस आले होते, त्याच वेळीं प्रो. जिनसीवाले हे दुसरे एक विद्वान् गृहस्थ बडोद्यास राहत होते. या दोन व्यक्ति म्हणजे मानसिक वृत्तीचीं दोन विरुद्ध टोकें होतीं. दोघेही आपापल्यापरी विद्वान् व स्वमताग्रही होते. उभयतांनाही मी पूज्य मानूं लागलों. एका व्याख्यानप्रसंगीं त्यांची माझी ओळख झाली. भागवत व्याख्याते, मी अध्यक्ष व जिनसीवाले हजर असा प्रसंग बनला. विषयप्रतिपादनांत ह्या उभयतांचा वाद जुंपून सभेंत गोंधळ उडाला. मीं सभा बरखास्त केली. पुढें त्या उभयतांच्या माझ्या भेटीही पुष्कळ झाल्या. त्यांच्यापासून मला पुष्कळ शिकायला मिळालें असें मला वाटतें.

३. पारसनीस

त्या वेळची इतिहासव्यासंगांतील अग्रगण्य व्यक्ति म्हणजे दत्तात्रेय बळवंत पारसनीस होत. स. १८९३ त त्यांचें झांशीच्या राणीचें चरित्र प्रसिद्ध झालें, तें त्यांनीं आश्रयार्थ महाराजांना पाठविलें; त्यावरून पत्रव्यवहार व भेटी घडून त्यांचा माझा परिचय जडला तो अखेर-पावेतों वाढतच गेला. स. १८९९ पासून १९२५ च्या काळाचीं त्यांचीं पत्रें मजजवळ आहेत. माझ्या इतिहासाचें भरपूर अभिनंदन करून त्यांनीं पुष्कळ माहिती व जवळचे अप्रसिद्ध कागद मला मोठ्या आपुलकीनें पुरविले. त्यांच्या इतक्या तत्परतेनें ऐतिहासिक साहित्य मला दुसऱ्या कोणीं दिलें नाहीं. स्वखर्चानें नकला करून ते मला पाठवीत. मी कांहीं तरी उपयुक्त कार्य करीत असून त्याचा उत्कर्ष व्हावा अशी त्यांची भावना होती. त्यांची उदार वृत्ति, तीव्र स्मरणशक्ति, ऐतिहासिक साहित्याची आस्था हे त्यांचे गुण असामान्य होते ह्यांत शंका नाहीं. ते बडोद्यास मजकडे येऊन राहिले तसा मीही पुष्कळदां साताऱ्यास त्यांजकडे राहिलों. तासन्-तास त्यांची माझी मराठ्यांच्या इतिहासावर सारखी चर्चा चाले, त्यांत त्यांचें परिशीलन मला अगाध वाटे. अशा अनेक व्यक्तींच्या भिन्न वृत्ति माझ्या अंतःकरणावर ठसलेल्या कायम आहेत. प्रत्येकाचें कर्तृत्व वेगळें आणि

विचारसरणीही वेगळी. सातारा म्यूझियम स्थापण्याच्या खटाटोपांत शेवटीं पारसनीसांच्या कर्तृत्वास गौणत्व आलें, त्यांच्या उद्योगाचा फायदा राष्ट्रास चिरकालीन झाला नाहीं आणि निराशेच्या संकटांत त्यांना अकालीं मरण आलें.

स. १९१५ सालीं पारसनीस मुंबईस माझ्या भेटीस आले तो प्रसंग मला पक्का आठवतो. सायंकाळीं साडेपांचांचा सुमार होता. योगायोग असा कीं ते आले तेव्हां माझा द्वितीय पुत्र श्रीवत्सलांछन वारला. खालीं दहनाची तयारी चालून आंतल्या खोलींत प्रेत होतें. त्यांना हें माहीत नाहीं. ते आले. थोडा वेळ बोलून ते निघाले तेव्हां त्यांस मीं ही वार्ता कळविली त्याबरोबर ते एकदम दचकून खिन्नान्तःकरणानें परत गेले. नंतर त्यांचें पत्र आलें तें ह्या संग्रहांत आहे. डिसेंबर १५ चा दिवस.

भारतवर्ष व इतिहाससंग्रह ह्यांच्या द्वारा पारसनीसांनीं इतिहासाची बहुमोल सेवा केली. स. १९१७ त इतिहाससंग्रह बंद झाला आणि ते म्यूझियम स्थापण्याच्या खटपटीस लागले. त्या उद्योगांत न्या. मू. किंकेडच्या साह्यानें मराठ्यांचा इतिहास प्रसिद्ध करण्याचें काम त्यांनीं स्वीकारिलें. ग्रंथावर नांव दोघांचें आहे, पण त्यांतील माहितींत किंवा मांडणींत पारसनीसांची खोंचदार वृत्ति उतरली नाहीं. त्यांजकडून हवी तशी माहिती किंकेड ह्यांस मिळूं शकली नाहीं; कां तें भगवान् जाणे. त्यासाठीं मी त्या किंकेडच्या पत्रांकडे वळतों.

४. किंकेड

ह्या गृहस्थांनीं History of the Maratha People हा ग्रंथ स. १९१८ ते १९२५ च्या दरम्यान तीन भागांनीं प्रसिद्ध केला. स. १९२१ पासून पुढील बारा वर्षांतील मला आलेलीं त्यांचीं पत्रें आज समोर आहेत, तीं पाहतां प्रथम त्यांना माझ्या मराठी उद्योगाची कल्पना नव्हती. पुढें कोणी तरी त्यांस माझ्या रियासतींची माहिती दिली आणि पेशवाईच्या भागापासून त्यांना माझा उद्योग विशेष मार्गदर्शी वाटूं लागला. त्यांनीं मला पत्रें लिहून नानाविध प्रश्न विचारले, त्या सर्वांचीं निर्णायक व परिपूर्ण उत्तरें मी त्यांस वेळच्या वेळीं इंग्रजींत देत गेलों, हे त्यांना माझे उपकार उत्कट वाटूं लागले. मला आश्चर्य वाटतें तें हें कीं पारसनीस

त्यांचे सहकारी असतां त्यांजकडून जी माहिती त्यांस सहज मिळूं शकती ती मजकडे मागण्याची पाळी त्यांस कां यावी! मला एकच निष्कर्ष वाटतो कीं पारसनीस किंकेडसाहेबांकडून आपला स्वतःचा मतलब साधून घेत असावे. मराठ्यांचा इतिहास सुसंबद्ध प्रसिद्ध व्हावा ही आंच त्यांस नसून आपल्या जवळच्या कागदांची देवघेव करून आर्थिक नड भागवावी असा त्यांचा डाव असावा. ते पैशाच्या अडचणींत होते आणि इंग्रज अधिकाऱ्यांची सरभराई करण्यांत त्यांना भारी खर्च करावा लागत होता हें मला माहीत आहे. मुंबईस हायकोर्टजज्जाचें काम केल्यावर किंकेडची बदली कराचीस झाली, तेथून ते स. १९२६ सालीं सेवानिवृत्त होऊन स्वदेशीं गेले. चिटणीसकृत रामराजाची व दुसऱ्या शाहूची बखर मीं त्यांस पैदा करून दिली त्याचा उल्लेख त्यांच्या पत्रांत आहे. ही बखर पारसनीसां-कडून त्यांस कां मिळूं शकली नाहीं हें मला नवल वाटतें. त्यांच्या पत्रांतले थोडे उतारे पुढें देतों म्हणजे माझ्या मराठी इतिहासाचा उपयोग त्यांस कसा झाला, हें त्यांच्याच शब्दांत व्यक्त होईल. किंकेड नुकतेच स. १९५४ च्या ऑगस्ट महिन्यांत दिवंगत झाले असें मीं वृत्तपत्रांत वाचलें. वय ८२ च्या अंदाजांत असावें.

ता. ४-६-१९२१

"I read and reread your most charming and delightful Riyasat Pt. II. This if I may say so, is the most valuable contribution to Maratha history of modern times. The easiness and clearness of the style compare favourably with Voltaires' Siecle de Louis XIV. Would you be so good as to inform me where I can get part I of your work. I am very anxious indeed to purchase it."

ता. १५-६-१९२१

"Many thanks for your letter of the 6th. I look forward with equal anticipation to your life of Balaji Bajirao. That work must be an immense labour. I never have read a book which combined such clearness with such learning. Vol. II of my History of the Maratha people will be going to press in a month or two. I am afraid I have had to change a good deal of the draft in the light of your Riyasat. I shall fully acknowledge my debt to you."

यानंतर मी स. १९२१ च्या जुलईंत किंकेडसाहेबांस मुंबई येथें पूर्वसंकेतानें त्यांच्या बंगल्यावर जाऊन भेटलों, आणि समक्ष पुष्कळ चर्चा केली. विद्वत्ता बेताचीच असली तरी गृहस्थ मोठे आस्थेवाईक व उद्योगी दिसले. त्यांचा पुत्र डेनिस किंकेड ह्याला "The Grand Rebel" हें सुंदर पुस्तक लिहिण्याची स्फूर्ति पित्याकडूनच मिळाली ह्यांत संशय नाहीं. ता. ५ जुलई १९२१ चे पत्रांत किंकेड मला लिहितात,—

"I was very anxious to see your third Vol. before I published my second which ends at 1750. The old historical Marathi letters are to a foreigner very difficult. But your arrangement is so lucid and admirable that they become quite clear. Would it be too much to ask you to let me see the 100 pages of the third Peshwa which you say are already in print. I shall make ample acknowledgement in my preface. Indeed I shall do that any way as I have derived a great deal of help from your second volume. I am trying to put the Maratha case fairly before the English public and to destroy the venomous atmosphere created by Grant Duff and his school. I suppose you know my brother-in-law Mr. Seddon."

On 22nd September 1921 I wrote to Mr. Kincaid,

"My Panipat volume is coming to an end in the press and I hope to send you a copy soon. My task beyond 1761 is however huge; I have read and made notes for the reign of Madhavrao I, but I am much handicapped by my official work. I wish I could devote all my time to history and finish the work once for all; but although I have earned my pension and put in 33 years service, the Maharaja would not relieve me; nor am I in a position to forego my pension."

On 15 October 1921 Kincaid wrote to me,

"This morning's post has brought me the copy of your Riyasat and I value it greatly. I am writing to the 'Times of India' asking them to let me review it. I hope you will pardon me for myself offering you my assistance. I enclose a cheque for Rs. 200 which will probably cover the cost of binding. I hope you will not mind accepting

it as a very slight return which your book and proof-sheets gave me in the preparation of my Volume II. I am actuated by merely selfish motives as I shall have the greatest difficulty in writing my 3rd Volume, unless you go on with your Riyasat."

Again on 22nd October Mr. Kincaid says,

" I have to thank you for your very cordial letter and the cheque which you returned. Of course I am not in the least offended at its return. I would not have ventured for a moment to have offered it to you personally. But since your books, as I am very pleased to learn, have paid their way, you were certainly right to send the cheque back."

23 Nov. 1921

"A review of the last Vol. of your great work on Maratha history appears in today's 'Times of India' under my initials. I hope you will like it. I did my best to do justice to your noble work. You deserved every word that I said about it".

10 Dec. 1921

"I am extremely obliged to you for the list of authorities you have sent me. It is just what I wanted. As a matter of fact your great work will probably be completed before I begin my 3rd volume and with your kind permission I shall make abundant use of it. I shall send for the three English volumes of Persian Calendar from Calcutta. In the mean time your notes will be of the greatest value. Indeed you have laid me under a prepetual and indelible obligation by the help you have given me. I wish I could help you about obtaining your release from the chains of office. I am glad you have started on Madhavrao I. Yours is a most valuable work and as I am sorry to say, not adequately appreciated except by brother workers. It is the one work in the Marathi language which shows real historical talents. Your work shows besides eloquence and style in abundance the true historical method of dealing with facts and presenting them in a readable form.

The task of writing Maratha history is a very arduous one as you know. I sometimes regret I ever undertook it. However having done so, I must struggle in ' "

18 Dec. 1923

" I have to thank you for your letter of 4th December. I am interested to hear that you also feel at times depressed about the continuation of your great and noble work. My history is a very poor thing compared with yours, but being in English reaches a wider public and so has its uses. Your offer to supply me with a classified index of the material bearing on the events of Madhavrao's life, is most generous and I must gratefully accept it. Your Riyasat books are the finest historical works ever published in an Indian vernacular. Your books are lively, interesting, and the result of years of painstaking and splendid labour. I do not know if you have seen my last work, "Tales from the Indian drama". I am sending you a copy and hope you will accept it as a very slight token of my immense admiration for your Riyasat."

7 January 1924

" You will be glad to hear that I have at last secured a copy of the Chitnis Bakhars of Dhakte Ramraja and Dhakte Shahu. The Chief of Ichalkaranji got it for me as also a number of Khare's volumes. I hope you would not mind if I ask you one or two questions."

These questions I answered fully.

16 Janu. 1924

"I wish you every possible happiness during your months holiday in Benares."

13 Dec. 1925

" A few days ago the Oxford Press sent me a copy of your review of my Vol. III of the History of the Maratha People. If I may say so, it is a very fair and frank and kindly criticism of the work. No one knows the shortcomings of the work more painfully than I do. Nothing could give me greater pleasure than to read

the praise that you bestow on it at the same time as criticism. I am thankful that I am spared to finish the history. It was really as you indicate too great an undertaking for a man who could not give a whole life to it. Nevertheless with all its faults and weaknesses, I think and you seem to agree, that the book is an advance on its predecessors. How is your monumental work proceeding ? Yours is the real history of the Marathas."

21 January 1926

"I was deeply distressed to hear of your poor son's death. It must have been a terrible blow. Your history must have been a gift from God to keep your mind from brooding over the sorrow."

3 Feb. 1926

"Many thanks for sending me a copy of your most valuable मराठी रियासत— मध्यविभाग ४. I only wish I had it before me when I was writing my 3rd Vol. I am retiring this year under the 35 years' rule. Your Riyasat will always be a memorial and reminder to me of the many happy days I spent in the Deccan".

6 Feb. 1927

" I have read and reread many parts of your Riyasat and been filled with admiration at the clarity and vigour of your Marathi style. It was a matter of genuine surprise and still greater admiration to me to find that your English was in no way inferior to your Marathi style. I have received and read the copy of your collected lectures delivered at the Patna University. I read with intense pleasure your generous tribute to your dear old friend R. B. Parasnis."

23 July 1929

" Cherbourg, France. I certainly have not forgotten and never shall forget the generous help that you always were ready to bestow on me. The Oxford University are anxious to bring out a one volume edition of my History of the Maratha people and they have suggested a revision of it before publication. I have resolved to seek your

advice. Can you in the midst of your arduous labours spare the time to write me a note on the various points in my history that need reconsideration, I mean of course only the really important points. I am now British Vice-Consul in France. My eldest son Denis is now Asst. Collector in Satara where he has made many Indian friends. I hope you will be spared for many years to complete your wonderful Riyasat."

Writes Mr. Kincaid in 1932.

"This week I have received the last volume of your Riyasat, that splendid and noble work to which you have dedicated your working life. It is a magnificent, a colossal fabric of human history. Indeed I know nothing like it in my language. I wish I had had the benefit of the last volume of the Riyasat when I was writing Vol. III of my history. On the other hand my second vol. and the early part of the third did derive great benefit from your kindness as I have mentioned in the preface.

I wish I felt equal to the task of re-writing my history with the help of the new and valuable work that has now been put into my hands; but I don't feel equal to it, I am afraid. I am 62 and I have left India. The death of my old friend Rao Bahadur Parasnis is a great blow to me. Without his help I could not face the task of writing the joint work. It is very difficult for my book in English to sell in India; and English publishers will not accept works on Indian history. I am afraid some other hand than mine will have to re-write the history of the Maratha people in English. I envy you the energy and strength that enables you at 67 to revise your gigantic work and at the same time bring to light the secrets of the Poona Daftar. May Heaven grant you the strength and the time to bring all your designs to an adequate conclusion. With ever so many thanks for your most generous and I assure you, most highly prized gift and every good wish for your work now and in the years to come. Believe me yours very sincerely,

Charles A. Kincaid."

मूळ पत्रांतील हे उतारे मुद्दामच जरा विस्तारानें दिले आहेत. त्यांवरून माझ्या कार्याची व लोकांच्या अपेक्षांची वाचकांस कल्पना येईल. माझें ऐतिहासिक कार्य पुरें होण्याची सदिच्छा किंकेड ह्यांनीं स. १९३२ सालीं व्यक्त केली, तदनुसार मीं पुढें रियासतींची पुनरावृत्ति आणि मराठ्यांचा समग्र इतिहास इंग्रजींत आणणें हीं कामें स. १९४८ पावेतों पुरीं केलीं आणि माझ्या इतिहासाचे तीनही भाग किंकेडसाहेबांस पाठविले, त्यांची पोंच आली नाहीं, त्यावरून ते त्यांस पोंचले नसावे असा संशय वाटतो. किंकेड ह्यांच्या पत्रांतील वरील उताऱ्यांप्रमाणेंच इतर थोर हिंदी व्यक्तींच्या पत्रांचे बहुविध उतारे मीं द्यावे असें एका जिव्हाळ्याच्या मित्रांनीं कळविलें, परंतु तशीं विस्तृत पत्रें फार थोड्यांचीं असून, त्यांत अनेक वाद अंतर्भूत आहेत, ते वाचकांस अप्रस्तुत वाटतील. योग्य ते उतारे मी देतच आहें.

५. साने–भावे–आठल्ये

पारसनीस, खरे, राजवाडे व साने हे चार गृहस्थच महाराष्ट्रांत मुख्यतः ऐतिहासिक साधनें प्रसिद्ध करीत असल्यामुळें त्यांच्यावरच बडोद्यांतून माझी दृष्टि खिळलेली असे. पैकीं साने माझ्या पुष्कळ अगोदरचे, मला केवळ त्यांच्या काव्येतिहास संग्रहावरून माहीत होते. राजवाडे तर माझे समकालीन आणि माझा त्यांचा उद्योग एकाच वेळीं चाललेला, म्हणून पत्रानें अगर भेटीनें त्यांचा माझा समागम होई, तसा सान्यांचा झाला नाहीं. पुढें भारत इतिहास मंडळाची स्थापना पुण्यास होऊन सवडीप्रमाणें मी त्याच्या वार्षिक सभेस मुद्दाम हजर राहूं लागलों, त्यामुळें साने व खरे ह्यांच्याशीं माझा परिचय झाला. दोघेही निष्ठावंत अभ्यासक, साने रेखीव तर खरे अघळ पघळ, मीं त्यांच्याशीं पत्रानें व समक्ष अनेक प्रश्नांची चर्चा केली. जुन्या लेखांचें वाचन, शब्दार्थ, ऐतिहासिक व्यक्तींचे गुणदोष ह्यांची अचूक माहिती सान्यांनीं द्यावी, तर सातारा कोल्हापूरकडील महाराष्ट्रीय भावना, समाज, चालीरीती, धार्मिक आचार इत्यादींचा यथोचित उलगडा खऱ्यांकडून होई. उदाहरणार्थ, शाहू छत्रपतींच्या दोन लेखी आज्ञा आपल्या पश्चात् पेशव्यांनीं राज्य सर्व सांभाळावें अशा मतलबाच्या प्रसिद्ध असून त्यांतील कित्येक शब्दांचे अर्थ बरोबर लागत नाहींत, हा विषय मीं सान्यांशीं चर्चा करून ठरविला. तसेंच शाहूच्या पश्चात् राणी सकवारबाईला पेशव्यानें जबरदस्तीनें सती जाण्यास लावलें असें ग्रँट डफ

लिहितो, ही गोष्ट खऱ्यांनीं कुशल युक्तिवादानें नाशाबीद केली. असे किती तरी गहन प्रश्न माझ्या उद्योगांत उद्भवलेले मीं अनेकांच्या साह्यानें यथामति निकालांत आणले. माझा व्याप समस्त मराठशाहीचा होता, एखाददुसऱ्या विशिष्ट प्रश्नाचें स्वरूप सांगून मोकळें होण्याची सोय मला नव्हती. मस्तानीच्या नादानें बाजीरावानें राजकारण बुडविलें कीं काय, नारायण-रावाच्या खुनांत आनंदीबाईचें अंग किती होतें, नाना फडणिसाच्या जाचास त्रासून सवाईमाधवरावानें आत्महत्या केली कीं काय, रामदासांकडून स्वराज्याची स्फूर्ति शिवाजीला किती मिळाली, असे असंख्य जिव्हाळ्याचे मुद्दे ह्या इतिहासांत गोवलेले सोडविणें हें काम एका व्यक्तीच्या आवांक्यांतलें नाहीं. देशभर चाललेल्या संशोधनाची टेहळणी ठेवून निर्विकार निष्कर्ष वाचकांस सादर करणें हें संकलनाचें काम माझ्या मतें संशोधनापेक्षां जास्त अवघड आहे. एखादा मर्यादित प्रश्न हातीं घेऊन त्याचें संशोधन करणें विकट असलें तरी समग्र इतिहास वाचकांपुढें उभा करणें हें काम मला जास्त अवघड वाटतें. अद्यापपर्यंत माझ्याखेरीज दुसऱ्या कोणीं तें हातीं घेतलें नाहीं ह्यांतच माझी परीक्षा झाली आहे असें मी मानतों. ह्या बाबतींत साऱ्यांच्या इतके काटेकोर इतिहासज्ञ मला दुसरे आढळले नाहींत. साऱ्यांचीं व खऱ्यांचीं पत्रें मजजवळ आहेत, त्यांत कित्येक विशिष्ट मुद्दयांची चर्चा केलेली आढळते.

विनायक लक्ष्मण भावे हे दुसरे एक गृहस्थ इतिहासव्यासंगानें माझ्या परिचयाचे बनले. बुद्धीनें तरतरीत, स्वभावानें झणझणीत, व्यवहारानें खणखणीत अशा ह्या गृहस्थांशीं माझा स्नेह गोड बनला. मला त्यांनीं पुष्कळदां चांगलें साह्य केलें. दुसऱ्या बाजीरावाची त्यांनीं एका प्रसंगानें तरफदारी केली ती मला अवास्तव वाटते. रुमाल तिसरा हें पुस्तक छापीत असतांना ते आजारी झाले तेव्हां मला भेटून तें काम पुरें करण्याची त्यांनीं मला विनंती केली, ती स्वीकारून मीं तें काम त्यांच्या इच्छेप्रमाणें सिद्धीस नेलें.

श्री. वि. आठल्ये ही एक घमेंडखोर व्यक्ति चुरचुरीत भाषेच्या आवरणाखालीं प्रतिपक्षास निरुत्तर करण्यांत प्रवीण होती. शिवाजी निरक्षर होता हें त्यांचें प्रतिपादन ह्या वृत्तीचें निदर्शक आहे. वाचतांना एखाद्याला वाटावें काय ही अगाध बुद्धि व अचाट कोटिक्रम ! पण

जगांत कोणाशीं पटायचें नाहीं अशा भांडखोर वृत्तीमुळें ते कोंकणच्या कोंदट हवेंत एकांडे शिलेदार बनून विधायक कामास मुकले. ते व मी ग्रामस्थ, मराठी शाळेंत वर्गबंधुच म्हणा ना पाहिजे तर; माझ्याहून चार दोन वर्षांनीं लहान. मीं आपल्या कामांत त्यांचा सहकार मिळविण्याचा कसून प्रयत्न केला, त्यांत यश आलें नाहीं हें माझें दुर्भाग्य.

पांडोबा पटवर्धन कणखर अभ्यासु होते. मला साह्य करीत. ते लवकरच दिवंगत झाले. इतिहासाची मोठी हानि झाली.

६. बाळकृष्ण नारायण देव

ह्यांचें नांव बाहेर कोणास आतां फारसें माहीत देखील नसेल. हें एक झांकलें माणिक सहजगत्या माझ्या नजरेस आलें ! इंदूरचे राहणारे, विचारी लेखक व प्रमाणबद्ध इतिहासाचे अभ्यासु. केवळ माझ्या रियासती वाचून त्यांनीं माझ्या उद्योगाचें कौतुक केलें. गुंतागुंतीचे बिकट प्रश्न सोडवून ऐतिहासिक मुद्दे स्पष्ट करण्याची त्यांची शैली मला मार्गदर्शी वाटली. त्यांच्या सूचनांचीं पुष्कळच पत्रें मजजवळ असून त्यांमुळें मला मोठें उत्तेजन मिळालें. अहल्याबाई, नाना फडणीस अशा अनेक व्यक्तींची कर्तबगारी निःस्पृहतेनें व खणखणीत भाषेंत सांगणारा इतका प्रवीण लेखक मला आढळला नाहीं. तुमचा पुढचा भाग कधीं बाहेर येणार, अमुक प्रश्नांचा तुम्हीं काय विचार केला आहे, अमुक नवीन बाहेर आलेली माहिती तुम्हीं पाहिली का, असे नानाविध प्रश्न विचारून ते मला सदा जागृत ठेवीत. त्यांचे लेख बहुधा विविधज्ञानविस्तारांत येत. सन १९१७ त ते बडोद्यास येऊन कांहीं दिवस मजकडे राहिले आणि माझा एकंदर उद्योग तपासून त्यांनीं पुष्कळ उपयुक्त सूचना केल्या. माझे लेख बारकाईनें वाचून त्यांतले गुणदोष ते मला मार्मिकपणें दाखवीत. ह्या त्यांच्या सूचनांचा उपयोग मला फार झाला. त्यांचे विचार निर्हेतुक राष्ट्रेतिहासपोषक असत, त्यांत अंतःकरणाची तळमळ दिसे. प्रकृतीनें अशक्त असून त्यांचा अंत अकालीं झाला. इंदुर गॅझेटियर लिहिण्याचें काम मि० ल्युअर्ड करीत, त्यांचे हे सहायक होते. त्यांची विचारसरणी सनातनी वृत्तीची नसून प्रगतिपर असल्यानें मला त्यांचा मोठा आधार वाटे. मी त्यांना कळकळीचा सहायक समजें.

पुण्याचे सरदार **खंडेराव तात्यासाहेब मेहेंदळे** कांहीं काळ भा. इ. मंडळाचे चिटणीस असून मला आदरानें मदत करीत. एखाद्या अपरिचित स्थळाचें, व्यक्तीचें, किंवा घडामोडीचें निराकरण ते तत्परतेनें करीत, त्यांत त्यांचें विस्तृत वाचन नजरेस पडे. शेवटीं शेवटीं त्यांनीं माझ्याशीं तुटकपणा आरंभिला, त्यावरून ते विलक्षण लहरी असावे अशी माझी समजूत झाली. बहुधा शिवजन्मतिथीच्या वादांत मीं नव्या तिथीचा पुरस्कार करूं शकलों नाहीं हें माझ्या मतें स्नेहबंदीचें कारण असावें. सन १९१६–२५ च्या कालाचीं त्यांचीं पत्रें मजपाशीं आहेत.

नाना पावगी हे दुसरे एक व्यवसायमग्न संशोधक पुण्यास प्राचीन इतिहासाचा अभ्यास करीत, त्यांचा मीं परिचय केला. त्यांचे बंधु रावसाहेब पावगी माझ्या ओळखीचे होते, त्यांच्या मार्फत ‘ भारतीय साम्राज्य ’ नांवाचीं नानांचीं पुस्तकें मीं वाचलीं. आकाशास गवसणी घालावी तशा प्रकारचा त्यांचा उद्योग मला अवाढव्य वाटला. त्यांचें कामच एवढें प्रचंड कीं त्याच्या सिद्धीला अनेक अभ्यासकांचें मंडळच (a syndicate of scholars) पाहिजे. तसलें कार्य पुढें श्रीधर व्यंकटेश केतकरांनीं ज्ञानकोशद्वारा केलें. आज नाना पावगींचा उद्योग बाहेर फारसा अवगत नाहीं ह्याचा खेद वाटतो. प्राचीन भारताच्या विषयांत वावरणारे पहिले अभ्यासक माझ्या मतें नाना पावगीच होत. स. १८९६ चीं त्यांचीं पत्रें मजजवळ आहेत, त्यांवरून मी आपल्या रियासतींच्या तयारीस तेव्हांच लागलों होतों हें निश्चित कळतें.

७. चिंतामणराव वैद्य

ह्यांचें नांव एके काळीं विद्वन्मंडळांत अग्रगण्य होतें. दिव्याचा पहिला प्रकाश झगझगीत दिसून शेवटीं ज्योत मंदावून मावळावी तशी ह्यांच्या जीवनोद्योगाची गत झाली हा दैवदुर्विपाक होय. एकंदरींत शेवटपर्यंत सारखी कर्तबगारी टिकणाऱ्या व्यक्ति विरळच असणार. ज्या इतिहासमंडळाचे पुण्यांत ते कैक वर्षें अध्यक्ष होते त्या जागेंत शेवटच्या पांच चार वर्षांत त्यांना पाऊल टाकण्याची इच्छा होऊं नये हा तरी योगायोग काय म्हणावा ! त्यांचा माझा सहवास व पत्रव्यवहार चांगला तीस वर्षें चालला. मला तर त्यांचें साह्य अतोनात झालें. कॉलेजचा

त्यांचा लौकिक बाहेर महशूर असून ते माझ्या अगोदर पांच सात वर्षे विद्वान् अभ्यासक म्हणून झळकूं लागले. **लक्ष्मण रामचंद्र वैद्य** हे दुसरे एक विद्वान् गृहस्थ, आम्हांस कॉलेजांत संस्कृत शिकवीत तेही असेच पट्टीचे विद्वान् असून, अल्पायुषी झाले. त्यांचा संस्कृत-इंग्रजी कोश चांगला प्रसिद्ध आहे. चिंतामणराव वैद्य एल्एल्. बी. झाल्यावर ग्वाल्हेरीस मुख्य न्यायाधीश झाले, त्या काळांत त्यांनीं "अवलोन्नति लेखमाला" लिहिली ती आम्ही मोठ्या कौतुकानें वाचीत असूं. ग्वाल्हेरच्या नोकरींत त्यांजवर टपका येऊन ते आपल्या घरीं कल्याणास व मुंबईस राहून लेखनाचा व्यवसाय करीत. मूळ विषय गणित, त्यांत ते प्रत्येक परीक्षेंत प्रथम पद मिळवीत गेले. वरील लेखमालेंत त्यांचें भाषाप्रभुत्व व प्रगतिपर विचार-सरणी हे गुण प्रगट झाले. नंतर महाभारत व रामायण ह्या दोन प्रचंड ग्रंथांचा सूक्ष्म अभ्यास करून, त्यांजवर मार्मिक टीका त्यांनीं प्रसिद्ध केल्या, त्यांचीं नावें "The Riddle of the Ramayana" and 'Mahabharat a Criticism" हीं होत. हा त्यांचा तत्कालीन इतिहास सांगणारा पहिलाच प्रयत्न चहूंकडे आदरणीय वाटला. लगेच त्यांनीं संक्षिप्त महाभारत व संक्षिप्त रामायण हे दोन सुंदर ग्रंथ त्वरित प्रसिद्ध केल्यानें ज्यांना हें प्रचंड ग्रंथभांडार समग्र वाचण्याची सवड नाहीं, त्यांना हे संक्षेप फारच बहुमोल वाटले. मीं तर हे संक्षेप बाहेर येतांच वाचले, त्यामुळें अर्वाचीन इतिहासाच्या माझ्या उद्योगास एक प्रकारचा सांस्कृतिक पाठिंबा प्राप्त झाला. रामायण व महाभारत हे ग्रंथ म्हणजे भारतीय संस्कृतीची जिवंत ज्योत होय, ते समग्र वाचणें सामान्य जनांस कसें शक्य होणार! त्या ग्रंथांचा सारभूत अंश सात आठ हजार श्लोकांत वैद्यांनीं एकत्र आणून जी सरस्वतीसेवा केली ती त्यांची कामगिरी राष्ट्रीय वाङ्मयांत चिरकाल कायम राहील. ह्याच एका विषयांत ते अखेरपर्यंत वावरत राहते तर त्यांत खुद्द त्यांचें व समग्र जनतेचें मोठेंच कल्याण झालें असतें. पण वैद्यांनीं आपलें उद्योगक्षेत्र सारखें वाढवीत नेलें. दुर्दैवी रंगू, श्रीकृष्णचरित्र हीं त्यांचीं पुस्तकें अव्वल दर्जाचीं असून तीं त्यांच्या तरुणपणींच अवतरलीं. उत्तरोत्तर ते अर्वाचीन इतिहासांत उतरले आणि राजपुतांच्या इतिहासाचे तीन भाग त्यांनीं प्रसिद्ध केले, पण त्यांत पूर्वीच्या उद्योगाची चमक राहिली नाहीं. तीं वरीचशीं उथळ, कंटाळून घाईत लिहिलेलीं निपजलीं. विस्तार

साधला पण खोली गमावली. उद्योगाची मौलिकता वाढवायची असेल तर त्याचें क्षेत्र कमी केलें पाहिजे. कशी तरी पुष्कळ जमीन नांगरून त्यांत सदा राबून कुचंबत थोडें पीक काढण्यापेक्षां लहानशा पट्टींतून नमुनेदार पीक काढणें जास्त श्रेयस्कर नाहीं का ? कित्येक अभ्यासकांची भावना बनते कीं आपण आतां पूर्ण झालों, आपली लेखणी प्रसवेल तें उत्कृष्टच असणार. अशी भावना एकदां बनली म्हणजे त्यांच्या कृतींचा दर्जा उतरत जातो. माझ्या मतें राजवाडे किंवा वैद्य ह्यांचा प्रकार थोड्याबहुत अंशानें असाच होत गेला. यच्चयावत् पाहिजे तो विषय हाताळण्याची सवय लागली कीं एकाचीही तड नीट लागत नाहीं. असो, ओघानें हें सांगावें लागलें.

राजपुतांच्या इतिहासांतून चिंतामणराव मराठ्यांच्या इतिहासांत शिरले आणि पुण्यास राहून भा. इ. सं. मंडळाचे अध्यक्ष बनले. तेथील पत्करलेलीं कामें निरलसपणें बजावून त्यांनीं आपली कामगिरी पार पाडली, तरी त्यांत त्यांची उच्च प्रवीणता व्यक्त झाली नाहीं. माझा त्यांचा निकट सहवास पूर्वींचाच होता. मी आपल्या रियासती त्यांजकडे मार्गदर्शनासाठीं पाठवीत गेलों. सात आठशें पानांचे ग्रंथ आमूलाग्र वाचून त्यांतील भाषेचीं किंवा विवेचनाचीं दोषस्थळें सर्व व्यवस्थित लिहून त्यांनीं मला वेळेवर पाठविलीं ते उपकार मला विसरतां येत नाहींत. त्यांना मी गुरुस्थानींच मानतों आणि त्यांच्या सूचनांचा उपयोग मी नवीन आवृत्तींत करीत आलों आहें. मात्र त्यांच्या सूचना बहुधा भाषेच्या आवरणांतल्या असून मूलग्रामी तात्त्विक सिद्धान्त किंवा खोंचदार विचारसरणी अथवा व्यक्तींची कर्तृत्वरेखा, ह्यासंबंधांत त्यांनीं मला विशेष कांहीं कळविलें नाहीं. ह्या दृष्टीनें बा. ना. देव, वासुदेवशास्त्री खरे ह्यांचे विचार मला जास्त मार्मिक वाटले. ह्यांवरून विषयाच्या खोलीपेक्षां विस्ताराकडे वैद्यांचा भर कसा होता हें कळून येतें. बा. ना. देव तर मुख्य मुद्द्यास हात घालून माझी रचना व विचारसरणी हादरून सोडीत. ह्या बाबतींत सर जदुनाथांचा दर्जा मला उच्च कोटीचा वाटतो.

शेवटीं वैद्यांनीं मराठी इतिहासाचा मुख्य गाभा जें शिवाजीचरित्र तें इंग्रजींत सिद्ध केलें. सर्व राष्ट्रास ह्या विषयाची तीव्र तृष्णा असून, सर जदुनाथांसारख्या महाराष्ट्रेतरानें हा प्रदेश सारखा व्यापलेला पाहून

महाराष्ट्रांत एक प्रकारचा उद्वेग प्रचलित होता. सरकारांच्या विचार-सरणीवर महाराष्ट्रीयांनीं जोराचे आक्षेप घेतलेले असून खुद्द मंडळाच्या परिणतप्रज्ञ अध्यक्षानेंच जेव्हां ह्या महनीय व्यक्तीचें चरित्र लिहिलें, तेव्हां तें सरकारांच्या ग्रंथास उखडून काढणार अशी सामान्य अपेक्षा होती ती सर्वथा फोल ठरली. स. १९३१ त वैद्यांचें पुस्तक प्रसिद्ध झालें तें भाषेच्या व विवेचनाच्या दृष्टीनें इतकें हीणकस ठरलें कीं त्याचें नांव सुद्धां बाहेर ऐकूं येत नाहीं आणि सरकारांनीं लिहिलेल्या चरित्राच्या पांच आवृत्त्या खपून गेल्या. ह्या कृतीनें नुसत्या वैद्यांच्याच लौकिकास खो आणला असें नाहीं तर त्यांत समस्त महाराष्ट्राचें कर्तृत्वही ओघानें निदर्शनास आलें.

वैद्यांची ही घसरपट्टी सांगण्याचा प्रसंग मजवर यावा हें मी आपलें दुर्दैव समजतों. समकालीन अभ्यासकांच्या उद्योगाचा आढावा मला ह्या पत्रव्यवहारांत घ्यावयाचा असल्यामुळें मुद्द्याचा हा विषय टाळतां येत नाहीं. त्यांचा माझा लोभ अखेरपर्यंत कायम होता आणि त्यासंबंधानें टीका करणेंही जिवावर येतें. पण व्यवसायबंधुत्वामुळें मागच्यांची ओळख पुढच्या पिढीस पुरविणें हें कर्तव्य करतांना मला खरें वाटतें तें बोलणें प्राप्त आहे. माझ्या मतें चिंतामणरावांच्या ह्या दुरवस्थेचें कारण त्यांना कौटुंबिक मनःस्वास्थ्य लाभलें नाहीं हें होय. अनेक कारणांनीं त्यांचें खासगी जीवन कष्टमय बनलें. एक दोन मुलें होऊन त्यांची पत्नी वारली, तेणेंकरून संसारयात्रेंत बिघाड झाला. जवळ जिव्हाळ्याचें मनुष्य राहिलें नाहीं. दोन पुत्र झाले, त्यांच्याशीं ह्यांचा जम बसला नाहीं. इतिहास मंडळांत मीं त्यांच्या अनेक भेटी घेतल्या, तेव्हां लहानशा बाहेरच्या अंधाऱ्या कोठडींत गांवठी खाट टाकून ते नुसत्या निफानें लिहीत बसलेले पाहतां मला त्यांची मोठी कींव वाटली. जवळ चुल्यावर पाणी तापवून आपली कॉफी बनवीत, वेळेनुसार मलाही अल्पांश देत. ही दैन्यावस्था पाहून मला मोठे कष्ट वाटत. त्यांच्या गृहस्थितीची मला कल्पना नाहीं. ज्या माधवमहाराज सिंद्यांच्या नोकरींत ते होते, त्यांनींच मला ह्यांच्या कांहीं गोष्टी सांगितल्या, त्यांवरून आर्थिक दैन्य चिंतामणरावांना नसावें असें मी समजतों. बाकी त्यांनीं ग्रंथ पुष्कळ लिहिले तरी त्यांजपासून म्हणण्यासारखी आर्थिक प्राप्ति त्यांस झाली नसावी.

ह्यासंबंधांत माणसास मनाची खंबीरता पाहिजे ती कदाचित् वैद्यांना नसेल. त्यांचें विद्वत्तेचें नाणें असावें तितकें खणखणीत नव्हतें असा माझा तर्क आहे. या परिस्थितीबद्दल मला अत्यंत खेद वाटतो.

८. नरसोपंत केळकर

नरसोपंतांचा माझा निकट परिचय असून त्यांचीं पत्रें मजजवळ आहेत. ते त्रिवर्ग बंधु व मी समवयी, एकत्र वाढलों, भेटलों बसलों, नानाविध विषयांची चर्चा केली. ते बडोद्यास वारंवार येत. सयाजीरावांशीं मीं त्यांच्या भेटी करून दिल्या. गायकवाडवाडा टिळकांस देण्याचा त्यांचा व्यवहार माझ्याच समक्ष झाला. अशा प्रकारें नरसोपंत व मी खेळीमेळीनें व बरोबरीच्या नात्यानें वागत आलों. मराठे व इंग्रज हें त्यांचें पुस्तक प्रसिद्ध झालें त्याचें परीक्षण मीं लिहिलेलं त्यांस आवडलं. त्यांना लोकांनीं साहित्यसम्राट् बनविलें तर मला इतिहासमार्तंड केलं. अशा रीतीनें आम्ही समान पातळीवर वावरत असतां पुढें पुढें आम्ही दुरावत चालल्याचा मला संशय येऊं लागला. मी समजतों टिळकांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्राच्या पुढारपणाची जबाबदारी त्यांजवर आली तींत ते गांगरून गेले. त्यांच्या वृत्तींत एक प्रकारचा चिडखोर वैताग निर्माण झाला. टिळकपुत्रांची व केसरीची व्यवस्था लावतांना त्यांना कित्येक निकाल झटपट करावे लागले, तेणेंकरून पूर्वीच्या त्यांच्या सौजन्यास उणेपणा येऊं लागला. महात्मा गांधींच्या पुढें हिंदुमहासभेचा कैवार घेण्यांत केसरीचा पूर्वींचा निःस्पृह बाणा उतरत चालला, हा प्रकार त्यांच्या मानी स्वभावास आवरतां आला नाहीं. हिंदी राजकारणावर आपली छाप बसविण्याची त्यांची उमेद फलद्रूप झाली नाहीं याचा परिणाम त्यांच्या वृत्तीवर झाला. एक प्रकारची बेपर्वाईची छटा स्वभावांत निर्माण होऊन पूर्वींची खेळीमेळीची अभ्यासु वृत्ति थोडीशी बदलत गेली. मला तरी इतिहासविषयांत त्यांजपासून शिकण्याजोगें कांहीं दिसलें नाहीं. मी त्यांना अखेरपर्यंत नरसोपंत असेंच म्हणत असें. ते कोणी तरी आपल्याहून उच्च कोटीचे भिन्न पुरुष आहेत, अशी आमच्यासारख्या त्रयस्थांची भावना कधींच बनली नाहीं. ते अकालीं एकाएकीं वारले.

वासुदेव गोविंद आपटे ह्यांचा माझा ऋणानुबंध बहुत काळ अत्यंत सलगीचा राहिला. आज मजजवळ त्यांचीं पत्रें १९१६ ते १९२३

ह्या काळचीं तेवढीं आहेत. व्यवहारांत रेखीव व व्यवस्थित असे हे गृहस्थ अहर्निश सत्कृत्यांत कालक्रमणा करीत. आपल्याला झेपेल तेवढें काम करावें, उगाच सतरा उलाढाली करूं नयेत, अशा वृत्तीचे हे कित्ता घेण्यासारखे होते. स. १९०९ सालीं बडोद्यास साहित्य संमेलन झालें, तेव्हां ते पुण्याच्या परिषदेचे चिटणीस व मी बडोद्याच्या संमेलनाचा चिटणीस ह्या नात्यानें त्यांचा माझा पत्रव्यवहार व व्यवसाय सहकार सुरू झाला तो अखेरपर्यंत वाढतच गेला. ते कित्येकदां बडोद्यास मजकडे येऊन राहिले. प्रकृति अशक्त असल्यामुळें ते खाण्यापिण्यांत अत्यंत जपून वागत. आनंद मासिक चालवायचें म्हणून मुलांच्या सोप्या गोष्टी व त्यांच्या-जोगीं ऐतिहासिक पत्रें अशा संबंधानें त्यांचा माझा समक्ष भेटींत किंवा पत्रानें विचारविनिमय सारखा चालला. आपलें काम भलें कीं आपण भले अशी त्यांची समाधानी वृत्ति मला मोठी कौतुकास्पद वाटते.

विजापुरकर व **अण्णा कर्वे** ह्या दोन महनीय व्यक्ति माझ्या निकट परिचयाच्या असून जरी ऐतिहासिक विषयांत ते पडले नाहींत तरी माझ्या जीवनावर त्यांच्या सहवासाचा परिणाम चांगलाच घडला. ते अनेकदां बडोद्यास मजकडे येऊन राहिले. त्या योगानें परिचय दृढ होऊन त्यांची उच्च विचारसरणी, साधी राहणी व राष्ट्रहिताची कळकळ ह्या गुणांचा ठसा कोणावरही उमटल्याशिवाय राहत नसे. विजापुरकर लवकर गेले. सुदैवानें अण्णा कर्वे विद्यमान आहेत, ते माझ्या अगोदरची वाट चालत असल्यामुळें मला माझ्या उत्तरायुष्यांत त्यांचा मोठा आधार वाटतो. निर्मळ जीवनांत ह्या व्यक्ति मला सदैव वंद्य वाटतात.

प्रो. **त्रिंबक शंकर शेजवलकर** हे दुसरे एक गृहस्थ योगायोगानें मला भेटले. बुद्धीचे तरतरीत दिसल्यावरून त्यांचा माझा समागम अल्पकाळ घडून आला. इतिहासांत त्यांचा उपयोग घडावा असें वाटून त्यांस मीं जवळ केलें, पण लहरी व अत्यंत निराशावादी वृत्तीमुळें त्यांच्याशीं माझें व्यवधान जुळून आलें नाहीं. त्यांचा मोठा पत्रसंभार माझेसमोर आहे, पण आतां व्यवसायसंबंध दुरावल्यामुळें त्या कागदांचें महत्त्वही संपलें आहे.

इतिहासव्यवसायांत एकदां पडल्यावर त्या संबंधानें आपली पराकाष्ठा करावयाची, बुद्धि, अक्कल काय असेल ती परमेश्वरी देणगी, पण परिश्रम

आपल्या हातचे, हें लक्षांत घेऊन मी कसा वागत गेलों ह्याचीं उदाहरणें माझ्या दप्तरांत पुष्कळ आहेत. त्यांतलीं कांहीं येथें सांगणें इष्ट वाटतें. माझ्या सवडीप्रमाणें मी आपली नजर सदैव फिरती ठेवीत होतों कीं जेणेंकरून माझ्या विषयाची प्रगति होत असावी.

९. मुशीर हुसेन किद्वै

सन १९१० सालीं मी मुसलमानी रियासतीची द्वितीयावृत्ति लिहीत असतां मुशीर हुसेन किद्वै नांवाच्या एका विद्वान् गृहस्थांनीं Pan-Islamism नांवाची एक पुस्तिका लिहिलेली माझ्या वाचण्यांत आली. हे गृहस्थ लखनौचे राहणारे (हल्लींच्या प्रधान मंडळांत अन्नप्रधान किद्वै होते त्यांचे वडील बंधु) युरोपांत जाऊन कॉन्स्टान्टिनोपल येथें राहिले. नंतर लंडनास जाऊन त्यांनीं तो वरील मार्मिक लेख प्रसिद्ध केला. त्यांत मला पुष्कळ उपयुक्त अशी नवीन माहिती मिळून त्यांच्याशीं संबंध जोडल्यास हिंदु-मुस्लीम ऐक्यास मदत होईल ह्या बुद्धीनें मीं त्यांस पत्र लिहून कित्येक प्रश्नांचे जबाब विचारले. त्यांचें उत्तर ता. १० सेप्टेंबर स. १९१० चें आलें तें अद्यापि मजजवळ आहे. त्या उत्तरांतील कांहीं थोडा मजकूर पुढें देतों त्यावरून खऱ्या मुस्लीम धर्माची भावना व्यक्त होईल.

"Your very interesting and appreciative letter has reached me. I am glad you liked my essay on Pan-Islamism. It was acclaimed all over the world.

I respect every religion but I am convinced that the most up-to-date religion is Islam, not the Islam of the Musalmans of India but the real and true Islam of the Arabian shepherd as preached by Omar. No other religion is so tolerant of other faiths. Please note that I do not mean that Musalmans have been tolerant. The Musalmans of the present day and particularly those of India are a disgrace to this glorious religion. I feel ashamed of being called an Indian Musalman. These wretched people are the meanest sycophants that ever disgraced the earth. The Musulmans of India have fallen into wrong hands. Their leaders are either blind

or they are abject villains. It gives me a headache to see my religion and my co-religionists both disgraced. I feel for India and cannot bear seeing its interests so selfishly sacrificed."

पुन: ह्या गृहस्थांस मीं अलीकडे पत्र लिहून पूर्वीची आठवण दिली. ते गोलमेज परिषदेला जाऊन गांधींचे अनुयायी बनले होते. ता. १-६-१९३२ चें त्यांचें पत्र मजजवळ आहे. आतां ते दिवगंत झाल्याचें कळतें. त्यांचीच विचारसरणी अब्बास तयबजी, मिर्झा इस्माईल इत्यादिकांची आहे हें आपण जाणतों.

एका अमेरिकन इतिहासकारास असेंच मीं एक पत्र लिहिलें. **फिलिप मायर्स** ह्यांचा जनरल हिस्टरी नांवाचा एक सुंदर ग्रंथ मजजवळ असून त्यांत केलेली युरोप-अमेरिका ह्यांच्या इतिहासाची चर्चा मला फार मार्मिक व मार्गदर्शक वाटली. जगाचा इतिहास हा त्यांचा विषय असून त्यांत बुद्ध धर्माचें, हिंदुस्थानचें, चीनचें नांव देखील नाहीं, याबद्दल मीं त्यांस बरेंच टोंचून लिहिलें, त्यावर त्यांचा जबाव ता. १२ मार्च, १९२१ चा आला तो असा :—

College Hall, Cincinnati; Ohio
March 12, 1921

To
Mr. G. S. Sardesai,
Baroda, India,
My Dear Sir,

Your letter of January 18th has reached me. It is very gratifying to me to know that my books have been of some service to you in your historical work. I have never acceded to Freeman's view that history consists virtually in the experience of the European nations and from the first would have liked to have given in my texts a much larger place to the peoples of the Far East; but a book written on such lines would have no favour in our schools. It is somewhat different now; and India, China and Japan will in the future receive recognition as important factors in universal history.

My publishers have almost ready for issue a second revised edition of my General History which now includes a chapter on the World War. As you very justly observe the great war has indeed revealed to the world the oneness of humanity and will, without doubt, mark the beginning of a new great age of Internationalism. I am interested in what you tell me about your own historical work and only regret my limited linguistic acquirements shut me out from the temper and enjoyment of what you have written.

With cordial greetings,
most sincerely yours,
P. V. N. Myers...

१०. लॉर्ड लिटन

दुसऱ्या एका संबंधानें बंगालचे माजी गव्हर्नर लॉर्ड लिटन जे लीग ऑफ् नेशन्सच्या तर्फें चिनांत गेले होते त्यांना मीं पत्र लिहिलें व त्याचा जबाब त्यांजकडून आला ते दोनही कागद वाचकांना मनोरंजक वाटतील. बंगालचे गव्हर्नरीवर असतां माझ्या श्यामकान्तासारखाच त्यांचा एकुलता एक तरुण पुत्र अपघातानें वारला. त्याचें नांव ॲन्टनी. ह्याच नांवानें त्यांनीं एक सुंदर इंग्रजी पुस्तक लिहिलें तें माझ्या वाचण्यांत येऊन माझ्या अंतःकरणांतील भावना उचंबळून आल्या, त्या मनःस्थितींत मीं त्यांस पुढील पत्र लिहिलें,

Post Kamshet,
Dist. Poona. G.I.P. Rly.
21 August, 1936

My Lord,

Having recently happened to read your "Antony" and experienced a tender chord vitally touched in my own mind, I trust, Your Lordship will not consider it presumptuous on my part if I take the liberty of sending you, in a separate packet, a similar book I published about two years ago containing letters of my only son who had died at Davos (Switzerland) in November 1925. I must trouble you with a few words by way of self-introduction.

I am a Maratha Brahmin running 72nd year of age ; my mother-tongue is Marathi and am a resident of Ratnagiri a district town on the west-coast of India. Having been long employed in the service of the Maharaja of Baroda, I have been spending my retirement near Poona in the study of Maratha history. You may possibly have heard of the Govt. of Bombay having published a series of 45 Selections of old Marathi Historical papers from the Peshwa's records which they possessed. The editorial work of this series was entrusted to me. At present I am editing for the Bombay Government old English papers from the Poona Residency Records (1785-1818).

My son named Shyamakant born in 1899 was a boy full of enthusiasm and amibition, had his school education in Bengal in Dr. Rabindranath Tagore's Shantiniketan and later joined the Fergusson College, Poona, where he took his degree with distinction. Towards the end of 1921, he proceeded to Germany for higher studies in Chemistry, took his doctorate at Berlin in 1924 and visited the Wembley Exhibition in London where he had a severe attack of Malaria, which was speedily cured but which later on unfortunately developed into tuberculosis. He went back to Germany and under Medical advice proceeded to a nursing home at Davos and died there during an intestinal operation. For a time his mother and I were stricken down with grief; but time and occupation have gradually eased our feelings. We had preserved most of his letters and a few friends who knew the boy intimately, suggested the idea of my publishing them rather for private circulation and for the preservation of old memories. Most of the letters were in Marathi and a few in English. His last letter from Davos was most touching in which he freely and courageously took leave of his parents and relatives. A facsimile of the letter is reproduced in the book. Most of the letters disclosed exceptional merit both linguistic and topical and the work

has proved, as we now see, a welcome addition of a rare character to Marathi literature.

There is nothing very strange or abnormal in the book which I am tempted to post you. Its contents being in Marathi, I know, will be entirely strange to you. Promising young men are a great national asset and I could easily imagine from a perusal of "Antony" how heavy must have been the blow to you and his mother. Pray accept sincere condolences from equally sore and sympathetic hearts coming from a distant land. I entirely agree with the writer of "Antony's" introduction that life is not to be measured by the number of years but by the effort that it puts forth for doing one's part.

Possibly it ill-becomes for an insignificant person like me in this familiar tone to approach Your Lordship who holds such an exalted and eminent position in the world. But I consider the similarity of the two cases so striking that I beg your Lordship to pardon me the impropriety.

Almost at the beginning of the book is printed a tribute in English paid to Shyamakant, by my friend Sir Jadunath Sarkar whom I believe your Lordship appointed Vice-Chancellor of the Calcutta University and with whom I still collaborate in publishing original materials of Indian history; and there will be found a few letters in English and some lines of condolence towards the end which may interest you. But it is not the language of the book but the hearts that must speak.

Kindly convey to the bereaved mother, Lady Lytton, a word of sympathy both from my wife and myself on the loss of Antony.

With profound respects and all best wishes and thousand apologies for the intrusion, Believe me,

Your Lordship's sincerely,
G. S. Sardesai.

7th September 1936.
Knebworth House, Knebworth

Dear Sir,

I have today received your very kind letter of August 21st. I am interested to learn that you have read a copy of my book and liked it; and I am sad to know that you have had a similar bereavement. It was very kind of you to send me a copy of your own book about your son, which, alas, I am unable to read owing to its being written in Marathi, a language with which I am not familiar.

I have read with great interest the few letters which are printed in English and wish there could have been more of them.

My wife joins me in sending you our sympathy and thanks for the kind thought that prompted you to write to me.

I am yours sincerely,
Lytton.

११. आणखी सन्मान्य व्यक्ति

कृष्णाजी नारायण आठल्ये ह्या नांवाचे एक गृहस्थ कल्पक, चतुर, बहुश्रुत असे मलबारांत कोचीन येथें राहून केरळकोकिळ ह्या नांवाचें मासिक मराठींत चालवीत असत. मोठेसे विद्वान नव्हते, पण एक प्रकारची आकर्षक हास्योत्पादक लेखनाची कला त्यांस चांगली अवगत होती. ह्यामुळें त्यांचें मासिक त्या वेळीं फार लोकप्रिय होतें. माझी रियासत प्रसिद्ध झाली, तिचें परीक्षण त्यांनीं आपल्या मासिकांत चालू केलें. सहज पुस्तक थोडें चाळून त्यांतलें मधलेंच कोठलें तरी एखादें वाक्य किंवा शब्दप्रयोग घेऊन त्याजवर चुरचुरीत टीका ते करीत. वाचकांना तें गोड वाटे, पण ग्रंथकाराला मात्र उगाच बुचकळ्यांत पडल्यासारखें होई. दोन तीन अंकांत अशी कांहीं बाष्कळ टीका त्यांनीं छापून अंक माझ्याकडे पाठविले. मीं त्यांना लगेच पत्र पाठवून त्यांचा बराचसा निषेध केला. त्यांना तेंच पाहिजे होतें. माझी ओळख करून माझ्यामार्फत बडोद्याच्या महाराजांकडे व इतरत्र आपल्या मासिकाचे कांहीं

अंक खपवावे हा त्यांचा हेतु. पुढें मी त्यांचा वर्गणीदार झालों तेव्हांपासून त्यांचा माझा पत्रव्यवहार बरेच दिवस चालला. त्यापासून मला आपल्या कामांत मोठा धीर आला. हे गृहस्थ अलीकडेच वारले. कुचाळी काढून मतलब साधण्यांत त्यांचा हातखंडा होता.

माझ्या उद्योगाचें कौतुक करणारे दुसरे एक सन्मान्य गृहस्थ हल्लींच्या पुरुषार्थाचे संपादक **श्रीपाद दामोदर सातवळेकर** हे होत. त्यांचा माझा पत्रव्यवहार पुष्कळ झाला. वर्तमानपत्री टीकेला प्रत्युत्तर देत बसूं नये हें तत्त्व त्यांनींच मुख्यतः मला पटवून दिलें. अशा टीकेनें चिडून जाण्यांत मतलब नाहीं. पण ही गोष्ट मला आरंभीं पटली नव्हती. एकदां आखाड्यांत उतरल्यावर माघार घेतां येत नसते. वर्तमानपत्रांतील टीकेंत सत्यांश असला तर त्याचा आपण अवश्य स्वीकार करून आपले दोष काढून टाकावे. टीका असत्य व कुत्सित असली तर तिचा परिणाम अंतीं कांहीं होत नाहीं. सन १९३२ च्या केसरींत कित्येक आठवडे माझ्या रियासतीवर टीकेची झोड उठली, तिच्या योगानें माझी प्रतिष्ठा बिलकूल कमी झाली नाहीं.

माझ्या ह्या पत्रसंचयांत अनेक गमतीदार प्रकार आहेत ते सर्व सांगत बसल्यास उगाच भारूड वाढून त्यांत सार्वजनिक उपयोग कांहींच नाहीं. एकंदरींत मला सर्व देशांतून अनेक लहानथोर व्यक्तींचें हार्दिक साह्य झालें, म्हणूनच ह्या रिसासतींची एवढी मोठी रचना मला सिद्धीस नेतां आली. वास्तविक असलें प्रचंड काम एकट्याच्या हातून होणेंच अशक्य. माझे ग्रहयोग चांगले म्हणून मला अत्यंत दूरच्या प्रतिष्ठित माणसांचेंही त्यांत साह्य मिळत गेलें. माझ्याहून वडील माणसांचा थोडाबहुत उल्लेख वर केला आहे. आतां माझ्याबरोबरीच्या अगर वयानें कनिष्ठ अशा दुसऱ्या कित्येक सद्गृहस्थांचा पत्रसंभार माझ्यापुढें आहे, त्यांतील कांहींचा निर्देश येथें करणें मला युक्त वाटतें.

पुण्याचे **यशवंत राजाराम गुप्ते** हे आस्थेवाईक अभ्यासक असून पुराण-वस्तुखात्यांत त्यांनीं संशोधनाचें कसब हस्तगत केलें आहे. त्यांनीं मला प्रेमानें कागद व माहिती पुरविली, शंकांचें समाधान केलें आणि माझे अनेक मिथ्याग्रह दूर केले. महाराष्ट्रांतील बऱ्याच जिल्ह्यांत त्यांनीं प्रवास व वास्तव्य

केलें असल्यामुळें त्यांच्या प्रत्यक्ष माहितीचा मला फार उपयोग झाला. इतिहाससंग्रहांत, पुण्याच्या मंडळाच्या मासिकांत व धुळ्याच्या संशोधकांत त्यांचे लेख वारंवार येतात. कित्येकांच्या प्रती ते मला आस्थेनें पाठवितात, फोटो पुरवितात, हे सर्व त्यांचे मजवर मोठे उपकार आहेत.

भास्कर रामचंद्र भालेराव हे असेच एक संशोधक ग्वाल्हेर संस्थानच्या नोकरींत आहेत. महादजी शिंद्यांचे एक प्रतिष्ठित सरदार खंडेराव हरि, त्यांचे हे वंशज. इतिहास विषयाची आवड व नोकरीचें क्षेत्र मराठ्यांच्या इतिहास-कक्षेंतलें. सर्वत्र माळव्यांतील मराठा हालचालींची व ऐतिहासिक स्थळांची प्रत्यक्ष माहिती व कागद त्यांनीं पुष्कळ मिळविले आणि मला नानाप्रकारें मदत केली. त्यांचीं पुष्कळशीं पत्रें माझ्या संग्रहांत आहेत.

एक विद्वान् गृहस्थ बंगाल्यांत जाऊन स्थायिक झालेले, अभ्यासू संशोधक **सखाराम गणेश देउसकर** ह्यांचें नांव आतां कोणास फारसें परिचित नसेल. माझा त्यांचा पत्रव्यवहार असून त्यांनीं बंगाल्यांतील मराठ्यांच्या हालचालींवर पुष्कळ संशोधन केलें होतें. त्यावर कित्येक उपयुक्त लेख त्यांनीं बंगालींत प्रसिद्ध केले. ह्या त्यांच्या बहुमोल कामगिरीचें स्मरण मराठी इतिहासानें जागृत ठेवलें पाहिजे.

धारवाड कॉलेजचे प्रोफेसर धोपेश्वरकर, मुंबईचे प्रो. वसंतराव नाईक, नागपूरचे प्रो. डॉ. सिन्हा ह्यांचा माझा परिचय व पत्रव्यवहार कैक वर्षे चालला. माझें मराठींतील काम ह्यांना फार आवडलें आणि तें बाहेरच्या अनेक विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावें ह्यासाठीं माझ्या रियासतींचा अनुवाद इंग्रजींत प्रसिद्ध करण्याची ह्यांनीं प्रेमाची कळकळ दाखविली, एवढेंच नाहीं तर त्यांनीं प्रत्यक्ष स्वतः हें काम अंगावर घेण्याची उत्कंठा व्यक्त केली. हरनारायण सिन्हा ह्यांनीं मध्यविभाग १, ह्या माझ्या ग्रंथाधारें "Rise of the Peshwas" नांवाचा एक भाग छापून प्रसिद्धही केला. वसंतराव नायकांनीं तर माझ्या रियासतींच्या कित्येक भागांचे तर्जुमे करून ते हस्तलिखित कागद मजकडे पाठविले. अशीच उत्कंठा प्रो. धोपेश्वर-करांनींही मला पत्रांनीं कळविली. पण त्या कामाला योग्य वेळ आली नव्हती असें आतां म्हणावें लागतें. माझ्या रियासती मराठींत असल्यामुळें बाह्य प्रांतांत त्यांचा उपयोग होत नाहीं आणि महाराष्ट्रेतर प्रदेशांतील

संशोधनाचा प्रवाह मराठी इतिहासांत सामील होण्याची सोय नाहीं ह्याची मला सारखी तळमळ वाटे. पण रियासतींचें पहिलें उद्दिष्ट कार्य पुरें करण्यास १९३९ चा काळ लागला. त्या सालीं ब्रिटिश रियासतीचा उत्तरार्ध प्रसिद्ध होऊन स. १८५८ पर्यंत विषय पुरा झाला. त्यानंतर पुनः सात वर्षें खपून "New History of the Marathas" "The Main Currents of Maratha History" हे दोन ग्रंथ मीच पुरे करूं शकलों. इतरांच्या साह्याची गरज उरली नाहीं.

औंधचे बाळासाहेब पंत प्रतिनिधि, इचलकरंजीचे अधिपति बाबासाहेब घोरपडे, पंथ पिपळोदाचे जागीरदार गणपतराव खांडेकर, सरदार किबे, हैदराबादचे अलीयावर जंग, कोटाचे सरदार पुरुषोत्तमराव गुळगुळे, मद्रासचे प्रो. नीलकंठशास्त्री व प्रो. श्रीनिवासाचारी, सीतामऊचे महाराजकुमार रघुबीरसिंह अशा किती तरी व्यक्तींचें व्यावसायिक साह्य मला मिळालें. त्या सर्वांचे आभार मानणेंही आतां मला शक्य नाहीं. ह्या सर्व मंडळींची नजर माझ्या कार्यावर सारखी खिळलेली असे. शाहू छत्रपतींच्या दरबारांत बाजीरावप्रतिनिधींचा वाद माजला, त्याचाच थोडाबहुत अंश औंधकर बाळासाहेबांनीं अलीकडे उचलला, त्याचा पत्रसंभार मोठा बनला आहे. बाळासाहेब गुणी होते. इतिहासाची त्यांना तीव्र आवड होती. शिवाय ते ऐतिहासिक कीर्तनें करीत, त्यासाठीं मजकडे कागद व माहिती विचारीत, ती मीही त्यांस आस्थेनें पुरवीत गेलों. त्यांच्या पुष्कळ कीर्तनांस ते मला आग्रहानें औंधास बोलावीत. त्यांच्या घरचीं भोजनें व चर्चा माझ्या स्मरणांत सदैव जागृत आहेत.

श्रीमंत बाबासाहेब घोरपड्यांचें सौजन्य अप्रतिम होतें. प्रत्यक्ष ओळख नसतां माझें काम पाहून मनांतील आदर व्यक्त करण्यासाठीं म्हणूनच एकदां ते अवचित पुण्याहून मोटारीनें कामशेतला आले. आपण होऊन आपलें नांव सांगून ओळख पटविली. बरोबर एक भली मोठी सुंदर फळांची करंडी आणलेली मला दिली. मीं म्हटलें, "कशाला हे एवढे श्रम आपण घेतां!" ते म्हणाले, "अहो तुम्ही इतके राष्ट्रेतिहासाचे श्रम करितां, त्याचें हें एवढें अल्प चीज आम्हीं दाखवावें ह्यांत विशेष काय? तुमची गांठ घ्यावी, परिचय करावा, जुन्या काळच्या गोष्टी बोलाव्या, म्हणून मुद्दाम आलों." असें बोलून थोडा

वेळ बसून परत गेले. मुद्दाम इचलकरंजीस येण्याचें आमंत्रण त्यांनीं मला दिलें. प्रो. भानु व मीं त्यांचा तेथील पाहुणचार घेतला.

ह्याचप्रमाणें बावडेकरपंतांनीं मला बोलावून आपलें दप्तर दाखविलें. धारकर उदाजीराव पवारांनीं मला व सर जदुनाथांस बोलावून आमचा सत्कार केला. आपण लिहिलेलें पानिपत संग्रामाचें इंग्रजी पुस्तक वाचून चर्चा केली. धार, मांडवगड हीं स्थळें आम्हांस दाखविलीं. कोटा येथें जाऊन मीं गुळगुळे पंडित पुरुषोत्तमरावांचा पाहुणचार घेतला व त्यांचा पत्रसंग्रह तपासला. हैदराबादचा दप्तरखाना तपासण्यासाठीं अलीयावर जंगांनीं मला तेथें महिनाभर ठेवून घेतलें. उस्मानिया विद्यापीठाचें अप्रतिम मंदिर पाहून मात्र काय वाटलें तें शब्दांनीं सांगतां येत नाहीं. तंजावरास जाऊन तेथील ऐतिहासिक दप्तर व सरस्वतीमंदिर पाहणें किंवा बृहदीश्वरचा शिलालेख तपासणें असे किती तरी गोड प्रसंग मीं अनुभवले ते सर्व मला बहुमोल वाटतात. उगाच नाहीं मला माझें भाग्य एवढें मोठें आहेसें वाटत.

१२. अपरिचितांकडून अभिनंदन

माझ्या इतिहासव्यासंगांत अनेक लहान मोठ्यांचें साह्य मला लाभलें, त्यांचा उल्लेख मीं वारंवार केलाच आहे. ग्रंथांचीं परीक्षणें प्रसिद्ध झालीं त्यांचाही निर्देश मी साभार करीत आलों आहें. परंतु मला जर मोठें प्रोत्साहन कोणाकडून मिळालें असेल तर तें अपरिचित वाचकांकडून होय. माझे ग्रंथ बाहेर प्रसिद्ध झाल्यावर अनेकांनीं न मागतां आपले अभिप्राय व सूचना मुद्दाम परिश्रमपूर्वक माझ्याकडे लिहून पाठविल्या. ज्यांची माझी ओळखही नव्हती, अशांच्या प्रोत्साहनाचें मोल किती वाटतें तें सांगतां येत नाहीं. वास्तविक अशा अनोळखी वाचकांच्या आधारावरच अंगावर मूठभर मांस चढून मला हा उद्योग उत्तरोत्तर वाढवितां आला आणि माझ्या कृतीची प्रसिद्धि चहूंकडे होऊन मला नवीन स्फूर्ति प्राप्त झाली. अशा कित्येक अपरिचितांच्या पत्रांतले कांहीं उतारे कृतज्ञतापूर्वक पुढें देतों.

गणपतराव बाबूराव शिंदे नेसरीकर, रा. बोरगांव, ता. वाळवें जि. सातारा हे ता. ५ मार्च, स. १९०४ च्या पत्रांत लिहितात,— "आपलें पुस्तक मराठी रियासत नुकतेंच आमच्या वाचनांत आलें. आपण इतिहासाचें एक भांडारच खुलें केलें आहे. आपले महाराष्ट्रावर मोठे

उपकार झाले. आमचा इतिहाससागर अमर्याद व खोल आहे त्यांत लोकांनीं यथेच्छ विहार करावा म्हणून ही मजबूद नौका आपण निर्माण केली आहे. त्यायोगें स्वदेशप्रीतीचे हितकर वारे त्यांच्या अंगीं संचरूं लागून त्यांच्या सुदृढ हृदयांत देशोन्नतीचें जोरदार बीं रुजूं घालण्याचें महाश्रेय आपल्या पदरीं येणार आहे. सोबत प्रस्तावनेंत लिहिल्याप्रमाणें कांहीं चुकांचें टिपण पाठविलें आहे."

धुळें ट्रेनिंग कॉलिजचे विद्यार्थी पांडुरंग शंकर जोशी, ता. २२ जानेवारी १९१३ रोजीं लिहितात—"आपण केलेली मराठी रियासत, ब्रिटिश रियासत ह्यांचे पूर्वार्ध सर्व वाचले. त्यांतील ओतप्रोत माहिती वाचतां आमच्या सारख्या निवळ मराठी वाचकांस इतिहासाची माहिती देणारें दुसरें कोणतेंही पुस्तक नाहीं. आपण परिश्रम करून हा कल्पवृक्ष बनविला हें आमचें महद्भाग्य म्हटलें पाहिजे. या ग्रंथांचा उत्तरार्ध केव्हां प्रसिद्ध होणार ह्याची उत्कंठा वाटते ती कृपाळुपणें परिपूर्ण करावी."

ता. ३०–११–१९१५, नीलकंठ वामन घाणेकर, सातारा.—"आपला ग्रंथ मराठी रियासत वाचला. आपण ह्या विषयाचे अधिकारी म्हणून पेशव्यांची माहिती देणारीं पुस्तकें कळवावीं."

रमाकांत पंढरीनाथ कंगले, मुंबई, ता. १७–१२–१९१७. "आमच्या-सारख्या विद्यार्थ्यांना आपल्या रियासतींचा मोठा उपयोग होतो. आपल्या पुस्तकांत सारभूत माहिती व तात्त्विक विवेचन एकत्र पाहावयास सांपडतें, तसें इतर पुस्तकांत मिळत नाहीं. ह्यावरून विद्यार्थीवर्ग आपला अत्यंत आभारी राहील. ह्या पुस्तकांचे उत्तरार्ध आम्हांस मिळण्याची उत्कंठा वाटते. ते केव्हां प्रसिद्ध होणार तें उत्तरीं कळवावें."

Mr. Vasudeo A. Dingankar writes from Ratnagiri on 25 March, 1921.—"It is my noble duty to express to you the respect and obligation that one feels after reading your book Marathi Riyasat. Your obligations cannot be repaid in the shape of money. We find it so heart-touching, striking and effective. We pray to God to encourage you to prepare such useful books."

ता. २६-९-१९२१ रोजीं शिक्षक विष्णु लक्ष्मण काणे, बी. ए. लिहितात,–"आपलें कार्य व उद्योग पाहून मला आपणाबद्दल मोठा आदर वाटतो. मला कांहीं मुद्दे पटले नाहींत, ते लिहून पाठवितों, त्यांचा खुलासा कळवावा." हेच गृहस्थ ता. २१-११-१९२१ ला पुन: लिहितात,– "कांटेरी जंगलांतून नवीन मार्ग काढण्यासारखेंच आपलें कार्य विकट आहे आणि तें मोठ्या प्रयासानें आपण पार पाडलें ह्याबद्दल आनंद वाटतो. नानासाहेब चरित्राचा उठावदारपणा इतरत्र न आढळणारा आपल्या पुस्तकांत उत्तम आला आहे."

दत्तात्रय केशव जोशी, पुणें ता. १९ ऑगस्ट स. १९२२ रोजीं लिहितात,–"इतिहास विषयांतील आपले परिश्रम पाहून समाधान वाटतें."

गोविंदराव बळवंतराव यादव राणा भूपतिराव देशमुख, मु. मांडवगण, ता. श्रीगोंदें, ता. २०-९-१९२४ रोजीं लिहितात,–"आपलीं रियासतींचीं पुस्तकें पानिपत प्रकरणापर्यंत सर्व वाचलीं. आपण आपला देह अशा सत्कार्याकरितां झिजविला हा महाराष्ट्रावर मोठा उपकार होय. त्याबद्दल आपले आभार मानतों. आपल्या परिश्रमानें वाचकांस प्रोत्साहन मिळून वाचनाची उत्कंठा दृढ होते. सर्व काळ मन आपले ग्रंथ कधीं बाहेर निघतील असें विचारीत असतें. पुढील भाग केव्हां होणार कळवावें."

गोपाळ गोविंद देशपांडे, पो. कोडोली (कोल्हापूर), ता. २५ ऑगस्ट स. १९२९ रोजीं लिहितात,–"आपण येथील वाचनालयास भेट देऊन आपल्या ग्रंथांची देणगी दिली ही आठवण आम्ही प्रत्येक जण जन्मभर ठेवूं, विसरणार नाहीं. पेशवेदप्तरावर आपली नेमणूक झाल्याचें कळलें. संतोष वाटला."

"**सत्संगति: कथय किं न करोति पुंसां**" ह्या वचनाचा लाभ मला कसा मिळत गेला हें मीं वर वारंवार सांगितलेंच आहे. विद्वद्रत्न कै. बापूसाहेब आठल्ये ह्यांच्या पूर्णकृपेचें फल म्हणजेच माझें एकंदर जीवन होय. त्यांचें हृदयद्रावक चरित्र मीं अन्यत्र प्रसिद्ध केलें असल्यामुळें येथें पुनरुक्ति करीत नाहीं. § तसेंच कै. सयाजीरावांच्या

---

§ आठल्ये घ० इतिहास, द्वि० खंड, पृ. २५७, २९२, व ३१०. श्रीसयाजी–गौरवग्रंथ, भाग ६, आठवणी, पृ. ११–२८.

कित्येक आठवणीही प्रसंगानुसार लिहिलेल्या वाचकांपुढें आहेत, म्हणून त्यांचाही निर्देश येथें करीत नाहीं. वास्तविक बडोद्याच्या माझ्या आठवणी विशेष ताज्या व चिरस्मरणीय आहेत. पुण्याच्या स्वराज्य पत्रांत नऊ लेखांकांत त्या मीं प्रसिद्ध केल्या. सेप्टेंबर १९५५.

१३. दादासाहेब मावळंकर

जीवनांत आपणा सर्वांस अनेक व्यक्तींचा परिचय घडत जातो. कालांतरानें त्या व्यक्ति दृष्टिआड होतात आणि नवीनांचा परिचयही सदैव बनत असतो. वर केवळ ठळक व्यक्तींचा तेवढा मीं निर्देश केला आहे, त्यांत पुष्कळांचा उल्लेख राहूनही गेला असेल. पुष्कळांचीं पत्रें माझ्या संग्रहांत नाहींत. कित्येकांचे हल्लीं सुद्धां नवीन परिचय जमत आहेत. हल्लींच्या ठळक मंडळींत श्री. दादासाहेब मावळंकर, अष्टपैद्ध सच्छील गृहस्थ माझे केवळ स्वकीय बनले असून स. १९२८ पासून त्यांचा माझा पत्रव्यवहार चालू आहे. मावळंकर सरदेसाई घराण्याच्या इतिहासामुळें त्यांच्याशीं समागम जडून तो उत्तरोत्तर वृद्धिंगत होत आहे. मोकळ्या मनानें अलीकडील राजकीय, सामाजिक इत्यादि परिवर्तनांची व लहान थोर व्यक्तींची चर्चा मी त्यांच्याशीं करतों, ती मला विशेष उद्बोधक वाटते. मनुष्यस्वभाव-निरीक्षण करण्याचें कौशल्य त्यांच्या इतकें इतरांच्या ठिकाणीं मला फारसें आढळलें नाहीं. पार्लमेंटच्या नियामकास हाच गुण मुख्यत: हवा असतो आणि ह्याचमुळें ह्या मुख्य पदावर ते नियुक्त होऊं शकले. आपल्या हिंदी राष्ट्राचे ते एक सामर्थ्यवान घटक आहेत, ह्यास्तव त्यांस पूर्ण आयुरारोग्य लाभून तद्द्वारा त्यांच्या हातून राष्ट्रसेवा घडत राहवी अशी प्रार्थना माझें मन करीत आहे. त्यांचा जन्म कार्तिक व० ८, ता० २७ नोव्हेंबर सन १८८८ चा असून हल्लीं त्यांचें वय ६७ वर्षांचें आहे.

माझ्या एकंदर पत्रव्यवहारांतील सर्व व्यक्तींचा निर्देश करणें शक्य नाहीं किंवा तसें करण्याची जरूरही नाहीं. काम करीत गेलों त्याचा विस्तार हळुहळू वाढत गेला इतकाच ह्याचा अर्थ आहे. माझ्या उद्योगाची तयारी आस्ते आस्ते कशी बनत गेली, त्याचें चित्र ह्या पत्रसंचयांत दिसून येतें. भेटी, वादविवाद, व्याख्यानें, परीक्षणें, शिवाय वाचन व मनन अशा साधनांनीं मनुष्याची मानसिक रचना बनत जाते ती त्याच्या उद्योगांत

उमटते. माझी वृत्ति सर्वसंग्राहक आहे. बापूसाहेब आठल्यांच्या सनातनी वृत्तींत मी लहानाचा मोठा झालों आणि सयाजीरावांच्या प्रागतिक परिसरांत माझें मुख्य जीवन व्यतीत झालें. तेणेंकरून सर्व प्रकारच्या विचारप्रणालींशीं माझा परिचय घडत गेला. अर्थात् ऐकावें जनाचें, करावें मनाचें ही वृत्ति मी पाळीत आलों. कॉंग्रेस व महात्मा गांधी ह्यांचे उद्योग मी समजून घेतों, तसेंच हिंदुमहासभा, मुस्लीम लीग, अगर मॅडम कामा व श्यामजी कृष्णवर्मा अशा क्रान्तिकारकांचे उद्योगही मी सूक्ष्मतेनें पाहत आलों. बिपिनचन्द्रपाल व लाला लाजपतराय ह्यांचाही परिचय मला घडला. पण अशा अनेक थोर व्यक्तींपैकीं फक्त सर जदुनाथ सरकार एवढे एकच माझे निकट साह्यकर्ते कायम राहिले.

प्रकरण सातवें

माझे सत्कार-समारंभ

१. रावसाहेबी ता. १ जानेवारी स. १९३२
२. रावबहादुरी ता. १० मे स. १९३७
३. साडेतीन वस्त्रांचा अहेर, सातारा २ नोव्हेंबर स. १९३४
४. एकाहत्तरावा वाढदिवस, पुणें ता. २४ मे स. १९३५
५. कामशेत सप्ताह ऑक्टोबर ता. १ ते ७ स. १९३८
६. इतिहासमार्तंड धुळें राजवाडे संशोधन मंडळ, १९ जानेवारी स. १९४६
७. बडोदेकरांचें मानपत्र ता. २ मार्च स. १९४७
८. उपसंहार व नंतर

प्रकरण सातवें

माझे सत्कार-समारंभ

> निर्ममो निरहंकारः श्राद्धमत्योद्यमैर्युतः
> नियतं कुरु कर्म त्वं त्यक्त्वा कर्मफलस्पृहाम् ॥

१. रावसाहेबी

अलीकडे साठी, एकसष्टी, पुस्तकप्रकाशन, पदवीदान किंवा उच्च पदावर नेमणूक अशा अनेक उद्देशांनीं व्यक्तींचे, संस्थांचे वगैरे भपकेबाज समारंभ करण्याची प्रथा माझ्या मतें अवास्तव वाढत आहे. प्रत्येक व्यक्ति आपापल्या कर्तबगारीनुसार अल्पांतून महत्त्वाकडे वाढत जात असते हा प्रकार सृष्टिक्रमप्राप्त असून त्यांत अघटित किंवा अभिनंदनीय असें कांहीं नाहीं. वनस्पति, पशुपक्षी व मानव ह्या सर्वांस उत्पत्तिस्थितिलय हा नियम पूर्णपणें लागू असून त्याजबद्दल सुखदुःख मानण्याचें विशेष कारण नाहीं. मला तर साठी एकसष्टीचे समारंभ किंवा विशिष्ट पदवीदान अगर स्मारकें अत्यंत अनवश्यक वाटतात. ही केवळ एक फुकटची जाहिरात होय. मेल्यावर एखाद्या व्यक्तीचें नांव मागें राहिलें कीं न राहिलें तरी त्या व्यक्तीला त्यापासून लाभ किंवा तोटा यत्किंचित् नाहीं. मला कोणी इतिहासमार्तंड किंवा रावबहादूर म्हटलें म्हणून माझी अंगची योग्यता बिलकूल वाढत नाहीं. माझें मूळचें सरदेसाई हें सुटसुटीत नांव सोडून भलत्याच उपाधि लावून कां घ्याव्या! मनुष्य उत्सवप्रिय आहे. पूर्वींच्या काळीं दसरा, दिवाळी, संक्रान्त, होळी इत्यादि धार्मिक उत्सवांचें प्रदर्शन करीत. त्यापूर्वींच्या काळीं यज्ञयागादि कृत्यांस ऊत आला होता. अलीकडे हे पूर्वींचे प्रकार मागें पडल्यामुळें त्यांची जागा हे अशा प्रकारचे उत्सव घेत आहेत. माझें मन त्यांत बिलकूल रमत नाहीं. पुनर्जन्मावर माझा विश्वास नाहीं, जन्म-मरण आपल्या हातचें नाहीं, ह्यास्तव ज्या अर्थी जन्म प्राप्त झालाच आहे, त्या अर्थी होईल तितका सदुद्योग करून जन्माचें सार्थक करावें एवढेंच भगवद्गीतेचें तत्त्व मला पटतें.

बडोदें संस्थानांत कै. सयाजीरावांनीं इंग्रजांच्या अनुकरणानें आपल्या हुकमतींत चांगलें काम करणारांस कांहीं विशिष्ट पदव्या देण्याचा उपक्रम कां व कसा केला तो अंतस्थ प्रकार मला माहीत आहे. परंतु त्यांपैकीं एखादें पद मला मिळावें अशी अभिलाषा मला कधीं झाली नाहीं, किंवा इतरांस तसें मिळाल्याबद्दल मला कधीं वैषम्य वाटलें नाहीं. उगाच ही अनवश्यक उपाधि कशास हवी असेंच मला वाटतें. माझ्या आठवणींतील पहिले मोठे जाहीर समारंभ म्हणजे व्हिक्टोरिया राणीचे रौप्य, सुवर्ण व हीरक महोत्सव झाले ते होत. तसेच समारंभ सयाजीरावांचेही झाले. राज्यकर्त्यांचे हे समारंभ एक वेळ मानवतील, परंतु साहित्यसंमेलनाचें अध्यक्षपद मिळाल्याबद्दल त्याचे आगाऊ गांवोगांव सत्कार करीत सुटणें हा माझ्या मतें पैशाचा व शक्तीचा अपव्यय होय. नरसोपंत केळकरांची एकसष्टी व बोडसांचें बोडण हे त्याचे पडसाद मी कसे विसरणार ! तशा प्रकारचे उचले समारंभ माझ्या वांट्यास फारसे आले नाहींत हें मी आपलें भाग्य समजतों. तथापि जे थोडे घडून आले ते माझ्या ऐहिक जीवनांतील महत्त्वाचे टप्पे जाहिरातींत आल्यामुळें त्यांचें निवेदन मला गाळतां येत नाहीं. त्यांत गतगोष्टींचा अहवाल आहे.

रावसाहेब व रावबहादूर हीं अभिधानें मला निष्कारण कशीं चिकटलीं त्याचा वृत्तान्त थोडासा मजेदार आहे. सुदैवानें अशी ब्याद माझ्या गळ्यांत बडोद्यांतून न पडतां मी अचूक त्यांतून सुटून स. १९२५ त कामशेतच्या निवासांत दाखल झालों. नंतर लवकरच मला मुंबई सरकारांतून पेशवे दप्तर तपासण्याचें काम मिळालें. पहिल्याच दिवशीं मी प्रथम मध्यभाग कमिशनरच्या भेटीस गेलों, त्या भेटींत डायरेक्टर लोरी व प्रो० रॅालिन्सन हेही हजर होते. काम कसें करायचें, कागद बाहेर न जातील ह्याबद्दल कशी खबरदारी ठेवावी, हाताखालच्या माणसांकडून भरपूर काम घेऊन ते दप्तरांतील कागद किंवा माहिती बाहेर न देतील ह्याची दक्षता कशी ठेवावी, अशा अनेक समजुती त्या गृहस्थांनीं मला तोंडीं दिल्या. असेंही त्यांनीं ध्वनित केलें कीं रावबहादूर पारसनीस सरकारच्या विश्वासास पात्र असूनही त्यांनीं दप्तरांतले कागद लांबविले किंवा त्यांतली माहिती बाहेर संस्थानिकांस वगैरे विकली असे बोभाटे सरकारांत आले असून

पुरावा नसल्यामुळें त्यांजवर सरकारला इलाज करतां येत नाहीं. तुम्ही हे प्रकार ध्यानांत ठेवा असें त्यांनीं मला बजावलें. स. १९२९ च्या ता. १० जून ह्या दिवशीं पेशवे दप्तराचें काम चालू झालें. चार दोन महिन्यांत संशोधकांच्या नेमणुका झाल्या. त्यांजवर माझी नजर असून शिवाय मजवर व सर्व संशोधकांवर दप्तरांतील सरकारी माणसांचा पूर्ण पाहारा असे. कोण केव्हां आला, त्यानें किती काम केलें इत्यादि प्रकार कमिशनरच्या कानांवर घालण्याची दक्षता ठेवण्यांत आली होती हें मला मागाहून कळलें.

मी आपलें काम शिकस्तीनें मन लावून करतों, चहा घेणें तो सुद्धां मी काम करीत असतां त्याच टेबलावर कप आणवीं हें सर्वांस जाहीर होतें. तथापि सरकारी अधिकाऱ्यांस संशय वाटे कीं मीं जर कांहीं कागद गुप्त रीतीनें लांबविले तर मजवर सरकारचे हातीं शह कसा राहणार! मला मिळणारें पेन्शन बडोद्यांतून होतें, त्याजवर मुंबई सरकारचा ताबा नव्हता. वर्ष सहा महिने ह्याचा ऑफिसांत खल चालला, त्यांत सर जदुनाथांचा सल्ला घेऊन मला कांहीं तरी पदवी द्यावी म्हणजे एक तर माझ्या कामाचा गौरव केलासें होईल आणि मजवर सरकारचें थोडें दडपणही राहील, असा प्रकार ठरला. ह्या वाटाघाटी सर्व माझ्या पश्चात् होत. मला त्या पुढें कारणपत्वें सहजगत्या कळल्या. स. १९३१ च्या वर्षअखेर म्हणजे ३२ च्या नूतन वर्षदिनीं मला रावबहादूर पदवी द्यावी अशी शिफारस कमिशनरनें पाठविली, पण पुढें हुकूम देतांना रावबहादूरची ठरीव संख्या भरून गेल्यामुळें रावसाहेबींतच माझें नांव दाखल झालें आणि ता. १ जानेवारीच्या वृत्तपत्रांत तें जाहीर झालें. सर जदुनाथांस ह्या रावबहादुरीचा प्रकार माहीत होता, पण मला त्यांनीं तो अगोदर कळविला नव्हता.

रावसाहेबीचा हा प्रसंग माझ्या मनांत कायमचा भिनण्याचें एक विशिष्ट कारण घडलें. सर जदुनाथ व मी दरसाल कोठें तरी एकत्र प्रवासास जात असूं. स. १९३१ च्या डिसेंबरांत आम्ही मोटारीनें चिपळूण संगमेश्वर पाहून साखरप्यावरून माझी जन्मभूमि गोवील येथें गेलों. ती तारीख ३१ डिसेंबर होती. दुसऱ्या दिवशीं सकाळींच धनुर्मासभोजन लवकर उरकून शिपोशीस गेलों. तेथील शाळेंत ग्रामस्थांनीं आम्हा

उभयतांचा सत्कार केला. थोडीं भाषणें झालीं, त्यांत सर जदुनाथ ओघांत बोलून गेले कीं आजच नानासाहेबांस (मला) रावबहादुरीचें पदवीदान जाहीर होणार आहे. सकाळीं दहा वाजतां हा पानसुपारीचा समारंभ उरकून आम्ही लगेच मोटारीनें कोल्हापुरास आलों. तेथें स्टेशनवर टाइम्स ऑफ इंडियाची ताजी प्रत मिळाली. पाहतात तों माझें नांव रावसाहेबींत वाचून आम्हा उभयतांचा अत्यंत विरस झाला. मी कांहीं पदवीला हपापलों नव्हतों, पण एखाद्या पोलिस शिपुर्ड्याला रावसाहेबी देतात तेवढीच माझी किंमत सरकारला वाटते असें म्हणून मला ही पदवी नको, उद्यां पुण्यास जातांच मी पदवी फेकून देण्याचें पत्र सरकारास लिहितों, असें मी म्हणालों. माझ्या अंगाचा तीळपापड झाला. जदुनाथ म्हणाले, "पुण्यास जाऊन पुढचा विचार करूं." त्यांनीं लगेच पुण्यास कमिशनरची गांठ घेऊन त्यांस माझा पदवी नाकारण्याचा मनोदय कळविला. कमिशनर म्हणाले, " आम्हीं रावबहादुरीच सुचविली होती, पण वर हा फेरफार झाला. आतांच सरदेसायांनीं असें चिडून जाऊं नये, त्या योगानें पेशवे दप्तराचें काम चालू आहे त्यास व्यत्यय येईल. पुढील प्रसंगीं आम्ही हा अपवाद अवश्य सुधारून घेऊं." हें ऐकून मला मूग गिळून स्वस्थ बसणें भाग पडलें.

पुढें पावसाळ्यांत जुलई ता. १३ ला गव्हर्नरचा दरबार पुण्यास व्हायचा, त्यांत रावसाहेबी स्वीकारण्यासाठीं मला आमंत्रण आलें. मी साफ कळविलें मला दरबारास हजर राहतां येणार नाहीं. सरकारकडून विचारणें आलें, हजर न राहण्यास कारण काय ! मी पेंचांत पडलों. प्रि० रॉलिन्सनला विचारलें मी काय उत्तर देऊं ? दोघांनीं बोलून "मला सायंकाळीं वरचेवर लघवीला जावें लागतें, तीन तास पावेतों दरबारांत बसण्याची मला सोय नाहीं, मधून उठून बाहेर जाण्याची परवानगी असेल तर दरबारास येतों." त्यावर प्रकरण मिटलें. रावसाहेबीबद्दल अभिनंदन करतांना कमिशनर क्लेटननें मला कळविलें, " You have deserved higher honours and I hope they will follow in due course. " माझ्या नाराजीला हा जवाब होता. रीतीप्रमाणें मला अनेकांकडून अभिनंदनपत्रें आलीं तीं येथें सांगण्याचें कारण नाहीं.

२. रावबहादुरी

रावसाहेबीची पुढची पायरी एवढीच ह्या पदाची किंमत आहे. बाकी व्यवहारांत तिची मला मोठी अडगळ वाटते. पेशवे दप्तरच्या कामामुळेंच मुंबई सरकारशीं माझा संबंध आला. नाहीं तर मी सर्वथा बडोद्याचा नोकर. स. १९२९ च्या जून महिन्यांत पेशवे दप्तरचें काम सुरू होऊन जवळजवळ पांच वर्षांनीं तें कसेंबसें संपलें. माझ्या रावसाहेबीचा उद्वेग पोटांत जिरून गेला. इतक्यांत एकाएकीं कामशेत येथें मला मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड ब्रेबर्न ह्यांचें १० मे, स. १९३७ चें पत्र हातीं पडलें, त्यांतील मजकूर, " I am delighted to see your name in the list of coronation awards and I write to congratulate you very much indeed on the honour that has been conferred upon you by the Viceroy." षष्ठ जॉर्ज बादशहा नुकताच गादीवर आला त्याच्या वाढदिवसाचें हें निदर्शन आहे. गव्हर्नर ब्रेबर्नशीं§ माझी ओळख विशिष्ट कारणानें स्मरणीय बनली. मला वाटतें स. १९३४ च्या जून महिन्यांत ते प्रथम पुण्यास दाखल झाले. लगेच पेशवे दप्तर म्हणजे काय चीज आहे तें त्यांनीं पाहण्याची इच्छा कमिशनरास कळविली. तेव्हां मला कमिशनरची सूचना आली, कीं " गव्हर्नरसाहेब पेशवे दप्तर पाहण्यास येणार त्यासाठीं तुम्हीं येऊन तो विषय त्यांस समजून द्यावा." तदनुसार मी पुण्यास जाऊन गव्हर्नरच्या भेटीचा कार्यक्रम ठरविला. त्याप्रमाणें पुन: ठरलेल्या दिवशीं मी पेशवे दप्तरांत गेलों. दुपारीं १२ च्या सुमारास साहेब आले. कमिशनर स्मिथ व मी त्यांस प्रवेशद्वारीं भेटलों. स्मिथनीं प्रथमच त्यांस सांगितलें, कीं " हें सर्व दप्तर जुन्या मराठी भाषेंत असून हे सरदेसाई त्याचे माहितगार हजर आहेत, ते आपणास सर्व माहिती सांगतील." तदुत्तर मी गव्हर्नर-साहेबांबरोबर हिंडून सर्व व्यवस्था दाखविली. नंतर ते व मी दोघेच कचेरीच्या जागेंत अर्धा पाऊण तास बसून पेशव्यांच्या इतिहासाची, दप्तराच्या ऐतिहासिक उपयोगाची व इंग्रज रेसिडेंटांच्या पत्रव्यवहाराची पूर्ण वाटाघाट केली. एल्फिन्स्टोनच्या गव्हर्नरीचे कागद तेथेंच धूळ खात पडलेले मीं त्यांस दाखविले. मी म्हणालों, " मराठ्यांचें राज्य इंग्रजांस मिळालें. आतां त्याचें स्मरण मात्र ह्या कागदांत उरलें असून ते शक्य तितक्या

§ ह्यांचा मुंबईचा कारभार डिसेंबर १९३३ ते जुलई १९३७.

त्वरेनें प्रसिद्ध झाले पाहिजेत." "सरदेसाई, हें काम खर्चाचें असून सध्या पैशाचें दुर्भिक्ष्य आहे." मीं उत्तर केलें, "पैसा पैसा तो कितीसा लागणार, दर्यामें खसखस, एवढा सरकारचा गाडा चालतो, त्यांत फक्त कागद व छपाई एवढ्याचीच जरूर आहे. मुंबई सरकारचा छापखाना प्रचंड असून त्यास हें काम भारी नाहीं. शिवाय संपादकीय काम मी व सर जदुनाथ सरकार विनामूल्य करीतच आहों. सरकारच्या फायद्याचा हा सौदा आहे." ह्या सर्व गोष्टी ऐकून साहेब खूष होऊन गेले आणि माझ्या कामाचें त्यांनीं पुनः पुनः कौतुक केलें. त्याच वेळीं मीं ताडलें कीं माझी रावसाहेबी उद्यास येणार. गव्हर्नरनीं कमिशनरसाहेबांशीं त्याच वेळीं माझ्याबद्दल विचारपूस केली, त्याचा परिणाम ही रावबहादुरी १० मे १९३७ ची होय असें मी मानतों. अलीकडील गव्हर्नरांत ब्रेबर्नची मान्यता वरचढ होय, अशी त्यांची ख्याति आहे. बाकी स्वकष्टानें जोडलेली रियासतकाराची आल्या कोणत्याही सरकारी संज्ञेपेक्षा निःसंशय जास्त मोलवान होय.

तथापि ह्या प्रसिद्धीमुळें अनेक लहानथोर व्यक्तींकडून माझें हार्दिक अभिनंदन झालें त्याचीं पत्रें संग्रहांत आहेत, त्यांचा नुसता नामनिर्देशही करण्याची आवश्यकता नाहीं. कमिशनर स्मिथ, सुप्रसिद्ध हिंद कैवारी Edward Thompson हल्लींचे पुण्याचे कर्तबगार कलेक्टर सदाशिव गोविंद बर्वे, रँगलर परांजपे इत्यादींचीं पत्रें अद्यापि मला कौतुकास्पद वाटतात.

श्री. भास्करराव जाधव (नुकतेच कैलासवासी झालेले, २६ जून, स. १९५०) ह्यांचें पत्र विशेष उद्बोधक आहे. रावबहादुर पदवी जाहीर झाली तेव्हांच ते मजकडे कामशेतला राहत होते. आरंभीं ह्यांचा माझा परिचय कधीं नव्हता. सत्यशोधक समाजाचे संस्थापक, ब्राह्मणांचे निंदक अशी त्यांची ख्याति बाहेर होती. स. १९३८ त कामशेत येथें ऐतिहासिक सप्ताह झाला त्याचें प्रमुखस्थान त्यांनीं स्वीकारून ते येथें राहिले. त्यामुळें त्यांचें निर्मळ खाजगी वर्तन व अभ्यासु वृत्ति माझ्या लक्षांत आली. मुख्यतः ब्राह्मणवर्गाचे जे कित्येक चांगले गुण म्हणून बोलले जातात तेच त्यांच्या ठिकाणीं पाहून मला मोठें कौतुक वाटलें. नदीवर थंड पाण्याचें स्नान, आपले कपडे आपण धुऊन स्वच्छ ठेवणें, दोन भोजनांपलीकडे चहादेखील न घेणें, रेखींव साधी वागणूक

हे त्यांचे गुण माझ्या नजरेंत भरून माझा त्यांजबद्दलचा पूर्वग्रह पार नाहींसा झाला.

३. सातारा छत्रपतींकडून साडेतीन वस्त्रें

ह्या माझ्या आयुष्यांतील अत्यंत संस्मरणीय प्रसंग होय. आणखी पुष्कळ सत्कार जरी पुढें मला अनुभवावयास मिळाले तरी अनेक कारणांस्तव साताऱ्च्या या समारंभाचें औचित्य कांहीं वेगळें होतें. षष्ठी एकसष्टीस चहूंकडे ऊत आला होता. साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदासाठीं भीषण चढाओढ सुरू होती. माझें वय सत्तरीच्या घरांत येत असून रियासती व पेशवे दप्तर प्रकाशन हीं माझीं दोन कार्यें जाहीर होतीं. माझें मन मात्र ह्या बाह्य उपाधींस कधींच हपापलेलें नसून, काम हेंच जीवनाचें यश, त्यास लौकिकी जाहिरातीची बिलकूल आवश्यकता नाहीं, उलट अशी जाहिरात न होईल तितकी चांगली असें भक्कम समाधान माझ्या मनास लाभलें होतें. स. १९२९ च्या पावसाळ्यांत पेशवे दप्तरचें काम सुरू होऊन तें पांच वर्षांनीं १९३४ च्या पावसाळ्यांत पुरें झालें. त्यांत कितीही दोष असले तरी पन्नास पाऊणशें वर्षें चाललेला महाराष्ट्राचा अट्टाहास एकदांचा सिद्धीस गेला हें श्रेय दैवयोगानें माझ्या पदरीं पडलें. ह्या परिपाकांत मला पुण्याचा सहकार तर मिळाला नाहींच, उलट वेळीं अवेळीं त्यास भलभलते अडथळेच पुण्यांतून बुद्धिपुरःसर घालण्यांत आले. इतिहास मंडळाचे मुख्य चालक प्रो. पोतदार ह्यांनींच हाकाटी चालविली कीं आम्हांस दप्तरांतील तमाम कागदांची सूचि पाहिजे, निवडक पत्रांची छपाई नको. असे हे अपप्रचार सामान्य जनतेच्या जिव्हारीं लागले आणि स. १७५० त सातारा-पुणें अशी स्पर्धा घडली तिची पुनरावृत्ति अल्पांशानें स. १९३४ त निर्माण झाली. साताऱ्यास एक इतिहास मंडळ होतें. पारसनीस म्यूझियम तेथेंच विद्यमान होतें. औंधचे प्रतिनिधि, रावबहादुर काळे, अण्णासाहेब बखले, कलेक्टर हमीदअली अशा कित्येकांनीं सर जदुनाथ सरकार ह्यांचा सल्ला घेऊन सातारा येथें पेशवे दप्तराच्या सांगतेचा समारंभ करण्याचें ठरविलें. शुक्रवार ता. २ नोव्हेंबर, स. १९३४ हा मुख्य दिवस मुक्रर होऊन व्याख्यानें, उपाहार इत्यादि प्रकार तीन दिवस-पावेतों मोठ्या उत्साहानें तेथें पार पाडले. सातारा म्यूझियमच्या भव्य इमारतींत सायंकाळीं पांच ते सातपावेतों जनसंमर्द भरून छत्रपतींच्या हस्तें रौप्यतबक

व प्राचीन प्रघातानुरूप साडेतीन वस्त्रें रियासतकारास अर्पण करण्यांत आलीं. सर्वच वातावरण अपूर्व होतें. सर जदुनाथ कुटुंबसह व मी सर्व कौटुंबीयांसमवेत हजर होतों हें तर खरेंच, पण साताराचे उत्साही कलेक्टर हमीदअली व त्यांचे श्वशूर बडोद्याचे सुप्रसिद्ध राष्ट्रसेवक आब्बास तैय्यबजी, जज्ज पु. मं. लाड इत्यादि अनेक सन्मान्य मंडळी त्या प्रसंगास उपस्थित होती. तो सर्व प्रसंगच प्राचीन इतिहासाचें अपूर्व स्मरण करून देणारा घडला. महाराष्ट्रभर त्याची जाहिरातही पुष्कळच झाली.

आरंभीं मुख्य मंडळीचा फोटो घेतल्यावर कलेक्टर हमीदअली ह्यांनीं प्रास्ताविक भाषण करून प्रसंगाचें औचित्य निवेदन केलें. सेक्रेटरी बखले ह्यांनीं संदेश वाचून दाखविले. नंतर सर जदुनाथ सरकारांनीं अत्यंत हृदयस्पर्शी भाषण करून मराठ्यांच्या इतिहासाचें विहंगमावलोकन केलें. तदुत्तर रावबहादुर काळे ह्यांनीं पेशवे दप्तरच्या कार्याचा गौरव सांगितला. प्रस्तुतचे सातारा गादीचे वंशज छत्रपति शाहू त्या वेळीं बालवयांत उपस्थित होते. त्यांनीं आपलें भाषण वाचून एक चित्रित रौप्य ताट, मुर्शिदाबादेहून बनवून आणलेलें रेशमी धोतर, एक शेला पागोटें, अंगरख्याचें ठाण व फितवीसाठीं किनखापाचें अर्धे ठाण अशीं साडेतीन वस्त्रें प्राचीन प्रघातास अनुसरून नजर केलीं. नंतर ह्या सर्व कार्याला उत्तर देण्याची पाळी मजवर आली. तें भाषण समग्र येथें देण्याचें प्रयोजन नाहीं. मीं सांगितलें, "पेशवे दप्तराचें काम माझ्या हातून सिद्ध झालें असलें तरी त्याचें श्रेय माझें नसून माझे संशोधनसहायक, मुंबई सरकार आणि खर्चाची रक्कम तावडतोब उभारण्यास मदत करणारे सद्गृहस्थ ह्या सर्वांचें आहे. त्यांतील नानाविध दोष व उणीवा ह्यांजबद्दल मात्र मीच एकटा सर्वथा जबाबदार आहें. मीं कांहीं एखादी मोठी राष्ट्रसेवा बजावली असें मला वाटत नाहीं." असें म्हणून मीं सर्वांचे आभार मानिले आणि मोठ्या उल्हासांत समारंभ सिद्धीस गेला.

४. माझा ७१ वा वाढदिवस

साताराचा समारंभ माझ्या व्यक्तित्वासंबंधानें बराच अपूर्व व क्रांतिकारक ठरला. लोक कांहीं म्हणोत, मी आपलें कर्तव्य निमूटपणें बजावीत होतों, तरी या समारंभाच्या द्वारें ऐतिहासिक संशोधनांतील अंतःस्थिति चव्हाट्यावर आली आणि प्रत्यक्ष पुण्यांतून माझा व माझ्या कामाचा उपहास

बुद्धिपुरःसर करण्यांत येत आहे अशी समजूत महाराष्ट्रांत व्यक्त झाली. सातारच्या समारंभांतील जबाबदार व्यक्तींच्या भाषणांनीं खरा प्रकार जाहीर होऊन पेशवे दप्तरच्या कामास पुणेंकरांकडून विरोध झाला तो महाराष्ट्रास आवडला नाहीं. वास्तविक जो समारंभ पुण्यासच व्हावयास पाहिजे, तो साताऱ्यास झाल्यामुळें, त्याची भरपाई करण्याचा उपक्रम पुण्यास लगेच सुरू झाला. स. १९३५ सालीं खुद्द रायगडावर शिवनिधनोत्सव मोठ्या प्रमाणांत करण्याचें रायगड स्मारक मंडळानें ठरवून त्याचें अध्यक्षस्थान मला दिलें. दत्तोपंत आपटे, नरसोपंत केळकर वगैरेंनीं पुढाकार घेऊन माझी समजूत काढण्याचा हा एक मार्ग स्वीकारला. ह्याच वेळीं “ रियासतकारांस वधाई ” ह्या नांवाचा मजसंबंधानें गौरवात्मक लेख खुद्द दत्तो वामन पोतदार ह्यांनीं १६ मे, १९३५ च्या ‘ संजीवनी ’ च्या अंकांत प्रसिद्ध केला. वधाई म्हणजे वृद्धत्व, भरभराट असें मी समजतों. माझ्या मतें हा अवास्तव स्तुतीचा लेख ह्याच वेळीं लिहिण्याचें प्रयोजन पोतदारांस वाटलें, हाच वरील माझ्या निष्कर्षाचा पुरावा होय. स. १९३५ च्या मे महिन्याच्या २४ तारखेस तिथीनें माझ्या वयास ७० वर्षे पुरीं होऊन ७१ वें लागतें त्या संबंधानें माझें जाहीर अभिनंदन ह्या लेखांत केलें असून नंतर त्यांच्याच अध्यक्षतेखालीं पुण्यास महाराष्ट्र शारदा मंडळाच्या तर्फे गोखले हॉलच्या जागेंत जाहीर सभा भरून माझा ७१ वा वाढदिवस साजरा झाला. पुणेंकरांनीं माझ्या एकंदर कामाची भरपाई करून दिल्याचें हें पहिलें ठळक उदाहरण होय. मला स्वतःला अशा भरपाईची जरूर कधीं वाटली नाहीं आणि पुणेंकरांनीं माझा कांहीं घात किंवा अपमान केला असेंही मला कधीं वाटलें नाहीं. ऐहिक व्यवहारांत पुष्कळदां दुमत होतच असतें, एकाचें कृत्य तंतोतंत दुसऱ्यास पटेल असें नाहीं. प्रत्येकाला आपापल्या भावनेप्रमाणें वागण्याचा पूर्ण हक्क आहे.

स. १९३४ च्या २ नोव्हेंबरास सातारा समारंभ झाला. त्यानंतर स. १९३५ ता. १८ एप्रिलला चैत्र शुद्ध पौर्णिमेस रायगडावर शिवाजीचा उत्सव साजरा होऊन त्यापुढील २४ मे रोजीं पुण्यास माझी एकाहत्तरी जाहीर झाली, हे प्रसंग माझ्या जीवनांत अर्थात्‌च स्मरणीय म्हटले पाहिजेत. सर जदुनाथ व मी उभयतांनीं रायगड राजधानी बरोबर पाहवी

असा फार दिवसांचा आमचा मनोदय होता. दुसरीं अनेक स्थळें आम्हीं उभयतांनीं बरोबर पाहिलीं तो योग रायगडासंबंधानें जुळला नाहीं आणि आतां तो जुळेल असें वाटत नाहीं. १७ एप्रिल रोजीं मी, सौ० माई व आणखी आमची दहापांच कौटुंबीय मंडळी रात्रीं ९ वाजतां गडावर पोचलों. सायंकाळीं ५ वाजतां पाचाडहून पायीं डोंगर चढूं लागलों आणि सर्व लहानथोरांनीं अवघड वाट चाढून चार तासांत मजल गांठली हा त्या वेळचा एक विक्रमच होय. खुद्द पोतदारांनींच डोंगर चढून गेलेल्या आमच्या ह्या विक्रमाची आपल्या लेखांत वाहवा केली आहे.

ता० १८ एप्रिलचा सर्व दिवस आम्हीं रायगडावर काढला. बहुतेक ठिकाणें मीं व बायकांनीं हिंडून पाहिलीं. सुमारें तीनशें लोकांच्या जमावापुढें माझें शिवनिधनावर व्याख्यान झालें, त्यास पोतदार हजर होते. मात्र ते मला या दिवशीं बरेचसे नाराज व कष्टी दिसले. मीं त्यांस बोलण्याची विनंती केली पण ती मान्य न करतां 'पुनः कधीं प्रसंगानें माझ्या विधानांची दखल घेईन' एवढेंच बोलले. ते म्हणाले, 'मी उत्सवासाठीं आलों नसून सिंहासनादि ऐतिहासिक स्मारकांची निश्चिति ठरविण्यासाठींच प्रत्यक्ष पाहणीकरितां आलों.' गडावरूनच सर जदुनाथांस एक कार्ड लिहून मीं रायगड पाहिल्याची धन्यता व्यक्त केली.

रायगडाहून परत येतांच पुण्यांत व्हावयाच्या एकाहत्तरीचा वेध सुरू झाला. मजवर हा एक प्रकारचा प्रसंगच ओढवत आहे असें मला वाटलें. पुणेकरांशीं झगडा करावा अशी मला बिलकूल इच्छा नव्हती. वास्तविक मी सुद्धां पुणेकरच नव्हे काय असें मला वाटे. मतभेद केव्हांही असूं शकतील. ते व्यक्तींचे होते, स्थळांचे नव्हते. कांहीं असलें तरी सातारच्या समारंभांत माझें मन रंगलें तसें पुण्यास तें रंगलें नाहीं. खुद्द मी तर अगदीं गांगरल्या-सारखा झालों. मला काय सांगायचें तें मीं साताऱ्यास सांगितलें, त्याहून पुण्यास दुसरें कांहीं सांगण्यासारखें मला सुचेना. सातारकर मंडळीच्या चेहेऱ्यांवर प्रफुल्लता मला दिसली, तशी ती पुण्यास दिसली नाहीं. समाजही तसा भरगच्च नव्हता. तथापि शक्य तितक्या सौजन्यानें मीं आपल्या सोंगाची बतावणी केली. पोतदार सभेचे अध्यक्ष होते. बाबासा० देशपांडे, दि. वि. काळे, या. मा. काळे (बुलढाणा), प्रो. बेहरे,

दत्तोपंत आपटे, ओतूरकर, अत्रे, शं. दा. पेंडसे इत्यादींनीं भाषणें केलीं. त्यांत शं. दा. पेंडसे ह्यांनीं संशोधक व संकलनकार ह्या अप्रयोजक वादाचा खरपूस समाचार घेतला. अत्र्यांचें भाषण मीं प्रथमच ऐकिलें. त्यांनीं हास्योत्पादनानें सभा हादरून सोडली. खुद्द पोतदारांनीं माझी एक हायस्कूलची अभ्यासाची चोपडी मुद्दाम पैदा केलेली मला दाखविली. त्यांच्या विनंतीवरून मीं भाषण केलें तेंही माझ्या जीवनसरणीचें द्योतक आहे. मीं आपल्या भाषणांत माझें जीवनध्येय व्यक्त करून अनेकांनीं मजवर उपकार केले त्यांचे जाहीर आभार मानले. दत्तोपंत पोतदारांनीं समारोपा-दाखल भाषण केल्यावर दोन तासांची ही सभा सायंकाळीं समाप्त झाली.

५. कामशेत सप्ताह

[शनिवार १ ऑक्टोबर ते शुक्रवार ७ ऑक्टोबर स. १९३८]

वर सांगितल्याप्रमाणें माझें जीवनकार्य चहूंकडे वृद्धिंगत होत असतां स. १९३७ त मूळव्याधीच्या विकारानें माझी प्रकृति बिघडली. मला फारशीं दुखणीं कधीं आलीं नाहींत, पण मूळव्याधीनें पुष्कळदां अपकार झाला. स. १८९५ सालीं व पुनः १९०५ सालीं अशी दोनदां शस्त्रक्रिया अनुभविली. त्यानंतर हा विकार स. १९३७ सालच्या मे-जून महिन्यांत पुनः जाणवूं लागला. डॉ केळकरांनीं तळेगांवास थोडी शस्त्रक्रिया केली. तेथें सुमारें तीन आठवडे राहिलों तरी आराम वाटला नाहीं. निद्रानाश होऊन जास्तच जाच झाला. तेव्हां भाऊंनीं मला मुंबईस नेलें. तेथें डॉ० गोखले ह्यांच्या नर्सिंग होममध्यें २२ सेप्टेंबर रोजीं डॉ० जोगळेकर ह्यांनीं सर्व मूळव्याध शस्त्रानें कापून काढिली. रोगाचें निवारण झालें, पण जखम भरण्यास दोन तीन महिने लागले. या दुखण्यांतले अनुभव माझ्या मनांत जागृत आहेत. मी मनाचा अत्यंत कोता, दुःख सहन करण्याची वृत्तिच नाहीं. म्हणून जवळच्या मंडळींस मीं निष्कारण पुष्कळ त्रास दिला त्याचें फार फार वाईट वाटतें. एक महिना मुंबईस काढून मी कामशेतला आलों, तेथें हळू हळू आराम वाटूं लागला. नोव्हेंबरांत सर जदुनाथ माझ्याकडे कामशेतला येऊन दोन आठवडे राहून कलकत्त्यास परत गेले. त्या मुक्कामांत अनेक नवीन कामांचा आम्हीं एकत्र खल करून ठरविलें कीं ठिकठिकाणीं वावरणाऱ्या वैयक्तिक अभ्यासकांस एकत्र आणून विचारविनिमय

करणें हेंच पहिलें काम होय. असा सद्विचार सिद्धीस जाण्यास निर्वेध स्थल व राहण्याची सोय पाहिजे. पुण्यास भारत इतिहास मंडळ काय किंवा आदल्या वर्षी स्थापन झालेली हिस्टरी काँग्रेस काय, तेथें जाहिरात व देखावा दिसतो, पण प्रत्यक्ष काम व मनमुराद विवेचन होऊं शकत नाहीं. मोठी सभा म्हटली कीं तिला सभेचीं नियंत्रणें आलीं. चार आठ दिवस अनेक तज्ज्ञांनीं एकत्र राहून विचारविनिमय केल्याशिवाय खरा उद्देश सिद्धीस जात नाहीं. कामशेतला हवा, पाहुण्यांची राहण्याभोजनाची सोय, संदर्भ ग्रंथांचा जवळ संग्रह अशी स्थिति लक्षांत आणून आम्ही एक आठवडा इतिहासाभ्यासकांस एकत्र आणण्याचें ठरविलें. हजारपंधराशें खर्च होईल तो करण्याचें मीं अंगावर घेतलें. फलनिष्पत्तीच्या मानानें हा खर्च अल्प होता. आमचे येथें समाईक भोजनाची सोय असून अहोरात्र एकाच कार्यांत घालविण्यास पाहुणे सिद्ध असतात, तसा प्रकार पुणें मुंबई-सारख्या ठिकाणीं भरणाऱ्या संमेलनांत घडूं शकत नाहीं. पन्नास पाऊणशें अभ्यासक एकत्र आणावे अशी योजना आम्हीं ठरविली. नक्की वेळ, पाहुण्यांची नांवनिशी व विषयाचा कार्यक्रम मागाहून बाहेरच्यांची सल्ला घेऊन मुक्रर करूं असें बोलून सर जदुनाथ मुंबईस गेले. तेथें दोनतीन दिवस राहून ते कलकत्त्यास परत गेले. मुंबईस त्यांजबरोबर मी नव्हतों.

मुंबईस श्रीपादराव टिकेकर आमचे घरीं राहत होते त्यांच्याशीं सर जदुनाथांनीं कामशेतच्या ह्या संमेलनाची वाटाघाट केली. टिकेकरांसारखा चतुरस्र सव्यसाची सेक्रेटरी जदुनाथांस लाभतांच त्या विषयास मूर्तस्वरूप येण्यास विलंब लागला नाहीं. मे महिन्यांत माझा वाढदिवस येणार त्या प्रसंगानें एक स्मारक ग्रंथ तयार करून तो सादर करण्यासाठीं समारंभ करावा असा विचार त्या दोघांनीं ठरविला आणि तीन महिनेपावेतों त्यांनीं तो बेत मला कळविला नाहीं. एप्रिलांत मला ही वार्ता कळतांच मीं लगेच जदुनाथांस लिहिलें, “ माझ्या वाढदिवसास हा समारंभ करून माझा वडेजाव करणें मला बिलकूल मान्य नाहीं. तथापि त्यांतला ऐतिहासिक प्रोत्साहनाचा भाग मला इष्ट आहे. जमवाजमव होऊन ग्रंथ छापून निघण्यास अवकाश राहिला नाहीं. तर दसऱ्याच्या संधीस माझ्या वडिलांची श्राद्धतिथि आहे, त्यांच्या स्मरणार्थ आम्ही सर्व सरदेसाई कुटुंब व आप्त मंडळी एकत्र जमून

वडिलांचें श्राद्ध व इतिहासाध्ययन हीं दोनही कृत्यें एकदम पार पाडूं." ही माझी सूचना सर्वांस पसंत पडली. तेणेंकरून हा कामशेत सप्ताह सिद्ध झाला. मध्यंतरीं मे महिन्यांत मी व पुतण्या अरविंद दार्जिलिंगला जाऊन सरकारांशीं तो बेत नक्की केला.

शनिवार ता. १ ऑक्टोबर, स. १९३८ ह्या दिवशीं मुंबईस सेंट झेव्हियर्स कॉलेज हॉलमध्यें सायंकाळीं ६ पासून ८ पर्यंत स्मारकग्रंथ अर्पण करण्याचा समारंभ झाला. मुंबईतील बरेच विद्वज्जन ह्या प्रसंगीं हजर होते.

हा सरदेसाई स्मारक ग्रंथ मराठी व इंग्रजी अशा दोन भागांत प्रसिद्ध करून त्याची प्रत वरील सभेंत अध्यक्ष नामदार जयकर यांच्या हस्तें मला अर्पण करण्यांत आली. दोनही भागांत मिळून पन्नास-साठ विद्वानांचे ऐतिहासिक लेख छापले असून त्यांत सरदेसाई ह्यांचें जीवनवृत्त व उद्योग ह्यांचें दिग्दर्शन केलेलें आहे. स्मारक समितीचे अध्यक्ष ना. भास्करराव जाधव ह्यांनीं सभेची सुरुवात करून ना. जयकर ह्यांनीं सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारून तो ग्रंथ सरदेसाई ह्यांस अर्पण करावा अशी सूचना केली. जयकरांनीं स्थानापन्न होऊन सभेचा उद्देश व सरदेसाई ह्यांचा गुणगौरव निवेदन केला. ह्या प्रसंगीं सर जदुनाथ सरकार, महाराज कुमार रघुबीरसिंह, पंडित जयचंद्र विद्यालंकार, डॉ. कानुंगो इत्यादींनीं समयोचित भाषणें केलीं. नंतर सरदेसाई ह्यांनीं आभारप्रदर्शक भाषण केल्यावर त्यांस पुष्पहार घालून समारंभ समाप्त झाला. त्याच प्रसंगीं कामशेत येथें ठरलेल्या सप्ताहाची जाहिरात सांगण्यांत आली. मुंबईचा समारंभ शनिवार ता. १ ऑक्टोबरला होऊन रविवारीं ता. २ रोजीं सकाळीं पन्नाससाठ मंडळी आगगाडीनें ११ च्या सुमारास कामशेतला दाखल झाली. सोमवार ता. ३ रोजीं विजया दशमीचें सीमोल्लंघन झालें.

शरदृतूचा हा समय कामशेतला अत्यंत हृदयंगम असतो. कोवळें ऊन, पक्वतेस पोचून आनंदानें डुलणारीं शेतें, पर्वतराजींतील झुळझूळ वाहणारे निर्झर आणि शंखासारखें स्वच्छ व जोरानें वाहणारें इंद्रायणीचें पात्र ह्यांमुळें कोजागिरीची ही पर्वणी आम्ही सालोसाल अत्यंत उल्हासानें पाळीत आलों, पण ह्या सालीं मेघराजाला असला विहार मानवला नाहीं. कदाचित् ऐतिहासिक कार्यास व्यत्यय येऊं नये म्हणून

सर्व निमंत्रितांना अहोरात्र घरांतच आपलें काम करीत राहणें जास्त श्रेयस्कर अशा भावनेनें पर्जन्य देवतेनें ह्या वर्षी ऐन वर्षाकाळाचें स्वरूप ह्याच सप्ताहांत धारण केलें. सभोंवार जलसंचय वाढून तात्पुरते बांधलेले संडास देखील वाहून गेले. मुख्य बंगल्याच्या मध्य दालनांत सर्वांनीं जवळ शेगड्या घेऊन मुखजिव्हाद्वारा मिळेल तेवढाच व्यायाम घ्यावा अशी पाळी आली, मग सीमोल्लंघनाची बहार काय विचारावी! शुक्रवार ता. ७ ऑक्टोबर रोजीं पाहुण्यांना परत जाण्याचा संदेश देऊन मेघराजानेंही कामशेतची रजा घेतली, ह्या योगानें हें संमेलन आम्हां सर्वांना चिरंतन स्मरणीय बनलें आहे.

पाहुण्यांच्या आरामासाठीं आम्हीं विस्तृत व शृंगारलेले सभामंडप उभारले होते ते सर्व भिजून निरुपयोगी बनले, तेव्हां आम्हां सेवकांची कशी त्रेधा उडाली असेल ह्याची कल्पना करावी. प्रथमपासूनच आम्हीं सर्वांनीं एकत्र विचार करून हा प्रसंग आमचें कौटुंबिक संमेलन बनविलें. बाहेरचा नोकर म्हणून न ठेवतां भोजन, चहापाणी, स्नान, वस्त्रपात्र, शय्यादि सर्व कामें पाहुण्यांसंबंधानें घरच्या मंडळींनीं करावयाचीं, घरची सर्व मंडळी, मुलगे-मुली, निकटचे आप्त व ओळखीचे सहायक अशी सुमार पाऊणशें आणि मुख्य येणारे पाहुणे सुमार पन्नास व त्यांचे संबंधीय मिळून आणखी पाऊणशें असा दीडशेंच्या अंदाजाचा हा समाज आठ दहा दिवस एकत्र जमल्यानें ह्या प्रसंगास अनुपम शोभा आली. खालच्या श्रीभाऊंच्या वसतिगृहांत १०० पानें एकदम जेवणास बसत. दररोजचा भोजनाचा बेत वेगळा. चटण्याकोशिंबिऱ्यांपासून पक्वान्नापर्यंत प्रत्येक चीज घरच्यांनीं बनवायची, नांवाला एक आचारी बाहेरचा होता. त्यांतून पाहुणे देखील हिंदच्या सर्व प्रांतांतून जमलेले. मद्रास, बंगाल, लखनौ, लाहोर, राजपुताना, इंदूर, मुंबई, म्हैसूर अशा अनेक ठिकाणच्या मंडळींस कांहीं उणें पडूं नये अशी व्यवस्था आम्हीं ठेविली. आदरातिथ्याचा एक विशिष्ट धडाच आमच्या समस्त घरास मिळाला.

बाहेरचे नामांकित पाहुणे तर आलेच, परंतु आमच्या घरची सर्व मंडळी कधीं न भेटणारी एकत्र आली हाच अपूर्व योगायोग होय. लग्न-कार्यप्रसंगानें अशी मंडळी अल्पकाळ मुंबई-पुण्यासारख्या संकोचित

जागेंत एकत्र येणें व कामशेतसारख्या उघड्या एकान्त जागेंत जमणें ह्यांत केवढा तरी फरक आहे. माझे बंधु नारायणराव बरींच वर्षे दूर विभक्तपणें राहत होते, त्यांनीं पुन: कुटुंबांत समरस होणें हा देखील सर्वांच्या उल्हासाचा प्रसंग बनला. किंबहुना श्राद्ध, पक्ष, पूजानैवेद्य इत्यादि धार्मिक कामें नारायणरावांनीं पत्करलीं तर आबाभाऊंनीं दर एक पाहुण्याकडे लक्ष ठेवून त्यांची सोय व आराम घडवून आणिला. प्रत्यक्ष सर जदुनाथ आपल्या लेकी, सुना, नातवंडें घेऊन आले त्या सर्वांना येथें परकेपणा न वाटूं देण्याची खबरदारी आम्हीं ठेवली. गोदूताई, बगूताई, इंदुबाई, सईताई, तसेंच जयराम, श्रीराम, बापू, दत्ता, मकरंद हे सर्व मुलगे, एकापेक्षां एक वाघ-वाघिणीसारखे वागणारे व त्या सर्वांचा दिग्दर्शक विजेसारखा चपळ श्रीपादराव टिकेकर अशी सर्व मंडळी तत्परतेनें कामास लागल्यावर समारंभांत उणें तें काय पडणार !

दरम्यान या अननुभूत वातावरणानें माझ्या मनोवृत्ती कशा उचंबळून आल्या असतील याची कल्पनाच केलेली बरी. सर जदुनाथांचा मुख्य सहायक मी, पाहुण्यांची विचारपूस, ऐतिहासिक कार्याचा पुरस्कार, बाह्य जगांत उद्भवणारे आमच्या या सप्ताहाचे फवारे, आप्तांचा परामर्ष, स्नान भोजनादि व्यवसायांत कोणास कांहीं उणें न पडण्याची खबरदारी हें काम मला कांहीं थोडें नव्हतें. ज्याला घरची बळकट जमात साह्य आहे त्याला अस्मान ठेंगणें वाटलें तर नवल नाहीं, असा हा माझ्या जन्मांतला मोठा संस्मरणीय बनाव होय. हें भाग्य क्वचित्च कोणाच्या वांट्यास येतें. अंत:करणांत मला पराकोटीची धन्यता वाटली. कौटुंबिक स्वास्थ्य व बाह्य जगांतला उत्कर्ष अनुभविणाऱ्या त्र्याहत्तरीच्या पुढें गेलेल्या माझ्यासारख्या व्यक्ती जगांत कितीशा असतील ! ह्या भावनेंत गर्क होत असतां माझ्या मनांत एक नूतन कल्पना उद्भवली. लगेच रात्रीं बसून मीं एक विशिष्ट लेख लिहून काढून बुधवार ता. ५ ऑक्टोबर, आश्विन शु. ११ सायंकाळीं ६ च्या सुमारास फक्त कौटुंबीयांस एकत्र जमवून तो त्यांस वाचून दाखविला. लहानसें भाषण केलें, तें मीं पूर्वीच्या प्रकरणांत दिलें आहे. तो माझा त्या वेळचा लेख मला हृदयंगम वाटतो. मला त्या वेळीं कल्पना नव्हती कीं मी इतका जगेन म्हणून (८५ वर्षे, १९५०).

कामशेतच्या या विद्वज्जनसमागमाचा हा (Kamshet-meet चा) वृत्तान्त पुढें प्रसिद्ध करण्यांत आला, त्यांत सर जदुनाथांनीं त्याचें प्रयोजन व फलश्रुति ह्यांचें उत्कृष्ट वर्णन केलें आहे. ता. २५ मे, १९३८ च्या जाहीरपत्रांत सर जदुनाथांनीं कळविलें,

"Workers in history in different parts of India have often expressed a wish to meet together for comparing notes, discussing problems, and arranging their future lines of study and research in mutual co-operation, so as to avoid overlapping and also to put the facilities existing in India to the fullest use. Such a scheme, if realized, would cause an enormous economy of our country's material resources and brain power, and prevent that waste and comparative futility of effort, which usually results from individual scholars working in isolation from and ignorance of their fellow-labourers in the same field, when no co-ordinated plan of the division of labour is followed. A sort of central bureau of intellectual labour exchange for Indian history between the older generation and the younger apprentices was contemplated in our Kamshet programme."

पुण्यास व इतरत्र इतिहास संशोधन संस्था आहेत. शिवाय हिंदुस्थानचा परिपूर्ण इतिहास लिहिण्याचे उद्योगही चालू आहेत. पोतदारांची हिस्टरी कॉंग्रेस, मुनशींचें भारतीय विद्याभवन, जयचंद्र विद्यालंकारांची बनारस परिषद् अशा आपापल्यापरी इतिहास कार्य करणाऱ्या संस्था असतां, त्यांचीं संमेलनेंही वारंवार भरत असतां, काम करण्यास माणसें पुढें येत नाहींत ही सर्वांची मुख्य तक्रार. तीं माणसें तयार होण्यास अडचणी काय आहेत व पैसा खर्चून माणसें सिद्ध कां होत नाहींत, ह्याचीं कारणें शांत अशा मूलगामी विचारानें शोधून काढून बौद्धिक देवघेव निर्माण करावी असा हा आमचा बेत होता. पुण्यास भारत इ. मंडळाला ज्या गोष्टी करणें शक्य होत नाहीं, त्याची पूर्तता करावी; नुसते ठराव पास न करितां किंवा वर्गण्या निवडणुकी अशा विविध भानगडींत न पडतां निवळ खासगी प्रयत्नानें अडलेलें गाडें पुढें लोटणें किती शक्य आहे हें ठरवावें आणि क निराळी दिशा चालू कार्यास लावावी एवढाच सर जदुनाथांचा व माझा

मुख्य उद्देश विचार करकरून ठरला. किंबहुना ते व मी आपापल्यापरी जितके होतकरू विद्यार्थ्यांच्या उपयोगी पडतों, तसा उपयोग विशिष्ट संस्थांचा होत नाहीं. अलीकडील दहापांच वर्षांत युनिव्हर्सिटींतील परीक्षक म्हणून किंवा पत्रद्वारा आम्ही किती तरी साह्य शिकाऊ जनांचें केलें असल्यामुळें प्रत्यक्ष समागमांत संशोधनमार्ग ठरवावे असा आम्हीं हा उद्योग चालू केला. १ ऑक्टोबरला मुंबईस जो माझा सत्कार झाला, त्याचें ऋण कोणत्या न कोणत्या मार्गांनीं फेडावें, लोकांकडून घेतलेल्या मानाची परत फेड कांहीं दृश्य सेवेनें करावी ही माझी अंतःकरणाची मुख्य तळमळ होती. Vacation classes for Research म्हणजे सुट्टीच्या दिवसांत कामशेत येथें शिक्षण वर्ग काढण्याची कल्पना कैक दिवस मनांत घोळत होती. त्यासाठीं विद्यार्थ्यांस राहण्याच्या खोल्या आम्हीं येथें बांधल्या, भोजनाची सुकर व्यवस्था बनविली; म्हणजे अहोरात्र अभ्यासकांची चर्चा चालण्याची जी सोय येथें आहे ती इतरत्र शक्य नाहीं. पुष्कळांनीं आजपावेतों कामशेतच्या निवासाचा अनुभव व फायदा घेतला आहे. भास्करराव जाधव, बाबासाहेब जयकर, बाळासा० खेर, दादासा० मावळंकर अशांनीं आमच्या ह्या प्रयत्नांची वाखाणणी केली आहे. ह्या दृष्टीनें आम्हीं निवडक मंडळींस आमंत्रणें दिलीं. जेवढें आम्हास झेपेल तेवढेंच काम अंगावर घ्यायचें असा आमचा निर्धार असल्यामुळें ह्या उपक्रमास आम्हीं सार्वजनिक स्वरूप मुद्दाम दिलें नाहीं. ज्यांचें सहकार्य उपयोगास येईल अशांस आम्हीं निमंत्रणें पाठविलीं. अहवालांत पाहुण्यांची नांवनिशी छापली आहे तिजवरून आमचे हेतु व्यक्त होतील. मंगळवार ता. ४ ऑक्टोबर रोजीं मुंबईचे गृहमंत्री श्री. मुनशी व त्यांच्या पत्नी ह्यांनीं आपण होऊन आम्हांस आपल्या समागमाचा लाभ दिला आणि भारतीय इतिहास कसा बनवावा ह्याची रूपरेषा ठरविली. ह्याच वेळीं पारसनीस म्यूझियमचा सावळागोंधळ आम्हीं मुनशींच्या नजरेस आणून त्याचें भावी स्वरूप निश्चित केलें. बाळासाहेब खेर येणार होते पण त्यांस सवड झाली नाहीं.

ऑक्टोबरांत कामशेतच्या निवासास भेट देण्याचीं आमंत्रणें मे-जून मध्यें बाहेर गेलीं त्यांत पुण्याच्या भारत मंडळालाही आपले चार दोन प्रतिनिधि पाठविण्याचें बोलावणें गेलें. शिवाय व्यक्तिशः पोतदार, आपटे, शेजवलकर

अशा ठळक संशोधकांसही सेक्रेटरीचीं पत्रें गेलीं. या आमच्या आमंत्रणाचा विपर्यास करून मंडळानें आम्हांस विरोध दर्शविला. प्रो. शेजवलकरांनीं ज्ञानप्रकाशांत स्वतःच्या सहीनें ता. ५ ऑक्टोबरच्या अंकांत आमच्या नालस्तीचा दीर्घलेख प्रसिद्ध केला. शेजवलकरांची दृष्टि व विचारसरणी किती विकृत आहे आणि कुत्सित कल्पनांनीं त्यांस किती वैगुण्य आलें आहे हें त्या लेखांत उत्कृष्ट व्यक्त होतें. हा सर्व प्रकार मंडळाच्या त्रैमासिकांत जाहीर झालेला असल्यामुळें त्याचें निराळें विवेचन येथें करण्याची जरूरी नाहीं. त्रै. व. १९, शके १८६० चा पहिला अंक, पृ. ४०–४२ पाहवीं. सोळा वर्षांमागच्या ह्या गत घटनांवर आतां कायम पडदा पडला असल्यामुळें येथें जास्त विवेचन नको. मंडळाला विरोध करण्याचा आमचा हेतु नव्हता. जें मंडळास साध्य होत नाहीं तेंच आम्ही करीत होतों, म्हणून मंडळाच्या विकृत प्रचारानें आमचें कांहीं एक वाकडें झालें नाहीं. आमचें संमेलन पूर्णपणें यशस्वी होऊन तें आमच्या स्मरणांत कायमचें ठसलेलें आहे. त्याच सप्ताहांत शुक्रवार ता. ७ ऑक्टोबर रोजीं सरकारचे गृहमंत्री कन्हैय्यालाल मुनशी ह्यांनीं आम्हांस पुण्यास भोजनास बोलाविलें. मीं, सर जदुनाथ, जयचंद्र विद्यालंकार असे सकाळीं ११ वाजतां भोजनास पुण्यास गेलों. प्रधान खेरही तेथें उपस्थित होते. सर्वांचा तासभर उत्कृष्ट विचारविनिमय झाला. एकंदर हा उद्योग सर्वथा यशस्वी बनला. मला कृतकृत्यता लाभली.

६. इतिहासमार्तंड पदवीचें सुवर्णपदक

स. १९३८ त कामशेत सप्ताह आटोपल्यावर पुनः स. १९३९ त मी सर जदुनाथांकडे दार्जिलिंग येथें जाऊन महिनाभर राहिलों आणि तेथें पुढील उद्योगाची रूपरेषा ठरविली. स. १९३९ तच जागतिक युद्ध सुरू होऊन त्याचे परिणाम हिंदुस्थानास पोंचले, त्यांतूनच पुढें ह्या देशास इंग्रजांकडून संपूर्ण स्वातंत्र्य मिळालें. ह्याच काळांत मराठ्यांचा इतिहास इंग्रजींत लिहिण्याचें काम सात वर्षें खपून मीं पुरें केलें, त्याचें श्रेय मुख्यतः सर जदुनाथ व डॉ. दिघे ह्यांस आहे. स. १९४० त मद्रास तंजावरचा प्रवास व डिसेंबरांत बडोद्यास जाऊन रेकॉर्ड कमिशनची बैठक साधली. सर जदुनाथांच्या समागमानें माझा असा पुष्कळ फायदा झाला.

आधुनिक युगांत मराठ्यांच्या इतिहासाचें पुनरुज्जीवन करण्याचें मुख्य काम कै. वि. का. राजवाडे ह्यांनीं केलें. त्यांचा जन्म स. १८६३ त होऊन ते ता. ३१ डिसेंबर, स. १९२६ रोजीं धुळें येथें वारले. धुळेंकरांनीं त्यांचें स्मरण जागृत ठेवण्यासाठीं राजवाडे संशोधन मंदिर स्थापून इतिहासाची सेवा चालविली. ह्या मंदिराच्या स्थापनप्रसंगीं सर जदुनाथ व मी धुळ्यास जाऊन राजवाड्यांची पुण्यतिथि साजरी केली. तेव्हांपासून धुळेंकरांशीं माझा परिचय जडून तो उत्तरोत्तर वृद्धिंगत होत गेला. राजवाड्यांचीं कांहीं पत्रें मला आलेलीं मीं त्या मंडळास दिलीं. त्यांतील एका पत्रांत त्यांनीं माझ्या नांवाला "इतिहासमार्तंड" हें अभिधान लावलेलें होतें. अशा स्थितींत धुळेंकरांच्या मनांत आलें कीं स. १९४५च्या राजेवाडे निधनतिथीस माझा सत्कार करून मला वरील पदवीचें सुवर्णपदक अर्पण करावें. कांहीं कारणानें त्या सालच्या डिसेंबरांत हा कार्यक्रम होऊं शकला नाहीं. लगेच स. १९४६ च्या जानेवारींत मुंबई हायकोर्टाचे सरन्यायाधीश लिओनार्ड स्टोन हे धुळ्यास आले असतां त्यांच्या पुरस्कारानें हा समारंभ तेथें १९ जानेवारीं शनिवारीं साजरा झाला. त्याप्रसंगीं मला गौरव-पत्र व सुवर्णपदक साहेबांच्या हस्तें देण्यांत आलें. माझे सन्मान्य मित्र सरदार माधवराव किबे ह्यांनीं सत्कारपत्र वाचून दाखविलें. धुळ्याची बहुतेक ठळक विद्वान मंडळी त्या प्रसंगीं हजर असून सकाळीं ११ चा तो समारंभ मला अद्यापि ताजा वाटतो. त्या वेळीं अनेक वक्त्यांचीं भाषणें झालीं. मीं आपलें इंग्रजी भाषण वाचून दाखविलें तें जीवनाच्या दृष्टीनें मला उद्बोधक वाटतें म्हणून त्याचा अल्पांश पुढें देतों. ह्याशिवाय ऐतिहासिक विषयांवर माझीं व इतरांचीं व्याख्यानें व चर्चा झाली, आणि तीन दिवसांचा भरगच्च कार्यक्रम पुरा झाला. धुळ्याची ही माझी भेट मी कधीं विसरणार नाहीं.

My reply to the address.

Your Lordship and Gentlemen,

I find myself so embarrassed at this moment by your overwhelming kindness, that I do not know how I should express my feelings to you correctly. When the heart is full, the words are few. To say that I thank you for

all the compliments you have showered on me is but a poor return. I know I have done nothing special or extraordinary that any the most common individual here or elsewhere could not have done. I am perfectly aware that I do not deserve the great honour you have chosen to bestow on me and the flattering words in which you have adjudged my poor work. I feel so ashamed and crushed that I would attempt neither to thank you nor to contradict you.

I have been a common plodder in life, have done no national service nor made any sacrifice for a cause. If my work seems accumulated in quantity, it is the result of a long life and fortunate circumstances by no means of my creation. Man requires work as much as food and clothing and I am sure every one does similar work, although it does not always appear in paper and ink and burden the shelves. I do feel that I have been singularly fortunate in life. People ask me what is the secret of my health. I say I do not know. Every one of us has a claim to long life. During all my travels and contemplation I have been haunted by one supreme thought, as was my master Sayajirao. Why such a great talented people, such a highly gifted country as this India, should be so low and wretched in the scale of prosperity, power and politics? Why should we have to remain always half-starved and half-clad from month to month and year to year? I often think to myself after witnessing two world-wars, if even a part of the wealth which was wasted in smoke and destruction, had been utilized in forwarding the comforts of humanity, not a single soul of this wide earth, would remain in want and distress. I begin to search my heart to find out what is the use of all this study of history, if we cannot learn the very simple lesson of every one of us trying to serve humanity, trying to do at least one good turn, if not every day, even once in life? In all my contact with the world I have noted one thing and, I hope your Lordship will bear me out, that we Indians may be poor, may be helpless, may be in dire want, but

in point of brain power and talent, history supplies me ample evidence that we are second to none : that we can stand competition in intellectual race with any of the most advanced peoples in the world.

And you may as well ask me, what is the solution, that my study of history suggests to me. It is this. Let us each do our own part sincerely from morning to evening. Let us not feel that we are disconnected scattered pebbles casually thrown about without purpose or function to perform. We all form one grand human machine in which as in a clock or an engine. each one without exception is connected as an indispensable part with a distinct function and clearly assigned duty to carry out. If one individual fails in his task, the whole machine goes wrong and comes to a stand still. Even a small pin has to put in its quota. There is none useless or irresponsible. We Indians at this moment are disconnected disjointed units. The remedy is in our own hands. No outsider can help us. I thank you all.

धुळ्याचा समारंभ आटपून मी मुंबईंत श्री. महाराणी चिमणाबाईच्या दर्शनास गेलों. गोष्टीवरून गोष्टी निघाल्या आणि मला कांहीं तरी द्रव्य पोंचवावें अशी इच्छा त्यांनीं बोलून दाखविली. सयाजीरावांनीं माझें पेन्शन बंद करून अन्याय केलेला महाराणींच्या मनांत वागत होता. मीं विज्ञप्ति केली, देवदयेनें माझा निर्वाह चालला आहे, आपणांस सत्पात्रीं दान करणें असेल तर धुळ्याचें हें संशोधन मंदिर मराठी इतिहासाची सेवा करीत आहे त्यास आपण कांहीं साह्य केल्यास राष्ट्रोपयोग आहे. त्यांनीं विचारलें, 'काय द्यावें ?' मीं उत्तर केलें, 'जें मर्जीस येईल तें द्या, दोनपासून दहा हजार मी सुचवितों.' नंतर त्यांनीं पत्रानें मला पाच हजारांची देणगी कळविली. मी तो चेक लगेच राजवाडे मंदिराकडे पाठविला. धुळेकरांचें ऋण मी अशा प्रकारें अंशतः फेडूं शकलों हें मनास समाधान लाभलें.

७. बडोद्याचें मानपत्र, [२ मार्च, १९४७]

स. १९४६ च्या ता. १९ जानेवारीस धुळ्याचा समारंभ संपवून मी परत आलों, त्याचे पडसाद बाहेर ऐकूं येऊं लागले. बडोद्यास मजवर प्रेम टेवणारी

मंडळी पुष्कळ होती आणि खुद्द सरकारवाड्यांत महाराज प्रतापसिंह व श्री. महाराणी शांतादेवी ह्यांना मजबद्दल आदर वाटत होता. प्रतापसिंह चौदा वर्षांचे होईपर्यंत मीं त्यांस शिकविलें असून ते राजकोटास शिकत असतां मी त्यांजपाशीं होतों. महाराणी शांतादेवींशीं माझा प्रत्यक्ष परिचय नव्हता. मीं वडोदें सोडल्यावर तीन वर्षांनीं त्यांचा विवाह होऊन त्या बडोद्यास आल्या. नंतर माझ्यासंबंधीं बरीच हकीकत त्यांच्या कानीं गेली. माझीं ऐतिहासिक पुस्तकें त्यांनीं पाहिलीं. माझा "New History of the Marathas" हा ग्रंथ छापण्यासाठीं प्रतापसिंहांनीं मला सहा हजारांची रक्कम दिली ती त्यांच्या कानांवर गेली. दरम्यान त्यांना वरचेवर मुलें होऊन मातृपदाची जबाबदारी समजून आली. अशा स्थितींत त्यांच्या सवतीचें म्हणजे नवीन सीतादेवींचें आगमन बडोद्यांत अकल्पित होऊन राजकुटुंबांत भीषण विरस निर्माण झाला, तेणेंकरून शांतादेवींची परिस्थिति अत्यंत नाजूक व दुःखद बनली. दरम्यान इंग्रजी सत्तेचें आवरण हिंदुस्थानांतून नाहींसें झाल्यानें येथील संस्थानें बंधमुक्त होऊन निराधार बनलीं. हे एकंदर प्रकार चलच्चित्रपटाप्रमाणें इतके त्वरित घडून आले कीं शांतादेवींसारख्यांना त्यांचा चटका विशेष जाचला. तीन सुपुत्र व पांच कन्यारत्नें आणि त्यांची माता ह्यांची बडोद्याच्या त्या भव्य लक्ष्मी-विलासच्या ऐश्वर्यांत कशी स्थिति होत असेल ह्याची कल्पनाच केलेली बरी! माझ्या धुळ्याच्या सत्काराची हकीकत बडोद्यास पोंचली. प्रतापसिंहांचें त्यांजकडील लक्ष कमी झाल्यानें त्या अत्यंत दुःखी होत्या. अशा स्थितींत माझी भेट व्हावी अशी उत्कंठा त्यांच्या मनांत उद्भवली.

सातारा, पुणें, धुळें अशा बाहेरच्या ठिकाणीं रियासतकारांचा सत्कार होतो, पण खुद्द बडोद्यांत असा प्रसंग घडूं नये ह्याजबद्दल तेथील कित्येक परिचितांस खेद वाटून त्यांनीं आपसांत एक हजारांची रक्कम वर्गणीनें जमविली आणि त्यांतून माझा तेथें सत्कार करण्याचें योजिलें. स. १९४६ च्या फेब्रुवारींतला हा प्रकार आहे. मला त्याची कांहीं एक वार्ता कामशेतला नव्हती. बडोद्याच्या मंडळींनीं रियासतकारांच्या सत्काराचें काम हातीं घेतलेलें कळतांच महाराणी शांतादेवी ह्यांनीं स्वयंस्फूर्तीनें त्या कामास तीन हजार रक्कम देऊन सरदेसाई ह्यांस थैली पोचवावी अशी सूचना

केली. दरम्यान श्री. चिमणाबाई महाराणी मुंबईस होत्या त्यांनीं पांच हजारांची रक्कम देण्याचें पूर्वींच मजकडे बोलणें केलें होतें आणि ती रक्कम धुळ्याच्या मंदिरास द्या अशी विनंती त्यांस मीं केली होती. हा प्रकार जाणून चिमणाबाईंनीं ही पांच हजार रक्कम त्या पर्स फंडांत जमा करण्यासाठीं माझ्या नांवाचा चेक लिहून तो बडोद्यास पाठविला. माझी सही झाल्याशिवाय तो चेक बँकेंत पटेना म्हणून तो बडोदेकरांकडून मजकडे आला. तेव्हां मला बडोद्यांतील उपक्रमाची थोडी अंधूक कल्पना आली. कुचविहारच्या महाराणी इंदिरा राजे ह्यांनीं पांचशें रुपये फंडास दिले.

ह्या बनावानें माझ्या मनाला भीषण वेदना होऊं लागल्या. मला थैली बिलकूल नको होती. माझ्या रियासतींचा खर्च परभारें भागत होता, त्यासाठीं द्रव्यसाह्याची जरूर नव्हती. बडोद्यांतून निवृत्तिवेतन मिळत होतें त्यांत माझा निर्वाह ठीक होत होता. शिवाय मी आतां एकटा असल्यामुळें एकाच्या पोटास तें कितीसें लागणार! अशा स्थितींत उगाच वर्गण्या जमविण्याचा आणि त्याचा बोजा इतरांवर नाहक घालण्याचा भलताच उद्योग बडोद्यास चालू झाला तो मला उद्वेगकर वाटला. मीं लिहून कळविलें, आपण थैली द्याल तर ती मी स्वीकारणार नाहीं. चिमणाबाईंचा पांच हजारांचा चेक मीं तसाच धुळेकरांकडे पाठवून दिला. हें माझें कृत्य बडोदेकरांस पटलें नाहीं.

मीं बडोद्यास कळविलें, माझा सत्कार करण्यासाठीं आपण मला तेथें बोलावीत असाल तर मी केव्हांही आनंदानें येईन. स्वखर्चानें येईन. त्यासाठीं मोठ्या वर्गण्या जमविण्याची मुळींच गरज नाहीं, पुष्पहार सभा वगैरेचा खर्च कितीसा लागणार! त्याला पांचपन्नास पुष्कळ झाले. चहापाणी, भोजन भेटी, बोलणीं इत्यादिकांस मोठा खर्च नको. मी केव्हांही आपल्या सेवेस हजर होईन. माझें हें समर्थन बडोद्यास कळण्यापूर्वींच जवळजवळ पांच एक हजार रुपये जमले होते. ते ज्याचे त्यास परत द्या अशी मीं सूचना केली ती मान्य झाली नाहीं. माझ्या नांवानें बडोदा कॉलेजांत कांहीं पारितोषिकें ठेवण्याकडे रकमेचा विनियोग करावा असें बडोदेकरांनीं योजिलें. हाही प्रकार मला रुचला नाहीं पण तो बंद करण्याचें माझ्या हातीं नव्हतें. चिमणाबाईंचे पांच हजार धुळेकरांस पोंचून सत्कारणीं लागले ह्याबद्दल सर्वांस समाधान वाटलें.

अशा ह्या वाटाघाटी व व्यवहार उलगडण्यांत एक वर्ष गेलें. सन १९४६-४७ चीं हीं दोन वर्षे हिंदच्या राजकारणांत किती क्रान्तिकारक बनलीं तें लोक जाणतात. पुढें स. १९४७ च्या १५ ऑगस्टास भारत-भूमीचें स्वातंत्र्य जाहीर होऊन तदनुषंगानें संस्थानें विलीन झालीं तो प्रकार येथें लक्ष्य आहे. स. १९४७ आरंभीं शांतादेवींचें चित्त अत्यंत अस्वस्थ होतें, तशाच स्थितींत त्यांनीं स्वतः पुरस्कार घेऊन माझा जाहीर सत्कार करण्याची योजना ठरविली. स. १९४७ चा तारीख २ मार्च रविवार हा समारंभाचा दिवस मुक्रर होऊन त्याच दिवशीं मी सकाळीं बडोद्यास दाखल झालों. माझा मुक्काम सरकारी गेस्ट हाउसमध्यें झाला. सकाळीं ११ वाजतां मीं राजमहालांत जाऊन महाराणींची भेट घेतली, त्या वेळचा तो हृदयद्रावक देखावा मी कधीं विसरणार नाहीं. त्यांनीं मुलांना आणून त्यांजकडून मला वंदन करविलें. आशीर्वादांत सामर्थ्य असेल तर मीं मनांतून करुणा भाकली, "देवा, ह्या बालकांचें भलें कर." थोडा वेळ बोलून मी मुक्कामावर गेलों.

सायंकाळीं पांच वाजतां न्यायमंदिराच्या विस्तीर्ण सभागृहांत बडोद्यांतील ठळक मंडळींचा व लहानथोर व्यक्तींचा मला मोठा जमाव एकत्र जमला. महाराणींनीं येऊन अध्यक्षपद स्वीकारलें आणि तीन तासपर्यंत एकासनीं बसण्याचे श्रम सोसले. त्या प्रसंगाचें स्वतंत्र पुस्तकच छापलेलें आहे त्यावरून सर्व हकीकत कळून येईल. चिटणीस वाकसकरांचें निवेदन, जदुनाथ सरकार, पोतदार, शेजवलकर इत्यादींचे संदेश व मानपत्र हे सर्व प्रकार मला तरी ओतप्रोत स्तुतीचे, बरेच अनिष्ट वाटले. मला वाटलें, मी ह्या स्तुतीस पात्र नाहीं. त्या प्रसंगीं माझें चित्त पूर्वीच्या आठवणींनीं व्यग्र व उद्विग्न बनलें आणि उत्तरादाखल मीं केलेलें भाषणही माझ्या आवडीसारखें झालें नाहीं. तथापि त्यांत माझ्या अंतःकरणाच्या भावना यथोचित उतरल्या असून तें भाषण माझ्या आयुष्यांतील एक पुढचा टप्पा दाखवितें.

समारंभाचा खर्च सुमारें एक हजार झाला. मीं थैली घेतली नाहीं आणि कॉलेजांत इतिहासविषयक निबंधास सालोसाल बक्षीस देण्याची कल्पनाही पुढें शक्य व युक्त वाटली नाहीं. नामदार मावळंकर ह्यांचाही अभिप्राय विचारतां तोही असाच पडला. ऐतिहासिक घराण्यांच्या वंशावळी मला छापावयाच्या

असून तें काम माझे मित्र पुण्याचे रा. वि. सी. चितळे ह्यांनीं परिश्रमपूर्वक केलेलें सिद्ध होतें. त्या श्रमांचा मोबदला म्हणून माझ्या शिफारशीवरून पंधराशें रुपये सत्कार समितीनें चितळे ह्यांस दिले. सुमारें दोन हजार रुपये अद्यापि समितीकडे शिल्लक असावे. जयपुर दप्तरांतलीं शिवाजी-विषयक डिंगल पत्रें सर जदुनाथांनीं शोधून काढलेलीं छापावयाचीं आहेत, त्या कामीं ही रक्कम वापरावी असा बेत कांहीं काळ चालला. पण हा विषय वडोदेकरांचा आहे.

८. उपसंहार व नंतर

वर सांगितलेले समारंभ सर्व माझ्या व्यक्तिसंबंधाचे होत. ह्यांशिवाय बाह्य समारंभांचा अध्यक्ष म्हणून मला जावें लागलें असे प्रसंग पुष्कळच आहेत. ते सर्व सांगण्याचें प्रयोजन नाहीं. साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षाची सालोसाल निवड होत असते. माझें नांव पुढें यावें आणि आयत्या वेळीं तें गाळलें जावें अशी धुमश्चक्री पांच चार वर्षें चालली, हा प्रकार मला अत्यंत अप्रयोजक वाटला. ही निवड स्वागत कमिटीकडून होते आणि ह्या कमिटीचे सभासद वर्गणीच्या आंकड्यानें बनविले जातात, त्यांच्या ठिकाणीं चतुरस्र विद्वत्ता असतेच असें नाहीं. एका वर्षी परीक्षेच्या रिझल्टाप्रमाणें अध्यक्ष निवडणुकीचा निकाल जाहीर झाला, त्यांत सावरकर २०८ मतें, सरदेसाई ८८ मतें, पोतदार ८ मतें अशा प्रकारची मतमोजणी ठरली ती वाचून मला भारी उद्वेग वाटला. ही काय अध्यक्षपदाची प्रतिष्ठा कीं लाचारी ! पुनः कधीं मीं ह्या परीक्षेस बसायचेंच नाहीं असें ठरविलें. त्या पुढच्या सालीं अहंमदनगरच्या बैठकीस माझें नांव मताधिक्यानें निवडलें गेलें असतांही मीं तो सन्मान नाकारून दिला आणि प्रो. पोतदार त्या सालीं संमेलनाचे अध्यक्ष बनले. मला आनंद झाला. संमेलनांतील अध्यक्षाचें यश त्याच्या विद्वत्तेवर अवलंबून नसून, तीनचार दिवस रात्रीं अपरात्रीं चालणाऱ्या सभांचें नियंत्रण करण्यांत आहे हें मी दीर्घकाळ पाहत आलों, तेव्हां माझ्या मनानें घेतलें, सभा चालविण्याची ही ब्याद मला नको, पोतदारांनींच ती रंगवावी. मला नेहमीं वाटतें दरसाल एक व्यक्ति सन्मानार्ह ठरवून तिचा गौरव संमेलनप्रसंगीं करावा, त्या व्यक्तीला आपल्या आवडत्या विषयावर अल्प काळ व्याख्यान देण्याची मुभा ठेवावी, पण अध्यक्ष नेमायचा तो कुशल

कुशल सभाचालकच असावा म्हणजे ऐन संमेलनप्रसंगीं अध्यक्षाचे वाभाडे निघणार नाहींत.

चित्रांचें अनावरण, पुस्तक-प्रकाशन असे कित्येक प्रसंग मला स्वीकारावे लागले त्यांचें निदर्शन करण्याची मला जरूर वाटत नाहीं. प्रो. पोतदारांचें चित्र भा. इ. मंडळांत ठेवलें त्या वेळीं त्यांच्या कर्तृत्वाचा अंदाज मी १४ जून, १९४२ च्या जाहीर भाषणांत व्यक्त केला तो पुष्कळांस पसंत पडल्याची चर्चा माझ्या अनुभवास आली. गुण्ये घराण्याचा इतिहास ता. १० जून, १९४४ त प्रकाशित झाला तेव्हांही तें काम माझ्याकडे आलें होतें. पण हे सर्व प्रसंग मामुलीच होत. मार्च १९४४ त वडोद्यास जागृतिकर्ते भगवंतराव पाळेकर ह्यांचा ज्युबिली समारंभ किंवा पुणें येथें शिवाजी हायस्कूलचे संस्थापक बाबूराव जगताप ह्यांचा सत्कार-समारंभ ता. २६ डिसेंबर, १९४८ रोजीं झाला, ते माझ्याच अध्यक्षतेनें पूर्ण झाले. १ जून, स. १९४३ ला (श्री. वामनराव जोशी समवेत) पुण्याच्या इतिहासपरिषदेचें अध्यक्षकाम मजकडे होतें.

वडोद्यास सहविचारिणी सभा नांवाची एक पुराणसंस्था आहे. स. १८९० त तिची स्थापना शंकर मोरो रानडे, नागेश विनायक बापट, वासुदेव महादेव समर्थ, शंकर विष्णु पुराणिक, डॉ० विष्णु गोविंद चिपळूणकर इत्यादींच्या प्रोत्साहनानें झाली. त्या वेळीं दक्षिणी-गुजराती पक्षभेद मणिभाई जसभाई दिवाणांच्या कारभारांत निर्माण झाले, त्यांतून पुढें बापट कमिशनची निर्मिति होऊन कांहीं काळ पुष्कळ वाद माजला, त्यांत समर्थांनीं चोरी या विषयावर व्याख्यान देऊन दक्षिणी पक्षाचें समर्थन केलें, त्या व्याख्यानास पुरस्कार देण्यासाठीं ही सभा निर्माण झाली, तिला सन १९५० सालीं साठ वर्षे पुरीं झाल्यावरून त्या संस्थेचा हीरकमहोत्सव करण्याचें वडोदेकरांनीं ठरविलें आणि मी विद्यमान व्यक्तींपैकीं सर्वांत जुना सभासद असल्यामुळें मला त्यांनीं अध्यक्ष म्हणून बोलाविलें. स. १९५० तारीख २ मार्चला हा समारंभ वडोद्यांत झाला, दोन दिवस मी त्या राजधानींत राहून पूर्वीचे परिचय ताजे केले. समारंभ सामान्यच झाला, तथापि मला ती एक जुन्या परिस्थितीची उजळणी करण्याची संधि मिळाली हा माझा व्यक्तिगत लाभ होय.

स. १९५१ सालच्या डिसेंबरांत ता. २८–३० असे तीन दिवस जयपुर येथें इंडियन हिस्टरी कॉंग्रेसचें अधिवेशन झालें त्याचें अध्यक्षस्थान चालकांनीं मला दिलें. मी स्वखर्चानें जयपुरास जाऊन आलों तो प्रसंग पुष्कळ अंशीं स्मरणीय बनला. मजबरोबर डॉ. दिघे होते. जातां येतां अहमदाबादेंत मुक्काम करून दादासाहेब मावळंकरांचा पाहुणचार घेतला. जयपुरास विद्वान मंडळीचा मोठा समाज जमला, पुष्कळांच्या भेटी झाल्या, नवीन परिचय जडले. त्या वेळचें माझें इंग्रजी भाषण परिणामकारक होऊन त्यामुळें शेठ सोहनलाल दुगड ह्यांनीं पांच हजार रु. ची देणगी इतिहासकार्यासाठीं माझ्या स्वाधीन केली. उत्साह पुष्कळ फैलावला पण अद्यापि दृश्य परिणाम घडून येत नाहीं ह्याची मला अहर्निश चिंता वाटते.

९. पुणें युनिव्हर्सिटीची डॉक्टरेट

ता. ८ सेप्टेंबर, स. १९५१ रोजीं पुणें युनिव्हर्सिटीकडून डॉक्टर ऑफ लेटर्स ही पदवी मला देण्यांत आली त्या प्रसंगीं मजबरोबर श्री. अण्णा कर्वे व श्री. होमी मोदी ह्यांनाही तीच पदवी मिळाली. मी गणेशखिंडच्या निवासांत हजर राहून पदवीचा स्वीकार केला. तत्पूर्वी मुंबईच्या मराठी ग्रंथसंग्रहालय संस्थेनें मला आपलें सन्मान्य सभासदत्व दिलें (जून १९५१). ता. १५ फेब्रुवारी, स. १९५२ रोजीं भोरच्या श्रीमंत सचिव अधिपतींनीं पुण्यास आपल्या निवासावर मला बोलावून ऊर्णावस्त्र व रोख रु. ४०० देऊन माझा सत्कार केला.

ह्यानंतर स. १९५२ सालीं ता. १४–१५ मार्च रोजीं नाना फडणिसांचा निधनोत्सव वेळास येथें झाला तेथेंही मी अध्यक्ष म्हणून गेलों. प्रसंग उत्तेजक व स्मरणीय झाला. मुख्य गोष्ट म्हणजे ८७ च्या वयांत मी हे प्रवास व कार्यक्रम यथास्थित करूं शकलों. हे नानाविध प्रसंग जरी माझ्याच सत्काराचे नसले तरी मी ह्या उतारावस्थेंत थोडीबहुत जनसेवा करूं शकतों हें मनास समाधान मोठें आहे.

प्रकरण आठवें

खांचखळगे

१. माईनीं लिहिलेल्या आठवणी

२. तेव्हां व आतां

३. माझे आजार

४. प्रस्तुत

प्रकरण आठवें

खांचखळगे

१. माईनीं लिहिलेल्या आठवणी

माझ्या पत्नी लक्ष्मीबाई उर्फ माई ह्यांचा जन्म ता. ७ जुलई, स. १८७४ ह्या दिवशीं पुणें जिल्ह्यांत चास येथें त्यांच्या मातुःश्रींच्या माहेरीं झाला. त्याच आपल्या वडिलांचें पहिलें अपत्य. आमचा विवाह ता. २९ फेब्रुवारी, स. १८८४ रोजीं रत्नागिरीस होऊन त्यांचें निधन कामशेत येथें ता. २६ फेब्रुवारी, स. १९४३ ह्या दिवशीं झालें, तेव्हा त्यांचें वय ६९ होतें. त्यांच्या पश्चात् मला त्यांच्या सामानाची व कागदपत्रांची आवराआवर करावी लागली. मला ठाऊक नव्हतें कीं त्यांचें लेखनभाण्डार एवढें मोठें असेल म्हणून. लहान मोठ्या चोपड्या, सुटे कागद, टिपणें व रोजनिशा, स्वतः रचलेलीं किंवा दुसऱ्यांचीं उतरून घेतलेलीं गाणीं, निरनिराळ्या म्हणी, उखाणे, भोजन पदार्थांच्या याद्या, कौटुंबिक समारंभ किंवा रुसते फुगवे इत्यादि किती तरी प्रकार त्यांच्या कागदांत मला आढळले. माईनीं सासर-माहेरच्यांस पत्रें सुद्धां पुष्कळ लिहिलेलीं आहेत. ह्या सर्व कागदांचें करावें काय हा मजपुढें आतां मोठ्या चिंतेचा प्रश्न आहे. नाश करण्यास धीर होत नाहीं, ठेवावे तर पुढें सांभाळणार कोण व आपापल्या व्यवसायापुढें त्यांत लक्ष घालणारा तरी कोण भेटणार! माईच्या कागदांत मन हलकें करण्याच्या इच्छेनें बनविलेलीं पुष्कळ कौटुंबिक बनावांचीं टांचणें व दैनंदिन्या आहेत. माझे मित्र दादासाहेब मावळंकर दोन एक वर्षांपूर्वीं येथें कामशेतला एक दोन दिवस राहिले तेव्हां माईच्या ह्या कागदांचें नवरा-बायकोनीं तासनतास खपून पारायणच केलें. स्त्रीहृदयाच्या कोमल भावना व अपत्य-वत्सलता ह्यांचें इतकें रसभरित चित्रण क्वचित् दृष्टीस पडेल. दादासाहेबांनीं मला मुद्दाम बजावलें, कागद बहुमोल आहेत, जपून ठेवा. त्यांतले थोडे भाग मासल्याकरितां पुढें देतों. कांहीं मोडी व पाठपोट लिहिलेले मी नकलून देत आहें. कांहीं थोडे कागद खुद्द त्यांच्या हातचे आहेत. त्यांत आमचें संसारचित्र उत्कृष्ट उमटलेलें आढळेल.

माईच्या रोजनिशींतील उतारे

वडोदें, ता. १२ ऑगस्ट, स. १९१०

मुंबईहून येथें येऊन बरोबर महिना झाला. डायरी लिहिण्याचें फार दिवस मनांत आहे. अद्यापपर्यंत तसा वेळ झाला नाहीं. आज लिहिण्याचा प्रयत्न करीत आहें. यापूर्वीं चारपांच वेळां मीं डायऱ्या लिहिल्या. आपल्या हातून बऱ्यावाईट काय गोष्टी घडल्या व घडतात, हें अशा डायरीवरून चांगलें समजतें. पूर्वीच्या अनेक आठवणी लक्षांत येऊन मजा वाटते. मुलें झाल्यापासून डायरी लिहिण्यास सवड होत नाहीं. हल्लीं येथें मुलें नाहींत. आम्ही दोघेंच आहों, म्हणून थोडासा वेळ सांपडतो. मुलें पारल्यास नारायणरावांकडे आहेत. येथें एकटे आल्यामुळें प्रथम करमलें नाहीं, पण आतां वेळ चांगला जातो. प्रथम थोडेंसें माझ्या पूर्वायुष्याविषयीं लिहितें.

माझें लहानपण विशेष गमतीदार गेल्येसें मला वाटत नाहीं. मुलांमुलींत खेळतांना माझें कोणाशीं पटत नसे. माझे विशेष लाडही कोणीं केले नाहींत. स्वभाव कुढा, समजूत लवकर न पडणारा असल्यामुळें पुष्कळदां एका बाजूस जाऊन रडत बसण्याची सवय होती. तब्येतीनें मी अशक्त असून कोणाचें बोलणें मला सहन होत नसे. दांडगाई करतांना कांहीं थोडें लागलें किंवा दुखलें तर सोसवत नसे. म्हणून मी एकटीच खेळत बसें. वडिलांनीं शाळेंत घातली तेव्हां रोज जाऊं लागलें, पण त्यांत हौस वाटली नाहीं. लग्न दहावे वर्षीं झालें, त्यानंतर कांहीं थोडे महिने मी शाळेंत गेलें. पुढें शाळा बंद झाली. लग्न रत्नागिरीस त्या वेळच्या मानानें थाटांत झालें, लोकांना फार आवडलें. खर्च फार झाला नाहीं. घरांत आजी वगैरे बोलत, मला घर फार गरीब मिळालें, मला दागिने मिळणार नाहींत. तेव्हां वडील म्हणत, दागिन्यांत काय आहे, आपण आपल्या घरचे घालूं, मुख्य दागिना चांगला आहे. ह्यांत मला विशेष कळत नसे, मात्र दागिन्यांची आवड मला दांडगी होती.

लग्न होतांच मला सासरीं दुरागमनास जावें लागलें. बरोबर घरचें कोणी जाण्यास नाहीं, म्हणून घरीं विद्यार्थी मधुकरी होता त्यासच आईनें सोबतीस दिला. सासरीं जातांना मला कांहीं वाईट वाटलें नाहीं. आईला मात्र दुःख विशेष झालें. सासरीं कसें वागावें मला कांहीं कळत नसे, त्यामुळें हसें होई व

सासूबाई, वन्सें यांचें बोलून घ्यावें लागे. चूक नसूनही अशीं बोलणीं ऐकून मला अत्यंत वाईट वाटे. मुलें झाल्यावरही मला पुष्कळ दिवस सासरीं कोंकणांत राहवें लागलें. सासूबाईंचा स्वभाव कांहींसा लहरी, पण त्याच्या उलट मामंजीचा, रागीट परंतु सर्वांशीं सारखें वागण्याचा मायाळु होता. त्यांची आवडती सून मीच होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

इकडे बडोद्यास नोकरी लागल्यावर मी त्यांचेकडे कोंकणांतून सतरावे वर्षीं गेलें. बरोबर मामंजी व तिघे दीर होते. पंधरावे वर्षी मी वयांत आलें, त्यानंतर एक वर्ष घरीं कोंकणांत गेलें. माझी आतेनणंद बालविधवा आक्का म्हणून होत्या त्या बडोद्यास आमचेकडे राहण्यास आल्या, त्या अखेरपर्यंत आमचेच जवळ होत्या. आम्ही दोघी घरचें काम संभाळूं लागलों. ह्या आक्कांचें माझें चांगलें पटे, कधीं भांडण वगैरे झालें नाहीं. बडोद्यास आल्यावर कैक वर्षे मी अशक्त व थोडीबहुत आजारीच असें. निजून नाहीं, पण अन्न जात नसे. पुढें मुलें झाल्यावर माझी प्रकृति सुधारली. श्यामकान्त झाल्यावर सहाएक महिने मी फार आजारी होतें, नंतर प्रकृति बरी झाली ती अद्यापपावेतों चांगली आहे. हल्लीं दुसरा मुलगा श्रीवत्स यास सात वर्षे पुरीं होऊन आठवें लागलें आहे. एकंदरींत माझें आयुष्य चांगलें गेलें. मुलें फार न होतां, घरांत नोकर वगैरे आहेत. मी होतील ते श्रम करून सर्वांच्या उपयोगी पडतें. शिकण्याची हौस मला मनापासून नाहीं. मुलें लहान असतां वेळच मिळत नसे. ह्यांची इच्छा मीं इंग्रजी वगैरे पुष्कळ शिकावें, शिकण्यासाठींच बाहेर कोठें तरी जावें. माझें आयुष्य फुकट जातें असें ह्यांना वाटतें. घरचे घरीं पुस्तकें वाचून मिळेल तेवढें ज्ञान पुरे असें माझें मत बनलें. ह्यांनीं मला इंदूरला डॉ. तांबे ह्यांजकडे महिनाभर शुश्रूषा शिकण्यास पाठविलें पण तो अनुभव विशेष उत्तेजक झाला नाहीं, अनेक कारणांनीं मला तो दुःसहच वाटला. § ह्यांना फार हौस कीं मीं कांहीं तरी शिकावें, पण अद्यापपर्यंत म्हणण्यासारखें कांहीं झालें नाहीं. पुढें होईल तें खरें. बडोद्यास महाराजांजवळ ह्यांची नोकरी म्हणून तीन वेळां ह्यांचा युरोपचा प्रवास झाला. त्यावेळीं

§ ता० १८ ऑगस्ट स. १९१० पासून ता० २५ सेप्टेंबरपर्यंत सुमारें सवा महिना माईनीं इंदुरास राहून डॉ० तांबे ह्यांच्या दवाखान्यांत रुग्ण शुश्रूषेचे काम केलें, पण तो अनुभव अनेक कारणांमुळें हितकर वाटला नाहीं.

मी बहुधा कोंकणांत असें. बहुधा दरसाल मला तीनचार महिने तरी दूरच राहवें लागे. ह्या वर्षी मात्र ह्यांना महाराजांनीं नेलें नाहीं, म्हणून हे तीन महिने रजा घेऊन इतिहासाच्या कामासाठीं मुंबईस राहिले. तेथें पारल्यास मुलांच्या मुंजी दीर नारायणरावांकडे झाल्या. बरीच मंडळी जमून आनंदानें सर्व समारंभ सिद्धीस गेला. जाऊ यमुनाबाईंचें व माझें चांगलें जमे. मुलें हल्लीं पारल्यासच ठेवलीं आहेत. हे नारायणरावांच्या संसाराची फार स्तुति करितात.

येथें आतां बडोद्यांत घरचें काम आहेच. पाहुणे येतात किंवा मुद्दाम स्नेही मंडळी जेवणास बोलावतों. निकट स्नेहाचे माधवराव वैद्यांसारखे चहाला वगैरे येतात. ते ह्यांच्या लिहिण्याचें काम फार करितात. वेळ झाला तर निरनिराळीं पुस्तकें वाचतें. मला केव्हां हे लिहिण्यास देतात, केव्हां रात्रीचें वाचून घेतात. आलेल्या घरगुती पत्रांचे जबाब मी लिहितें. केव्हां पायीं अगर गाडींतून दोघे फिरावयास जातों. देवपूजा, जेवणाची व्यवस्था, पैशाची देवघेव वगैरे घरचेंच काम मला पुरेसें आहे. शिवण्याचें यंत्र आहे त्यावरही बरेंच काम मी करतें. मिळून कामाचा तोटा केव्हांच नाहीं. माझा वेळ आळसांत जातो असें मला वाटत नाहीं. कांहीं तरी सारखें करीत असतें. काल मुलांचीं पत्रें आलीं, उत्तरें घालायचीं आहेत. अद्यापपर्यंत ईश्वर सर्व गोष्टी हव्या तशा घडवून आणीत आहे. पुष्कळदां माझें डोकें फार दुखतें, केव्हां पोट बिघडतें, असा आयुष्याचा वेळ फुकट जातो तेव्हां वाईट वाटतें. एखादे वेळीं हे रागावले म्हणजे मला स्त्रीजन्माचा फार खेद वाटतो; आणि आम्हा स्त्रियांचा कांहीं उपयोग नाहीं असें मनांत येऊन किती वाईट वाटतें तें लिहितां येत नाहीं. एखादे वेळीं क्षुल्लक कारणावरून उभयतांचें भांडण होतें, तोच विनोद म्हणावा. मग माझें मन लवकर साफ होत नाहीं. मी आनंदी बायको नाहीं. आहे त्यांत समाधान मानणें जमत नाहीं. सहनशक्ति अंगांत नाहीं. कोणी कांहीं बोललें कीं मनास टोचत राहतें. स्वभाव भित्रा असल्यानें लगेच उत्तर करणें होत नाहीं. अशा स्थितींत बायकांचें शस्त्र रडणें तो मार्ग खुला होतो.

चार पांच दिवसांनीं एकदां मी स्वतः बाजारांत भाजी आणण्यास जातें, तेणेंकरून आपणांस हवें असेल तें आणतां येतें. शिकणें होत नाहीं

म्हणून पुष्कळ घोटून घ्यावें लागतें. इंग्रजी अक्षरें थोडीं काढून घेतलीं आहेत, पण त्यांत मन लागण्याइतका वेळ मिळत नाहीं. सारखे कांहीं महिने तरी चालेल तर गोडी लागेल· त्यांतून वेळ असतो तेव्हां शिकवणारा नसतो. मुलें नव्हतीं तेव्हां मला ह्यांच्याबरोबर स्वारींत जातां येत असे. नीलगिरी, महाबळेश्वर, लोणावळा ह्या ठिकाणीं मी गेलें होतें. एकदां देवळालीस गेलों. नवसारीजवळ उमरठ येथें समुद्रकांठीं महाराजांचा वाडा आहे तेथें एकदां जाणें झालें. पुण्याचा प्रवास पुष्कळदां होतो. राजोरीस माहेरच्या देवाचा उत्सव होतो, तेथें एकदां जाऊन आलें. फार मजा वाटली. पांच दिवस विठोबाचा उत्सव होऊन रोज भोजनास शें-दीडशें पान सहज होतें. स्वयंपाकास व वाढण्यास मदत देवाचें कृत्य म्हणून सर्व बायका झटून करितात. प्रवासही पुण्यापासून बैलगाडीचा तीन दिवसांचा मजेदार वाटला. उत्सवापुरती राजोरीस मंडळी जमतात. खर्चही बराच होतो. कोंकणांतही सरदेसाई मंडळीचा नृसिंहजयंतीचा उत्सव वेरवलीस होतो.

ता. १८ ऑक्टोबर, स. १९१०. दिपवाळीच्या सुट्टींत आम्ही दोघें मुंबईस गेलों. तेथें तेरा दिवस राहिलों. रजा सरतांच परत बडोद्याला आलों. बरोबर श्रीवत्स, कमळी व मीनाक्षी अशीं मुलें आणलीं. श्रीवत्साची मर्जी आमचे बरोबर येण्याची नव्हती. बांधलेलें गांठोडें त्यानें वेगळें केलें. तेव्हां मला फार वाईट वाटलें कीं माझा एकही मुलगा जवळ नसावा. मीं श्रीवत्सास जवळ घेऊन फार सांगितलें. मग ह्यांनीं त्याला बरोबर घेण्याचें ठरविलें, तेव्हां मला आनंद वाटला. त्यांतून तीन दिवस मुंबईस माझे बाहेरपणांत जाऊन वत्सास जवळ घेतां येईना हें आणखी वाईट वाटलें. मीनाक्षी ही आबांची लहान मुलगी. जन्मल्यावर थोड्या दिवसांत आई वारली म्हणून तिला आम्हीं बाळगली. आईशिवाय मूल कसें उघडें पडतें त्याचें हें उदाहरण आहे. तिची प्रकृति अगदींच वाईट. वरचें दूध पचेना, खोकला, किरकीर सारखी चालू, औषधें दिलीं. तिच्याकरतां स्वतंत्र बाई ठेविली. माझ्या सहनशीलतेची सीमाच आहे. तथापि मला ह्यांनीं पुनः दुसरीकडे शिकायला पाठविली नाहीं व मुलें जवळ ह्यामुळें माझा वेळ आनंदांत जाऊं लागला. मीं नर्सिंगचें काम पूर्ण शिकावें असें ह्यांच्या मनांत फार आहे, पण तें घडावें कसें समजत नाहीं. चार दोन वेळां त्यांचा माझा ह्यासंबंधीं वाद झाला. बळजबरी करतील कीं काय अशी भीति वाटते.

शिकणें होत नाहीं म्हणजे काय, मनावर घेतलें म्हणजे होतें असें हे म्हणतात. एकदां ह्या वादाचा कळस झाला, तेव्हां मग बोलणें बंद पडलें. त्यांचें रागावणें फार झालें. तेव्हांपासून मींही तो विषय काढला नाहीं. ते बोलले तर नुसतें ऐकून घेतें. परंतु मनांत आणलेली गोष्ट हे सोडतील असें वाटत नाहीं, हा धाक सदैव माझ्या मनांत आहे. सध्या मीनाक्षी जवळ आणल्यानें तो विषय मागें पडला आहे.

पुढें संक्रान्तीचे सुटींत यमुनाबाई, श्यामकान्त व श्रीकान्त § दोघे मुलगे असे बडोद्यास आले. चार दिवस राहून परत मुंबईस गेले. हे दिवस फारच आनंदांत गेले. त्यांजबरोबर मकरंद (नारायणरावांचा दुसरा मुलगा) व जयराम हेही चार दिवस बडोद्यास आल्यानें मोठी करमणूक झाली. मकरंद बडोद्यास एक महिना होता.

स. १९११ च्या सालीं इंदिराराजे ह्यांचें लग्न ग्वाल्हेरच्या माधवमहाराजांशीं ठरूं लागलें. वाटाघाट चालली. शेवटीं युरोपास जाणें घाईनेंच ठरलें. ता. २४ एप्रिल रोजीं हे मुंबईस बोटींत बसून प्रवासास गेले. निघतांना बडोद्यास आमची फारच धांदल झाली. अशी घाई पूर्वीं कधीं झाली नव्हती. मला बडोद्यास त्या वेळीं फारच थकवा आला. ह्यांचे निघण्याचे वेळीं मला फार वाईट वाटलें. आमचीं कितीही तंटेभांडणें झालीं, तरी आमच्यासारखें प्रेम कोणाचेंही नसेल असें दोघांनाही वाटतें. त्या वेळीं डॉ. पुरंदरे आमच्याकडे बायकोमुलांसह पाहुणे आले होते, त्यांची तजवीज आम्हीं चांगली टेविली. हे युरोपास गेल्यावर मी बडोद्याची आवराआवर करून पुण्यास माहेरीं गेलें, तेथें एक महिना गेला. पुण्याचा हा महिना अत्यंत आनंदांत गेला. तेथें स्वतंत्रता पुष्कळ वाटून सर्वांचीं मुलें-बाळें पाहून समाधानांत केव्हांच वेळ संपलासें वाटलें. बहीण विठाबाई, अंबूताई खांडेकर इत्यादि फार वर्षांनीं भेटून बोलणीं झालीं. पुण्याहून परत पारल्यास आलें. इंदिराबाई आजारी देवळालीस आहेत. त्यांचें कठीण दिसतें. श्यामकान्ताच्या सांखळ्या व घागऱ्या होत्या त्या मोडून त्याची सांगली घाटाची तपेली पुण्यास असतां बनविली आहे. ह्यांचीं पत्रें युरोपांतून आलीं. आतां आम्ही मुलें घेऊन जून महिन्यांत मंगळदास-

§ नारायणरावांचा मुलगा.

वार्डांत स्वतंत्र बिऱ्हाड केलें आहे. श्यामकांत पारल्यास आहे. पण मुलें सारखीं आजारी पडतात व हवेचा कोंडमारा वाटतो. श्रीवत्साला ताप येऊन प्रकृति बिघडली. शौच्याचे वेळीं रक्त पडतें. आबांच्या सासूबाई (डॉ. वासुदेवराव किर्लोस्कर ह्यांची पत्नी) ह्या मुलीचे शुश्रुषेसाठीं देवळालीस आल्या आहेत, त्यांची माझी ओळख होऊन फार आनंद वाटला. त्यांचें परोपकारी वृत्तीचें उदाहरण सर्वांनीं डोळ्यांपुढें वागवावें असें आहे. मीनीला घेऊन मी देवळालीस गेलें. चमत्कार असा कीं मिनी आपल्या आईजवळ जाईना. लाजे फार. नुकतेच दीर भास्करराव बऱ्हाणपुरास नोकरीस गेले. त्यांची बायको मालतीबाई व सासूबाई मिनीला घेऊन त्यांजबरोबर गेल्या आहेत.

श्यामकांताचा अभ्यास बरा चालला आहे. तो मला भेटतो तेव्हां आनंद वाटतो. त्याला खरूज झाली आहे, म्हणून त्यास स्वतः संध्याकाळीं आंघोळ घालून खरूज धुतली. विलायतेहून ह्यांचीं पत्रें नेहमीं येतात, तीं फार चांगलीं असतात. इतकीं पत्रें आपलें काम संभाळून सर्वांना कशीं धाडतात याचें आश्चर्य वाटतें. त्यांचें येणें केव्हां होईल ह्याची उत्कंठा वाटते. येथें आतां मला अगदीं कंटाळा आला आहे. नुकतेंच वत्साचें वजन केलें, ४१ पौंड भरलें, म्हणजे पूर्वीहून तीन पौंड वाढलें. येथें वाचन विशेष कांहीं होत नाहीं. इंदुप्रकाश, मनोरंजन, आनंद वगैरे बारीक सारीक वाचतें. सुधा म्हणून कादंबरी मिळाली ती वाचली. चांगली आहे.

यंदांची दिपवाळी पारल्यास झाली. मोठी आनंदांत पार पडली. सासूबाई वगैरे मंडळी सर्व एकत्र जमली. हे युरोपांतून केव्हां येतात त्यांचे दिवस मोजीत होतें. तों हे ता. १० नोव्हेंबरला आले. आबा, श्रीवत्स वगैरे बोटीवर आणण्यास गेले होते. माझें स्नान होऊन मी वाट पाहत होतें. एकीकडे स्वयंपाक चालू होता. तों सकाळीं ९ वाजतां घरीं आले. आल्यावर चहापाणी कांहीं झालें नाहीं. जेवण लवकर हवें म्हणाले. त्याप्रमाणें साडेदहा वाजतां जेवणें झालीं. घरांत बराच वेळ आंत येऊन बसणें बोलणें झालें. दुरूनच जिना चढतांना पाहिलें, नंतर हॉलच्या दारांत आलें. इकडचा चेहरा व हसतमुख पाहून मला अतिशय आनंद झाला. काळजी दूर होऊन समाधान वाटलें. इतक्या दिवसांचा थकवा, कंटाळा

आळस सर्व एकदम नाहींसा होऊन नवीन हुरूप आलासें वाटलें. दिवस केव्हांच गेला. रात्रीं दोघेंही पारल्यास गेलों. दिवसा मुंबईस व रात्रीं पारल्यास असा थोडे दिवस क्रम चालला. पारल्यास मुलें होतीं व जागा चांगली म्हणून मोकळें वाटे. एक दिवस आम्ही दोघें पुण्यास जाऊन वडिलांस भेटून आलों. नंतर बडोद्यास जाऊन एक महिन्याची रजा घेऊन आम्ही, मुलें वगैरे सर्व मुंबईहून कोंकणांत जाऊन आलों. बरोबर सामान पुष्कळ घेतलें, कारण तेथें कशाची अडचण पडूं नये. कोंकणांतले दिवस फारच आनंदाचे गेले. मात्र शांतपणा न वाटतां सारखी धांदल चालू राहिली. एक दिवस मुलांसह विशाळगडास जाऊन आलों. आम्ही कोंकणांतून परत मुंबईस आलों तों आबांची बायको इंदिराबाई वारल्याची बातमी येऊन वाईट वाटलें. लगेच आम्ही मुलांसह बडोद्यास आलों.

डॉ. जोशी ह्यांच्या औषधानें श्रीवत्स बरा झाला. हेही फार जपून वागतात म्हणून तब्येत बरी आहे. तिखट मात्र स्वयंपाकांत त्यांस खपत नाहीं. आम्ही हल्लीं फारच सुखांत आहों. मात्र मनांत धास्ती वाटते कीं हें सुख असेंच टिकेल का ? सुखाचा कंटाळा कोणालाच येत नाहीं. ईश्वराची इच्छा असेल तसें घडेल. आम्हा उभयतांचें वय आतां बरेंच झालें. कोणी तरी मागें राहणारच, तें कोणाच्या कपाळीं आहे, कोणाला कसें वाटेल, पुढें कसे दिवस जातील वगैरे शंका मनांत येऊन खिन्नता उत्पन्न होते. अद्याप मुलें लहान आहेत. हे अद्याप बरेच दिवस जगायला हवेत असें वाटतें. बायकांनीं आधीं जावें ही तर मनापासून इच्छा खरी,* परंतु स्वाधीन कांहीं नाहीं. आयुष्याचे दिवस एकापुढें एक जात आहेत. माझा उद्योग मात्र म्हणण्यासारखा होत नाहीं. फुकट आयुष्य गेलें व जात आहे असें वाटतें. हल्लीं मिनी येथें आमचे जवळ आहे. गोविंद नाईक प्रभानवल्लीकर मुलगा दत्तक मागण्याकरितां मुंबईस आले त्यांस भेटण्यास हे तीन दिवस मुंबईस जाऊन आले. हल्लीं स्वयंपाकांत आम्ही पुष्कळ तऱ्हा करतों. बडोद्यांत मीं एकंदरींत संसाराचें काम पुष्कळच केलें. यमुनाबाईचीं दोन बाळंतपणें, एक भागीरथीमामीचें, एक पार्वतीमामीचें, अशीं मलाच करावीं लागलीं.

* हा मजकूर सौ० माईनीं ता. ११ मार्च १९१२ त लिहिला. ह्यानंतर ३१ वर्षांनीं त्या फेब्रुवारी ता. २६ स. १९४३ रोजीं निवर्तल्या.

स. १९१२ चा मे महिना लोहगड येथें मोठ्या आनंदांत गेला. हे नीलगिरीस महाराजांबरोबर गेले होते ते परत येतांना थोडे दिवस आमच्याकडे लोहगडास आले. बरोबर सासूबाई, भास्करराव व मुलें मुंबईहून आलीं. लोहगडावर आम्ही सर्व वीस दिवस राहिलों. हवापाणी उत्तम, पुष्कळ मंडळी येऊन भेटली व दिवस मोठ्या आनंदांत गेले. व्यायाम, अन्नपचन, भूक वगैरे बाबतींत हा अनुभव आमच्या स्मरणांत कायमचा राहील. सीताबाई कीर्तने, माझी बहीण रंगूताई, दादा पंडित वगैरे मंडळी लोहगडास येऊन भेटून गेली. संध्याकाळीं रानांत डोंगरावर फिरायला जात असूं. केव्हां फराळाचें घेऊन तेथें खाऊं. सर्वांनीं गाणीं वगैरे म्हणावीं, करवंदें तोडावीं अशी मजा आली. चांदण्या रात्रीं तर डोंगरावर फार गंमत वाटे. दोन तीन महिने मी बाहेरची झालें नव्हतें म्हणून गर्भारपणाची धास्ती पोटांत उत्पन्न होऊन मोठी चिंता सारखी लागली होती. पुण्यास एका बाईला पोट दाखवलें, पण संशयनिवृत्ति झाली नाहीं. नंतर लोहगडावर मासिक पाळी फिटल्यानें संशय जाऊन मनास समाधान झालें. मुलें दोन आहेत तीं पुष्कळ, आतां आणखी भार नको असें मनास फार वाटतें. यांना मीं माझा संशय सांगितला, तेव्हां ते गर्भारपणाच्या तयारीलाही लागले. मुलांचीं नांवेंही त्यांनीं शोधून ठेविलीं. जूनचे आरंभीं परत बडोद्यास आलों.

ह्या वेळची एक उद्वेगकर गोष्ट माझ्या जिवाला हुरहूर लावीत आहे. कांसोट्याशिवाय बायकांनीं घरांत फिरणें नानासाहेबांना फार आवडतें. तीच चाल सभ्य असें ते म्हणतात. ह्यांचा हा नाद फार दिवसांचा आहे. मला मात्र तें अत्यंत अवघड वाटतें. आजपर्यंत कसें तरी ढकलीत नेलें. आतां माझें कांहीं चालूं न देतां तसें करण्याची पाळी आली आहे. मला कांहीं सुचत नाहींसें झालें आहे. घरांत नोकरचाकर आला गेला ह्यांचे देखत मी कशी वागूं असें होऊन जातें. परवां रात्रीं ह्यावरून त्यांचें माझें सडकून रागाचें बोलणें झालें. मी ती गोष्ट सोईनें करण्यास कबूल नाहीं. ते म्हणतात कोणतीही नवीन गोष्ट प्रचारांत येतांना असेंच वाटायचें. पण मला हें कधीं आवडणार नाहीं. मी ह्यांची माझेकडून पुष्कळ समजूत घातली, कीं आपलें अठरा हातीं लुगडें फार चांगलें. ते म्हणतात गुजराती बायका बारा हाती वस्त्र वापरून भागवितात. धुवायला हलकें, खर्चांत स्वस्त, तो प्रघात आपण

स्वीकारला पाहिजे. माझा मात्र कोंडमारा झाला आहे. आतां त्यांचे मर्जीस्तव तसें करणें भाग आहे.

ता. ९ जून, सन १९१२ रोजीं मालतीबाई व सासूबाई येथें (बडोद्यास) आल्या. मालतीबाईंची प्रकृति उत्तम आहे. त्यांचें माझें चांगलें जुळतें व उभयतांना करमणूक वाटते. संध्याकाळीं दोघीजणी फिरायला जातों. त्या ता० १५ जुलईला प्रसूत होणार असें नानासाहेबांनीं अगोदरच ठरवून दिवस मोजून ठेवले आहेत. सासूबाई येथें एक आठवडा होत्या. नंतर एक दिवस माझें गुजराती नेसणें त्यांना न आवडून त्या सकाळींच रागावून मुंबईस जातें म्हणाल्या. नानासाहेबांनीं जा म्हणून सांगितलें. जेवण तयार होतें, पण त्या न जेवतां तशाच निघून गेल्या. आम्ही दोघी सुना कांहींच बोललों नाहीं. आम्हीं दोघींनीं त्यांना नमस्कार केले व दहा रुपये खर्चा-करितां दिले. गाडींत बसविण्यास शिपाई गेला होता. ता. २५ जूनला मुलें येथें आलीं. मला तीं कधीं येतीलसें झालें होतें. त्यामुळें तीं अवचित येऊन आनंद झाला. मालतीबाई ता. १६ जुलईला प्रसूत झाल्या. मुलगी झाली. ह्यांनीं सांगितलेली तारीख तंतोतंत जुळली. मुलीचें नांव मंदाकिनी ठेविलें. बाळंतिणीला शेक वगैरे कांहीं न करतां प्रकृति उत्तम आहे. पहिल्या दिवसापासून रोजचेंच साधें जेवण त्यांना देतों, त्याचा परिणाम चांगला दिसतो. नुकत्याच आमच्या थोरल्या काकी (माझी चुलती) निवर्तल्याचें वर्तमान आलें. ता. २१ जुलई रोजीं त्या गेल्या. हल्लीं गुजराती नेसणें मला होत नाहीं व हेही कांहीं बोलत नाहींत. त्यांचें हें वेड सध्या गेलेलें दिसून बरें वाटतें.

[येथें डायरीच्या शेवटीं सुमारें ५० मराठी पुस्तकें वाचल्याची यादी दिलेली आहे.]

वत्साबद्दलच्या माईंच्या आठवणी

बडोदें, ता. १-१२-१९१७

बडोद्यांत आल्याला वर्ष झालें, परंतु जें कांहीं मागेंपासून लिहिणार आहें त्याला हात धजत नाहींत. मन आनंदी तर सर्व होतें व तसा मजकूरही आनंदाचा वाटतो, परंतु एव्हां सर्व बाजू उलट झाली आहे त्यामुळें कांहींच करण्यास बरें वाटत नाहीं. दोन वर्षांखालीं (स. १९१५ च्या

फेब्रुवारींत) श्यामकांत आजारी बराच झाल्याचें बंगालमधून तारेनें कळलें, त्या वेळीं भाऊंना त्याच्याकडे लगेच धाडलें. त्यांनीं तेथें गेल्यावर त्याच्या मानेच्या गळवाचें ऑपरेशन केलें व मग त्याला थोडें बरें वाटून त्या रात्रीं त्याला थोडी झोपही लागली. इकडे आम्ही भाऊ पोचून श्यामकांत बरा आहे अशी तार येईल म्हणून सारखी वाट पाहत होतों. चार दिवस भाऊंना जाऊन झाले तरी इकडे कांहीं खबर कळेना, तेव्हां आम्हांला भलत्याच कल्पना येऊन अतिशय वाईट वाटूं लागलें. सहाव्या दिवशीं आम्हीं फार निराश असतां बोलपुरचें पत्र भाऊंचें आलें कीं श्यामकांत बरा आहे, तरी अशक्त फार आहे, म्हणून ४।६ दिवसांनीं येथून निघून त्याला घेऊन येतों. हें ऐकून सर्वांना आनंद वाटला. खडीसाखर देवापुढें ठेवून सर्वांना घरांत वांटली व एकादष्णी देवाला केली. नंतर थोड्याच दिवसांत तो मुंबईस भाऊं-बरोबर आला. आगगाडींतून त्याला आणतांना फार त्रास पडला. रस्त्यांत एक वेळ फार घाबरला सुद्धां होता, परंतु ईश्वरी दया पूर्ण म्हणूनच तो मला भेटला असें पुन्हा पुन्हा वाटतें. तो मुंबईस पोचतांच येथें तार आली. नंतर कोणाचें पत्र तीन दिवसांत आलें नाहीं त्यामुळें पुन्हा मला फार काळजी वाटून मी त्याच दिवशीं रात्रीं मुंबईस निघालें. आगाऊ पत्र गेलें नव्हतें. ग्रांटरोड स्टेशनवर उतरून मजूर करून मी तशीच घरीं गेलें. आबांना हाक मारून घरांत गेलें. मजुराचे पैसे चुकवून मी प्रथम श्यामकान्त ज्या खोलींत होता तेथें जाऊन त्याला भेटलें. तो प्रथम निजला होता, परंतु लगेच जागा होऊन कण्हूं लागला, तेव्हां मी त्याच्याजवळ जाऊन त्याच्याशीं दोन शब्द बोललें, तेव्हां तोही माझ्याशीं बोलूं लागला, परंतु भाऊ म्हणाले, ‘ त्याला त्रास देऊं नका. ’ मग मी तेथेंच जवळ जरा पडलें. त्याला पाहून मला अतिशय समाधान व धन्यता वाटली. कारण त्याला मी केव्हां पाहीन असें झालें होतें. तीन रात्री मीं बडोद्यांत रडून घालविल्या होत्या, त्यामुळें तो भेटल्यावर तसें वाटणें साहजिक आहे. कांहीं वेळानें त्यानें आपली बोलपुरची हकीकत सांगण्यास आरंभ केला, त्यांत एक गोष्ट जरा चमत्कारिक होती व त्यामुळें त्याचें दुखणें वाढलें असावें असें मला गोष्ट ऐकल्यावर वाटलें. गरीब बिचारा, लहान वयांत दूर ठेवला, खाण्याचे तिकडे हाल होत असत वगैरे मनांत येऊन वाईट वाटलें व आतां त्याला मी दूर ठेवणार नाहीं असेंही मनांत ठरविलें. ती गोष्ट म्हणजे बंगालमधें

हा असतां एक गरीब मुलगा कोल्ह्यानें वारला होता, त्याचें दुखणें पाहून ह्यानें मनांत धास्ती धरली होती. केव्हां केव्हां खिन्न होऊन कोठें तरी एकटा बसत असे, तें त्याच्या मास्तरानें पाहिलें व त्याची भीति दूर केली. तरी मनांतून ती पार गेली नव्हती. त्याचें हें दुखणें पाहून धास्ती वाटली. गळवें पायाला दोन व मानेला मोठें एक ह्यामुळें गळा, गाल सर्व अतिशय सुजले होते. त्याला खाणें घालणें म्हणजे थोडें दूध किंवा फळाचा रस तोही फार प्रयत्नानें घालावा लागे. तरी मी गेल्यापासून त्याचें सर्व काम मीच करूं लागलें. जरा दूर गेलें तर त्याची हाक मला ऐकूं येणार नाहीं, ह्यामुळें मी होईल तितकें करून दूर जात नसें. वरचेवर त्याला खाणें घालणें, त्याचे कपडे वगैरे स्वच्छ ठेवणें, त्याची करमणूक करणें, शौच लघवी हें सर्व वेळच्या वेळीं करणें, ह्यांतच माझा वेळ जात असे. परंतु हा बरा लवकर कसा होईल इकडे माझें सारें चित्त असे.

पायाच्या जखमा दुपारीं भाऊ धूत असत तेव्हां श्यामकांत फारच ओरडत असे. माझी स्थिति त्या वेळीं मोठी चमत्कारिक होई. पहिल्या दिवशीं जखमा धुतांना मी लांब जाऊन बसलें तरी त्याची ओरड ऐकून माझा जीव व्याकूळ झाला. दुसऱ्या दिवशीं मी जवळच राहिलें व रोज तशीच मी असें. पुढें थोडा थोडा गुण पडूं लागला व पोटांत वेळावेळानें थोडें अन्न जाऊं लागलें, त्यामुळें तो हुशार दिसूं लागला. गालाची सूज कमी झाल्यावर त्याला खाणें जाऊं लागलें. पायाच्या जखमा मात्र लवकर भरत नव्हत्या. डॉ. म्हणाले, खेडेगांवीं जखमा लवकर बऱ्या होतात. परंतु ह्याला मुळींच चालतां उठतां येत नसे. साधारण बरा होण्यास एक महिना लागला, तेव्हां तो काठी घेऊन, धरून चालूं लागला. मग मृदंग घेऊन वाजवीत बसे व गाणीं म्हणे, त्यांत तो बराच रंगत असे. आमच्या घरासमोर घर बांधीत असत तेथें मजूर लोक काम करतांना जीं गाणीं म्हणत तीं गाणीं हा चित्त देऊन ऐकत बसे, तेणेंकरून ह्याचा वेळ जाई. मी बारा दिवस आधीं मुंबईस गेलें व पुढें हे रजा घेऊन तेथें आले. श्यामकान्तला थोडें चालतां येऊं लागलें तेव्हां आम्ही कारल्यास गेलों. आमच्या बरोबर बाई चोपडेकर होत्या. कारल्यास जाण्यापूर्वी माझे वडील, मातोश्री व वहीण अशीं मुंबईस श्यामकान्तला भेटण्याकरितां आलीं होतीं. तीन दिवस तेथें राहून तीं पुण्याला गेलीं. रंगूचे (माझ्या बहिणीचे) यजमान

तेथें मुंबईसच होते. ह्या वेळीं श्यामकान्तचें जिवावरील दुखणें गेलें म्हणून आम्ही सर्वजण देवाचे आभार मानीत होतों व मनांत अतिशय आनंद वाटत असे. पूर्वी श्यामकान्तजवळ नेहमीं वत्स त्याला करमणूक करीत बसे, तो देखावा मनांत उभा राहून, ' देवा, आतां ते आनंदाचे दिवस कधीं तरी येतील काय ? ' पुढें थोड्याच दिवसांनीं माझा वत्स देव नेणार आहे हें तरी माझ्या मनीं ध्यानीं होतें काय ! तसें जर कळतें तर मी आधींच दुःख करीत बसलें असतें. परंतु ईश्वराची करणी अगाध आहे, ती आम्हा मानवांना काय समजणार ! हें एक प्रकारें अगोदर समजत नाहीं म्हणूनच जग चाललें आहे. श्यामकान्त दुखण्यांत असतां त्याला वासना होईल तें तो मागत असे व त्याला तें मिळतही असे. एके वेळीं त्यानें कुल्पी मलई मागितली व आवांनीं दारावर येतांच त्याला हाक मारून बराच वेळ त्यास बसवून सर्वांनाच खाण्यास दिली. श्यामकान्ताच्या ह्या दुखण्यांत माझी नवीन ओळख गंगूताई कर्वे (रघुनाथरावांच्या पत्नी) ह्यांची झाली. विष्णुपंत लेल्यांनीं ओळख करून दिली. पुढें त्या नेहमीं ह्याच्या आजारांत आमच्या घरीं येऊन बसत.

कारल्याचा प्रवास—श्यामकान्ताची प्रकृति थोडी सुधारतांच स. १९१५ च्या उन्हाळ्यांत हवाफेर करण्यासाठीं आम्ही कारल्यास जाऊन तेथें तीन महिने राहिलों. दिवस आनंदांत गेले. तेथें महिना झाला नाहीं, तोंच श्यामकांत चहूंकडे हिंडूं फिरूं लागला. एकदां तेथें भाऊ आले. प्रथम पोंचविण्यासही भाऊच आले होते. दुसऱ्यांदां भाऊ आले तेव्हां श्यामकान्त व भाऊ नदीवर खूप वेळ पोहत राहिले. मी पुरे करा म्हणत होतें तरी तो पोहतच होता. असें बरेंच पोहणें त्या दिवशीं झाल्यावर दुपारीं त्याला ताप आला, पण तो लवकरच चांगला बरा होऊन डोंगरावर वगैरे फिरावयास जाऊं लागला. अनसूयाबाई, इंदुबाई, शरद वगैरे येऊन जाऊन कारल्यास होते.

त्या वेळची वत्साची एक आठवण माझ्या लक्षांत अगदीं ताजी आहे. अनसूयाबाई व वत्स पुण्यास गेले होते. परत आले तेव्हांचे त्यांचे चेहरे पाहून माझ्या पोटांत धस्स झालें. पुढें जेवणें झाल्यावर वत्स व अनसूया-बाईंनीं आमच्या मावशीचा मुलगा शंकर हर्डीकर पुण्यास नदींत बुडून

गेल्याची बातमी सांगितली. ती बातमी ऐकून व मावशीचा शोक मनांत येऊन त्या रात्रीं मला झोपही आली नाहीं. लगेच मी पुण्यास एक दिवस जाऊन मावशीस भेटून आलें. त्यांचा शंकर, आमचा वत्स वगैरे बरेच मुलगे ओंकारेश्वराजवळ आंघोळीला गेले. शंकर कसा एकदम खोल पाण्यांत गेला कोणास कळलें नाहीं. त्याची शेंडी वर दिसत होती, ती धरून त्याला ओढण्यास वत्स गेला. परंतु तितक्यांत शंकर दिसेनासा झाला, नाहीं तर कदाचित् वत्स देखील त्याच वेळीं जायचा. वांचल्याबद्दल देवाचे आभार मानले.

कारल्यास आमच्याकडे मंडळी बरीच जमली होती. जयराम होता त्याला ताप येऊं लागला, तो पुष्कळ दिवस उतरेना. घरांत पाणी खोल विहिरीचें ओढून आणावें लागे. औषध आणणें, पाणी ओढणें हीं सर्व कामें वत्स मोठ्या हौसेनें करी. दंड बारीक काठीसारखे पण हा इतकें पाणी कसें काढतो ह्याचें मला नवल वाटे. पुढें जयराम बरा होऊन शेतकी शाळेंत लोणी काळभोरला गेला.

कारल्यास आमचे दिवस बरे गेले, मला काम पुष्कळ पडे, पण त्याचा खेद वाटला नाहीं. सर्व मंडळी आनंदांत पाहून केवढें माझें भाग्य असें वाटे. पुष्कळदां मला व ह्यांना पडसें, ताप, खोकला वगैरे आजार झाले, पण त्यांचें कांहीं कठीण वाटलें नाहीं. पुण्याची पुष्कळ मंडळी भास्कर, त्रिंबक, सीताबाई, केशव वगैरे येऊन गेली. जवळच बळवंतराव टोळ राहत त्यांचा आम्हांस फार उपयोग झाला. कारल्यासारख्या परक्या ठिकाणीं त्यांनीं आम्हांस कांहीं उणें पडूं दिलें नाहीं.

कारल्यास असतां श्यामकान्ताचा वाढदिवस आम्हीं थाटांत केला. नुकताच तापांतून उठलेला तो खडखडीत चांगला झाल्यामुळें मुद्दाम तो प्रसंग आम्हीं विशेष आनंदांत साजरा केला. शेजारीं भालचंद्रांचे घरांत जेवणावळ मांडली. रव्याचे लाडू केले. त्या दिवशीं पंक्तींत श्यामकान्तानें सोवळें नेसून बसावें, म्हणून मीं त्यास फार आग्रह केला, पण त्यानें माझें ऐकलें नाहीं म्हणून मला त्याचा भारी राग आला. ह्यांना मीं सांगितलें. ते म्हणाले, 'मी त्याला सांगणार नाहीं, त्याच्या मर्जीची गोष्ट आहे.'

अशा बाबतींत त्यानें विचारपूर्वक ठरविलेला निश्चय पाळला, ह्याबद्दल आतां मला त्याचें कौतुकच वाटतें.

कारल्याच्या कित्येक आठवणी माझ्या मनांत कायमच्या भिनल्या आहेत. जागा लहान, माणसें पुष्कळ, तेव्हां दोन मुलें बाजूला घेऊन मध्यें मी निजें तेव्हां माझें मलाच वाटे माझ्यासारखी भाग्यवान मीच होय. पण तें माझें सुख कायमचें नष्ट होणार ह्याची अटकळ आगाऊ नव्हती म्हणून बरें. वाढदिवसाच्याच सुमारास पुण्याहून फर्ग्युसन कॉलेजचीं कांहीं मुलें व मास्तर दोन दिवसांच्या सफरीकरितां म्हणून कारल्यास आले. लेणीं लोहगड वगैरे त्यांनीं पाहिला. त्यांच्या त्या सफरीच्या अंतर्गत सुमारें ७० मंडळी होती. आमच्या बाई त्यांजकडे स्वयंपाकास पाठविल्या. कित्येकांना आम्हीं चहाला वगैरे आमच्याकडे बोलाविलें; श्यामकान्त, वत्स वगैरे मुलें वाढण्यासाठीं त्यांजकडे जात. त्या वेळीं श्यामकान्तानें श्लोक व गाणीं म्हणून करमणूक केली. त्याचप्रमाणें एकदां हिंगण्याच्या पुष्कळ मुली आल्या त्यांचेंही आतिथ्य आम्हीं चांगलें केलें. दोघेही मुलगे ह्या मंडळींत पूर्णपणें मिसळून गेले होते. वत्साची तरतरी तर अति वाखाणण्यासारखी होती. मुलांबरोबर दहा पंधरा मैल तो सहज चाले. तो सर्वांचा आवडता बनला होता. जरा तो कोठें दुसरीकडे असला तर सारखीं मुलें त्यास विचारण्यास येत. आंगठीचा मजेदार खेळ आम्ही खेळत असूं. नदीवर आंघोळीची तर फारच मजा येई. सर्व मुलें आपले कपडे धुऊन आणीत. एकदां कांहीं कारणावरून मी दोघांही मुलांवर फार रागावलें. चापटीही मारली असावी. तों वत्स रागावून कोठें दूर गेला, घरांत येईना. मला अत्यंत वाईट वाटलें, मग त्याचीं आर्जवें करून त्यास आंत आणला. बाजारचें आणणें, घरांतील बारीक सारीक कामें, पाहुण्यांस स्टेशनवर पोंचवणें अशीं किती तरी कामें वत्स करी. सदा पडेल तें करण्यास तयार. पैशाचा हिशेब विनचूक आणून देई. रानांतून करवंदें आणी. लोणावळ्यास आगगाडीनें जाऊन बर्फ घेऊन येई. मग आम्ही सरबत, आईसक्रीम वगैरे करून सर्वांस वांटीत होतों. कारल्यास भालचंद्रांचे घरीं विहिरीला मोट लागे, तेव्हां माळी मोठ्यानें गाणीं म्हणे तीं श्यामकान्त-वत्साला इतकीं आवडत कीं, ते त्यांतच सारखे गुंगून जात. एकदां कांहीं पाहुणे मंडळी व मुलें सर्व जेवीत असतां हे दोघे मुलगे इतके कांहीं हसूं

लागले कीं कितीही दाबले तरी त्यांचें हसूं म्हणून आवरेना. आम्ही रागें भरलों तरी हसें बंद झालें नाहीं. अशा एक एक गोष्टी आठवूं लागल्या कीं लिहितां पार येणार नाहीं. इतके ते दिवस आमचे काल्यास आनंदांत गेले. ते आतां पुन: कसचे येणार !

वत्सास वाचण्यालिहिण्याचा नाद मोठा होता. ह्यांच्या इतिहासास तरी त्याची मदत फार होई. पुस्तक झपाझप वाचून संपवीत असे. नुसते डोळे फिरवून मतलब ग्रहण करी.

मनाचें समाधान

ता. १ डिसेंबर, स. १९१७

मनुष्यप्राणी मायामोहांत किती गुरफटून जातो व त्याची सुख मिळविण्याकडे किती धाव असते, हें जगाच्या राहटीकडे पाहिलें म्हणजे चांगलें कळून येतें. थोडें सुख कमी झालें किंवा त्याचे कांहीं मार्ग खुंटले म्हणजे मनुष्य दु:खी होतो. सुखाचे दिवस केव्हांच निघून जातात, दु:खाचे मात्र सरत नाहींत. सुख मिळत असतां मनुष्याला त्याची किंमत कळत नाहीं. दु:ख मात्र असह्य होतें. माझा वत्स तेराव्या वर्षी गेला, त्याला जाऊन इतक्यांत वर्ष होईल, परंतु अद्यापि त्याचा विसर मला बिलकूल पडत नाहीं. फार फार विचार करतें, पण मागच्या गोष्टी लगेच डोळ्यांपुढें उभ्या राहतात. हल्लीं श्यामकान्त येथें असल्यानें पुष्कळ बरें वाटत आहे, तथापि वत्साची आठवण सारखी मनास झोंबते. त्याचे गुण किती म्हणून आठवावे असें होऊन जातें. पुष्कळसे अश्रु ढाळणें ह्यांतच काय समाधान वाटेल तें खरें. दिवाळी नजीक आली तेव्हां पोटांत गोळे उठूं लागले. पूर्वीच्या दिवाळींच्या आठवणी मनांत येऊन केवढा दु:खावेग उत्पन्न होतो तो सांगतां येत नाहीं.

जगाच्या दु:स्थितीकडे नजर टाकली तर, त्यापुढें माझें दु:ख कांहींच नाहीं, हें जरी खरें तरी एखादे वेळेस नदीचा बांध फुटून पाणी अफाट वाहूं लागतें, तशी माझी गत होते. मग तें मन कशानेंही आवरत नाहीं. शिवाय घरांत नीटनेटकेपणा, व्यवस्था, स्वच्छता ह्यांत कांहीं थोडें चुकलें तरी मनाचा संताप होतो, अशा स्थितींत वडील, मातुश्री वगैरे कोणी धीर देण्यास जवळ असावें असें वाटूं लागतें. आपण पुष्कळ विचार व निश्चय केले तरी त्यांतलें फारच थोडें तडीस जातें.

असलेल्या सुखाची आपणास किंमत वाटत नाहीं, नाहीं त्याचा मात्र खेद वाटत राहतो. मन नेहमीं शांत व आनंदी ठेवण्यास मला शिकलें पाहिजे. आपण समजतों तितकें जग साधें किंवा निर्मल नाहीं हें समजून जगाशीं वागलें पाहिजे. येथेंच माझी फसगत होते. सर्वांशीं सारखें वागून भागत नाहीं. मला शब्दांत दुसऱ्याला पकडतां येत नाहीं. जगांत भलें म्हणवून घेणें फार कठीण आहे. सतत उद्योगांत वेळ काढणें ह्यासारखा आनंद नाहीं. मीं लहानसें कवन केलेलें जमलें तर केवढा आनंद होतो, मग ह्यांच्या ह्या इतिहासासारखे उद्योग तडीस गेले तर तो आनंद काय वर्णावा ! निश्चयानें थोडथोडा उद्योग केला तरी त्याचें फळ मिळाल्याशिवाय राहत नाहीं. संसारांत पुष्कळशा गोष्टी आपणास कर्तव्य म्हणूनच कराव्या लागतात, मग त्यांत भलेपण मिळतेंच असें नाहीं. प्रत्येकाचा स्वभाव व अनुभव भिन्न असल्यामुळें एकाच्या गोष्टी दुसऱ्याला पटतील असें थोडेंच आहे ! म्हणून मनुष्यानें निराश असें कधीं होऊं नये, आहे त्यांत समाधानवृत्ति ठेवीत जावी. पैशानें सुख होतें असें तर मुळींच नाहीं. मुलें असलीं तरी तीं सुशिक्षित होऊन त्यांजकडून सुख लागतेंच असें नाहीं. संसार सर्व संकटमय आहे. आपल्या वर्तनानें दुसऱ्याला आनंद व संतोष होईल असें वागलें पाहिजे. दुसऱ्याचा आनंद तोच आपला आनंद असें मानून राहणें ह्यांत केवढा थोरपणा आहे !

मी बडोद्यांत केव्हां केव्हां माधवबुवांचें कीर्तन ऐकण्यास जाई, त्या वेळीं मन अतिशय तल्लीन होऊन जात असे, आणि संसारांतल्या विवंचनांचा कांहीं वेळ तरी विसर पडे. दुःखाचा विसर पडण्यास खऱ्या ज्ञानाचें समाधान मनास झालें पाहिजे. सृष्टिकर्त्याच्या लीलांचें मनन करूं लागलें तर मन गोंधळून जातें. मिळून सतत उद्योगांत मन घालविणें हा एकच मार्ग दुःख विसरण्याचा आपल्या हातीं आहे. उद्योग व वाचन ह्यांसारखा दुसरा मित्र जगांत नाहीं. दररोज नवीन उद्योग व नवीन कामें जोरानें करीत राहणें, कांहीं तरी नवीन ज्ञानकण पैदा करणें हेंच आम्हां मानवांचें भूषण आहे.

माईचे हे उतारे पुष्कळ झाले. आणखी भारूड आहे पण यावरून आमच्या कौटुंबिक जीवनाची कल्पना येईल. आमच्यासारखेंच इतरांचेंही जीवन आहे, त्यांत नवल असें कांहीं नाहीं. आतां पुढें निराळा विषय.

२. तेव्हां व आतां

माझ्या जीवनकथेस आरंभ करितांना ऐशीं नव्वद वर्षांतील प्रचंड क्रांति स्पष्ट नजरेस पडून त्या क्रांतीनें माझे सर्व अनुभव व्यापलेले आढळतील. आजच्या परिस्थितीवरून पूर्वकालाची कल्पनाच होणार नाहीं. प्रवासाचीं साधनें, गृहशृंगार, अन्नवस्त्र, उद्योगधंदे, वेषभूषा, धर्माचार, सामाजिक व्यवहार अशा एकूण एक बाबतींत फार मोठा फरक झालेला आढळतो. माझा जन्म सत्तावन सालच्या प्रक्षोभानंतर आठ वर्षांनीं झाला, त्या वेळीं इंग्रज लोक आपलें सत्तेचें नियंत्रण बळकट करीत चालले होते. शिक्षणाची सुरुवात नव्हती. स्वराज्य म्हणजे काय ह्याची पूर्ण विस्मृति लोकांस झाली होती. स्वराज्य हा शब्द देखील उच्चारण्याची सोय नव्हती. गुरेंढोरें वावरतात तशाच पद्धतीचें आमचें मानवी जीवन चालत असून घराच्या किंवा गांवाच्या पलीकडे जग म्हणून कांहीं आहे ह्याचें भान कोणासही नव्हतें. प्रत्येक गांव व कुटुंब स्वयंपूर्ण असून घरच्या घरीं निर्वाह-साधनें बनवून जीव आहे म्हणून जीवन कंठावें असा तो काळ होता. घरचें शेत, परसांतील भाजीपाला, शेतीला उपयोगाचीं जनावरें एवढाच संसाराचा व्याप. बाजाराची जरूरी फक्त वस्त्रापुरती भासत असे. कोंकणांत कापूस पिकत नसल्यामुळें वीणकाम तयार होत नाहीं. किंबहुना घोडा, उंट हीं जनावरें, गहूं, हरभरा वगैरे धान्यें किंवा साखर ह्या चिजा आम्हांस लहानपणीं ठाऊक नव्हत्या. गूळ, मिरची, तंबाकू हे जिन्नस वर्षाकांठीं दूरच्या बाजारांतून डोईवरून आणावे लागत. विशेष कामाचे दिवस म्हणजे पावसाचे तीन चार महिने. बाकीच्या दिवसांत वाटेल तेवढी विश्रांति मिळून, स्नानसंध्या, भजन-पूजन, हव्यहवन, सणवार अशा व्यवसायांत आम्ही मुलें लहानांचीं मोठीं झालों. पाऊस, वारा, ऊन, थंडी सहन करावी लागल्यानें निसर्गाची ओळख निकट होत असे.

सातव्या वर्षी माझी मुंज होऊन गळ्यांत जानवें पडलें. उपाध्यायांनीं ताकिदी दिल्या कीं बहिर्दिशेच्या वेळीं कानावर जानवें ठेवावें, शूद्राचा स्पर्श झाल्यास स्नान करावें, स्नान केल्याशिवाय तोंडांत पाणी घालूं नये, संध्या-नमस्कार आटपून मग सोवळ्यानें भोजन करावें. हें माझ्या हातून कसें निभेल ह्या विवंचनेंत मी मुंजीनंतर आठ दिवस सारखा रडत बसलों.

पण आज जर कोणी विचारील कीं कोठें आहे जानवें व सोवळें व कोठें आहे गांठ मारायला शेंडी, तर हल्लींच्या पिढींत कित्येकांस हे प्रकार समजणार देखील नाहींत. जेवतांना गोविंद गोविंद म्हणावें, विटाळशीचा शब्द ऐकूं नये, सुवेर सुतक पाळावें हे प्रचार आतां प्रायः लुप्त झाले. मुंजीच्या पूर्वीच मला वडिलांनीं धूळपाटीवर घातलें, श्रीगणेशाय नमः हीं मोडी अक्षरें घालून मला तीं गिरवायला दिलीं. पुढें शाई-लेखणीची ओळख होऊन मोठ्या अक्षरांचा कित्ता वळविण्यास दिला. ह्याप्रमाणें माझी अक्षर-ओळख मोडींत होऊन मागाहून शाळेंत गेल्यावर मी बालबोध शिकलों. त्या वेळचा आमचा वेषही विचित्र होता. शिंप्यानें शिवलेले कपडे आम्हांस माहीत नव्हते. शिवण्याचें यंत्र निघालें नव्हतें. बायका आपल्या चोळ्या व बारबंड्या हातानें शिवून देत. बाहेर जातांना अंगावर दुहेरी धोतराचें पांघरूण व डोकीस लाल किंवा शुभ्र रुमाल बांधायचा. टोपी त्या वेळीं वापरांत नव्हती. टोपी होती तिला कानटोपी म्हणतात, ती थंडीच्या दिवसांत दुहेरी वापरायची. पायजमा, चड्डी, शर्ट, ब्लँकेट, हे प्रकार आम्हांस ठाऊक नव्हते. बायकांनीं पातळें नेसणें, अंबाडा घालणें, रात्रीं आरशांत पाहणें निंद्य समजत. मग त्यांच्या विकच्छ लुगड्याची तर गोष्टच नको. अंगावर दुहेरी धोतर व डोकीस रुमाल बांधून मी वेरवलीच्या मराठी शाळेंत दाखल झालों. सकाळीं खर्डेघाशी व वाचनपाठांची आवृत्ति आणि दुपारीं गणित, हिशेब व परवचा मिळून निदान सात तास तरी आम्हांस शाळेंत डांबून ठेवीत. छडी व घोडीवर चढविणें ह्या शिक्षा मीं भोगलेल्या आठवतात. खेळांचें तर नांव नव्हतें. कंटाळा आला म्हणजे एकीदुकीचें निमित्त सांगून बाहेर उनाडकी करावी. मोडी लिपी प्रथमपासून आल्यानें बडोद्याच्या नोकरींत व पुढें पेशवेदप्तरच्या कामीं मला तिचा मोठा उपयोग झाला. आतां मात्र ही लिपी अस्तास जाते खास.

भोजन व राहणी आतां पूर्वींची पार बदलून गेली आहे. असल्यास केळींचीं पानें व द्रोण-पत्रावळी ह्यांचा उपयोग भोजनास सर्वत्र चालू होता. ताटें-वाट्या प्रथम नव्हत्या, पुढें उपयोगांत आल्या. हल्लीं मेजावरचें जेवण होतें, तें स्पर्शास्पर्श दोषामुळें निषिद्ध असे. बिनकल्हईचीं ताटें, चमचे, कांटे किंवा चिनी कपबशा ह्यांची ओळख आम्हांस फार पुढें झाली. मुंबईस

इराण्याच्या दुकानांत चहा, ब्रेड किंवा सोडावॉटर घेण्याची मोठी धास्ती वाटे. हे प्रकार उत्तरोत्तर रूढ होत गेले.

पूर्वीं घरीं शुभ दिन ठरवून आठ पंधरा दिवसांनीं ग्रामन्हावी येई त्याजकडून वस्तऱ्यानें डोई गुळगुळीत करावी लागे. कात्रीनें केंस कापण्याची प्रथा नसून सेफ्टी रेझर (सुरक्षित वस्तरा) तर अगदीं अलीकडचा आहे. त्या वेळच्या न्हाव्याचीं हत्यारें पाहून आमच्या पोटांत गोळा उठे. रक्त आल्याशिवाय हा विधि बहुधा पार पडत नसे. आम्हा मुलांचें डोकें तो न्हावी आपल्या दोन गुडघ्यांत चांगलें दाबून धरी. वडील आम्हां मुलांस गूळ वगैरे दाखवून आर्जवानें न्हाव्यापुढें बसवीत, तेव्हां नाकाडोळ्यांतील जलस्रावानें आमचा जीव कासावीस होई. आतां तर हे प्रकार कोठेंच आढळणार नाहींत. स. १८९२ त मी प्रथम युरोपास गेलों तेव्हां स्वहस्तानें दाढी करण्यास शिकलों, ती सुद्धां प्रथम आंतल्या बाजूस गुप्तपणें करावी लागे. आतां तर दररोज दाढी केल्याशिवाय बाहेर पडणें असभ्य मानलें जातें.

पुरुषांपेक्षां स्त्रियांच्या बाबतींत तर ही क्रांति जास्तच तीव्र भासते. स्त्रियांचा पेहराव, शृंगार व मोलवान अलंकार पूर्वींचे साफ बदलून नवीन आचार रूढ होत आहेत. मोठ्या लांब लुगड्याऐवजीं विकच्छ गोल साडी व पाठीवर लांब लोंबणारी वेणीदार केशगुंफण आतां सर्रहा वापरांत दिसतात. रस्त्यानें तरुण-तरुणींचा मेळावा हल्लीं चाललेला दिसतो तो पूर्वीं पाहण्यांत नसे. शाळा-कॉलेजांत मुलगे मुली आतां सहशिक्षणाचा अवलंब करतात. केशशृंगार तर पूर्वींचे कांहींच राहिले नाहींत. पूर्वींच्या वेण्या, डोक्यांत, कानानाकांत झळकणाऱ्या दागिन्यांचीं नांवें सुद्धां आतां कोणास ठाऊक नसतील. तरुण मुलींच्या पायांतील सांखळ्या किंवा जोडवीं, डोईंतील चांद, केतक किंवा गुलाबाचें फूल, वेणीच्या खोप्यांतील मूद, कानांतील बुगड्याबाळ्या, हातांतील गोटपाटल्या किंवा बाजूबंद, कमरबंद हे प्रकार आतां मुद्दाम बनविल्याशिवाय प्रचारांत दिसणार नाहींत. नथ तर सर्वत्र लयास जाऊन ती प्रो. गोड्यांच्या संशोधनलेखांत मात्र आढळते. मंगळसूत्रानें नवीन स्वरूप धारण केलें. नवराबायकोंनीं पायीं किंवा गाडींत बसून एकत्र फिरणें किंवा गप्पागोष्टी करणें म्हणजे एके काळीं आचरटपणा

वाटला असता, पण आतां तो नित्याचा क्रम बनला आहे. शाळा-कॉलेजांत पुरुष व मुली खुशाल एकत्र बसतात, शिकतात, बोलतात, वादविवाद करितात. विधवा देखील कुंकूं लावूं लागल्यामुळें, त्यांचा वेगळेपणा उरला नाहीं. मग केशवपनाचें तर नांवच नको. अशा प्रकारें सर्व जीवनांत प्रचंड क्रान्ति बनली आहे.

चहाचें नांव सुद्धां पूर्वी ठाऊक नव्हतें. मी हायस्कुलांत असतांना एक चहावाला ब्राह्मण दुपारीं पैशाचा एक छोटा कप चहा व एक पैशाच्या दोन पुऱ्या विकी, त्या मी घेऊं लागल्याचें स्मरतें. कॉफी उपासाच्या वगैरे निमित्तानें क्वचित् कोणी घेत. आतां चहा तर घरोघर खालच्या थरापर्यंत पोंचला आहे. ब्रेड बिस्किट पूर्वी निषिद्ध मानलें जाई, तें आतां सकाळ संध्याकाळ अवश्य बनलें आहे. स. १८७८ त पहिला घासलेटचा डबा शिपोशीच्या दुकानांत आलेला मीं पाहिला. आगपेटी त्याच सुमारास दृष्टीस पडली. प्रथम लाल बोंडाच्या काड्या प्रचारांत आल्या, पण त्या साध्या घर्षणानें सहज पेटत म्हणून काळ्या बोंडाच्या काड्या चालू झाल्या त्या अद्यापि प्रचारांत आहेत. कंदीलही अलीकडेच उपयोगांत आले. पूर्वी घरांत लामणदिवे, समया व ठाणव्या असत, रात्रीं रस्त्यांत चुडी अगर मशाली वापरण्याचा प्रघात होता. आतां तर विजेच्या बत्त्या प्रत्येकाला खिशांत बाळगतां येतात. विस्तव टिकविण्याला घरांत पूर्वी लांब गोवऱ्या किंवा शेणाचा मुठ्या चुलींत ठेवीत, त्या आगकाड्या आल्यावर बंद झाल्या. आंघोळीचें पाणी घेण्यास पूर्वी गंघाळें (गंगालय) असत, तीं जड व अडचणीचीं वाटून अदृश्य झालीं आणि बालडीचा म्हणजे बकेटचा अवतार निर्माण झाला तो हल्लीं घरोघर दिसतो. पूर्वी पाणी तापविण्याचीं मोठीं तपेलीं असत त्यांस सतेल म्हणत, त्यांऐवजीं आतां गरम झरे सर्वत्र दिसतात. विहिरीचें पाणी काढण्यास दोरी लावलेला पोहोरा (अपोहर) असे, त्याच्या जागीं आतां हातपंप वापरतात. असें निरीक्षण करूं लागल्यास पूर्वप्रघात कसे नाहींसे झाले आणि नवीन कां अवतरले तें लक्षांत आल्यानें मानवी जीवनाचीं स्थित्यंतरें मनांत भरतात.

मी प्रथम युरोपास गेलों तेव्हां अंगावर सूटकोट, बूट, पाटलोन, डोकीवर हॅट (टोपी), गळ्याला शुभ्र कडकडीत कॉलर व खालीं नेकटाय

(गळबंध) हा पेहराव घ्यावा लागला. शिवाय भोजनाचा विशिष्ट कोट वेगळा असे. हें सर्व नीटनेटकें ठेवण्यास वेळ व श्रम फार लागे. आतां महात्मा गांधींचें खादीयुग निर्माण झाल्यानें भूतलावरील सर्व लोक आपापले देशी पोषाख चढवून पाहिजे तिकडे संचार करूं शकतात. पूर्वी आम्ही आमचाच पोषाख ठेवतों तर लंडनांत राहण्यास जागाही मिळाली नसती.

पूर्वीचीं घरें आतां राहिलीं नाहींत. मुंबई-पुण्याची पूर्वरचना पार बदलून गेली आहे. स. १८८४ सालीं मी मुंबईस आलों तेव्हां रस्त्यांवर घोड्यांच्या ट्रॅम्स चालत, त्या जाऊन आतां विजेच्या गाड्या, बसेस व मोटारी ह्यांच्या वापरामुळें रस्ता ओलांडणें बिकट झालें आहे. हल्लींसारखी गर्दी रस्त्यांत मुळींच नसे. चार-पांच मजल्यांच्या इमारती निर्माण झाल्यानें लिफ्ट्ची योजना उत्पन्न झाली ती पूर्वी नव्हती. दुमजली जगन्नाथाच्या चाळी म्हणजे त्या वेळच्या प्रचंड इमारती समजल्या जात.

अलीकडे ही जीवनक्रान्ति इतक्या झपाट्यानें होण्याचें कारण नवीन शास्त्रीय शोध होत. मोटारी, विमानें हीं प्रवासाचीं साधनें व विद्युच्छक्तीचे उपयोग रेडियो, ध्वनिक्षेप, सिनेमा इत्यादींनीं पूर्वीचें शतकांनुशतकें चाललेलें जीवन अल्पावकाशांत पार बदलून गेलें. स. १८२६ त पहिली आगबोट बाष्पशक्तीनें लंडनास जाऊं लागली, तेणेंकरून तीन महिन्यांचा मुंबई-लंडनचा प्रवास तीन आठवड्यांत पुरा होऊं लागला आणि स. १८६९ त सुवेझचा कालवा उपयोगांत येतांच हा प्रवास दोन आठवड्यांवर निश्चित झाला. आधुनिक शोधही इतक्या त्वरेनें निर्माण होण्यास दोन जागतिक युद्धें कारण झालीं. पेट्रोलच्या उपयोगानें तासांत पन्नास-पाऊणशें मैलांचें अंतर गांठणाऱ्या मोटारी सिद्ध होतांच प्रवास व दळण-वळण झपाट्यानें वाढलें. पहिल्या युद्धांत पाणबुड्या बोटी व विमानें युद्धोपयोगासाठीं म्हणून सुरू झालीं, त्यांचा प्रसार पुढें विशेष होऊन आतां तर मुंबई-लंडनचा प्रवास विमानानें चोवीस तासांत घडून येतो. ही प्रचंड क्रान्ति आतां सर्वव्यापी झाल्यानें तीस अनुसरून सर्व जीवन व राजकारणही पालटत आहे. पूर्वीचीं मालाची नेआण करणारीं लंमाणें जाऊन त्यांची जागा पब्लिक कॅरियर्सनीं पटकावली आहे. पूर्वीचे बैलगाड्या चालणारे धुळीचे रस्ते त्रासदायक वाटल्यानें नवीन सीमेंटचे रस्ते

तयार झाले, तेणेंकरून मोटारींचा प्रवास फारच आरामाचा बनला. सीमेंट-कांक्रीटची बांधणी निर्माण झाल्यानें मोठमोठ्या इमारती आतां अगदीं झटपट तयार होऊन त्यांत लाकडाचा उपयोग फारच अल्प होत आहे. नवीन घरांची रचना व ठेवण सर्वथा इतकी बदलली आहे कीं तींत पूर्वींचें आपलें वैशिष्ट्य कांहींच उरलेलें नाहीं. गवताच्या झोपड्या किंवा कौलें जाऊन आतां मंगलोरी मोठीं कौलें किंवा गची ह्यांनीं घरांचीं शिरें बदलून गेलीं आहेत. घरोघर नळाचें पाणी व विजेचे दिवे आल्यानें पूर्वींच्या चुली, धूर, सारवण हे प्रकार शहरांत तरी लुप्त झाले आहेत. लाकडांचें जळण दुर्लभ होऊन आतां केरोसिनचा स्टोव्ह घरोघर आला आहे. स्वयंपाकास वाफेचे कुकर आल्यानें चुलीजवळ सारखी राखण ठेवण्याचें प्रयोजन उरलेलें नाहीं. पूर्वीं घरोघर बाळंतपणें होत त्यांऐवजीं बहुधा प्रसूतिगृहांची सोय उपयोगांत आली आहे. ह्याचा अर्थ पूर्वींची शिवाशीव तर गेलीच, पण बाळंतिणीस अंधारांत कोंडून विस्तवाचा शेक देण्याऐवजीं स्वच्छ मोकळी हवा, उजेड, वारा ह्यांचा भरपूर उपयोग चालू झाला आहे. हे प्रकार नागरी जीवनांतच मुख्यत: उद्भवले असले तरी त्यांचा परिणाम ग्रामीण जीवनावरही झाल्याशिवाय राहत नाहीं. परिस्थित्यनुरूप मानवी जीवन कसें बदलत जातें हें ह्या घडामोडींत चांगलें व्यक्त होतें.

हे सर्वच प्रकार हितावह आहेत असें म्हणतां येणार नाहीं. स. १८८५ त मुंबईची लोकसंख्या पांच लाख व पुण्याची एक लाख होती, ती आतां पांच पटीहून जास्त वाढली असल्यानें नागरिक कारभार बिकट बनला आहे. तीस लाख वसतीला मुंबईंत पुरेशी जागा, हवा, उजेड किंवा देहधर्माची सोय दुर्लभ झाली आहे. ह्या तीस लाख प्राण्यांच्या मलमूत्राचें खत परत शेतीस मिळत नाहीं, तें पुष्कळसें वायां जातें हा तोटा होऊन अन्नटंचाई, दुग्धदुर्मिळता हे प्रकार वाढत आहेत. लोकांना शिक्षण देणाऱ्या पुरेशा शाळा किंवा लायक शिक्षक नसल्यानें शिक्षण महाग व दुर्लभ बनत आहे आणि शिक्षण चांगलें मिळाल्याशिवाय उद्योग-धंदे नीट चालत नाहींत. महायुद्धांनीं अपरिमित संपत्तीचा नाश होऊन भूतलावर सर्वत्र दुष्काळाची छाया पसरल्यानें 'ते हि नो दिवसा गता:' असें दु:ख करीत बसण्याची पाळी सर्वत्र आली आहे. पूर्वींची साधी ग्रामीण राहणी आतां बिलकूल शक्य नाहीं. वर्तमानपत्रें व मासिकें ह्यांचा विस्तार

कल्पनातीत होऊन पूर्वीच्या तमाशासारख्या करमणुकींच्या ऐवजीं आतां सिनेमागृहें निर्माण झाल्यामुळें जनतेची नैतिक स्थिति खालावत आहे. पूर्वी चिलमीगुडगुड्यांच्या द्वारा तंबाकूचें थोडेंबहुत सेवन लोक करीत. विडीचा वापर फारसा ठाऊक नव्हता. पण अलीकडे विड्या बनविण्याचा एक स्वतंत्र धंदाच बनला असून लहानांपासून मोठ्यांपर्यंत तें व्यसन फैलावलें आहे. विडीची देखणी बहीण कागदी सिगारेट, तिचाही प्रसार वाढत असून ह्या तंबाकूपायीं समाजाची आयुर्मर्यादा नाहक घटत आहे. धूम्रपानामुळें उत्तर वयांत पुष्कळशा व्याधी सुद्धां माणसास जडून राष्ट्राला हानि येते. तंबाकूच्या वरचढ व्यसनें गांजा, अफू, मद्य इत्यादि पूर्वी ठाऊक नसलेलीं माझ्या मतें हल्लीं वाढत असावीं. पण ह्या विषयावर मला अधिकारी वाणीनें कांहींच बोलतां येत नाहीं.

राजकारणांत लोकशाहीच्या तत्त्वाचा अंतर्भाव असला तरी त्याची निर्मलता सर्वथा भंग पावत आहे. कायदेमंडळाच्या किंवा नागरिक संस्थांच्या निवडणुकी शुद्ध व सात्त्विक पद्धतीनें न होतां त्यांत व व्यापारांत सर्वत्र काळाबाजार व फसवणूक ह्यांचा प्रभाव वाढत आहे. सत्याचा लोप व असत्याचा जोर वाढत चालल्यानें पुढें काय संकटें उद्भवतात त्याची कल्पना होत नाहीं. भूतलावर युद्धपरिस्थितीचा फैलाव सारखा चालू आहे.

सर्वांत प्रचंड प्रगति बौद्धिक शिक्षणांत व सर्वांगीण संशोधनांत झाली तिचा प्रभाव तर आपण आतां सभोंवार पाहतच आहों. माझ्या जन्मापूर्वी आठ वर्षें म्हणजे स. १८५८ त युनिव्हर्सिट्या स्थापन झाल्या, त्यांनीं शिक्षणाचें नवीन कार्य चालू केलें त्याचा प्रभाव अर्ध्या शतकानें पूर्णतया जीवनांत दिसूं लागला. सर्वत्र नवीन जागृति व विचार चालू होऊन पूर्वीचें आलस्य व नैराश्य लय पावूं लागलें. सामाजिक आचार, उद्योगधंदे, राजकारण, प्रवास, दळणवळण इत्यादि बाबतींत प्रचंड क्रान्ति होऊन स. १९०० पासून पुढें पूर्वीचा मनु साफ पालटून गेला. बाजार, उद्योग-धंदे, बँका व पेढ्या, कारखाने, गिरण्या, शाळा, कॉलेजें इत्यादींचा फैलाव झपाट्यानें होऊन समस्त हिंदी जनता उद्योन्मुख बनली. ह्या क्रान्तीच्या काळांत मला आपलें कर्तव्य निश्चित करतां आलें हें मी मोठें भाग्य समजतों. ह्या क्रान्तीचीं वर्णनें इतकीं सुस्पष्ट दिसत आहेत कीं त्यांचा

निर्देश मुळींच आवश्यक नाहीं. "विद्येनेंच मनुष्या आलें श्रेष्ठत्व या जगामाजी" हें तत्त्व आतां सर्वमान्य झालें आहे. म्हणून येथेंच मी हा पूर्वोत्तर अनुभव लेख संपवितों. माझ्या दीर्घायुष्याची फलश्रुति समजण्यास मी ह्या क्रान्तींतून कसा निभावलों तें पुढें कळून येईल.

३. माझे आजार

माझी प्रकृति मुळांत दणकट नव्हे, नाजुकांतच गणना करावी लागेल, पण सुदैवानें मला चांगल्या हवेच्या ठिकाणीं राहण्यास मिळालें. बडोद्याच्या छत्तीस वर्षांच्या नोकरींतील तिसरा हिस्सा तरी बाहेर हवेच्या ठिकाणीं युरोपांत वगैरे गेला. पहिलीं अठरा वर्षे कोंकणच्या चांगल्या हवेंतच गेलीं. अलीकडे जवळ जवळ तीस वर्षे मी कामशेतलाच चिकटून आहें. माझें मुख्य काम ह्याच ठिकाणीं सिद्धीस गेलें. बडोद्यास मात्र मलेरिया पाठीस लागला होता, त्याला मी कंटाळलों. एकंदरींत मी निकोप प्रकृतीचा खरा, पण मूळव्याधीचा त्रास बराच झाला, तो शेवटच्या शस्त्रक्रियेनें साफ मिटला. तथापि स. १९४९ त दोन महिने व पुनः स. १९५१ त दोन तीन महिने असे दोन जिवावरचे आजार मला सहन करावे लागले, त्यांचें थोडें दिग्दर्शन करणें अवश्य आहे.

स. १९४९ च्या सुरुवातीस अंगास तीव्र कंड सुटूं लागला. मुंबईस जाऊन सर्व तपासणी केल्यावर कांहीं औषधयोजना झाली. मी अंग खाजवून बेजार झालों. मुख्यतः वृषणाला नखाचें विष बाधून सूज आली आणि एप्रिलच्या २६ तारखेस रात्रीं सडकून ताप आला. त्या दिवशीं रविवार असल्यामुळें भाऊ माझ्याजवळ होते. माझा वाखा पाहून ते सकाळींच तळेगांवला गेले आणि दोन तासांच्या आंत त्यांनीं मला मोटारीनें तळेगांवच्या हॉस्पिटलमध्यें नेलें. तेथें एक महिना मी अत्यवस्थ होतों. निभावेन असें कोणास वाटलें नव्हतें. कौटुंबिक व आप्त मंडळी सर्व भेटून विचारपूस करून गेली. डॉक्टर फाटक व वाघेवाडकर ह्यांनीं शिकस्त केली म्हणूनच मी वांचलों. जवळ शुश्रूषेस सईताई सारखी खपत होती. सर्व शरीरास विष बाधून चामडीच्या खपल्या पडून नवीन त्वचा आली. सारखा हा कातडीचा भुगा कपड्यांत पडे. वृषणाला बाहेरून तळहाताएवढें एक कवच बनलें तें शेवटीं कापून काढतांच उतार पडला.

२६ एप्रिलला आजारी झालों तो दोन महिन्यांनीं २८ जूनला परत कामशेतला आलों. तदनंतर प्रकृति झपाट्यानें सुधारली आणि कांहीं अंशीं मी पहिल्या-पेक्षांही जास्त टवटवीत बनलों.

ह्यानंतर सुमारें दीड वर्षानें स. १९५१ सालीं लघवीचा विकार उद्भवला. लघवी मोकळेपणीं न होतां अवरोध होऊं लागल्यामुळें मूत्र-ग्रंथि वाढल्याचें तपासाअंतीं कळून आलें. तो ग्रंथि समूळ कापून टाकल्या-शिवाय आराम पडणार नाहीं असा डॉक्टरी सल्ला पडला. नाजूक ठिकाणची ही शस्त्रक्रिया झेपेल कीं नाहीं ह्याची शहानिशा सडकून झाली. मुंबईस डॉ. जोगळेकर हे ह्या शस्त्रक्रियेंत चांगले निष्णात होते, त्यांनीं एक दोन आठवडे बारकाईनें तपासणी करून प्रोस्टेटग्रंथि कापण्याचें ठरविलें. लॅमिंग्टन रोडवरील गोखल्यांच्या नर्सिंग होममध्यें मला नेलें. तेथें मंगळवार ता. ३ जुलई रोजीं जोगळेकरांनीं अत्यंत कुशलतेनें तो ग्रंथि कापून काढला. त्या दिवशीं अमावास्या होती, पण मला हें ज्योतिषाचें कुलंगडें कधींच मान्य नव्हतें. सकाळीं ९-२० पासून १०-१५ पावेतों मी मेजावर पडून सर्व क्रिया आनंदानें पाहत होतों. कमरेखालचें शरीर सर्व बधिर. ग्रंथि काढला तो लाल मांसाचा गोळा डॉक्टरांनीं मला दाखविला. नंतर त्यांनीं मला शेजारच्या खोलींत आणून पलंगावर निजविलें.

मुख्य भाग संपला, पण पुढचा पाऊण महिन्याचा विधि मात्र मला भारी कष्टमय वाटला. ह्या अवधींत एकाच पलंगावर पडून लघवीसाठीं दुसरें खरी नळीचें द्वार वापरणें हें मोठें संकट वाटे. त्यांतच एके दिवशीं थंडी वाजून हुडहुडी भरली तो अनुभवही उद्वेगकर भासला. सईताई, इंदुबाई इत्यादींनीं रुग्णालयांत मला कांहीं एक उणें पडूं दिलें नाहीं. पंचवीस दिवस न समजतां केव्हांच निघून गेले. ह्या मुदतींत अनेक आप्तइष्ट व स्नेहीसोबती माझ्या समाचारास येऊन प्रकृतीची विचारपूस करून जात. सर्वांनाच दुखणें जिवावरचें वाटत होतें, मला मात्र तसा भास कधींच झाला नाहीं. माझ्या उतावळ्या स्वभावामुळें कित्येक पृच्छकांस मीं नाराज केलें असें मागाहून मला कळलें. मी अशा माझ्या दुष्कृतीबद्दल मनापासून क्षमा मागतों. होऊन गेलेल्या आगळिकीबद्दल अद्यापपावेतों मला सारखा पस्तावा वाटतो.

माझें मोठें भाग्य हें कीं माझी शरीर-रचना सर्वथा निर्दोष होती. फक्त त्या एका ग्रंथीच्या पलीकडे अन्य व्यंग म्हणून बिलकूल नव्हतें. म्हणूनच मी इतक्या लवकर पहिल्यासारखा खडखडीत बरा झालों. ब्लडप्रेशर, डायबेटिस असले कांहींच विकार मला नव्हते. शिवाय मी आज कैक वर्षे सोनामुखीच्या शेंगांचें पाणी घेऊन मलावरोध कधीं होऊं दिला नाहीं. जोगळेकरांनीं सांगितलें त्या सेनापॉडसच्या रसांत थोडा कॅस्कारा-सॅग्राडा मिसळीत जा. ही गोष्ट माझ्या उत्कृष्ट उपयोगास आली. दररोज शौचास साफ होऊन एनिमाची गरज उरली नाहीं. मी लवकर बरा होण्याचें हें एक मुख्य कारण आहे. रोजरोज रेचकें घेऊं नयेत हें खरें, पण शौचास साफ होणें एकंदर शरीररचनेचें प्रधान अंग असून उत्तरावस्थेंत तर नेहमींच कांहीं तरी सारक घेत राहणें शरीरस्वास्थ्यास अत्यंत अवश्य आहे. सेना-शेंगा व हा कॅस्कारा माझा आतां परम सोबती बनला आहे. त्यांतल्या त्यांत हाच एक उपाय सर्वांत कमी निर्दोष मला वाटतो आणि तो मी स्वीकारतों. तोही आतां काम देईनासा झाला असून मलावरोधाचा त्रास हल्लीं चालू आहे.

शस्त्रक्रियेनंतर मला बरें वाटूं लागलें. डॉ. जोगळेकर सकाळ-संध्याकाळ येऊन विचारपूस करून जात व धीर देत. दररोज जखम धुवायची, ड्रेसिंग करायचें त्याचा मोठा बाऊ वाटे. थोडें बहुत दुखे पण डॉक्टर मला इजा वाटूं नये म्हणून अत्यंत जपत. त्यांतून दररोज शौचाचें वस्तान ठीक बसल्यामुळें एनिमाची कटकट चुकली आणि मला शीघ्र आराम वाटूं लागला. नर्सिंगहोमचें भोजन चांगलें असे, पण तो एक रोजचा ठरीव प्रघात, त्यांत बदल कांहीं नाहीं ह्याचा मला कंटाळा येई आणि अन्न दृष्टीसमोर नकोसें वाटे. पण सईताई बाजारची ब्रेड, तऱ्हेतऱ्हेचीं बिस्किटें व फळें वगैरे मुद्दाम आणून मला पुरेसें अन्न पोंचवी. १३ जुलई रोजीं डॉ. जोगळेकरांनीं लघवीची खरी नळी बंद करून कॅथेटर घालून त्यानें लघवी काढण्याचें ठरविलें. त्या दिवशीं क्लोरोफॉर्म देऊन बेशुद्धि आणावी लागली. कापलेल्या जखमेंतील लघवींत रक्ताचे गोठलेले कण आढळून आले ते काढतांना हें एक नवीन प्रकरण उद्भवलें. त्या दिवशीं मला भारी थकवा आला आणि प्रकृतींत पुष्कळशी पीछेहाट झाली. दररोज थोडा ताप चढूं लागला. परंतु झोप व शौच्य ह्या दोन गोष्टी व्यवस्थित चालल्यामुळें पुनः

सर्व लवकर सुधारलें. पहिल्या शस्त्रक्रियेपासून दोन आठवड्यांनीं प्रकृतिमान झपाट्यानें बदलून मला धीर आला कीं मी आतां भीतीचा कोपरा ओलांडून सुधारणेच्या मार्गास लागलों. जोगळेकरांनीं आश्वासन दिलें कीं ह्या शस्त्रक्रियेस सामान्यत: २८ दिवस लागतात, पण मला २१-२२ दिवसांतच घरीं जाऊं देऊं. मात्र हें आश्वासन थोडें अपुरें पडलें. २५ दिवसांनीं तारीख २८ रोजीं नर्सिंगहोम सोडून मी भाऊंच्या घरीं आलों. दरम्यान बगूताई, गोदूताई, द्वारकूताई वगैरे मला भेटून कांहीं दिवस राहून गेल्या. आबा ता० २० च्या अंदाजांत सोलापुरास गेले. मी त्यांना जाऊं देत नव्हतों, पण त्यांचें निकडीचें काम असून मजकडे त्यांचा उपयोगही नव्हता, म्हणून ते थोड्याशा खिन्न अंत:करणानेंच मला सोडून गेले. भाऊ जवळ होतेच, म्हणून आबांची जरूर मुळींच नव्हती.

आजार बरा होणें किंवा विकोपास जाणें हा प्रकार जसा डॉक्टरांच्या कसबावर अवलंबून आहे, तसाच तो त्या माणसाच्या अंतर्भावनेवरही पुष्कळ अवलंबून आहे. मी बरा होणार, माझी प्रकृति माझ्या हातची आहे, सर्वथा डॉक्टरांच्या आज्ञा पाळून त्यांस मनापासून मीं पाठिंबा दिला पाहिजे, निराशेची झळ मनास बिलकूल लागूं देऊं नये. आजारांतही मी दररोज माझी डायरी लिहीत असें. कांहीं वाचन थोडेंबहुत करीं. टाइम्स तर मुद्दाम न चुकतां वाचीं. शिवाय माझें जयपुर कॉंग्रेसचें भाषण टाइप होऊन आलें तें सर्व दुरुस्त केलें. त्याच वेळीं बडोद्यास परमानंदकाव्य छापत होतें, त्याचीं प्रुफें टपालनें येत तीं मीं पडल्या पडल्या सर्व वाचून दुरुस्त करून जेव्हांच्या तेव्हां रवाना केलीं. मुद्रकांची खोटी बिलकूल कधीं केली नाहीं. मात्र हें काम अर्धा तास फार तर करीं. जास्त वेळ केल्यास थकवा येई. थोडी विश्रांति, थोडी झोप, चहापाणी, डॉक्टरांच्या व इतरांच्या भेटी ह्यांत तो वेळ केव्हांच निघून गेला. २४ जुलईच्या डायरींत परमेश्वर थोर आहे, माझा साह्यकर्ता आहे, तो मला खात्रीनें बरा करणार, सत्यायशींच्या उमरींत अशी भीषण शस्त्रक्रिया अंतर्गत नाजूक अवयवाची करण्यास धजणें हा माझा एक प्रकारचा अनुपम विक्रमच होय असें मीं लिहून ठेविलें. मी परमेश्वराचें अस्तित्व मानणारा नाहीं, पण त्या परमोच्च शक्तीचें साह्य मिळविणें माझ्या हातांत आहे अशी माझी निष्ठा आहे. प्रत्येक इसम आपला आपण शत्रु किंवा मित्र होय ह्यांत संशय नाहीं.

शस्त्रक्रियेच्या २६ व्या दिवशीं मला डॉक्टरांनीं नार्सिंग होममधून घरीं जाण्यास अनुज्ञा दिली. मला स्वतःच्या पायांवर उभें राहतां येत नव्हतें. मोठ्या शिकस्तीनें काठी टेकीत लिफ्टपर्यंत आलों. खालीं जवळ मोटार उभी होती तींत बसवून मंडळींनीं मला भाऊंच्या घरीं आणिलें. मोटारींतून उतरून खुर्चींत बसवून मला त्यांनीं वर खोलींत पलंगावर आणून निजविलें. पण एवढेही श्रम मला सोसले नाहींत. मी अत्यंत अस्वस्थ झालों. नाडी जोरांत वाढली. दुसऱ्या दिवशीं रविवारीं भाऊ तळेगांवास गेले आणि संध्याकाळीं मला एकदम थंडी वाजून ताप भरला, तो १०३-४° इतका होता. अरविंद व डॉ. परांजपे आले त्यांनीं इंजेक्शन दिलें. झोपेचें औषध दिलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं माझें उष्णतामान १००° होतें. थकवा फार आला. मिळून नर्सिंगहोममधून आल्यावर प्रकृतींत थोडासा व्यत्ययच आला. डॅा. वाड ह्यांनीं तपासून उपचार सांगितले. तीनचार दिवस दुपारीं ताप १००° पर्यंत चढे, मग निघाला. वाडांनीं अंग रगडून तेल व लिंबू लावण्यास सांगितलें. तो प्रयोग मला पुष्कळच हितकर वाटला आणि अल्पकाळ चालू ठेवला. मला ऊन पाण्याचें स्नान आवडत नाहीं पण अंग रगडून तेल लावल्यावर गरम पाणीच वापरलें पाहिजे. उत्तरोत्तर मी नेहमींच्या थंड पाण्याचा वापर सुरू केला आहे.

ता. २८ जुलई पासून १८ ऑगस्टपर्यंत भाऊंच्या घरीं राहिल्यावर त्यांनीं मला मोटारीनें कामशेतला आणिलें. येथें येतांच प्रकृति ताबडतोब सुधारली आणि मूत्रग्रंथीची ब्याद संपली. त्या पुढील स. १९५२ व १९५३ ह्या दोन वर्षांत मी सर्वथा निखालस खडखडीत झालों आणि कामही भरपूर केलें. दररोज चार पांच मैल पायीं फिरण्याचा माझा सराव चालू राहिला. आतां अलीकडे स. १९५४ पासून मला वार्धक्य जाणवूं लागलें आहे. पोटांत वायु होतो त्याचें निःसरण झाल्याशिवाय मलविसर्जन होत नाहीं आणि कोठा साफ नसला कीं अस्वस्थता प्राप्त होते. सबब पोटांतील वायु बंद करण्याचे उपाय हल्लीं चालू आहेत. स. १९५४ च्या ऑगस्ट महिन्यांत मुंबईस जाऊन डॉ. वाड ह्यांनीं उपचार सांगितले ते हल्लीं करीत आहें. डॉक्टरांच्या तपासणींत कोणतेंही व्यंग दिसून आलें नाहीं. वय वाढत आहे त्याचा परिणाम होणारच. शरीराची ताकद आतां पुष्कळ कमी झालेली वाटते. कदाचित् आहारही

थोडाथोडा कमी होत असावा. यंदां स. १९५५ त वर्षाकाळ सर्वत्रच तीव्र बनला. दोनशें वर्षांत असा प्रचंड पर्जन्य अनुभवांत नव्हता. बंगाल-बिहारमध्यें तर नद्यांच्या पूरांनीं भीषण आपत्ति उत्पन्न झाली आहे. मला डोंगरावर फिरण्याची उत्कट आवड ती आतां आवरावी लागते. उत्साह कमी नाहीं, झोंप चांगली येते, क्षुधा लागते, सात आठ तास लेखन वाचन करूं शकतों पण शरीरयष्टि खालावत असून बोलण्याचे वगैरे श्रम लगेच भासूं लागतात, हाताला कंप सुटतो, दांत, नेत्र, कर्ण इत्यादि गात्रें कमकुवत बनत असून आजपर्यंत वार्धक्य वाटत नव्हतें तें आतां जाणवूं लागत आहे. तरी मी जपून वागत आहें. जवळचीं माणसें अत्यंत अगत्य ठेवून माझें सर्व व्यवस्थित चालवितात. भाऊ-आबांसारखे बंधु, मकरंद-अरविंदासारखे पुढील पिढीचे समस्त मुलगे माझ्या भजनीं राहतात, सईताई वगैरे तिघी बहिणी माझी निगा ठेवण्यांत सदा तत्पर असतात, असा जीवनयोग संसारांत फारच थोड्यांना मिळतो. गेल्या फेब्रुवारींत मी हैदराबादचा प्रवास करून आलों, त्याच्या आदल्या वर्षी दिल्ली, जयपूरचे प्रवास झाले, हे प्रकार आतां बंद होतीलसें वाटत आहे. तथापि मनाचा हुरूप यत्किंचित् कमी नसून स्वास्थ्य व समाधानवृत्ति आजपावेतों लाभली तशी ती अखेरपावेतों टिकावी एवढीच उत्कंठा सदैव अंतःकरणांत वागते.

४. प्रस्तुत

सारखें कांहीं तरी काम हातांत पाहिजे ह्या दृष्टीनें मी हें ‘संसारयात्रा’ प्रकरण मुद्दाम हातीं घेतलें. कदाचित् हेंच माझें अखेरचें लेखन ठरेल. आज दहा पांच वर्षें हा विषय मनांत घोळत असून जेव्हां जसे विचार उद्भवले, तसे हे मी लिहीत गेलों. उत्तरोत्तर त्या लेखांचें मोठें भारूड बनलें, तेणेंकरून काय घ्यावें आणि काय टाकावें ह्याचा कायम निश्चय करणें प्राप्त झालें. आबा, भाऊ वगैरेंस हे भाग वाचण्यास दिले. त्यांच्या सूचना स्वीकारल्या. गेल्या कित्येक दिवसांत सर्व लेखावर फिरून नजर टाकून मी हें काम आतां हातावेगळें करीत आहें. ह्यासंबंधींचे माझे विचार मीं स्पष्टतेनें ठिकठिकाणीं मांडले असल्यामुळें जास्त सांगणें कांहीं राहत नाहीं. हल्लींचा मोठा चर्चेचा विषय म्हणजे नवीन शोधांनीं निर्माण

झालेलें जागतिक स्थित्यंतर. त्याचें स्वरूप कसें व्यापक आहे तें मुद्दाम मीं ' तेव्हां व आतां ' ह्या शीर्षकानें स्वतंत्र दाखविलें आहे.

माझ्या एकंदर जीवनोद्योगांत माझी कुटुंबिनी गंगूमाई ह्यांचें अंग मुख्य असल्यामुळें त्यांनीं स्वेच्छेनें लिहून ठेवलेल्या कित्येक गोष्टी मुद्दाम मीं ह्या प्रकरणांत स्वीकारल्या आहेत, कीं जेणेंकरून माझ्या ह्या कृतींत माईचेंही स्मरण कायम राहवें. श्यामकान्तचीं पत्रें ह्या पुस्तकांतील " माझें हृद्गत " आणि ' स्त्री'मासिकाच्या स. १९४३ च्या एप्रिल अंकांतला ' माईचें निधन ' हा लेख ह्या दोन्ही माझ्या कृति मी अत्यंत हृदयस्पर्शी समजतों. त्यांत मनाचा उमाळा स्पष्ट उमटलेला आढळेल. अलीकडे " कै. सयाजीरावांच्या आठवणी " पुण्याच्या स्वराज्य साप्ताहिकांत प्रसिद्ध केल्या त्यांचे नऊ लेख तशाच स्वरूपाचे गणतां येतील, (सेप्टेंबर, ऑक्टोबर १९५५). इत उत्तर प्रयाणाची वेळ केव्हां येते सांगवत नाहीं, परंतु तत्पूर्वी हें माझें पुराण वाचकांच्या हातीं पडेल तर मी आपणास कृतकृत्य समजेन.

महार्घतेच्या दिवसांत विस्तार कमी करण्यासाठीं पुष्कळ गोष्टी व कौटुंबिक हकीकती कमी कराव्या लागल्या, त्याबद्दल आप्तांनीं मला क्षमा करावी.

वेळ जाण्यासाठीं हातांत सदा कांहीं काम पाहिजे, ह्यास्तव अलीकडे मी मुलांसाठीं '**राजा शिवाजी**' हें पुस्तक लिहिलें आहे. मिळून एकंदरींत काळ बरा जातो. अत्यंत समाधानानें प्रयाणमार्गानें माझा प्रवास चालला आहे. सच्चिदानंददाता सर्व कांहीं ठीक करील, एवढें सांगून मी वाचकांचा निरोप घेतों.

गो. स. सरदेसाई

कामशेत, ता. १ डिसेंबर स. १९५५.

टिळक ग्रंथसंग्रहालय
१८७४ | ५८ | सा | हि
वाई जि. सातारा

[illegible] | 上 | 7076